# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह



मंगळवार दि. २५/०१/२०२२ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०७ दि. १७/०१/२०२२ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता Video Conferencing द्वारे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | महापौर |
| २) | गेहलोत हसमुख मोहनलाल | उपमहापौर |
| ३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सभागृह नेता |
| ४) | शाह राकेश रतिशचंद्र | सभापती, स्थायी समिती |
| ५) | पाटील धनेश परशुराम | विरोधी पक्षनेता |
| ६) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ७) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ८) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ९) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| १०) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| ११) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| १२) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| १३) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १४) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १५) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| १६) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १७) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १८) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १९) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| २०) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २१) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| २२) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| २३) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २४) | जैन गीता भरत | सदस्या. |
| २५) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २६) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |
| २७) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| २८) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| २९) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| ३०) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| ३१) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३२) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| ३३) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| ३४) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३५) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ३६) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ३७) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३८) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ३९) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ४०) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४१) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| ४२) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४३) | मेहता डिम्पल विनोद | सदस्या |
| ४४) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४५) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४६) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४७) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ४८) | चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ४९) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ५०) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ५१) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५२) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५३) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५४) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५५) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ५६) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५७) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ५८) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ५९) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६०) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ६१) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ६२) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ६३) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ६४) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६५) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ६६) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६७) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ६८) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६९) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ७०) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ७१) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ७२) | भट दीप्ती शेखर | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ७३) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ७४) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ७५) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ७६) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ७७) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ७८) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ७९) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ८०) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ८१) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ८२) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ८३) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ८४) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ८५) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |
| ८६) | बगाजी शर्मिला विन्सन्ट | सदस्या |
| ८७) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |
| ८८) | शर्मा भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८९) | ॲड शफीक अहमद सादत खान | नामनिर्देशित सदस्य |
| ९०) | भोसले अनिल बाबुराव | नामनिर्देशित सदस्य |
| ९१) | अजित भगवान पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ९२) | सिंह विक्रमप्रताप रमाप्रती | नामनिर्देशित सदस्य |

गैरहजर सदस्य -

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| ३) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| ४) | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | सदस्या |
| ५) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ६) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |

रजेचा अर्ज - निरंक

मा. महापौर :-

सचिव साहेब सभेला सुरुवात करा.

नगरसचिव :-

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा मंगळवार दि.२५/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० Video Conferencing द्वारे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी Video Conferencing द्वारे आयोजित महासभेमध्ये सर्व सन्मा. सदस्यांनी सहभाग घ्यावा हि विनंती. आजच्या कामकाजाला सुरुवात करण्या पुर्वी आपण आज दोन शपथ घेणार आहोत पहिली शपथ आहे आज राज्य मतदार दिन आहे. दर वर्षी आपण राज्य मतदार दिवस साजरा करत असतो तर त्या निमित्ताने आज एक राष्ट्रीय मतदार दिन ह्या निमित्ताने मतदाराने घ्यावयाची शपथ ही अधी घेणार आहोत. त्याच्या नंतर माझी वसुंधरा अंतर्गत सगळ्यांनी आपआपल्या जागेवर

उभे रहायचे आहे आणि हात पुढे करुन मी शपथचे वाचन करील त्याप्रमाणे आपण माझा पाठीमागे त्या शब्दांचे उच्चारण करायचे आहे आणि शपथ घ्यायची आहे. सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे आपण आपआपल्या जागेवर उभे राहून उजवा हात पुढे करायचा आहे आणि आपण शपथ घ्यायची आहे.

आज आपण ह्या सभागृहामध्ये सत्कार आयोजित केलेला आहे काही व्यक्तिंचा त्यापैकी केंद्रीय सशस्त्र दलाच्या असिस्टंट कमांडन पदी संपुर्ण देशातुन मुलींमध्ये पहिली आलेल्या मिरा भाईंदरच्या भावना सुभाष यादव यांचा महापालिकेच्या वतीने गौरव करण्यात येत आहे. भावना सुभाष यादव ह्या मिरा रोडच्या रहिवाशी आहेत भावना यादव यांचे प्राथमिक शिक्षण यांचे प्राथमिक शिक्षण मुंबई मध्ये तर माध्यमिक शिक्षण मिरारोड येथे झालेले आहे. त्यांनी एम.एस.सी. पर्यंत शिक्षण केलेले आहे. आणि केंद्रीय सशस्त्र दलाचा असिस्टन कमांडर पदी संपुर्ण देशातुन मुलींमध्ये त्या पहिल्या आलेल्या आहेत त्याबदल महापालिकेच्या वतीने त्यांचा शाल स्मृती चिन्ह पुष्पगुच्छ देवून मा. महापौरांच्या हस्ते सत्कार करण्यात येत आहे.

त्यानंतर कु. अलिशा जहिर चौधरी इला कराटे आणि क्रिडा क्षेत्रामध्ये अनेक पदक प्राप्त झालेली आहेत त्याबदल त्यांचा देखील आपण सत्कार करणार आहोत. अलिशा जहिर चौधरी यांना कराटे या क्रिडा क्षेत्रामध्ये गोल्ड सिल्वर आणि कांस्य असे नॅशनल आणि इंटरनॅशनल पदक प्राप्त झालेली आहेत त्याबदल त्यांचा मिरा भाईंदर महानगरपालिका तर्फे शाल पुष्पगुच्छ आणि स्मृती चिन्ह देवून त्यांचा गौरव करण्यात येत आहे सत्कार करण्यात येत आहे. अलिशा जहिर चौधरी इला क्रिडा क्षेत्रामध्ये नॅशनल व इंटरनॅशनल स्तरावरती पदक प्राप्त झालेली आहेत त्याबदल मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे तिचा गौरव करण्यात येत आहे.

तसेच कासिम नाळकर आंतरराष्ट्रीय दिल्ली आगरा येथे कराटे स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावले आहे. कासिम नाळकर यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर नुकत्याच झालेल्या आयोजित केलेल्या कराटे चॅम्पियनशीप मध्ये अनेक देशांना पराभुत करुन देशाचे नाव उंच्चावले आहे. कासिम नाळकर हे मिरा रोड पुर्व येथील नयानगर येथील राहिवाशी आहेत. ते मिक्स मार्शलआर्टस किक्क बॉक्सींग आणि तायकाँदो मध्ये राज्यस्तरीय विजयता आहेत त्यांचा देखील शाल आणि पुष्पगुच्छ देवून महापालिका तर्फे सत्कार करण्यात येत आहे.

त्यानंतर मिरा भाईंदर शहरातील दैनिक महाराष्ट्र टाईम्सचे पत्रकार श्री. भाविक पाटील व दैनिक पुन्य नगरीचे पत्रकार श्री. नामदेव काशिद यांचा उत्कृष्ठ पत्रकार म्हणून महापालिका वार्ताहार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आलेला आहे. मिरा भाईंदर शहरातील स्थानिक नागरीक तसेच पत्रकार या नात्याने त्यांनी पत्रकारीतेच्या क्षेत्रात उत्कृष्ठ कामगीरी केल्याबद्दल महापालिकेच्या सभागृहाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात येत आहे. भाविक पाटील यांचा सत्कार मा. महापौर शाल आणि पुष्पगुच्छ देवून करीत आहेत. तसेच दैनिक पुन्य नगरीचे पत्रकार श्री. नामदेव कासिद यांचा देखील ह्या ठिकाणी सत्कार मा. महापौर मॅडम यांच्या हस्ते शाल आणि पुष्पगुच्छ देवून करण्यात येत आहे. भाविक पाटील आणि नामदेव काशिद यांचे अभिनंदन. धंन्यवाद.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने सन - 2021-22 करीता दैनंदिनी छपाई केलेली आहे त्या दैनंदिनीचे प्रकाशन आपण आता मा. महापौरांच्या हस्ते करणार आहोत. महापालिकेतर्फे दरवर्षी आपण दैनंदिनीची छपाई करत असतो ती छपाई ह्यावर्षी आपण वेळेमध्ये सगळ्यांना उपलब्ध करुन देत आहोत. दैनंदिनीचे प्रकाशन उत्घाटन झालेले आहे असे मा. महापौरांच्या वतीने मी घोषीत करतो. लवकरच भांडार विभागातर्फे त्याचे वितरण लगेचच सुरु करण्यात येणार आहे.

मा. महापौर :-

सचिव साहेब विषयाला सुरुवात करा.

नगरसचिव :-

आजच्या विषय पत्रिकेवरील कामकाजाच्या अनुषंगाने आपण आधी प्रश्नोत्तरांच्या तासाला सुरुवात करत आहोत. 11 वाजुन 42 मिनिटे झालेली आहेत. पहिला प्रश्न आहे श्री. अजित भगवान पाटील सदस्य यांनी विचारलेला पहिला प्रश्न आहे महानगरपालिकेने शहरातील उद्याने व मैदाने याबाबतचा आहे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, एक सभागृहाला विनंती करायची आहे आजची महासभा सुरु होण्यापुर्वी सन्मा. सदस्यांना माझी विनंती आहे की आजची ही सभा खेळीमेडीच्या वातावरणामध्ये याठिकाणी पार पाडायची आहे. शहराच्या विकासाचे जे प्रश्न आहेत ते आपल्याला मार्गी लावायचे आहेत आणि उद्या 26 जानेवारी असल्या कारणाने महापौर मॅडम प्रत्येक नगरसेवकांच्या वॉर्डामध्ये शहरामध्ये ठिक ठिकाणी ह्या 26 जानेवारीचा कार्यक्रम असतो. तर लवकरात लवकर आपण हे सर्व विषय मार्गी लावून ही सभा शांततेत पार पाडावी ही मी सर्व सदस्यांना विनंती करत आहे. सचिव साहेब, महापौर मॅडम विषय असा आहे की आता जो प्रश्नोत्तराचा तास आहे गेल्या महासभेतही हा विषय झालेला आहे आणि ऑलरेडी तो विषय विषय पत्रिकेवरती आहे त्यामुळे प्रश्नोत्तर तासामध्ये वेळ न घालवता आपण विषयाला सुरुवात करावी जेणे करुन तो विषय विषयपत्रिकेमध्ये आहे तर ज्यावेळी तो विषय विषयपत्रिकेवर येईल त्यावेळेला ती चर्चा करावी.

मा. महापौर :-

ठिक आहे विषयाला सुरुवात करा.

नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाकडून आजच्या महासभेकरीता 2 के खाली एक विषय प्राप्त झालेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर वसुलीबाबत नागरीकांना मालमत्ता करात सवलत देणे करीता अभय योजना लागु करणे. हा विषय प्रशासनाकडून सभागृहाच्या पटलावरती आलेला आहे तर त्याला सभागृहाची मान्यता आहे किंवा कसे याबाबत आपण आपलं मत जाहिर करावे. गटनेत्यांनी आपले मत जाहिर करावे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम माझी पुन्हा एकदा सर्व गटनेत्यांना विनंती राहील की गेल्या वर्षीही मा. आयुक्तांनी ह्या अभय योजनेसाठी मिरा भाईंदर करीता ही अभय योजना लागु केली होती आणि त्याही विषयावरती मी मा. महापौर मॅडम आणि मा. आयुक्त महोदयांना पत्र दिले होते की ह्याही वर्षी फेब्रुवारी ते मार्च 31 पर्यंत ही अभय योजना लागु करावी जेणे करुन ह्या कोविडचा वाढता प्रादुर्भाव ह्या ठिकाणी ह्या मिरा भाईंदर शहरामध्ये नागरीकांना ह्या व्याजाच्या याच्यामधुन थोडी सुट मिळेल जी गेल्या वर्षी आपल्याला 75 टक्के आपण जी सुट दिली होती ती ह्याही वेळेला पुनष्च करावी अशी मी सर्व गटनेत्यांना विनंती करतो आणि त्यांनी ह्या अभय योजनेला आपला प्रतिसाद द्यावा अशी मी त्यांना विनंती करत आहे. धंन्यवाद.

जुबेर इनामदार :-

काँग्रेस लोकशाही आघाडीच्या वतीने ह्या विषयाला आम्ही मान्यता देत आहोत ह्या विषय चर्चेला घ्यावा आणि त्यावर निर्णय व्हावा अशी अपेक्षा करतो. याचा गोषवारा मात्र आम्हाला प्राप्त नाही.

नगरसचिव :-

तो 2 के खाली आताच विषय प्राप्त झालेला आहे त्यामुळे तुम्हाला तो भेटला नाही. हो म्हटल्यावर आम्ही लगेच तुम्हाला गोषवारा तुमच्या व्हॉटअॅपवर आणि मेल द्वारे पाठवतो. विषय हा

सगळ्यात शेवटी घेण्यात येईल विषय पत्रिकेवरील विषय संपल्या नंतर हा विषय घेण्यात येईल. सभागृहाची याला मान्यता आहे का ?

मा. महापौर :-

ठिक आहे विषयाला सुरुवात करा.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 80, दि. 02/09/2021 रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

प्रशांत दळवी :-

02/09/2021 रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे.

अनिल विराणी :-

माझे अनुमोदन आहे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम सगळ्यांचे माईक बंद असल्यामुळे सन्मा. सदस्यांचा आपल्याकडे येणाऱ्या लेखी दुरुसत्या किंवा सुचना काही असतील तर त्यामध्ये त्या समाविष्ठ करुन घेण्यात याव्यात. धंन्यवाद.

मा. महापौर :-

लेखी दुरुस्त्यांसह ठराव सर्वानुमते मंजुर.

प्रकरण क्र. 80 :-

दि. 02/09/2021 रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. 64 :-

02/09/2021 रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 81, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करुन पालिका सदस्यांमधून सदस्यांची नेमणूक करणे. तसेच ३(३) नुसार बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींची सदस्य संख्या निश्चित करुन नेमणूक करणे

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, यांची घोषणा होणेपुर्वी एक अभिनंदनाचा ठराव आहे आणि ते ध्रुवकिशोर पाटील वाचत आहेत तर हा अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यात यावा.

ध्रुवकिशोर पाटील :-

अभिनंदन ठराव मांडत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडे सद्यस्थितीत 74 बसचा ताफा असुन सुसज्ज असा बस डेपो व वर्कशॉप घोडबंदर येथे उभारला आहे. घोडबंदर बस डेपो मागील दोन वर्षापासून कार्यान्वीत करण्यात आला असुन डेपोमध्ये अत्याधुनिक यंत्र सामुग्री व इन्टॅलिजन्ट ट्रान्सपोर्ट सिस्टीम (ITS) जागतिक बँकेच्या अर्थसहाय्यातुन उभारण्यात आलेली आहे.

कोविड-19 च्या प्रादुर्भावामुळे मागील जवळपास दोन वर्षापासून आपण लढा देत आहोत. या कालावधी मध्ये अनंत अडीअडचणी असतानाही परिवहन समिती व परिवहन उपक्रमाने केलेली कामगिरी नोंद घेण्याजोगी आहे.

मागील 2 वर्षामध्ये परिवहन उपक्रमाने उल्लेखनीय अशी कामगिरी केली आहे. यामध्ये प्रामुख्याने घोडबंदर बस डेपोचे संचालन, “माझी बस” मोबाईल ॲपचे लोकार्पण, नविन 08 बस मार्गाचे लोकार्पण, जुने बस मार्ग सुरु करणे / बदल करणे, दिव्यांगांना तिकीटामध्ये 100% सवलत, जागतिक महिला दिनानिमित्त महिलांना एक दिवस मोफत प्रवास इ. बाबींचा उल्लेख करावा लागेल. तसेच परिवहन उपक्रमाकडील सद्यस्थितीत 74 बस पैकी 70 बस म्हणजेच 95% बस दैनंदिन मार्गावर चालविल्या जात असुन दैनंदिन नियोजित केलेल्या 98% पेक्षा जास्त फेऱ्या पूर्ण केल्या जात आहेत.

मिरा भाईंदर परिवहन बस सेवेत एक दिवसात प्रवास करण्याऱ्या प्रवासी संख्येचा 60,000 चा टप्पा डिसेंबर 2021 मध्ये गाठला असुन, ही मागील कित्येक वर्षातील उच्चांकी संख्या आहे. या उल्लेखनीय कामगिरीसाठी मा. आयुक्त- श्री. दिलीप ढोले, परिवहन समितीचे मा. सभापती - श्री. दिलीप जैन, मा. अतिरीक्त आयुक्त - डॉ. संभाजी पानपट्टे, श्री. विजयकुमार म्हसाळ, सर्व सन्मा. सदस्य - श्री. मंगेश आत्माराम पाटील, श्री. राकेश सतिशचंद्र शाह, श्री. अन्सारी रशिद अन्वर, श्री. उपाध्याय देविप्रसाद जगन्नाथ, श्री. जागुष्टे अविनाश अरविंद, श्री. टॉमस अंतोन ग्रेसीयस, श्री. पाटील विशाल रघूनाथ, श्रीम. वनिता शंकर बने, श्री. म्हात्रे राजेश हरिश्चंद्र, श्री. लक्ष्मण बुधाजी कांदळगावकर, श्री. शिवशंकर सत्यनारायण तिवारी, श्री. राजकुमार देवनारायण मिश्रा आणि परिवहन उपक्रमाचे प्रभारी उपायुक्त - श्री. स्वप्निल सावंत, सहा. आयुक्त - श्री.दिलीप जगदाळे, श्री. दिनेश कानगुडे व सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

प्रशांत दळवी :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजुर.

**अभिनंदन ठराव क्र. 63 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडे सद्यस्थितीत 74 बसचा ताफा असुन सुसज्ज असा बस डेपो व वर्कशॉप घोडबंदर येथे उभारला आहे. घोडबंदर बस डेपो मागील दोन वर्षापासून कार्यान्वीत करण्यात आला असुन डेपोमध्ये अत्याधुनिक यंत्र सामुग्री व इन्टॅलिजन्ट ट्रान्सपोर्ट सिस्टीम (ITS) जागतिक बँकेच्या अर्थसहाय्यातुन उभारण्यात आलेली आहे.

कोविड-19 च्या प्रादुर्भावामुळे मागील जवळपास दोन वर्षापासून आपण लढा देत आहोत. या कालावधी मध्ये अनंत अडीअडचणी असतानाही परिवहन समिती व परिवहन उपक्रमाने केलेली कामगिरी नोंद घेण्याजोगी आहे.

मागील 2 वर्षामध्ये परिवहन उपक्रमाने उल्लेखनीय अशी कामगिरी केली आहे. यामध्ये प्रामुख्याने घोडबंदर बस डेपोचे संचालन, “माझी बस” मोबाईल ॲपचे लोकार्पण, नविन 08 बस मार्गाचे लोकार्पण, जुने बस मार्ग सुरु करणे / बदल करणे, दिव्यांगांना तिकीटामध्ये 100% सवलत, जागतिक महिला दिनानिमित्त महिलांना एक दिवस मोफत प्रवास इ. बाबींचा उल्लेख करावा लागेल. तसेच परिवहन उपक्रमाकडील सद्यस्थितीत 74 बस पैकी 70 बस म्हणजेच 95% बस दैनंदिन मार्गावर चालविल्या जात असुन दैनंदिन नियोजित केलेल्या 98% पेक्षा जास्त फेऱ्या पूर्ण केल्या जात आहेत.

मिरा भाईंदर परिवहन बस सेवेत एक दिवसात प्रवास करण्याऱ्या प्रवासी संख्येचा 60,000 चा टप्पा डिसेंबर 2021 मध्ये गाठला असुन, ही मागील कित्येक वर्षातील उच्चांकी संख्या आहे. या उल्लेखनीय कामगिरीसाठी मा. आयुक्त- श्री. दिलीप ढोले, परिवहन समितीचे मा. सभापती - श्री.

दिलीप जैन, मा. अतिरीक्त आयुक्त - डॉ. संभाजी पानपट्टे, श्री. विजयकुमार म्हसाळ, सर्व सन्मा. सदस्य - श्री. मंगेश आत्माराम पाटील, श्री. राकेश सतिशचंद्र शाह, श्री. अन्सारी रशिद अन्वर, श्री. उपाध्याय देविप्रसाद जगन्नाथ, श्री. जागुष्टे अविनाश अरविंद, श्री. टॉमस अंतोन ग्रेसीयस, श्री. पाटील विशाल रघूनाथ, श्रीम. वनिता शंकर बने, श्री. म्हात्रे राजेश हरिश्चंद्र, श्री. लक्ष्मण बुधाजी कांदळगावकर, श्री. शिवशंकर सत्यनारायण तिवारी, श्री. राजकुमार देवनारायण मिश्रा आणि परिवहन उपक्रमाचे प्रभारी उपायुक्त - श्री. स्वप्निल सावंत, सहा. आयुक्त - श्री.दिलीप जगदाळे, श्री. दिनेश कानगुडे व सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील　　　　अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

वृक्ष प्राधिकरण समितीवर सदस्यांची नाव ह्या ठिकाणी प्राप्त झालेली आहेत. भारतीय जनता पक्षाचे गटनेता यांच्याकडून नाव प्राप्त झालेली आहेत 1) श्री. दौलत गजरे 2) श्री. अनिल विराणी 3) श्री. अरविंद शेट्टी 4) श्री. गणेश भोईर 5) श्री. आनंद मांजरेकर 6) श्री. ध्रुवकिशोर पाटील. शिवसेना पक्षाचे गटनेते यांच्याकडून नाव प्राप्त झालेली आहेत 1) श्री. प्रविण पाटील 2) श्री. राजु भोईर 3) श्री. अनंत शिर्के. काँग्रेस लोकशाही आघाडी यांच्यातर्फे गटनेत्यांनी नाव दिलेले आहे 1) श्री. अनिल सावंत.

मा. महापौर :-

सचिवांनी जी ह्या ठिकाणी नाव वाचलेली आहेत वृक्ष प्राधिकरण समिती वरती ती सर्व गटनेत्यांनी सुचविलेली नाव असुन ती सर्व नाव ह्या ठिकाणी मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. 81:-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करुन पालिका सदस्यांमधून सदस्यांची नेमणूक करणे. तसेच ३(३) नुसार बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींची सदस्य संख्या निश्चित करुन नेमणूक करणे.

**ठराव क्र. 65 :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ चा नियम ३(३) अन्वये वृक्षप्राधिकरणेस ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींना वृक्षप्राधिकरणाचे सदस्य म्हणून [नामनिर्देशित करता] येईल. परंतु अशा [नामनिर्देशित सदस्यांची संख्या पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या सदस्यांच्या संख्येपेक्षा अधिक असणार नाही.] हे सदस्य, [विहीत करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा मुदतीसाठी नामनिर्देशित] करण्यात येतील.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ कलम ३(२) नुसार वृक्ष प्राधिकरणाचा अध्यक्ष महानगरपालिका आयुक्त असतील.

मा. महासभा दि. ७/१२/२०२० (दि. ४/१२/२०२० रोजीची तहकुब सभा), ठराव क्र. २३ अन्वये पालिका सदस्यामधून घ्यावयाची सदस्य संख्या ९, बिनसरकारी संघटनाचे प्रतिनिधी २ व आयुक्त पदसिध्द अध्यक्ष अशी एकुण १२ सदस्यांची १ वर्षाकरिता वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करण्यात आली होती.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून पक्ष/गट/आघाडी मिळून केलेल्या आघाडीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| भारतीय जनता पार्टी | शिवसेना | काँग्रेस लोकशाही आघाडी |
|---|---|---|
| ६१ | २२ | १२ (१० + २) |

वरीलपैकी शिवसेना पक्षाच्या एका सदस्याचे निधन झाल्याने, शिवसेना पक्षाचे सध्याचे तौलानिक संख्याबळ २१ इतके आहे. तसेच कॉग्रेस लोकशाही आघाडीच्या एका सदस्याचे निधन झाल्याने, कॉग्रेस लोकशाही आघाडीचे सध्याचे तौलानिक संख्याबळ ११ इतके आहे. सद्यस्थितीत असलेल्या तौलानिक संख्याबळाचे प्रमाणात महापालिका सदस्यांमधून घ्यावयाचे सदस्य संख्येसाठी वृक्ष प्राधिकरण समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन (उदाहरणार्थ) खालीलप्रमाणे होत आहे.

| अ. क्र. | पक्ष/गट/आघाडी | समिती सदस्य ९ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य | समिती सदस्य १२ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ६१ ÷ ९३ x ९ = ५.९० | ६ | ६१ ÷ ९३ x १२ = ७.८७ | ८ |
| २ | शिवसेना | २१ ÷ ९३ x ९ = २.०३ | २ | २१ ÷ ९३ x १२ = २.७० | ३ |
| ३ | काँग्रेस लोकशाही आघाडी | ११ ÷ ९३ x ९ = १.०६ | १ | ११ ÷ ९३ x १२ = १.४१ | १ |

वृक्ष प्राधिकरण समितीची मुदत व महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये महापालिका सदस्यांमधून ९ सदस्य संख्या व ३(३) अन्वये ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींमधून २ सदस्य संख्या निश्चित करुन वृक्ष प्राधिकरण समिती तसेच प्रकरण २ कलम ३ (२) नुसार वृक्ष प्राधिकरणाचे अध्यक्ष महानगरपालिका आयुक्त असतील अशी १२ सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये महापालिका सदस्यांमधून पुढील सदस्यांची वृक्ष प्राधिकरण समितीवर एक वर्षाकरिता नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पक्ष |
|---|---|---|
| १ | श्री. दौलत गजरे | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्री. अनिल विराणी | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्री. अरविंद शेट्टी | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्री. गणेश भोईर | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्री. आनंद मांजरेकर | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्री. ध्रुवकिशोर पाटील | भारतीय जनता पार्टी |
| ७ | श्री. प्रविण पाटील | शिवसेना |
| ८ | श्री. अनंत शिर्के | शिवसेना |
| ९ | श्री. अनिल दि. सावंत | काँग्रेस लोकशाही आघाडी |

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 82, महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत. याकरीता देखील गटनेत्यांकडून नाव प्राप्त झालेली आहेत. भारतीय जनता पक्षाच्या गटनेत्यांकडून नाव प्राप्त झालेली आहेत महिला बालकल्याण समितीवर खालील सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात येत आहेत 1)

श्रीम. विविता नाईक 2) श्रीम. रक्षा भुप्तानी 3) श्रीम. मिरादेवी यादव 4) श्रीम. प्रीती पाटील 5) श्रीम. हेमा बेलानी 6) श्रीम. शालु गोईल 7) श्रीम. मेघना रावल 8) श्रीम. मिना कांगणे 9) श्रीम. सुनिता जैन 10) श्रीम. रुपाली मोदी. शिवसेना पक्षातर्फे गटनेत्यांनी नाव दिलेले आहेत महिला बालकल्याण समितीवरती 1) सौ. भावना भोईर 2) सौ. स्नेहा पांडे 3) सौ. हेलन गोविंद. काँग्रेस लोकशाही आघाडी तर्फे नाव देण्यात आलेले आहे महिला बालकल्याण समितीसाठी 1) श्रीम. रुबीना फिरोज 2) श्रीम. गिता परदेशी  याप्रमाणे नाव आपल्याकडे गटनेत्यांनी दिलेली आहेत ते मी महापौरांकडे सुपुर्द करतो.

मा. महापौर :-

महिला व बालकल्याण समितीवरती सन्मा. सर्व पक्षाच्या गटनेत्यांनी जी नावे सुचविलेली आहेत ती सचिव माहोदयांनी त्याचे वाचन केलेले आहे ती सर्व नावे ह्या ठिकाणी मंजुर करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरविता येईल अशारितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेला अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी पाच आणि जास्तीत जास्त पंधरा व्यक्तींची मिळून बनलेल्या एका वृक्षप्राधिकरणाची रचना करता येईल अशी तरतुद आहे.

**प्रकरण क्र. 82 :-**

**महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत.**

**ठराव क्र. 66 :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३०(१) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणे आवश्यक असुन, महानगरपालिकेतील गटाच्या तौलनिक संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची तरतुद आहे. माता व बालकांच्या विविध कल्याणकारी योजना शासकिय धोरणाप्रमाणे राबविणे तसेच यासंबंधी नविन योजना सादर करून शासकिय धोरणाप्रमाणे कार्यन्वित करणे हे या समितीचे कार्यक्षेत्र राहिल.

महानगरपालिका सभा कामकाज नियमचे कलम ४ (ब) अंतर्गत महिला व बालकल्याण समिती सदस्य संख्या नऊ इतकी निश्चीत आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३०(१) अन्वये महानगरपालिकेस, वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून (महिला व बालकल्याण समितीसह) विशेष समित्यांची नेमणूक करता येईल अशी तरतुद आहे. मा. महासभा दि. ७/१२/२०२० (दि. ४/१२/२०२० रोजीची तहकुब सभा), ठराव क्र. २४ अन्वये महिला व बालकल्याण समिती सदस्यांची संख्या १५ इतकी निश्चित करण्यात आली आहे.

सर्वपक्षीय गटनेत्यांनी तौलानिक संख्या बळाप्रमाणे सदस्यांच्या नावाची शिफारस केलेनुसार महिला व बालकल्याण समितीवर खालील १५ सदस्यांची १ वर्षाकरीता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पक्ष |
|---|---|---|
| १ | श्रीम. विविता नाईक | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्रीम. रक्षा भुप्तानी | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्रीम. मिरादेवी यादव | भारतीय जनता पार्टी |
| ४ | डॉ. प्रिती पाटील | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्रीम. हेमा बेलानी | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्रीम. शानु गोहिल | भारतीय जनता पार्टी |
| ७ | श्रीम. मेघना रावल | भारतीय जनता पार्टी |
| ८ | श्रीम. मीना कांगणे | भारतीय जनता पार्टी |
| ९ | श्रीम. सुनिता जैन | भारतीय जनता पार्टी |

| | | |
|---|---|---|
| १० | श्रीम. रुपाली मोदी | भारतीय जनता पार्टी |
| ११ | श्रीम. भावना भोईर | शिवसेना |
| १२ | श्रीम. स्नेहा पांडे | शिवसेना |
| १३ | श्रीम. हेलन गोविंद | शिवसेना |
| १४ | श्रीम. रुबिना फिरोज | काँग्रेस लोकशाही आघाडी |
| १५ | श्रीम. गिता ह. परदेशी | काँग्रेस लोकशाही आघाडी |

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 83, महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात दोषारोप दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे.

मा. महापौर :-

अवलोकन मान्य आहे.

(सदरच्या विषयाचे अवलोकन करण्यात आले.)

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 84, मिरा भाईंदर शहरातील 500 चौ. फुटापर्यंतच्या घरांचा मालमत्ता कर माफ करणेबाबत.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम या विषयावर चर्चा आधी की धराव आधी ?

मा. महापौर :-

तुम्ही सांगाल तस.

जुबेर इनामदार :-

योग्य असे असेल की तुम्ही त्याच्यावरती चर्चा करा, चर्चेमध्ये सुचना घ्या आणि एकमताने ठराव जाऊ द्या.

मा. महापौर :-

पहिला तुम्ही बोला.

जुबेर इनामदार :-

धंन्यवाद महापौर मॅडम ज्वलंत विषय ह्या शहरामध्ये सध्या चालत आहे. मुंबईच्या धरतीवर ह्या शहरात काही लोकांची अपेक्षा आहे 500 चौरस फुट कारपेट क्षेत्र म्हणजे मालमत्ता कर हा माफ करण्यात आला मुंबई महानगरपालिकेमध्ये. आता मालमत्ता कर माफ करणे म्हणजे थोडक्यात मालमत्ता करच माफ होईल. मालमत्तामध्ये बरेच दुसरे काही कर आहेत, अग्निशमन, शिक्षण, मलनिसारण, मलप्रवाह, ह्या करांची नोंद खरतर चर्चेमध्ये कुठेच आली नाही एवढे बरेच आपली भाषन बरेच मोठमोठ्या नेत्यांनी ह्या शहराच्या लोकांसमोर येवून भाषन केली की मालमत्ता कर माफ झाला पाहिजे. थोडक्यात खरतर मालमत्ताकर माफ केला तर 40 टक्के 30 टक्के मालमत्ता कर माफ होणार बाकी 70 टक्के कर तो तसाचा तसा लोकांच्या वरती असलेला भुर्दंड आहे तो तसाचा तसाच राहणार. खरतर लोक टॅक्सेशन, आणि बेटर ॲडमिनिस्ट्रेशन ह्या धोरणावर महानगरपालिका चालु आहे. आपण त्याच्यात कुठेतरी कमी पडतो. कर आपले रोज वाढत चालले आहेत कर एक मुद्दा आहे वसुली उत्पन्न आहे त्याचीही गरज ह्या शहराला आहे. आता कर माफ केला तर महसूली उत्पन्न दुसऱ्या कुठल्या माध्यमातुन ह्या आपल्या महापालिकेला प्राप्त होईल, कारण विकासाची काम ही

आहेत ही केली पाहिजेत. आता किती शहरामध्ये विकासाची काम प्रलंबित आहेत किंवा किती स्पील ओव्हर आहे याचीही दक्षता आपल्याला पालिकेला घ्यावी लागेल. आणि ही सुरु करताना लोकांना रहिवाशांनाही आपल्याला कुठेतरी खरोखरच एक फायदा पोहचवला पाहिजे. मुंबई महानगरपालिकेने हा विषय कशा प्रकारे हाताळला त्याची माहिती ती जाणीव आपण घेतली घ्यायला पाहिजे. ठाणे महानगरपालिकने ठराव करुन शासनाकडे पाठवला, नवी मुंबई महानगरपालिकेनेही ठराव करुन शासनाकडे पाठवलेला आहे की आमचा मालमत्ता कर माफ करण्यात यावा. खरतर अधिकार शासनाचा आहे आणि तो अधिकार खरतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आपला जो आहे त्याच्यामध्ये त्याचे उल्लेख स्पष्ट आहे 99 ड मध्ये आणि 99 मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 99 जो आहे तो आपल्याला काय बोलतो तर कुठलाही तुम्हाला कर लादायचा असेल अथवा त्याच्यामध्ये वाढ किंवा घट करायची असेल तर तुम्हाला 20 फेब्रुवारीच्या आधी तेव्हा तुम्हाला निर्णय घेतला पाहिजे. आणि तो निर्णय ठाम निर्णय घेवून शासनाकडे पाठवला पाहिजे की आम्ही ह्या मालमत्ता करामध्ये किती टक्क्याची वाढ अथवा किती टक्क्याची सुट आम्ही मालमत्ता करामध्ये देतो. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 99 हा स्पष्ट त्याचा उल्लेख करतो. आपल्याला त्या कलमाला सोबत घेवून किंवा कलमाचा अनुसार आपल्याला त्याअनुषंगाने ठराव किंवा कशा प्रकारचा ठराव शासनाकडे पाठवू. दुसरं आता मला 100 टक्का याची जाणीव आहे सर्व पक्षीय काँग्रेस लोकशाही आघाडी असो शिवसेना असो अथवा भाजपा असो हे सर्वपक्षीय कुठलाही पक्ष ह्या विषयाला विरोध करेल असे मला तरी वाटत नाही. आणि माझी भुमिका स्पष्ट आहे आम्ही काही विरोध करणार नाही आम्ही ठरावाचा बाजुने पण ठराव कशा प्रकारे असावा महापौर मॅडम, मी तुम्हाला पत्र दिले होते दि. 10/01/2022 रोजी आम्ही तुम्हाला एक पत्र दिलेले आहे आणि त्या पत्रामध्ये मी एक उल्लेख केला विशेषत: की कलम 99 अनुसार महाराष्ट्र महानगरपालिका कलम 99 नुसार 20 फेब्रुवारीच्या आधी तो ठराव कमी किंवा जास्त करण्याचा मालमत्ता कर लादण्याचा कमी करण्याचा बदल करण्याचा फरक करण्याचा आपल्याला तो तयार करुन शासनाकडे पाठवावा लागेल. आणि ते करताना त्यासोबत आपली महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती कारण येणाऱ्या पुढील 30 तारखेच्या आधी तुम्हाला अर्थसंकल्प सादर करायचा आहे 2022-23 चा आणि तो अर्थसंकल्प सादर करताना आपली आर्थिक स्थिती काय आहे किती सक्षम आहे आम्ही ती कमी करु शकू किंवा नाही करु शकणार केली तर किती करु केली तर त्याचा परिणाम आमच्या अर्थसंकल्पावर काय असणार किंवा विकासावर काय असणार आहे त्याची खरी बाजु आपल्याला त्या अर्थसंकल्पामध्ये सादर केली पाहिजे. विषय स्पष्ट आहे बहूमताने हा ठराव होणार अर्थात तुमच्या पक्षाकडे तर बहुमताने ठराव करताना पुढचा अर्थ संकल्प अर्थात 2022-23 चा अर्थसंकल्प त्याच्यामध्ये मालमत्ता करामध्ये आम्ही किती सुट देणार त्याची जाणीव किंवा त्याचा उल्लेख आपल्याला शासनाला आपल्या ठराव द्वारे करुन द्यायला पाहिजे की आम्ही 70 टक्के 80 टक्के मालमत्ता करात आमची उत्पन्नाची बाजु तेवढी कमी दर्शविणार खरोखर आमची इच्छा असली तर आम्ही कमी दर्शवू आणि आम्ही ती कमी दर्शविली नाही तर ह्याचा अर्थ आमची फक्त आम्ही ही भाषने करत आहोत आणि लोकांची फसवणूक करतोय. एका बाजुला मालमत्ता कर जमेची बाजुमधली वसुली उत्पन्नातुन फुगवून टाकायचा त्याअनुषंगाने पालिकेने खर्च करायचा त्याअनुषंगाने आर्थिक प्रशासकिय मंजुरी घ्यायच्या कारण ह्याही आजच्याही सभेमध्ये असे विषय आहेत आपल्याकडे असलेली तरतुद कमी आहे आर्थिक प्रशासकिय मंजुरी देणार कुठल्या आधारावर पुढच्या अर्थसंकल्पाच्या आधारावर. म्हणजे थोडक्यात पुढचा अर्थसंकल्प आपला कसा असायला पाहिजे त्याची आपल्याला नोंद आपल्या आजच्या या ठरावामध्ये असायला पाहिजे तरच हा तुमचा ठराव खरोखर की तुमची मनस्थिती माणसिकता आहे की आम्ही पुढच्या 2022-23 च्या अर्थसंकल्पामध्ये मालमत्ता कर आम्ही आमची जमेची बाजु आम्ही कमी दाखवू म्हणजे आम्ही कमी दर्शवू तरच ह्या लोकांना ह्या शहराच्या रहिवाशांना आम्ही खरोखर मालमत्ता करामध्ये ती सुट देणार हे सिध्द करु शकु अथवा

फक्त ही फसवणूक असणार आहे याच्या पलिकडे काहीच नाही. महापौर मॅडम ही माझी तुमच्याकडे सुचना आहे की अशा प्रकारे आपल्याला मालमत्ता कराच्या जमेच्या महसुलीच्या बाजुला 70 टक्के कमीत कमी मालमत्ता जमेच्या बाजुच्या महसूली जमा आपल्याला तो दर्शवा लागणार आहे अर्थसंकल्पामध्ये तरच तुम्ही मालमत्ता करामध्ये सुट देवू शकता. ठराव तुमचा जो असेल तो आम्हाला पटला तर आम्ही तुमच्या बाजुने असू नाहीच पटला तर आमचा ठराव ह्याच धर्तीवर असेल. धंन्यवाद महापौर मॅडम.

मा. महापौर :-

ठिक आहे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम प्रथमत: मी आपले ह्या ठिकाणी अभिनंदन करीन की आपण हा विषय ह्या ठिकाणी ह्या महासभेपुढे आणलात. कारण गेल्या कित्तेक दिवसा पासुन ह्या ठिकाणी आपल्या मिरा भाईंदर शहराचे लोक प्रतिनिधींनी आपल्याला पत्रव्यवहार केला होता की आपण हा ठराव महासभेपुढे घ्यावा आणि ह्या ठरावा वरती चर्चा करुन तो ठराव करुन शासनाकडे पाठवावा. खरोखर महापौर मॅडम मी आपले अभिनंदन करत असताना त्या सर्व लोकप्रतिनिधींचेही अभिनंदन करीन की ज्यांनी ह्या ठरावा साठी आपल्याला त्यांनी पत्रव्यवहार केला होता. महापौर मॅडम मी अजुन एक विनंती करीन ह्या माध्यमातुन की आम्ही तो ठराव करणार आहोत परंतु तो ठराव शासनाकडून मंजुर करुन आणायची जबाबदारी त्यांचीच आहे. आपली जी जबाबदारी होती महापौर मॅडम आपण ती पार पाडलीत ह्या महासभेला आपण तो ठराव केलात ह्या मिरा भाईंदरच्या नागरीकांची दिशाभुल कोणालाही करायची नाही. जुबेर साहेब आता मगाशी म्हणाले की आपल्याला कोणाची फसवणुक करायची नाही बरोबर आहे जुबेर साहेब मी आपल्या मताशी सहमत आहे की आपल्यालाही कुठल्या नागरीकाची दिशाभुल करायची नाही. ह्या ठिकाणी ह्या 500 चौरस फुटाच्या सदणीकेला मालमत्ता कर माफी बाबत ह्या ठिकाणी आयुक्त महोदयांनी पण गोषवारा दिलेला आहे. आणि आपण जर ह्या गोषवाऱ्याचा अभ्यास केला तर ह्याठिकाणी परिपुर्ण माहिती त्यांनी ह्याठिकाणी सादर केलेली आहे की आपली महापालिका कशी चालते कशा प्रकारे चालते आपल्या महापालिकेचे उत्पन्न काय आणि हे सगळ बघितल याचा सारंसार जर विचार केलात महापौर मॅडम जसे जुबेर साहेब म्हणालेत तर हा ठराव बहुमताने नाही तर जो आपण ठराव करणार आहोत तो सर्वानुमते पास झाला पाहिजे अशी मी त्यांना विनंती करीन. आणि महापौर मॅडम हे करत असताना आपली ड वर्ग महापालिका आहे आणि त्यामुळे आपले उत्पन्न काय ? आपल्याला ठावून असेल महापौर मॅडम की गेल्या वेळेलाही आपण मालमत्ता करात 50 टक्के सुट द्यावी अशा प्रकारची आपण मागणी ह्या सरकारकडे केली होती. आम्हाला तिकडून काही अनुदान नको होते. परंतु ह्या कोविड प्रादुर्भावामुळे ह्या ठिकाणी लोकांची राहणीमान आणि त्यांचा जीवणाचा प्रश्न निर्माण झाला होता. कित्तेक लोकांना कोविड उपचारार्थ तिथे पैसे लागले, काही लोकांची परिस्थिती एकदम बिकट ह्या कोरोना काळात झाली. आणि ह्याठिकाणी मी महापौर मॅडम ह्या महासभेच्या माध्यमातुन विनंती करणार आहे लोकप्रतिनिधींना ज्यांनी आपल्याला पत्र दिलीत मग ती ठाणे महानगरपालिका असो, मुंबई महापालिका असो किंवा नवी मुंबई महापालिका. ठाणे जिल्ह्याचे सन्मा. पालक मंत्री आपले मिरा भाईंदर जिल्ह्यालाही पालक मंत्री आहे. आणि म्हणून आपला हा ठराव होण्यापुर्वी मी आदरणीय पालक मंत्री आणि सन्मा. सर्व लोकप्रतिनिधी आमदार यांनाही विनंती करीन ह्या सभे द्वारे ह्या निवेदना द्वारे की आपण ज्या पोटतिडकीने आपण ह्याठिकाणी आपण महापौरांना पत्र दिलीत की आपण हा ठराव महासभेपुढे घेण्यात यावा आणि तो आपण घेतला तेवढ्याच जिद्दीने आणि त्याच पोटतिडकीने महापौर मॅडम हा ठराव होणेपुर्वी आपण जर शासनाकडे पत्रव्यवहार केला की महापालिकने ह्या मिरा भाईंदरच्या महापौरांनी केलेला ठराव पारीत केलेला ठराव आपणही तिथे मोठ्या मनाने मोठ्या दिलाने ह्या ठिकाणी आपल्याला मंजुर करुन

पाठवलात तर ह्या मिरा भाईंदरचे नागरीक आपल्याला कधी विसरनार नाहीत. आणि एवढेच नाही महापौर मॅडम तर मी निवेदनाद्वारे आपल्या माध्यमातुन सांगु इच्छीतो की ह्या क्षेत्रामध्ये ताबडतोब एक नागरीक भव्य सत्कार आपण ह्या ठिकाणी आयोजित करु. महापालिकेच्या वतीने तर आपला सत्कार होणारच आहे परंतु नागरीक सत्कार ह्या ठिकाणी मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये त्या लोकप्रतिनिधींचा घडवून आणू जेणे करुन आपल्या ह्या 500 चौरस फुटाच्या घरांना ह्या मिरा भाईंदरकरांना ह्या मालमत्ते करात सुट मिळेल. आणि म्हणुन महापौर मॅडम ह्या ठिकाणी निवेदन करत असताना आता मी शेवटी ह्या ठरावा वरती येतो हा ठराव आपल्याला पारीत करायचा आहे परंतु महापौर मॅडम आपल्या सर्व सन्मा. सदस्यांची पण इच्छा आहे की ह्या विषयावरती त्यांनाही बोलायचे आहे. त्यामुळे महापौर मॅडम माझी अशी विनंती राहील आपणाला की सन्मा. सर्व पदाधिकारी मग ते सेनेचे राष्ट्रवादीचे असतील कॉंग्रेसचे काही पदाधिकारी असतील सन्मा. सदस्य असतील त्यांनाही ह्या विषयावरती चर्चा करुदेत. आणि महापौर मॅडम त्यानंतर मी आपला ठराव ह्याठिकाणी मांडेल अशी मी आपणास विनंती करतो. धंन्यवाद.

प्रविण पाटील :-

महापौर मॅडम, आताच्या विषयावरती मा. महापौरांनी जो विषय आणलेला आहे सन्मा. सदस्य असो किंवा लोकप्रतिनिधी असो यांनी ह्या विषयी वेळोवेळी मागणी केलेली आहे मग ते सर्वपक्षीय असो शहराचा हिताचा विषय आहे. आजची महासभा असताना आजच्या महासभेमध्ये हा विषय असताना याचा गोषवारा मा. आयुक्ताने प्रशासना मार्फत काल जो दिलेला आहे त्याच्यावर दुर्लक्षीत करुन चालणार नाही. कारण आयुक्ताची बाजु किंवा प्रशासनाची जी बाजु आहे त्याच्यामध्ये फार गांर्भीय पुर्वक तो गोषवारा वाचला तर येणाऱ्या काळामध्ये शहराच्या विकासावर काय परिणाम होईल त्याचे तुम्ही बघा त्याच्यावर विचार करा. मुळात हा विषय मुंबई महापालिका असो किंवा ठाणे महापालिकेने ज्यावेळेला दिला त्यावेळेला प्रशासना बद्दल बरोबर तिकडचा लोकप्रतिनिधींनी सविस्तर चर्चा करुन त्यातुन उत्पन्नाचे इतर स्त्रोत निर्माण करुन महानगरपालिकेच्या विकासावर कुठलाही परिणाम होणार नाही याची काळजी घेवून सदर हा गोषवारा दिलेला होता किंवा हा विषय आणलेला होता. तदनंतर हा विषय मान्य केलेला आहे. परंतु लोकप्रतिनिधींनी मागणी केली आणि आपण हा विषय आणला आणि आता तो तुम्ही ठरावासाठी ठेवलेला आहे. मान्य करतो ठराव होईल परंतु मिरा भाईंदर महानगरपालिकेवर याचा विकासावर काय परिणाम होईल याचाही बाजु तुम्ही विचार केला पाहिजे. तत्पुर्वी प्रशासनाने हा ठराव करण्या पुर्वी प्रशासनाने आपली बाजु मांडावी किंवा भविष्यामध्ये होणार मिरा भाईंदरचा विकासावर काय परिणाम होऊ शकतो किंवा उत्पन्नाची बाजु काय याच्या व्यतिरिक्त आपण आणु शकतो याच्यावर प्रशासनाने निट पहिला खुलासा करावा. मॅडम बघा जुबेर इनामदारांनी सविस्तर याच्यावर सांगितलेले आहे सविस्तर माहिती सांगितलेली आहे कुठल्या प्रकारे हा विषय यायला पाहिजे कुठल्या प्रकारे याच्यावर चर्चा करायला पाहिजे आणि कुठल्या प्रकारे हा मंजुर व्हायला पाहिजे. परंतु लोकप्रतिनिधींनी मागणी केली आणि इतर महानगरपालिकेने मंजुर केला म्हणून आपण आणलेला आहे आणि त्याचा वेगळा परिणाम ह्या शहरावर होईल, विकासावर होईल असे होता कामा नये. महापौर मॅडम आपले निवेदन झाल्यावर किंवा ठराव होण्यापुर्वी प्रशासनाची बाजु आपण स्पष्ट करावी हा फार महत्वाचा विषय आहे अशी आपणाला मागणी करतो विनंती करतो महापौर मॅडम.

मा. महापौर :-

पाटील साहेब हा विषय ह्या सभागृहामध्ये आला याचे कारण मी तुम्हाला सांगु इच्छीते सन्मा. आपल्या पक्षाचे आमदार सरनाईक साहेब, आणि आमदार गिता जैन मॅडम तसेच आपल्या सभागृहातील लोकप्रतिनिधी यांनी मला लेखी निवेदन दिलेले आहे की सदरचा विषय हा महासभेमध्ये घ्यावा. आणि जर त्यांनी मला लेखी निवेदन दिले असेल तर विचारपुर्वकच दिला असेल की हा विषय

महासभेपुढे आणावा. कारण ह्या सभागृहामध्ये पण हे सदस्य आहेत त्यांनाही शहराची कळकळ आहे, त्यांनाही वाटते की आपल्या शहरामध्ये सुध्दा टॅक्स माफी झाली पाहिजे आणि त्यासाठीच आपण ह्या सभागृहामध्ये हा विषय विषयपटलावर आणलेला आहे. जस सदस्यांना बोलायला संधी दिली तस प्रशासनालाही बोलायला संधी देणार आहे त्यांचेही मत ह्याठिकाणी जाणून घेतले जाईल त्यानंतर आपण ठराव करणार आहोत. ठराव सर्वानुमते मंजुर झाला तर अतिशय उत्तम नाही तर आपण आपल्या पक्षाच्या मार्फत योग्य तो ठराव आपण इथे करु शकता.

प्रविण पाटील :-

मॅडम, मुळात ह्या विषयाला आमच्या लोकप्रतिनिधींनी मागणी केलेली आहे त्याचा आमचा मुळात त्या विषयाला आमचा विरोध नाही हे प्रथम आमचे पहिला मत समजुन घ्या. आयुक्तांनी जो गोषवारा दिला त्याच्यावरही दुर्लक्षीत करुन चालणार नाही. मला एवढेच म्हणायचे आहे की दोन्ही याच्यातुन सुर्वणमध्य साधुन कुठला तरी याच्यावर निर्णय घ्यावा जेणे करुन प्रशासनाची बाजुही तितकीच महत्वाची आहे. कारण ह्या सर्व गोष्टीचा विचार म्हणजे आयत्या वेळेला विषय दिलेला आहे. आपण सविस्तर सर्व पक्षीय बैठक घेवून त्याच्यावर प्रशासनाचे मत आणि आपले मत घेवून नंतर त्याच्यातुन चांगला मार्ग शहराचा हिताचा जेणेकरुन टॅक्स माफीचा जो विषय आहे तो घ्यावा अशी आपणाला विनंती करतो.

मा. महापौर :-

नक्की, अनिल सावंत आपण बोला.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम, प्रथम मी ह्या विषयावर दोन मिनिटात बोलणार आहे. प्रथम जो सचिवांनी मगाशी प्रश्नोत्तराचा तास जो गुंडाळला त्यामध्ये अजित पाटील साहेबांचा प्रश्न होता 37 नंबर स्मशान भुमी दुभाजके वगैरे त्याच्यामध्ये सभागृहनेत्यांनी सांगितले की खेळीमेळीच्या वातावरणात आपण ही सभा चालवूया आमचा नेमहमी तोच प्रश्न असतो. परंतु सचिवांना माहित आहे की त्या सभागृहनेत्यांनी सांगितले त्यांचा प्रश्न पुढे येणार आहे महासभेमध्ये त्याच्या पुढच्या प्रश्नांचे काय ? ते महासभेच्या विषयाला धरुन नाहीत. आणि आपण आज ही सभा लावली 26 जानेवारी उद्या आहे ते आपल्याला माहित आहे 26 नंतर 27 जानेवारीला लावली असती. महिन्यातुन एकदा सभा होते व्हर्चुअलमुळे बऱ्याच सदस्यांना आपले विचार सुध्दा मांडता येत नाहीत आणि त्यात आपण असे प्रकार करणार फक्त विषय पत्रिका घ्या बाकिचे विषय सोडून द्या मग विरोधी पक्षाने करायचे काय ?

मा. महापौर :-

सावंत साहेब आपला पण एक ज खाली विषय आहेना.

अनिल सावंत :-

ज खाली आहे तो वेगळा आहे इतर जे माझे प्रश्न आहेत ते वेगळे आहेत मॅडम.

मा. महापौर :-

ऐका तुमचा जेव्हा प्रस्ताव येईल त्यावेळेला तुम्हाला वेळ वाढवून दिली जाईल त्या विषयावरती बोलायला.

अनिल सावंत :-

मॅडम त्यावेळी होणार नाही कारण त्यावेळी सभा संपत आलेली असणार.

मा. महापौर :-

अजिबात संपणार नाही पाहिजे तर मधी बोलायला देईल.

अनिल सांवत :-

महापौर मॅडम मी आपल्याला विनंती करतो की माझे प्रश्न तसेच पेडिंग ठेवा पुढच्या सभेमध्ये घ्या.

मा. महापौर :-

ठिक आहे चालेल.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम आता हा जो विषय चाललेला आहे 300 क्वेअर फिटच्या घरांना कर माफी द्या, प्रशासनाचा काल जो गोषवारा आलेला आहे त्याच्याकडे मी आपले लक्षवेधु इच्छीतो त्याच्यामध्ये प्रशासनाने असे म्हटलेले आहे की जर ही माफी दिली तर 109 करोड रुपयाचा वार्षिक आपल्याला लॉस होणार आहे हे त्यांच्या गोषवाऱ्यामध्ये आहे. 2021-22 चा आपला टोटल डिमांड मालमत्ता कराचे आयुक्तांचे अंदाज 85 करोड आहेत, मग हा 109 करोडचा लॉस कसाकाय होणार आहे ? एकतर हा गोषवारा चुकीचा आहे किंवा जे 2021-22 मध्ये प्रशासनाने अंदाज दिलेल आहेत ते चुकीचे आहेत. 109 करोड इथे फिगर दाखवून सभागृहाची दिशाभुल करण्यात आलेली आहे असे माझे स्पष्ट मत आहे. बजेटमध्ये 85 करोड आहेत मग याच्यामध्ये 109 करोड कुठून आले ? आपण आजची फिगर घ्या कर विभागाला विचारुन कि आजपर्यंत ह्या वर्षामध्ये किती जमा झाले. मालमत्ताकराच्या रुपाने किती जमा झाले आणि त्याच्या मधले 500 पर्यंत घराचे किती आहेत याचे उत्तर प्रशासनाकडे आता आहे का ?

मा. महापौर :-

प्रशासन ह्या संदर्भामध्ये सांगणारच आहे तुमचे मत फक्त मांडा.

अनिल सावंत :-

ते 109 करोड रुपये कुठून आले ते मला प्रशासनाला विचारायचे आहे.

मा. महापौर :-

ठिक आहे निवेदनामध्ये सांगतील.

अनिल सावंत :-

निवेदनामध्ये सगळी उत्तर मिळत नाही मॅडम.

मा. महापौर :-

आयुक्त महोदय बोलतील.

ध्रुवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम माझी आपणास विनंती आहे की शिवसेनेच्या गटनेता निलम ढवण ह्यांना यांचे मत मांडू द्या आणखीन त्याच्या नंतर आपण भारतीय जनता पार्टीतर्फे मी माझे मत मांडतो. माझी आपणास अशी विनंती आहे की पहिला त्यांना त्यांचे मत मांडूद्या.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, हा जो विषय आहे टॅक्स माफीचा आम्ही सर्वजन आपल्या मताशी सहमत आहोत की नागरीकांचा टॅक्स हा माफ झाला पाहिजे परंतु आपण आणि प्रशासन किंवा पदाधिकारी आणि प्रशासन कारण प्रशासनाचा जो गोषवारा आहे तो पुर्णत: विरोधात आहे की हे होऊ शकत नाही. जर प्रशासनाने आपल्याला होऊ शकत नाही म्हणून जर दिलेले असेल तर आपण पुढे जावू कसे शकणार ? जर आपण त्याच्यावर ठराव केला तर तो ठराव पुढे काय होईल तुम्हाला माहिती आहे मग त्यापेक्षा हा विषय घेण्या पुर्वी प्रशासन आणि आपली चर्चा झाली असती एखादा आर्थिक स्त्रोत किंवा अनावश्यक जो खर्च होतो तो टाळता येवून त्यासाठी एक तरतुद आपण केली असती किंवा करावी आणि त्यानंतर हा विषय लोकांसाठी आपण नागरीकांसाठी हा विषय घ्यावा. कारण हे आपण फक्त ठराव करण आणि तो ठराव लोकांसमोर मांडणे म्हणजे लोकांची एक दिशाभुल होणार आहे तर दिशाभूल नकरता सर्व सामान्य लोकांसाठी आपण काहीतरी करु शकु ह्या पध्दतीने हा विषय आला पाहिजे होता. मागणी सगळ्यांनी केली आमदारांनी केली म्हणा किंवा सर्व लोकप्रतिनिधींनी केली म्हणजे सगळ्यांची भावना एकच आहे की सर्व सामान्य जनतेला याचा दिलासा मिळावा त्यांचा काही

तरी फायदा व्हावा परंतु प्रशासन आणि सत्ताधारी किंवा सगळे प्रतिनिधी यांची ह्या विषयावर चर्चा झालेली दिसत नाही त्याच्यातुन तोडगा काय काढायचा ह्या विषयावर चर्चा विनिमय झालेली नाही. मागणी केली म्हणून विषय घेतला अस नकरता प्रशासनाची भुमिका किंवा प्रशासनाला आपल्याला त्या संदर्भातली तरतुद करुन नंतरच आपण ह्या संदर्भातला विचार विनिमय करावा ठराव करावा आणि त्यानुसार आपण जनतेला त्याचा योग्य निर्णय द्यावा आणि लोकांची भुमिका आपण सर्वांसमोर ठेवावी.

मा. महापौर :-

बरोबर ताई तुमचे म्हणणे आणि सन्मा. सदस्य प्रविण पाटील साहेबांचे म्हणणे असे होते की प्रशासनाचे मत घ्यावे प्रशासनाचे मत आपण शंभर टक्के घेणारच आहोत पण हा विषय का आणला तेही तुम्ही विचारता तर त्याचे उत्तरही मी तुम्हाला दिलेले आहे. मला सन्मा. आमदार आणि इतर आपले लोकप्रतिनिधी त्यामध्ये आपले पदाधिकारी पण आहेत त्या सर्वांनी मला लेखी पत्र दिलेले आहे की हा विषय महासभेमध्ये घ्यावा आणि त्यापध्दतीने मी हा विषय महासभेमध्ये घेतलेला आहे. शहराच्या हिताच्या दृष्टीकोणातुन हा विषय आहे नाही या संदर्भामध्ये आपण चर्चा करतच आहोत आणि हा चर्चा करुनच आपण योग्य तो निर्णय पुढे करणार आहोत आणि प्रशासनाचे सुध्दा आपण याच्यामध्ये मत घेणार आहोत. त्याच्या नंतर हा विषय मी सभागृहामध्ये घेतला म्हणून सन्मा. आमदार सरनाईक साहेब आणि सन्मा. आमदार जैन मॅडम यांनी मला लेखी पत्र दिलेले आहे त्यांनी माझे अभिनंदन सुध्दा केलेले आहे की हा विषय तुम्ही सभागृहामध्ये घेतला आणि त्यांनी मला ग्वाही सुध्दा दिलेली आहे पत्रामध्ये की हा विषय ते इथुन मंजुर करुन आणणार आहेत. आणि याची त्यांनी ग्वाही दिलेली आहे लेखी ग्वाही माझाकडे दिलेली आहे दोन्ही सन्मा. आमदारांनी. आता तुम्ही परत ह्या सभागृहामध्ये विषय आल्या नंतर परत म्हणतात हा विषय चर्चेला आणायला पाहिजे आणि आता प्रशासनाचे मत आपण आता घेतच आहोत. आता ह्या विषयाला वेगळे फाटे फोडू नका आपले जे स्पष्टपणे मत आहे ते नोंद करुन घ्या नंतर मी ध्रुवकिशोर पाटील साहेबांना बोलायला संधी देणार आहे.

निलम ढवण :-

ठिक आहे थँक्यु मॅडम, मॅडम तुमचे अभिनंदन नक्कीच आहे की तुम्ही हा विषय घेतला परंतु घेण्यापूर्वी आपण ह्याचे नियोजन कसे करणार आहोत याच्या संदर्भात प्रशासनाने गोषवारा देण्या पूर्वी आपली एकत्रित एक मिटींग झाली पाहिजे होती.

मा. महापौर :-

गोषवारा दिला मॅडम तुमच्याकडे गोषवारा पोहला नाही का ?

निलम ढवण :-

मॅडम, त्यांचा पॉझिटीव्ह आपल्याला एक मॅसेज आणि गोषवारा आपल्याला त्याआर्थि मिळाला असता. ठाणे म्हणा, नवी मुंबई, हयांनी त्यांची तरतुद करुन त्यासंदर्भातला निर्णय त्या संदर्भातली माहिती आपण घ्या. आपल्याकडे गोषवारा निगेटीव्ह आहे.

मा. महापौर :-

गोषवारा दिलेला आहे तुम्ही वाचा.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम ढवण मॅडम का मे जवाब दे देता हूँ जो बार बार कह रही है की नियोजन कर के यानी प्लॅनिंग कर के हम प्लॅनिंग ढवण मॅडम जब करेंगे जब कोई ठराव आयेगा अब तो इसके उपर फिल्हाल चर्चा हो रही है । ठराव मे अगर ऐसा हूवा की पैसा माफ करना है..................

निलम ढवण :-

ठराव नही है तो ठिक है ।

मा. उपमहापौर :-

नही मेने यह नही कहा की ठराव नही है मेने यह कहा की ठराव जब आयेगा वह ठराव मै क्या लिखा जायेगा क्या पढा जायेगा उसके उपर हम नियोजन करेंगे । अब तो फिल्हाल हम उसपे चर्चा कर रहे है की शहरके लिये करना चाहिये की नही करना चाहिये । जिस तरीके से लोकप्रतिनिधीने आमदारने अपना विचार शहर के हितको देखते हूये उनकी ताकद है वो लेके आ सकते है । हमे भी विश्वास है वो लेके आ सकते है, उसी विश्वास को लेके शहर का नुकसान नहोते हूये और शहर को फायदा पोहोचते हूये महापौर मॅडमने यह विषय महासभा मे लाया । अब ठराव किस प्रकार होता है सभी सदस्यो को पता होना चाहिये उसमे हमारी महानगरपालिका को कोई नुकसान होता है वह नियोजन के हिसाब से वो ठराव के हिसाब से बाद मे हम नियोजन करे महापौर मॅडम ।

मा. महापौर :-

बरोबर.

ध्रुवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम, आपणास धंन्यवाद की आपण हा प्रस्ताव महासभेपुढे आणला आणि विशेष करुन मी आयुक्त साहेबांचे पण धंन्यवाद करतो की आयुक्त साहेबांनी सुध्दा आपली भुमिका रोखठोक मांडली. आणि मॅडम त्यांनी त्यांचे मत ऑलरेडी गोषवाऱ्यामध्ये दिलेले आहे. आणि ते पण व्यवस्थित पणे खरं म्हटले आहे की मिरा भाईंदर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बरोबर नाही आहे आपण जर दिल्यास तर आपल्याला बाकिचे विकास कामे करण्यास अडचण येईल असा स्पष्ट गोषवारा आणि प्रशासनाचे ते मत त्यांनी मांडलेले आहे. आयुक्त साहेबांचे अभिनंदन करतो मॅडम आणि आता सगळ्यांची मी भाषनं ऐकली आपले नेत्यांची सन्मा. सदस्यांची सर्व म्हणतात की लोकांची दिशाभूल केली पण मॅडम लोकांची दिशाभूक करायची सुरुवात कोणी केली तर लोकांची दिशाभूल करायची सुरुवात केली प्रथम 3 जानेवारीला आमदारांनी पत्र दिले की मुंबई महापालिकेमार्फत ज्याप्रमाणे 500 चौरस फुटाच्या घरांना माफ केले आहे त्याप्रमाणे मिरा भाईंदरला पण केले पाहिजे. त्यानंतर पुन्हा 4 जानेवारीमध्ये आमदार साहेबांनी पत्र दिले की मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील लोकांना सुध्दा आपण माफ करावा आणि प्रशासनाच्या संमतीने आणि विशेष म्हणजे की हे दोन्ही आमदारांनी तुम्हाला पत्र दिले त्यांनी पत्र आयुक्तांना दिले नाही. अजुन पर्यंत तुम्ही रेकॉर्ड काढा मॅडम हे सगळ्या आमदारांनी पत्र फक्त आयुक्त साहेबांना देतात का कारण आयुक्त साहेब काम करतात म्हणून आणि हा प्रशासनाचा विषय असतो. आणि मॅडम हा सुध्दा प्रशासनाचाच विषय असतो म्हणून त्यांनी आयुक्त साहेबांना दिला पाहिजे परंतु त्यांनी आयुक्त साहेबांना दिले नाही आणि त्यांनी तुम्हाला दिलं आणि राजकारन केलं की आम्ही उद्या परत पब्लिकला सांगणार की बघा आम्ही पत्र दिलं होतं आणि महापौरांनी विषय घेतला नाही त्याच्यामुळे हा टॅक्स कमी झाला नाही. वास्तविक दोन्ही आमदार समजदार आहेत आणि दोन्ही आमदारांना मिरा भाईंदर महापालिकेची आर्थिक स्थिती माहिती आहे आणि दोन्ही आमदारांपैकी मला वाटते एक आमदार आपल्या मिरा भाईंदर महापालिकेचा सदस्य सुध्दा आहे त्यामुळे मिरा भाईंदर महापालिकेची आर्थिक स्थिती माहिती आहे आणि आज हा टॅक्स कमी होऊ शकत नाही टॅक्स कर माफी आपण देवू शकत नाही कारण की गेल्या वर्षी कोरोनाच्या काळात आपण फक्त 50 टक्के कर माफीचा ठराव मांडला होता आणि वेळेत मांडला होता आणि आपण शासनाकडे दिला होता परंतु तो त्यांनी मंजुर नाही केला. आणि आपले आमदार साहेब काय म्हणतात की तुम्ही व्यवस्थित ठेराव मांडला नाही आणि म्हणून तो प्रलंबित आहे. प्रलंबित ठेवायची गरज पडली नसती त्यांनी उलट टपाली जर आपल्याला त्यांनी कळवलं असतं की तुमचा ठराव स्वयंस्पष्ट नाही बरोबर नाही तुम्ही ठराव व्यवस्थित करुन पाठवा तर आपण ठराव पुन्हा व्यवस्थित करुन पाठवला असता आणि तो करमाफी आपल्याला झाली असती परंतु करमाफी करायची त्यांची इच्छा नसल्यामुळे आज पुन्हा त्यांच्याच आमदारांनी आपल्याला पत्र दिलं. महापौर मॅडम, आताच आमचे सन्मा. सदस्य

जुबेरजी बोलले, निलमजी बोलल्या, प्रविणजी बोलले परंतु कोणीही डंकेके चोटपर बोलले नाही की मिरा भाईंदर महापालिकेच्या क्षेत्रातील नागरीकांना करमाफ करा आम्ही तुमच्या बरोबर आहोत, त्यांनी काय म्हटलं की प्रशासनाच्या गोषवाऱ्याने प्रशासनाच्या मताने आपण केले पाहिजे, प्रशासनाचे मत प्रशासनाचे संभाषन त्यांनी अगोदर केलं पाहिजे होतं त्याच्या नंतर त्यांनी डिमांड केली पाहिजे होती पण तस त्यांनी केले नाही.

निलम ढवण :-

धृवकिशोरजी चुकीचे बोलत आहात आम्ही तुमच्यावर आरोप नाही करत तुम्ही आमच्यावर आरोप करत आहात.

धृवकिशोर पाटील :-

आज सर्व सदस्यांना आपली मत मांडायची आहेत आरोप केले नाहीत. जे स्पष्ट आहे तेच बोलतो आहे मॅडम मी हे तुमचे पत्र मी दाखवत आहे. आणि आज आपल्या सगळ्या 95 नगरसेवकांना आपली मत मांडायची म्हणून मी माझ मत एकदम शॉर्टपणे मांडलेले आहे मॅडम. आणि तुम्हाला सांगतो शंभर टक्के आज महाविकास आघाडी सरकार आहे जर आमची सरकार असती तर आम्ही शंभर टक्के कर माफी करुन तुम्हाला दाखवली असती. आणि कर माफी होऊ शकते मॅडम ज्याप्रमाणे ऑक्ट्रॉय बंद झाल्या नंतर जी.एस.टी. सुरुवात केली त्याप्रमाणे आदरणी उद्धवजी ठाकरे साहेबांनी केंद्र सरकारला आव्हान केले होते जोपर्यंत तुम्ही आम्हाला भरभरुन अनुदान देणार नाहीत तोपर्यंत आम्ही ऑक्ट्रॉय बंद करणार नाही अशी त्यांनी घोषना केली होती. आणि त्यांनी त्यांच्या सामनामध्ये आवाज दिला होता. आणि त्यानंतर आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजीनी मुंबई महापालिकेला घसघशीत अनुदान दिलं आणि आज जी.एस.टी. मुळे त्यांना अनुदान भेटते आणि आज मुंबई महापालिकेची स्थिती चांगली आहे. मॅडम ही करमाफी होऊ शकते मिरा भाईंदर महापालिकेच्या नागरीकांना आपण करमाफी शंभर टक्के देवू शकतो. फक्त विषय किती आहे फक्त 100 करोडचा विषय आहे. आणि 100 करोड राज्य सरकारतर्फे एकदम शुल्लक अमाऊंट आहे. मिरा भाईंदर महापालिकेच्या क्षेत्रातील जनतेला आपण जर करमाफी केली तर अनुदान जर राज्य शासनाने आपल्याला जर दिले तर शंभर टक्के मिरा भाईंदरच्या जनता करातुन मुक्त होईल. आणि आपण खरच त्यांना न्याय देवू शकतो. म्हणून माझी आपणास विनंती आहे, माझी जुबेरजींना विनंती आहे माझी निलमजींना विनंती आहे माझी धनेश पाटलांना विनंती आहे की आपण आपल्या नेत्यांना सांगा की मिरा भाईंदर शहराच्या नागरीकां करीता तुम्ही फक्त 100 कोटी अनुदान द्या आम्ही त्यांचा टॅक्स माफ करतो. धंन्यवाद मॅडम.

निलम ढवण :-

फक्त माझा विरोध एवढ्यासाठीच होता की सन्मा. धृवजींनी मी म्हणा, जुबेरजी म्हणा किंवा प्रविण पाटील म्हणा यांनी ठाम पणे सांगितल नाही की यांचा कर माफ व्हावा म्हणून आम्ही सुरुवातीलाच बोलण केलेले आहे की कर माफ व्हावा याच्यासाठी आम्ही पत्रव्यवहार देखील केलेला आहे परंतु अरे विविध ठिकाणी एवढे टॉवर आहेत टॉवरचे 7-7 करोड रुपये बाकी आहेत बाकिचा ओपन लॅंड टॅक्स आहे त्यांची तुम्ही वसुली केलेली नाही. ती का बिल्डरांना एवढ्या तुम्ही सुविधा देतात त्याचे पैसे घेत नाहीत. मग इथे कशाला तुम्ही गव्हर्नमेंटकडे हात पसरवायचे ?

मा. महापौर :-

ताई तुमचा विषय वेगळ्या पटरीवर चालला आहे=

निलम ढवण :-

पालिकेकडे पैसा नाही म्हणतात त्याच्यावर मी हे उत्तर देत आहे. आपली आर्थिक कुवत आहे आपली आपण कुवत पणाला लावून.............

मा. महापौर :-

ह्या विषयावरती तुम्ही आता बोला तुमच्या विषय वेगळ्याकडे चाललेला आहे.

निलम ढवण :-

मॅडम मी दुसरीकडे जात नाही मला काय म्हणायचे आहे की आपली कुवत नाही आहे आपण कुवत बणवू शकतो.

मा. महापौर :-

याचा अर्थ तुम्हाला शंका आहे का सदर विषय तुम्ही मंजुर करुन घेवून येणार नाही ?

निलम ढवण :-

तुम्ही स्टेट गव्हर्नमेंटकडे कशाला हात पसरवायचे याच्यासाठी ?

मा. महापौर :-

तुम्हाला शंका आहे का की सरनाईक साहेब तिथुन शासनाकडून मंजुर घेवून येणार नाहीत का हा ठराव ?

निलम ढवण :-

तो विषय नंतरचा आहे पण आपली पालिका एवढी कमकूवत आहे कमकुवत आहे कशाला करत रहायला पाहिजे ? बाकिच्यांना द्यायचे फायदे बिल्डर लोकांपासुन सगळ्या लोकांना फायदे द्यायचे आणि सर्व सामान्य नागरीकांना त्याचा फायदा मिळू नये.

मा. महापौर :-

तुम्ही रिस्पेक्ट करत नाही का मी करते म्हणून मी त्यांचा मान ठेवलेला आहे, दोन्ही आमदारांचा मान ठेवलेला आहे. हा विषय मी सभागृहामध्ये आणलेला आहे आणि त्यांनी मला मोठ समजल की माझ्राकडे पत्र लिहीलेले आहे ते मुख्यमंत्रयांनाही पत्र लिहू शकले असते आणि मुख्यमंत्र्यांकडून पण मंजुर करुन घेवू शकले असते. पण त्यांनी मला जो मान दिला आहे म्हणून मी पण त्यांना स्व:तहून माण देत आहे. म्हणून हा विषय मी महासभेमध्ये आणलेला आहे. आता आपल्याला ठरवायचे आहे की ह्यामध्ये आपल्याला काय करायचे आहे काय नाही करायचे. तुम्ही तुमचा ठराव करु शकता नाही तर सर्वानुमते हा ठराव जो आता आमच्या पक्षाचा जो करेल त्याला तुम्ही मंजुरी देवू शकतात. आता आपल्या सर्वांची चर्चा बहूतेक झालेली आहे त्याच्यामुळे आता मी प्रशासनाचे मत ह्या ठिकाणी जाणून घेवू इच्छीते की ह्या विषयावरती आपल्याला काय करता येईल.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम, जहा तक मेरी जानकारी के हिसाब से जो आप कह रहे हो प्रशासन को खुलासा करना चाहिये बाकी सभी सदस्य का कहना है प्रशासन को खुलासा करना चाहिये मेरा ऐसा मानना है की गोषवारा जो दिया हूवा है उसके अंदर प्रशासनने पुरी तऱ्हासे खुलासा किया हूवा है । अब खाली एकही विषय बचा था जो सावंत साहब ने कहा था ओथा की ओ 109 कहासे वो आकडे आये खाली वही विषय की बात थी । बाकी पुरीतऱ्हासे अगर किसीने प्रशासन के दिये हूये गोषवारे को पढा है तो उसमे कोईभी चिज छुपाई गई नही है । और महापौर मॅडमने जोभी कहा की वहापे नुकसान होगा ऐ नुकसान होगा उसपे ध्यान देना चाहिये । और वहाका पैसा बकाया वो वसुल करना चाहिये । मे ढवण मॅडम से फिर से अगाह करना चाहता हूँ और उनको बताना चाहता हूँ यह विषय एक साल के लिये एम महिने के लिये नही है सभी सदस्यो को पता चले और इस महासभाके माध्यम से सभी पुरे शहर वासियो को और पत्रकार बंधुवो कोभी पता चले यह विषय जीवन काल के लिये हो रहा है, तो अगर किसी का पैसा बाकी है तो शायद वो यह साल का बाकी होगा या पिछले साल का बाकी होगा । ढवण मॅडम सभी सदस्यो को यह बताना चाहता हूँ लेकीन यह जो विषय आया हूवा है यह हमेशा के लिये है यह ना एक साल के लिये है ना एक महिने के लिये तो हमे गंभीर तौर पे ध्यान रखना पडेगा की हमारी महानगरपालिका का क्या नुकसान हो रहा है । जिस तरीके से महापौरने कहा

मुझेभी विश्वास है की जो आमदारने कहा है वो कर सकते है, उन्होने जनता को गृमऱ्हा नही किया है उनकी ताकत है वो ला सकते है वो कर के दे सकते है । तो प्रशासन का खुलासा न करते हूये उसके अगर किसी का अगर शहर के हित मे अगर कुछ करना चाहते है मेरा खाली योगदान और मेरा निवेदन ठराव करने के लिये महापौर मॅडम आपे द्वारा यही रहेगा.............

मा. महापौर :-

प्रशासनाने जो गोषवारा दिलेला आहे त्याच्या व्यतिरिक्त ते बोलत असतील तर बोलू देत. सन्मा. सदस्यांना पण कळेल की प्रशासनाला काय म्हणायचे आहे.

संदिप शिंदे :-

सन्मा. महापौर महोदया, सन्मा. आयुक्त महोदय, सन्मा. सभागृह सन्मा. महापौर महोदय यांच्या वतीने मी या विषया संदर्भामध्ये थोडक्यात निवेदन करतो. मा. आयुक्त महोदयांनी ह्या संदर्भातला सविस्तर गोषवारा आपल्या समोर सादर केलेला आहे. तथापी काही सन्मा. सदस्यांनी 109 कोटी रुपये संदर्भामध्ये प्रश्न विचारला होता म्हणून मी त्याचे स्पष्टीकरण करु इच्छीतो सन्मा. सभागृहाला माझी विनंती आहे की गोषवारा देताना आम्ही सविस्तर दिलेले आहे परंतु सन्मा. उपमहापौर साहेबांनी जसं सांगितले की 109 कोटी कुठून आपल्याकडे आलेले आहे तर आपल्या महापालिकेच्या हद्दीमध्ये सध्या 3 लाख 48 हजार 451 प्रॉपर्टी आहेत त्यामध्ये 2 लाख 94 हजार प्रॉपर्टी ह्या निवासी मालमत्ता आहेत. 54 हजार 9 बिगर निवासी मालमत्ता आहेत. या मालमत्ताची चालु अधिक थकबाकी प्रॉपर आम्ही शब्दाची व्हर्डिंग टाकलेली आहे. ते 152 कोटी व 132 कोटी असे एकूण 184 कोटी रुपयाची आपली मागणी आहे. यापैकी 500 चौरस फुटा पर्यंतच्या ज्या काही प्रॉपर्टी आहेत त्या प्रॉपर्टी 2 लाख 77 हजार 885 आहेत त्यापैकी 2 लाख 30 हजार ह्या निवासी तर 47 हजार 458 ह्या बिगर निवासी मालमत्ता आहेत. ह्या सर्व मालमत्ताची एकूण थकबाकी अधिक चालु अशी मागणी 164 कोटी रुपये इतकी येते. आणि 500 फुटा पर्यंतचा जर विचार फक्त निवासीचा जर आपण काढला तर 66 टक्के येते. आता आपल्याला जे सन्मा. सदस्यांनी विचारले की 109 कोटी रुपये कुठून आले तर निवासी मालमत्ता पैकी 500 फुटा पर्यंतच आपण चर्चा केली तर यामध्ये 2 लाख 30 हजार 427 प्रॉपर्टी आहेत 500 फुटापर्यंतच्या त्याची जी मागणी आहे ती मागणी आपली थकबाकी 43 कोटी आणि चालु 66 कोटी अशी एकुण मागणी होते 109 कोटी 55 लाख रुपये. आम्ही सरळ ती राऊंड फिगर करताना 109 कोटी रुपये दिलेले आहेत. तर आपण 500 फुटा पर्यंतचा जर टॅक्स माफ करायचा जर ह्या ठिकाणी निर्णय झाला तर त्यामधुन महापालिकेला 109 कोटी रुपये दर वर्षी आपले उत्पन्न थांबणार आहे अशा प्रकारचे ह्या ठिकाणी आम्ही निवेदन करतो.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो वेगवेगळ्या सन्मा. सदस्यांनी आणि सर्व लोकप्रतिनिधींनी आपले म्हणणे मांडलेले आहे. याच्यात आम्ही गोषवारा स्वयंस्पष्ट दिलेला आहे परंतु त्याच्यात एक अॅड करतो सध्या महापालिकेची स्थिती कोरोना मुळे आर्थिक स्थिती तर बिकट आहेच सध्याचा ह्या महापालिकेचा स्पील ओव्हर 468 कोटी. दुसरी गोष्ट मा. शासनाच्या बरोबर वेगवेगळ्या ज्या बैठका होतात त्यामध्ये प्रत्येक बैठकीत हे ऐकविण्यात येते की प्रत्येक महापालिकेने आपला स्व:तच्या उत्पन्नाचा स्त्रोत वाढवला पाहिजे. सोर्स ऑफ इनकम हा महापालिकेने स्व:तचा वाढवला पाहिजे. वेळोवेळी शासनाकडे याच्यासाठी निधी साठी मुलभूत निधी असो किंवा इतर असेल त्यासाठी पाठपूरावा नकरता आपले स्व:तचे उत्पन्न वाढवले पाहिजे असे एकंदरीत सुरु असते. त्यानंतर जे वेगवेगळे हेड आणि याच्यात 85 कोटी, 109 कोटी आणि 284 कोटी हे जे मा. सदस्य सावंत साहेब यांनी जे मांडले ते आमचे उपायुकतांनी तुम्हाला खुलासा केलेलाच आहे ते वेगवेगळे हेड असल्यामुळे तुम्हाला ते 85 कोटी प्रत्येक हेड्स वेगवेगळे आहेत त्या प्रत्येक हेडचे ग्रॅंड टोटल केल्यावर तुम्हाला मालमत्ता कराचे ते जनरल हेड असते वृक्षप्राधिकरण असते, सिवरेज असते अशा वेगवेगळ्या हेडखाली

तर त्यामुळे त्यांना ते कमी वाटले परंतु ते वेगवेगळ्या हेडची ग्रँड टोटल केल्या नंतर येतो तो फिगर प्रॉपर मॅच होतो. दुसरी गोष्ट मला सांगायची आहे की आता जी आपण माफी मागत आहोत ही फक्त एक वर्षासाठी नाही. आता उपमहापौर साहेबांनी पण सांगितले जे दुर्गामी परिनाम आहेत. आपण ह्या वर्षी फक्त 500 फुटापर्यंत चाचले तर ही महापालिका छोटी आहे ड - वर्ग महापालिका आहे आणि 500 फुटापर्यंत घरांची संख्या ह्या महापालिकेत जास्त आहेत. दर वर्षी जर सोडायचे म्हटले तर महापालिकेचा आर्थिक कंबर्ड पुर्णत: मोडले जाईल भविष्याम महापालिका चालविणे अवघड होईल. जे वेगवेगळे विकासाचे प्रकल्प चालले आहेत ते थांबवावे लागतील, आस्थापनेवरचा खर्च, विकासाचे प्रकल्प, साफसफाई, वैद्यकिय कोरोनासारखी महामारी हे सर्व जर झेलायचे असेल महापालिकेला स्व:तच्या याच्यावर तर हा मालमत्ता कर आपला बॅकबोन आहे हा आपला पाठीचा कणा आहे जर तोच काढून टाकला तर महापालिका चालविणे अशक्य होईल म्हणून प्रशासन प्रमुख म्हणून सांगतो कुठल्याही परिस्थिती याची पर्यारी व्यवस्था आपल्याकडे असल्या शिवाय आपली ड-वर्ग महापालिका आहे आपल्याला करणे शक्य नाही आपली तुलना नेहमीच मुंबई सारखी आणि ठाणे, नवी मुंबई सारखी अ-वर्ग महापालिका अशी होते. अ-वर्ग, आणि ब-वर्ग महापालिकांचे उत्पन्नाचे स्त्रोत वेगळे आहेत त्यांचे एफ.डी. वेगळ्या आहेत त्यांचे उत्पन्नाचे साधने आपल्या पेक्षा जास्त आहेत सोर्स ऑफ इनकम जास्त आहेत म्हणून त्यांना शक्य होते. आपली महापालिका ग्रोईंग आहे डेव्हलपींग आहे त्यामुळे कसल्याही परिस्थितीत प्रॉपरटॅक्स ही महापालिका चालवणे शक्य होणार नाही म्हणून पर्यायी मार्ग असले पाहिजेत उत्पन्नाचे स्त्रोत असले पाहिजेत, किंवा शासनाने तेवढे दरवर्षी आर्थिक तरतुद केली पाहिजे. एक वर्षासाठी 109 कोटी देणे आणि दरवर्षी प्रपोस्टेटली त्यात वाढ होत जाईल. दरवर्षी शासनाने पैसे द्यावे लागतील अन्यथा एल.बी.टी. आणि जो आपला ऑक्ट्रॉय गेल्या नंतर जे आपले आर्थिक अडचण झाली होती त्यापेक्षा यात भयंकर अडचण होऊ शकते. म्हणून प्रशासन प्रमुख म्हणून सध्यस्थितीत आपल्याकडे पर्यायी मार्ग समोर असल्या शिवाय उत्पन्न आपल्या ताब्यात येण्याची खात्री असल्या शिवाय मालमत्ता कर माफ करणे अशक्य आहे असे माझे मत आहे. धंन्यवाद.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्या गिता जैन मॅडम बोला.

गिता जैन :-

धंन्यवाद मॅडम, सर्व प्रथम आपण माझा पत्राला मान देवून हा विषय आज घेतला त्याबदल तुमचे परत मी अभिनंदन करते. आणि आता पासुन मी गृहीत धरते की आम्ही जे जे लेटर लिहीनार ते ते विषय महासभेत येणार धंन्यवाद त्यासाठीही.

मा. महापौर :-

असे तुम्ही गृहीत धरु नका तुम्ही काही पण देणार आणि मी काही पण घेणारका मॅडम. शहराच्या हिताच्या दृष्टीकोणातुन तुम्ही विषय आणला तर मी घेणार नाहीका ? घेणार. तुम्ही आणखीन आणा शहराच्या हिताच्या दृष्टीकोणातुन विषय मी घेणारना.

गिता जैन :-

मॅडम, ती पुढेही शहराच्या हिताच्या दृष्टीकोणातुनच विषय आणनार तुम्ही का असं सांगतात की हिताचा दृष्टीने आणनार नाही.

मा. महापौर :-

तुम्ही बोलण्यामध्ये पहिला असे म्हणालात की मी जे जे विषय आणनार ते तुम्ही घेणार म्हणजे जे जे म्हणजे कुठलेपण असू शकतील. तुम्ही असे म्हणायला पाहिजे होते की मिरा भाईंदर शहराच्या हिताच्या दृष्टीकोणातुन जे विषय आणनार ते तुम्ही घेणार.

गिता जैन :-

मॅडम मी तुमचे अभिनंदन केले आहे हा विषय घेतल्या बद्दल ठिक आहे मॅडम, सर्व प्रथम राजनिती सुरु करतात असा आमच्यावर आरोप झाला आहे. मॅडम राजनिती कधी पासुन सुरु झाली ?

मा. महापौर :-

अहो याचा मी कसा खुलासा देणार ? राजनिती आता कोणीही करु शकतो.

गिता जैन :-

आता पाटील साहेबांनी सांगितले असे पत्र लिहून राजनिती तर मॅडम आमच्या आधीही एका नेत्याने आपल्या पदाधिकाऱ्याने मुख्य मंत्र्याला लेटर लिहीले होते की आम्हालाही करमाफी द्या. मॅडम आपण महापौर आहात आणि कायदा आपल्यालाही माहित असेल की स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये करात काय करायचे काय नाही करायचे हे सगळे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थेने घ्यायचे असते जनरल बॉडीमध्ये त्याशिवाय तुम्ही कुठलेही म्हणजे इव्हन जरी मुख्य मंत्र्यांनी घोषना केली तरीही ते विषय होऊ शकत नाही. राजकिय आपल्याला हा ठराव आणायचा आहे त्यासाठी प्रशासनाला विश्वासात घ्यायचं काम ही महापौर मॅडम आपले आहे. त्याचे प्लस मायनस काय होणार त्यावर चर्चा करायचंही काम आपलं आहे.

मा. महापौर :-

ऐका मॅडत तुम्ही पुन्हा चुकत आहात माझ काम मला माहित आहे की प्रशासनाला कस विश्वासात घ्यायचं किंवा त्यांच्याशी कशी चर्चा करायची मग तुम्ही आमदार आहात ह्या मिरा भाईंदर शहराचे तुम्ही चांगले नेतृत्व करत आहेत मग तुम्ही हा विषय मला लेखी पत्रा द्वारे दिलेले आहे किंवा तुम्ही प्रशासनाचे मत नाही विचारलं का ?

गिता जैन :-

मॅडम, मी परत आपल्याला सांगते की हा कायदाच आहे की महापौरांनी तो विषय जोपर्यंत जनरल बॉडीमध्ये पास होत नाही तोपर्यंत इव्हन मुख्यमंत्रीची घोषना करुनही ती करमाफी होऊ शकत नाही म्हणून आमचं देअर आर नो वे आम्हाला तुम्हालाच ते द्यायचे होते आणि आम्ही ते दिलं. ते कायद्याचे आहे मॅडम त्यात काही आम्ही चुकीचे केलेले नाही.

मा. महापौर :-

आपण सभागृहामध्ये आणलेना.

गिता जैन :-

आणले त्याबदल अभिनंदन आम्ही केले.

मा. महापौर :-

मग आपण आता ह्या विषयावर बोला त्या विषयावर का बोलत आहात. आपल्याला कसा कर माफ करता येईल ह्या विषयावर बोला.

गिता जैन :-

मी तेच सांगते की जेव्हा आपण करमाफी बद्दल बोलत असतो मॅडम तेव्हा कर माफी करुन जो तुटवडा होणार आहे ते आपण कुठून परत ते त्याला करु शकु म्हणजे परत तेवढी इनकम आपण इथेही करु शकु त्यासाठी आपले प्रयत्न आणि चर्चा ही नक्कीच पाहिजे. मी आता विषय वाचत होती तर काही तरी मला थोडे असे विषयही वाटले की आपण जरा अपोझिट सेंसस सांगु शकतो की असुद्या जेव्हा ते विषय येणार त्यावेळी त्यावरही बोलणार पण सर्व प्रथम राजकिय जर ठराव झाला जसा दुसरी महानगरपालिकेमध्ये झाला आहे मॅडम मी ठाणेचे म्हस्के साहेबा बरोबरही बोलली त्यांनी सांगितले आम्ही पहिला स्टडी केला मग आम्ही हे राजकिय ठराव आणला की आम्हाला किती तुटवडा होणार कशा प्रकारे किती परसेंटने किती 500-600-700 घरांना आम्ही माफी देवू शकतो आणि त्यानंतर आम्ही तो ठराव आणला. तर मॅडम आपण पण एखाद्या वेळी आम्हाला किंवा सगळ्यांना

विश्वासात घेवून ती चर्चा झाली असती कमिश्नर साहेबाला तेव्हा बसायला पाहिजे होते आणि आम्ही पण त्या पत्रात आम्ही सुचवलं असतं की हे मॅडम शेवटी जी काही उपाय योजना करायची आहे उत्पन्न वाढवायला ते स्थानिक स्वराज्य संस्था आणि प्रशासनने करायची आहे. आम्ही त्यात आमची सुचना देवू शकतो आमचं गाईडन्स देवू शकतो पण आम्ही ते करु शकत नाही राबवायचे तुम्हालाच आहे मॅडम. त्यात आम्हाला हे सांगायचे की तुम्ही राजनिती चालु केली हे चुकीचे आहे. म्हणजे कोणी काहीही सांगायचे हे मला अस वाटते की हे चुकीचे आहे महापौर मॅडम मला तुमचाकडून अशी अशा होती की तेव्हाच तुमचे सदस्यांना थांबवून सांगायचं होतं की अशी काही तरी राजनिती तुम्ही इथे करु नका आपण शहराच्या जनतेसाठी इथे बसलो आहोत आणि ते होऊ शकते की नाही 500 होऊ शकत नाही निदान 300 होऊ शकते का , 250 होऊ शकते यावर कोणी चर्चाच करत नाही किंवा यावर अभ्यासच झालेला नाही की 500 आपल्यासाठी पॉसिबल नाही ड वर्ग कार्पोरेशन आहे आपल्यासाठी कदाचित 500 पॉसिबल नाही आहे पण त्यापेक्षा गरीब मानसाला 250-300 मध्ये राहतात त्यासाठी आपण काही करु शकु का मग तेवढा काय तुटवडा होणार आहे ती स्टडी झाली आहे का मॅडम ? किंवा कमिश्नर साहेबांनी तसं ................

मा. महापौर :-

मॅडम तुम्ही असं कसं बोलता तुम्ही मला पत्र दिलं आहे आणि ते पत्र देवून आता मला वाटते चांगले 20-25 दिवस झाले मग तुम्ही काय स्टडी केली तुम्ही आता इथे बोलता सभागृहामध्ये विषय पटला वरती विषय आल्या नंतर पण तुम्हाला संधी दिलेली असते. प्रोसेडिंग मिळाल्या नंतर त्याच्या नंतर तुम्ही तुमच्या पक्षाच्या नगरसेवकांना घेऊन इथे आयुक्तांकडे जावून स्टडी करायची होती. तुम्ही आता इथे सभागृहामध्ये बोलत आहात की इथे स्टडी करायला पाहिजे. ह्या सभागृहामध्ये स्टडी कशी घेणार, सभागृहामध्ये तुमची मत मांडली जाणार आणि त्याच्या वरती ठराव होणार.

गिता जैन :-

मॅडम, जी उपाय योजना होणार ते सत्ताधारी पक्षाने राबवायचे असते. शेवटी आम्ही चर्चा करुनही काय करणार मॅडम उपाय योजना आपण शोधायची होती.........

मा. महापौर :-

म्हणजे वाईट झालो तर सत्ताधारी चांगले झाले तर आम्ही.

गिता जैन :-

मॅडम ते मला नाही तुम्हाला शोधायचे होते. आपण महापौर म्हणून बसल्या आहात.

(सभागृहामध्ये गोंधळ )

मा. महापौर :-

तुम्ही जेव्हा मला हे पत्र दिलं तेव्हा तुम्ही स्टडी केली नाही का ?

गिता जैन :-

मॅडम पण उपाय योजना तुम्हाला करायची आहे ते मला नाही मॅडम. महापौर मॅडम आपण आहात माझापेक्षा आपले उंच्च पद आहे. शेवटी उपाय योजना आपल्याला राबवायची आहे. आम्ही सुचना करु शकतो. आम्ही तो उपाय राबवू शकत नाही आम्ही सुचना करु शकतो मॅडम.

मा. महापौर :-

ह्या सुचना मी घेतल्याना मॅडम.

गिता जैन :-

तुम्ही बोलाना आम्हाला विश्वासात घ्याना आम्ही नक्कीच येवू आम्ही आमची मतेही मांडणार. मॅडम योगानूयोग मी कार्पोरेटर पण आहे तर तुमच्याशी वन टू वन बोलत आहे सरनाईक साहेबांना तर तिही संधी भेटत नाही. तर आम्ही बोलूत आम्ही आमचे देवू आमचे गाईडन्स आमची सुचना आमच्या आयडीयाज आपल्याला देवू पण आपण कधी बोलवलेच नाही आमच्या बरोबर चर्चाच नाही.

मा. महापौर :-

का बोलवू तुम्हाला तुमच्या पत्राला मान देवून हा विषय मी सभागृहामध्ये घेतला. आता सन्मा. दोन दोन आमदार ह्या क्षेत्राचे तर मला पत्र देत असतील आणि विषय शहराचा हिताचा असेल तर तो विषय मी घ्यायला पाहिजे की नाही घ्यायला पाहिजे ?

गिता जैन :-

मी सांगितले आज माझे जे बोलणे आहे ते प्रशासनाच्या निवेदनावर आहे मॅडम की अस वाटलं कदाचित..............

मा. महापौर :-

मॅडम आता हा आपण विषय घेतला बऱ्याचशा सदस्यांनी चर्चा केली आता चर्चा केल्या नंतर आता आपल्याला एकमताने ठराव करुन शासनाकडे पाठवायचा आहे आणि तुम्ही मला दुसरेही पत्र दिले आहे की शासनाकडे तुम्ही ठराव मंजुर करुन पाठवा मी त्याच्याकडून तुम्हाला ग्वाही देते की मी तो मंजुर करुन शासनाकडून आणेन असे दुसरे पत्र तुम्ही मला दिलेले आहे.

गिता जैन :-

मॅडम मी परत ग्वाही देते.

मा. महापौर :-

पत्र सरनाईक साहेबांनी पण दिलेले आहे मग मी तुमच्यावर विश्वास ठेवू नको का ?

गिता जैन :-

हंडरेड परसेंट ठेवाना मॅडम.

मा. महापौर :-

तुमचे काय म्हणणे आहे मी हा विषय आणून चुकी केली.

गिता जैन :-

नाही मॅडम मी अभिनंदन केले आहे.

मा. महापौर :-

मी ठराव करुन तुम्हाला देतो तो तुम्ही शासनाकडून मंजुर करुन आणा.

गिता जैन :-

नक्कीच आणनार.

मा. महापौर :-

बस झाले मग वेगळे फाटे कशाला फोडत आहेत ? प्रशासनाकडून बैठक झाली पाहिजे, प्रशासनाचे मत घेतले पाहिजे प्रशासनाने पण त्यांचे मत सांगितले तुम्हाला गोषवारा दिलेला आहे.

गिता जैन :-

मी वेगळे फाटे फोडतच नाही मॅडम, परत मी तेच सांगते की मला दुसरे ना फाटे फाडायचे आहेत.

मा. महापौर :-

मला तुम्हाला एकच विनंती करायची आहे आणि आमदार सरनाईक साहेब यांचा मी फार रिस्पेक्ट करते त्यांनी मला बऱ्याच वेळेला चायनलच्या माध्यामातुन बहिण म्हणून संबोधीत केले आहे आणि म्हणून मी त्यांचा रिस्पेक्ट करते आणि मी त्यांच्यावरही विश्वास ठेवते की त्यांनीही शासनाकडून मंजुर करुन आणायचा आहे. आणि सर्व सभागृहाने ह्या ठिकाणी संमती करुन ठराव करुन शासनाकडे द्या.

गिता जैन :-

महापौर मॅडम मी परत ग्वाही देते.

मा. महापौर :-

तुम्ही ग्वाही नका देवू तुम्ही शासनाकडून फक्त मंजुर करुन आणा. मी ह्या ठिकाणी सर्वांचा सत्कार करेल दोन्ही आमदारांचा मी स्व:त सत्कार करीन. माझा सर्व मिरा भाईंदर शहराचा लोकप्रतिनिधीच्या वतीने आणि सर्वांना एकत्रित घेवून प्रशासनाला एकत्रित घेवून दोन्ही सन्मा. आमदारांचा सत्कार मी स्व:त करीन.

गिता जैन :-

महापौर मॅडम, मी परत परत आपल्याला सांगते की मला हे बाकीचं सगळं काही करायची गरज नाही आपल्याला एवढं बोलायची गरज नाही मी शांततेने हे सांगते की जर का 500 होत नाही 300 होते का, 200 होते का ते तरी आपण स्टडी करायला पाहिजे होते एवढे दिवस नाही झाला हरकत नाही आपण पुढे करु. पण मी आपणाला परत सांगते की आपण हा ठराव करुन घ्या प्रशासनाने ते पाठवावे आणि मंजुर करायची जबाबदारी आम्ही दोघे आमदार घेतो हे मी परत सांगते.

मा. महापौर :-

धंन्यवाद, ठिक आहे आता ठराव करा. तुम्ही ठराव करा आम्ही तुम्हाला समर्थन करतो.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम आता खुप चर्चा झाली ह्या ज्वलंत प्रशनावर आता ठराव होऊ द्या. ह्या ठरावाकडे ह्या सर्व मिरा भाईंदर शहराचे लक्ष लागलेले आहे. महापौर मॅडम आपल्याला आपल्या माध्यमातुन सांगेण की मा. मुख्यमंत्री आणि नगरविकास मंत्र्यांना ॲस सभागृहनेता म्हणून मीच निवेदन दिले होते महापौर मॅडम आपल्यालाही हे माहित आहे आणि मी हे सर्व सन्मा. सदस्यांना पण सांगु इच्छीतो एखाद्या लोकप्रतिनिधीने माझ नाव नाही घेतल कोणी दिलं काय तो भाग नाही पण मी देतो. सध्या आता जे चर्चा करत होते त्यांचे जे काही म्हणणे होते त्यांनी पत्र महापौरांना दिलं आम्ही आमची बाजु मांडतोयना सभागृहात फक्त आपले वय झाले म्हणून आपल्याला जास्त कळतं अशा रोशात कोणी राहू नये. ह्या सन्मा. सभागृहामध्ये सर्व सन्मा. सदस्य आहेत आणि सर्व सदस्यांना कळते की आपल्याला काय करायला पाहिजे आपण कुठे करमाफी द्यायला पाहिजे काय आणि करमाफी ही शासनच करणार आहेना त्यामुळे किती माफ करायचे काय करायचे आणि बॉडीला अधिकार आहेत बॉडी तो ठराव करते महापौर मॅडम. मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील निवासी इमारतींमधील 500 चौरस फुटांपर्यंत चटई क्षेत्र असलेल्या घरांना मालमत्ता कर संपूर्णपणे माफ करण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री श्री. उध्दवजी ठाकरे यांनी केली आहे.

मिरा भाईंदर शहर हे मुंबई लगतच असल्याने सर्व लोकप्रतिनीधींनी मिरा भाईंदर शहरातील रहिवासीयांकरीता निवासी इमारतींमधील 500 चौरस फुटांपर्यंत चटई क्षेत्र असलेल्या घरांना मालमत्ता कर माफ करणेबाबत मागणी केलेली आहे.

मिरा भाईंदर शहरातील निवासी इमारतींमधील 500 चौ. फुटापर्यंत चटई क्षेत्र असलेल्या घरांना आकारण्यात येणारा मालमत्ता कर संपूर्णपणे माफ करावा व कर माफी केल्यानंतर महापालिकेस येणाऱ्या तुटीची रक्कम भरपाई म्हणून शासनाकडून दरवर्षी अनुदान घेण्यास तसेच याबाबत प्रशासनाने सन 2022-23 च्या अंदाजपत्रकात तरतुद करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

दि.01/04/2022 पासून शहरातील नागरीकांच्या निवासी इमारतींमधील 500 चौ. फुटापर्यंतच्या घरांचा मालमत्ता कर संपूर्णपणे माफ करण्याकरीता प्रशासनाने कर माफीचा प्रस्ताव मंजुरीस्तव राज्य शासनास त्वरीत पाठवावा व दि.20/02/2022 पर्यंत कर माफीची आवश्यक ती कार्यवाही करणेस ठराव मांडत आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम आम्हाला आमच्या बाजुने ठराव करावा लागेल.

मा. महापौर :-

करा.

जुबेर इनामदार :-

तो ठराव करायचा आधी.............

मा. महापौर :-

आता चर्चा नको ठराव झालेला आहे तुम्ही डायरेक्ट ठराव करा. चर्चा झालेली आहे चर्चा करायला तुम्हाला संधी दिली होती तुम्ही प्लिज ठराव करा.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, हा विरोधी पक्षाचा गटनेता आहे काँग्रेस लोकशाही आघाडीच्या वतीने मी बोलत आहे एकटा माणुस कारण तुम्ही दुसऱ्याला संधीच देत नाही. आता एक आरोप झाला आणि ते सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटलांनी केला त्यांचे मला ते आरोप ऐकताना माईंडच्या मागे एक दुसरा विषय चालु होता मी परत येणार मी परत येणार मी परत येणार असे मुख्यमंत्री बोलायचे ते मुख्यमंत्री परत येवून येवून येवून मिरा भाईंदरमध्ये बरेच काही बोलून गेले होते. दिल्लीच्या गल्ली पर्यंत कुठच्या पध्दतीची भाषन करायचे हे कोणा कडून शिकायची असेल तर ते परत येणार हे जे व्यक्ती बोलायचे त्यांच्याकडून शिकायला पाहिजे. कारण सांगतो मुंबई महानगरपालिकेने 2018-19 के लिये.............

मा. महापौर :-

हे तुम्ही जे काही म्हणत आहेत ते तुम्ही तुमच्या ठरावात म्हणा.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम कदांचित तुम्हाला तुमच्या सदस्यांना थांबवले पाहिजे की बोलताना आपली खरी बाजु मांडा कारण तुम्हाला याची खरी बाजु तुम्हाला मी दाखवून देवू शकतो. हा मुंबई महानगरपालिकेचा आलेला आपला जो जी.आर. आहे शासन निर्णय त्याच्यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे 2019 मध्ये म्हणजे 2018-19 साठी मुंबई महानगरपालिकेने ठराव करुन पाठवला होता तेव्हा भाजपा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे तेव्हा मुख्यमंत्री होते का केले नाही त्यांनी निवडणूक 21 ऑक्टोंबर 2019 ला लागला...........

मा. महापौर :-

फडणवीस साहेबांपर्यंत जावू नका तुम्ही तुमचे सांगा तुम्ही तुमचे मत मांडा.

जुबेर इनामदार :-

शासन जेव्हा महाविकास आघाडीची सत्ता आली तेव्हा मुंबई महानगरपालिकेमध्ये हा जो प्रस्ताव आहे त्याला मान्यता देण्यात आली महाविकास आघाडीने मान्यता दिलेली आहे.

मा. उपमहापौर :-

जुबेरभाई आपको खाली इतना काम करना है की आपका ठराव क्या है वो पढना है वो पढीये।

जुबेर इनामदार :-

ठराव भी पढेगे वो मेरा अधिकार है ओ थोडे कोई ले सकता है ।

मा. महापौर :-

तुमचा ठराव वाचा.

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय तुमचे निवेदन खरतर तांत्रिक आणि असलेल्या आर्थिक बाबीला अनुसरुन असलेले निवेदन याच्यामध्ये साहेब एक बैठक लागलेली होती 10/01/2022 रोजी त्याच्यामध्ये आम्हाला दिलेली माहिती प्रमाणे रवि पवार साहेबांनी तयार केलेला उपायुक्त पद त्याच्यामध्ये 60 कोटी रुपये म्हणजे 300 चौरस फुट पर्यंत ज्या मालमत्ता आहेत ते अंदाजे 15 कोटी रुपये आणि

300 ते 500 चौरस फुटा पर्यंत जी मालमत्ता आहे त्याला 44 कोटी रुपये असे एकुण 61 कोटी रुपयाचा.................

मा. महापौर :-

तुम्ही ठराव मांडा तुम्ही आता ठराव मांडाल तर मला कळेल.

जुबेर इनामदार :-

ठरावच मांडतो आहे त्याच्या नंतर आणि का मांडतोय तो ठराव 61 कोटी रुपये कुठून आणलेली.

मा. महापौर :-

एक ठराव झाला आहे मग दुसरा ठराव तुमचा मांडायचा आहे मग तो मांडा मग काय असेल ते मतदान होईल.............

जुबेर इनामदार :-

त्या आमदारांचा राग माझ्यावर कशाला काढत आहेत ?

मा. महापौर :-

अजुन पण विषय विषयपटलावर आहेतना मी आमदारांचा राग कशाला काढू ? आमदारांचा तर मी सन्मान करते.

जुबेर इनामदार :-

तुम्ही सन्मान करताना आमची बाजु तर ऐकून घ्या ते 61 कोटी रुपये कुठून आले. कारण मी ठरावामध्ये त्याचा उल्लेख करणार आहे. आणि प्रशासनाने तो विषय खरतर प्रशासनाने आपला केलेला ठरावाच्या नंतर तो प्रस्ताव प्रशासनाने तयार करुन शासनाला पाठविलेला आहे.

मा. उपमहापौर :-

जुबेरभाई आपको जो बाद रखनी है वो ठराव मे रखोना ?

जुबेर इनामदार :-

प्रशासनाने 451 अंतर्गत विखंडत करायला पाठवून दिला तर मग तुम्ही काय कराल ?

मा. महापौर :-

आम्ही ठराव पाठवू तुम्हाला ?

जुबेर इनामदार :-

तुमच्या ठरावाला मी काय करणार.

मा. महापौर :-

मग तुमचा वाचाना.

जुबेर इनामदार :-

तुमचा थातुरमातूर केला आहे. तुमच्या थातुरमातुर ठरावाचे मी काय करु.

मा. महापौर :-

मग तुमचा ठराव वाचा.

जुबेर इनामदार :-

वाचतो, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभा दि. २५/०१/२०२२ प्रकरण क्र. ८४ मिरा भाईंदर शहरातील ५०० चौ.फुटापर्यंतच्या घराला मालमत्ता कर माफ करणे बाबत.

मुंबई ठाणे व नवी मुंबई महानगरपालिकेत व्यक्तीवात मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ५०० चौ. फुटापर्यंतच्या घरांना मालमत्ता कर माफी देण्यासाठी धोरणात्मक आर्थिक उपाययोजना करून महासभा ठराव मंजूर करून शासनाकडे आर्थिक मंजुरीसाठी पाठवावा लागेल मुंबई ठाणे व नवी मुंबई महानगरपालिकेने महानगरपालिकेस स्वत: ५०० चौ. फुटापर्यंत घराचे मालमत्ता कर माफी देण्यासाठी त्यांच्या सर्व सर्वसाधारण सभेमध्ये धोरणात्मक ठराव मंजूर करून शासनाकडे मंजुरीसाठी पाठवले

असता. महाराष्ट्र शासन जा.३/२०१९ आरआय नंबर NAHEANG/२००९/३५५२८ अन्वये ठराव मंजूर करून ५०० चौ.फुटापर्यंत रहिवासी मालमत्ता यांना मालमत्ता कर माफी करण्याचा निर्णय दिला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिककेत कर माफीचा ठराव २०/०२/२०२२ आधी करावा लागेल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ९९ अंतर्गत तसेच सन २०२२-२३ अर्थसंकल्पीय अंदाज स्थायी समितीमध्ये मंजूर करतांना महसुली उत्तन्न मालमत्ता कर लेखा शिर्षका अंतर्गत आयुक्तांनी दिलेल्या अंदाजात ७० टक्के ६१ कोटी अंदाजे कपात करून अंदाजपत्रक जमेच्या बाजुला मंजुरी देण्यात यावी तद्नंतर महासभेच्या मंजुरीचा ठराव शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवावा ज्याअर्थी मिरा भाईंदर महानगरपालिकेत सध्या एक हाती सत्ता असणारे भाजपा पक्ष सत्ताधारी तसेच आर्थिक तयारी मालमत्ता कर माफीची प्रथम दर्शनी दर्शविणे तर महानगरपालिकेचे आर्थिक भार उचलण्याची क्षमता शासनाला स्पष्ट समजेल त्याआर्थी महाराष्ट्र शासनाला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात विशेष बद्दल करून ठरावाला अंतिम मंजुरी देणे जिकरीचे ठरणार नाही. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांना खरोखर कर माफी देण्याची सत्ताधारी भाजपा पक्षाची मनापासून इच्छा असेल तर सुचविलेल्या वर पहिले अंमलबजावणी करून ठराव शासनाकडे पाठवला जाईल आणि प्रशासन तशी आपली भूमिका स्पष्ट करून प्रशासनाकडे अंतिम मंजुरीसाठी हा ठराव पाठवेल असा मी ठराव करत आहे.

निलम ढवण :-

माझे अनुमोदन आहे. मॅडम मी एका गोष्टीकडे लक्षवेधू इच्छीते की मगाशी ठराव झाला ठिक आहे पण मगाशी आयुक्त साहेबांनी प्रशासनाच्या वतीने सांगितले आहे की राज्य शासनाने शक्यतो स्वराज्य संस्थांना स्व:तची तरतुद स्व:त करायला सांगितलेली आहे तर त्यानुसार त्या विषयाचा देखील आपण विचार करावा.

मा. महापौर :-

आपण दोन ठराव केलेले आहेत सन्मा. सदस्य जुबेर इनामदारजी त्याला तुम्ही अनुमोदन दिलेले आहे एक ठराव आपला दळवी साहेबांनी केलेला आहे दोन्ही ठराव आपण ह्या ठिकाणी मतदानाला टाकणार आहोत आणि जो कुठला ठराव तुम्हाला शासनाकडून मंजुर करुन आणायचा असेल तर तो तुम्ही मंजुर करुन आणा सचिव साहेब दोन ठराव आलेले आहेत मतदान घ्या.

गिता जैन :-

मॅडम, माझी एक विनंती आहे आपण दोघी ठराव बघणार तर दोघी ठरावाचे आम्ही समर्थनच केले आहे एक दुसऱ्यांच्या विरोधात नाही तर मला असे वाटते की दोघांना क्लब करुन सर्वानुमते हा ठराव पास झाला पाहिजे कारण समर्थन त्यांनीही दिले आहे समर्थन सत्ताधाऱ्यांनीही दिलेले आहे पण फक्त दोन तीन ज्या सुचना केल्या आहेत त्या सुचना समाविष्ठ करुन आपण तो ठराव एकमताने करावा असे माझे मत आहे.

मा. महापौर :-

ठिक आहे तुमची जी सुचना आहे त्याच्यामध्ये ठराव करणारे कोण आहेत प्रशांत दळवी साहेब तसे काही करता येईल का ?

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम असे काही होणार नाही.

जुबेर इनामदार :-

अर्थसंकल्पामध्ये फक्त त्याचा जो बदल आहे तो घडवून आणा अशी सुचना केली आहे.

मा. उपमहापौर :-

जुबेर भाई आप जो बजेट की बात कर रहे है वह हमारे बजेट मे ले नही रहे है खाली जो 20 फरवरी की हम बात कर रहे है वो हम टेक्निकल तौर पे बात कर रहे है उसके अलावा जोभी अनुदान

है हम महाराष्ट्र गव्हर्नमेंट से माँग रहे है । हमारी महानगरपालिका की ताकद जहातक मुझे ध्यान मे है जहातक मेरी नॉलेज मे है की हमारी महानगरपालिका की इतनी ताकत नही है की हर साल इतना पैसा जाया कर पाये या इतना पैसा योगदान दे पाये या इतना पैसा छुट दे पाये शायद नही कर पायेंगे बिना महाराष्ट्र शासन के यह हो नही सकता ।

निलम ढवण :-

महापौर मॅडम, उपमहापौर साहेब याच्यासाठी जो गिता जैन मॅडमने पर्यार दिला आहे की 500 नाही होत आहे तर 400 तर करा, 300 करा जे काही असेल म्हणून तुम्ही ठरवा.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम आपसे निवेदन है ऑलरेडी दो ठराव हो चूके है उसके उपर मतदान होय उसके उपर प्रक्रिया आगे करते रहे ।

मा. महापौर :-

त्यासाठी मॅडम आपला जो ठराव ज्यावेळाला शासनाकडे जाईल त्यावेळेला महापौर, उपमहापौर या नात्याने आम्ही तुमच्या बरोबर असू आम्ही तिथे मदतीला येवू आमचे म्हणणे मांडायला तिथून मंजुर करताना काय चेंजेस करायचे असतील तर ठिक आहे.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 84 करीता 2 ठराव आलेले आहेत पहिला ठराव आहे सुचक प्रशांत दळवी अनुमोदक ध्रुवकिशोर पाटील आणि दुसरा ठराव आहे सुचक जुबेर इनामदार अनुमोदक निलम ढवण. ह्या दोन्ही ठरावावर आपण एकदमच मतदान घेणार आहोत.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, ह्या सभागृहाला आणि गटनेते जुबेर इनामदार यांनाही माझी कळकळीची विनंती राहील की आपण हा एकच ठराव ह्या ठिकाणी सर्वानुमते मंजुर करावा दोन ठराव ह्या ठिकाणी करु नये. ह्या मिरा भाईंदर शहरातील जनतेच्या आपल्याकडून खुप अपेक्षा आहे.

मा. महापोर :-

सन्मा. सभागृहनेते यांनी गटनेते जुबेर इनामदारजींना रिक्वेस्ट केलेली आहे की ठराव जर तुमचे म्हणणे जर मिळतं जुळतं आहे आपले आमदार साहेब मॅडमने पण इथे म्हटलेले आहे तस की आमचा ठराव आणि तुमचा ठराव एकत्रित मिळता जुळता आहे मग दोन ठराव नकरता एकच ठराव करा.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, सभागृहनेते, माझे मित्र प्रशांत दळवी साहेबांनी जी विनंती केली त्याला मी भावूक झालो आहे पण तरीही माझे मत त्याच्यामध्ये एकच आहे की तुम्ही केलेला ठरावामध्ये आम्ही जो ठराव केला आहे त्याच्यातली सुचना घ्या आमची काही हरकत नाही आमची मनस्थीती आहे आमची माणसिक तयारी आहे ह्या शहरातील रहिवाशांना खरोखर मालमत्ता करामध्ये सुट देणेची.

मा. महापौर :-

दळवी साहेब तुमच्या ठरावामध्ये...............

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम मी जो ठराव केलेला आहे तो एकदम परिपक्व ठराव आहे त्यामध्ये काही अशी सुचना वगैरे घ्यायची जुबेर साहेब एवढे तुम्ही काय लावून धरले आहे ?

जुबेर इनामदार :-

प्रशांतजी मी त्याच्यामध्ये काय बोललो तुम्ही आपल्या अर्थसंकल्पामध्ये सुधारणा त्याच्यामध्ये दर्शवा की येणाऱ्या स्थायी समितीमध्ये तुमची आता शेवटची स्थायी समिती लागेल त्याच्यामध्ये तुम्ही तो फरक दर्शवू शकता त्याचा ठराव करुन तुम्ही तसा तयार करुन घेवू शकतात त्या ठरावाला तुमच्या

असलेल्या ठरावा सोबत जोडा आणि तो प्रशासनाकडे द्या जर प्रशासन तो पुन्हा तयार करुन निर्णय.............

मा. उपमहापौर :-

जुबेर साहेब मे टेक्निकल तौर पे बोलना चाहता हूँ जो आप बात कर रहे हो की बजेट के अंदर प्रावधान होणा चाहिये आपको लगता है की जोभी बजेट होगा वह विदाऊट टेक्निकल होगा ? वो टेक्निकलही होगा और प्रशासन के जो अधिकारी है बजेट जिस तरीके से रुपरेखा करनी चाहिये उसके अंदर अगर तरतुद या प्रोव्हिजन कुछ करना है वह टेक्निकल तौरपेही होगा और वह टेक्निकल तौर पे होने के बाद औररेडी प्रशांतजीने जो ठराव रखा है उसके अंदर वो तारीख भी मेन्शन की हूई है की तारीख के पहले कर के लेना है की बजेट के अंदर वो तकलिफ ना आये और बाद मे मुख्यमंत्रीजी के पास भेजना है ।

जुबेर इनामदार :-

आप अपने ठराव मे एकही इसमे बदल करदो की हम अपने अगले 2022 और 2023 के अर्थसंकल्प मे वसुली जमा जो हमारा है उसके अंदर हम मालमत्ता कर का जो आप हमारा जो उत्पन्न है हम उसको कम कर रहे है बस आप उतना कर दो..............

प्रशांत दळवी :-

क्या कर रहे है ?

जुबेर इनामदार :-

मालमत्ता कर जमेच्या बाजुमध्ये महसूली जमेमध्ये आम्ही आमच्या अर्थसंकल्पमधल्या आमचा जो मालमत्ता कर तो प्रशासनाने आम्हाला दिलेला आहे 500 चौरस फुटा पर्यंतचा फक्त 61 कोटी रुपये त्यांनी दर्शविलेला आहे.................

मा. महापौर :-

सन्मा. सभागृहनेते यांनी मोठे मन करुन त्यांची सुचना घेण्या करीता ठराव आपल्या ठरावामध्ये एकत्रित करुन घेण्या करीता मत मांडले होते परंतु तस काही दिसत नाही आहे त्यामुळे दोन ठराव आलेले आहेत ते दोन ठराव आल्या नंतर सुचिव महोदय आपण काय करायला पाहिजे ती मतदानाची प्रक्रिया करा.

नगरसचिव :-

मी आताच वाचन केले आहे की पहिला ठराव आहे सुचक प्रशांत दळवी अनुमोदक ध्रुवकिशोर पाटील आणि दुसरा ठराव आहे सुचक जुबेर इनामदार अनुमोदक निलम ढवण. ह्या ठरावाच्या बाजुने आणि विरोधात जे मतदान आपल्याला द्यायचे आहे ते गटनेत्यांच्या मार्फत द्यायचे आहे तरी माझी विनंती आहे की तिन्ही पक्षाच्या गटनेत्यांनी आपआपले मत आणि मतदान ह्या प्रकरणा वरती मतदान जाहिर करावे.

जुबेर इनामदार :-

काँग्रेस लोकशाही आघाडीच्या वतीने मी केलेला ठरावाच्या बाजुने आमचे जे सभागृहामध्ये उपस्थित सदस्य आहेत त्यांचे मत माझा ठरावाचा बाजुने आहेत.

मा. उपमहापौर :-

मी हस्मुख गहलोत भारतीय जनता पार्टी का गटनेता उपस्थित सदस्य जितने भी है जो प्रशांत दळवीजी ने जो ठराव किया है उसके बाजु से मे अपना मत व्यक्त करता हूँ और उसके अलावा किती व्यक्ती यानी किसी लोकप्रतिनिधी को उसके अगर कुछ कहना है तो वो कह सकते है ।

निलम ढवण :-

मी निलम ढवण शिवसेना गटनेता जुबेर इनामदार यांनी केलेल्या ठरावाच्या बाजुने आमचे सर्व नगरसेवकांचे मतदान आहेत असे मी जाहिर करते.

नगरसचिव :-

या व्यतिरिक्त कोणाला आपले वैयक्तिक मतदान करायचे असेल तर त्यांनी कृपया सांगाव. जैन मॅडम आपला हात वर दिसत आहे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, आयुक्त साहेब आताच झालेला असा ठराव आयुक्त साहेब शासनाला पाठवू शकतात का ?

नगरसचिव :-

मतदानाची प्रकिया सुरु आहे मतदानाची प्रकिया सुरु होऊ देत मग आपण बोला. जैन मॅडम आपल्याला ह्या विषयावर काही बोलायचे आहे का, वेगळे मत द्यायचे आहे का ?

गिता जैन :-

महापौर मॅडम, कदाचित आपल्या मिरा भाईंदरचे इथे ह्या महासभेत पहिल्यांदा असे होत आहे की दोन ठराव जे एकच सुर आहे म्हणजे त्यांनाही हेच पाहिजे आपल्यालाही हेच पाहिजे तरीही आपण दोन ठराव मांडलेला आहे. मला असे थोडेसे गैअर वाटते का तसे करु नये. जिथे जिथे हे ठराव पास झालेले आहेत तिथे सर्वानुमते झालेले आहेत आणि आपण मला असे वाटते की सर्वानुमते करुनच ती प्रथा पाडावी कारण असे लोकहिताचे ठराव जर दोन ठराव मांडले गेले तर चुकीचा मेसेज बाहेर जाणार आहे मॅडम एकदोन सुचना घ्यायला काही.................

मा. महापौर :-

मी तुमच्या मताशी पुर्णपणे सहमत आहे मी सन्मा. सदस्य जुबेर इनामदाराजी गटनेते यांना मी विनंती पण केली संधी पण दिली की दळवी साहेबांशी तुम्ही हे करा त्यांच्या ठरावामध्ये तुमचा ठराव एकत्रित करा पण त्यांनी तस काय संमती दर्शवले नाही.

गिता जैन :-

मॅडम आपण मोठे मन राखुन मॅडम, त्यांची सुचना काय आहे की जेवढी इनकम आहे त्याचात तुम्ही बजेट करा सुचना तर त्यात गैर काही असे मला वाटत नाही तर ती तुम्ही स्विकार कराना प्रशासन कडून तुम्हाला अनुदान मिळाला तर तुम्ही तस बजेट करा नाही मिळालं तर तसं बजेट करा. ती सुचना समाविष्ठ करायची माझी विनंती आहे.

मा. महापौर :-

मॅडम, दळवी साहेबांनी जो ठराव केला आहे त्याच्यामध्ये त्यांनी म्हटलेले आहे सन-2022-23 च्या अंदाज पत्रकात तरतुद करणे याबाबत तरतुद करायला त्यांनी सांगितलेली आहे. मग आता इनामदार साहेबांनी त्यांनी म्हटले पाहिजे की माझा ठराव मी मागे घेत आहे अस.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम ठरावावर मतदान चालु आहे.

मा. उपमहापौर :-

मॅडम, मतदान की प्रक्रिया चालु है इसके उपर अभी चर्चा ना होते हूये मतदान की प्रक्रिया चालु रहे ।

गिता जैन :-

मॅडम, माझी परत विनंती राहणार.

मा. महापौर :-

मॅडम तुम्ही मला बोलण्या पेक्षा जुबेर इनामदार साहेबांना सांगा की दळवी साहेबांच्या ठरावामध्ये त्यांनी तो मर्च करा.

जुबेर इनामदार :-

माझी तयारी आहे.

मा. महापौर :-

सर्वानुमते मंजुर होऊन तो आपण शासनाकडे पाठवू शकतो.

जुबेर इनामदार :-

आमच्या केलेला ठराव तुम्ही तुमच्या ठरावामध्ये क्लब करत असाल सुचना घेत असाल तर तुमच्या विनंतीला मान मॅडम सरआखोपर.

मा. उपमहापौर :-

मॅडम, मे फिर से कह रहा हूँ ऑलरेडी इस विषय पे चर्चा होगई है आपने उनको एकबार सुचना भी दि निवेदन भी किया दो ठराव हो चुके है और मतदान प्रक्रिया चालु है इसके उपर चर्चा नहोते हूये मतदान प्रक्रिया पुरी हो जाये ।

गिता जैन :-

महापौर मॅडम मी काय हे समजु की आपला कडून आपल्याकडे जर तो ठराव पास झाला तर त्या नंतरची स्थिती आपली मनस्थिती नाही आहे का त्यानंतर जी स्थिती येईल त्याला तोंड द्यायची?

मा. महापौर :-

हे कोणी सांगितले तुम्हाला ?

गिता जैन :-

मग मोठे मन कराना.

मा. महापौर :-

माझी मनस्थिती काय आहे काय नाही हे तुम्हाला कोणी सांगितले ?

ध्रुवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम काही तरी कंफ्युजन आहे.

गिता जैन :-

महापौर मॅडम, मी परत एकदा सांगते की त्यांची सुचना फक्त एवढी आहे तुम्ही बजेटमध्ये ती तरतुद करत आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम, जो प्रशांत दळवी साहेबांनी ठराव मांडलेला आहे त्याच्यामध्ये आपण जर टॅक्स कमी केला तर त्याचे उत्पन्न ॲटोमेटीकली कमी होणार, इट इस इम्प्लाईड मॅडम आणि त्याच्या नंतर शासनाकडून जस अनुदान येईल ते अनुदान त्याच्यामध्ये येईलच ना. नाही आले तर नाही येणार आलं तर येणार इट इस इम्प्लाईड मॅडम. म्हणजे प्रशांत दळवी साहेबांनी त्याच्यामध्ये जे जुबेरजींनी मांडलेला ठराव आहे ते सगळे मुद्दे प्रशांतने आपल्या ठरावामध्ये घेतलेले आहेत. अंदाजपत्रकात तरतुद करायला सांगितलेली आहे 20 फेब्रुवारीच्या आतमध्ये त्याची अंमलबजावणी करायला सांगितलेली आहे, मंजुरी करीता त्वरीत पाठवायला सांगितले आहे, 1 ऐप्रिल 2022 ला आपण सगळ्यांना कर माफी देण्यासाठी जे जे आवश्यक लागणार आहे त्याची सगळी इतंभूत कार्यवाही करण्या करीता आयुक्तांना ठरावामध्ये सांगितलेले आहे मॅडम.

निलम ढवण :-

मग क्लब करायला काय हरकत आहे ?

मा. महापौर :-

त्यांनी सांगितलं की आम्ही करुन टाकू.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम मै फिर से याद दिलाना चाहता हूँ अपने सदस्यने यह कहा था की हमारा ठराव जो पिछली बार गया था 50 परसेंट टॅक्स के अंदर छूट दी जाये खाली प्रॉपर्टी टॅक्स के अंदर वो ठराव हमारा बराबर नही था ऐसा उनका कहना था अब प्रशांतजी की मै तारीफ करता हूँ की इन्होने इसबार

टेक्निकल तौर पे तारीख के सात मेन्शन कर के प्रोव्हिजन करते हूये ठराव के अंदर नमुद किया हूवा है तो यह टेक्निकल तौर पे कोई गलत बात नही है । और अगर इसके अंदर इनका ऐसा कहना है की टेक्निकल तौर पे पुरी तऱ्हसे नही किया गया है तो प्रशासन उसके उपर निर्देश देवे और फिर से कह रहा हूँ महापौर मॅडम ठराव हो चूके है मतदान की प्रक्रिया चालु है इसके उपर और विलंब ना होते हूये प्रकिया आगे बढाई जाये ।

निलम ढवण :-

महापौर मॅडम क्लब करा आणि तो पुढे घ्या. मतदानाची प्रक्रिया पुर्ण झालेली नाही. आणि जर तस असेल तर असा झालेला ठराव प्रशासन पुढे पाठवणार की नाही याचे प्रशासनाने उत्तर द्यावं.

गिता जैन :-

महापौर मॅडम, मला एक संशय आहे मला एक विचारु द्या मॅडम असे आहे की त्यात लिहीलेले आहे की जर प्रशासनाने अनुदान दिला तरच अस हे वाक्य आहे त्याचा जरा खुलासा झाला तर आम्हालाही मतदान कुठे करायचं ते जरा बराबर होणार.

जुबेर इनामदार :-

त्यांना अर्थसंकल्पामध्ये दुरुस्ती करायची नाही शासनाने अनुदान दिले तरच आम्ही करमाफी करु हे त्यांचे मत आहे म्हणजे आम्ही आमची जमा महसुली बाजु ती फुगवलेली दाखवू. म्हणजे अवाढव्य आम्ही खर्च करु.

गिता जैन :-

हे चुकीचे आहे मॅडम.

मा. उपमहापौर :-

जुबेर भाई आपने जो बोला गलत यह भी हो रहा है की यहापे मतदान प्रक्रिया चालु किया उसके बिच मे चर्चा चालु है दुसरा आप जो तरतुद करने की बात कर रहे है अगर हम वहा बजेट मे तरतुद कर देते और प्रशासन से पास नही हूवा तो यहा पैसा भुगतान कोन करेगा ?

जुबेर इनामदार :-

प्रशासन से कसा से पास नही होगा ?

प्रशांद दळवी :-

शासन से ।

जुबेर इनामदार :-

शासन से 100 टक्का पास होगा क्योकी हम अपनी आर्थिक परिस्थिती.................

मा. उपमहापौर :-

हमारा आपके उपर भरोसा है महाविकास आघाडी पे भरोसा है दोन्हो आमदार पे भरोसा है ।

जुबेर इनामदार :-

आमची आर्थिक परिस्थिती सक्षम आहे. आपण ती सुट देवू शकतो. आम्ही आमचा खर्च कमी करु लोकांना आम्ही त्याचा फायदा देवू.

मा. उपमहापौर :-

जुबेरभाई आप क्यु डर रहे हो दोन्हो आमदार पे हमे भरोसा है ।

निलम ढवण :-

राजकारण नकरता प्रशासनाने असा केलेला ठराव आयुकत साहेब तुम्ही शासनाला पाठवणार की नाही याचे पण उत्तर द्या.

मा. महापौर :-

दळवी साहेबांनी जो ठराव मांडलेला आहे तो निटपैकी ऐकला आहे की नाही ते मला माहिती नाही म्हणून तुम्ही दुसरा ठराव केला तुम्ही निट तो ठराव ऐका.

जुबेर इनामदार :-

तुम्ही शासनाकडून अनुदान मागत आहे. एका बाजुला तुम्ही बोलत आहेत की आम्हाला सुट द्याची आहे शासनाकडून तुम्ही अनुदानचीही अपेक्षा ठेवत आहेत. अनुदान दिले नाही तर तुमचे काम होणार नाही.

मा. महापौर :-

ऐका प्रशासन म्हणते की आपली तेवढी आर्थिक बाजु सक्षम नाही मग तिकडे आपण डायरेक्ट कशी सुट देणार ?

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम मे जुबेर भाई की बात याद दिलाना चाहता हूँ जैसे उन्होने शुरुवात की थी सब से पहला उन्होने यह कहा था की हमारे गोषवारा जिस तरीके से आया हूवा है और हर साल का जुबेर भाईका यह वर्ड था हर साल का स्पील ओव्हर करोड रुपये मे है तो क्या हम सक्षम है यह जुबेरभाईका पहिला सवाल था और उसी सवाल को देखते हूये प्रशांतजीने वो काफी अच्छी बात रखी की प्रशासन के पास भेजा जाये तो मे प्रशांतजी को धंन्यवाद देना चाहता हूँ और उन्होने कहा और फिर कमिश्नर महोदयने भी कहा की स्पील ओव्हर तकरीबन 450 कोटी के आस पास उन्होने शब्द वापरे तो प्रशांतजी को मै फिर से धंन्यवाद देना चाहता हूँ की उन्होने जुबेर भाईकी बात रखी उन्होन आयुक्त महोदय की भी बात रखी उन्होने महापौर महोदय किभी बात रखी और साथमे हमारे जितने भी थे हमारे ढवण मॅडम है अनिल सावंत साहब है प्रशांतजी बाकी इन्होने जो जो बात रखी वो सब बात को कव्हर करते हूये प्रशांतजीने ठराव रखा हूवा है । अब मे फिर से कह रहा हूँ यह गलत हो रहा है महापौर मॅडम की मतदान प्रक्रिया चालु होगई है उसके अंदर हस्तक्षेप हो रहा है और फिस से यह बात हो रही है की इसको मर्च करे इनकी भावना क्या है ? इनकी मनशा क्या है ?

निलम ढवण :-

महापौर मॅडम, उपमहापौर साहेब जस तुम्ही उल्लेख केलात की प्रशासनाने हे सांगितले आहे की आपली परिस्थिती नाही तसेच प्रशासनाने हेही देखील सांगितलेले आहे की प्रत्येक ज्या व्हि.सी. होतात त्यांच्या त्यावेळी शासनाने नमुद केले आहे की प्रत्येक स्वरांज्य संस्थेने आपल्या परिस्थितीचा गांर्भियाने विचार करुन त्या त्या याच्यानुसार आपण तरतुद करुन ते उपक्रम राबवावेत. असे प्रत्येकवेळी शासनाने पण सांगितलेले आहे त्याच्याकडे तुम्ही दुर्लक्ष का करतात ?

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम हे स्पष्ट आहे की यांनी माणसिकता नाही आहे. हे राजकारण करत आहेत यांची माणसिकता नाही आहे. महापौर मॅडम ठराव झालेला आहे आपण ठरावाच्या अनुषंगाने मतदान घ्या. एका बाजुला तुम्ही शासनाची बाजु मांडत आहेत एका बाजुला प्रशासनाची बाजु मांडत आहेत म्हणजे तुम्हाला नेमके करायचे काय आहे ? महापौर मॅडम ठराव झालेला आहे महापौर मॅडम माझी तुम्हाला विनंती आहे की ही मतदान प्रक्रिया जी चालु होती ती चालु राहूद्या.

निलम ढवण :-

प्रशासनाने हा ठराव पुढे पाठवणार किंवा नाही हे देखील प्रशासनाने सांगाव.

प्रशांत दळवी :-

म्हणजे सरकारची बाजु पण यांनीच मांडायची प्रशासनाची बाजु पण यांनीच मांडायची दोन्ही बाजु मांडतात.

निलम ढवण :-

आम्ही नाही मांडली प्रशासनाने मांडलेली आहे ती तुम्ही ऐका तुम्ही प्रशासनाची एकच बाजु सांगता.

प्रशांत दळवी :-

नेमक राजकारण करायचे आहे महापौर मॅडम आपल्याला आपला ठराव पाठवायचा आहे. आपण आपला ठराव बणवून पाठवूया.

मा. महापौर :-

एकतर त्यांनी आपला ठराव मागे घ्यावा आमच्या ठरावाला त्यांनी सर्वानुमते मंजुरी द्यावी नाही तर दोन ठराव आहेत त्यावरती मतदानाची प्रक्रिया घ्या.

जुबेर इनामदार :-

आमचा ठराव आम्ही मागे घेणार नाही. आम्ही तुमच्या विनंतीला मान देवून क्लब करु शकतो पण आम्ही मागे नाही घेणार.

मा. महापौर :-

नका घेवू मतदानाची प्रक्रिया घ्या.

नगरसचिव :-

प्रकरण क्र.84 च्या आलेल्या दोन्ही ठरावांवरती तिन्ही गटनेत्यांनी आपआपल्या पक्षा तर्फे मत जाहिर केलेले आहे ह्या व्यतिरिक्त कोणाला इंड्युजल व्ययक्तिक मत द्यायचे असेल तर मी ह्यापुर्वी विचारणा केलेली होती तथापी अद्याप कोणीही तस आपलं मत जाहिर केलेले नाही तरी जे गटनेत्यांनी जाहिर केलेले मत आहे ते त्यांच्या पक्षाच्या सदस्यांतर्फे आहे असे समजुन ह्या प्रमाणे पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

गिता जैन :-

सचिव साहेब माझे मत कुठे मोजत आहेत ते पहिला सांगा.

नगरसचिव :-

म्हणून तर मग मी तुम्हाला विचारले मगाशी मॅडम. मी तुम्हाला मत विचारण्यासाठी विचारणा केली मॅडम.

गिता जैन :-

साहेब माझे मत मांडायच्या आधी परत मला म्युट करत आहेत तुम्ही मी मत मांडणार कशी?

नगरसचिव :-

तुम्हाला म्युट केले नाही.

गिता जैन :-

आता केले साहेब.

नगरसचिव :-

मी बोललो तेव्हा तुम्ही बोललात ना तुम्ही बोलायला सुरुवात केली आणि डायरेक्ट विषयावर बोललात तुम्ही असे झाले आहे.

गिता जैन :-

साहेब असे आहे की विनंती करणे किंवा क्लबअप करणे किंवा एकमताने करायची विनंती सर्व सदस्यांना असते साहेब. ती आम्हाला विनंती करुद्या.

नगरसचिव :-

ठिक आहे माझे त्याच्या बद्दल काही मत नाही मी तुमचे मतच विचारले होते.

गिता जैन :-

मॅडम परत एकदा सांगणार की जे जे कार्पोरेशनने हे पास केलेले आहे त्यांनी कोणीही अशी अट ठेवलेली नाही की प्रशासनाने अनुदान दिले तरच ही माफी द्या, आपल्याकडून वेगळाच ठराव पास होत आहे.

जुबेर इनामदार :-

यांची माणसिकता कुठे आहे द्यायची.

गिता जैन :-

म्हणजे आपली माणसिकता नाही असे कळते मॅडम आपण असे सांगा की आपण दुसरी काही योजना करु..................

मा. महापौर :-

तुम्ही चुकीचे बोलत आहेत तुमची माणसिकता असेल तर तुम्ही ठराव मागे घ्या.

गिता जैन :-

मॅडम, पण तुमची अट अशी पण नाही आहे. तुम्ही सांगतात प्रशासनाने दिले तरच म्हणजे माणसिकता तुमचीच नाही आहे.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम मे फिर से निवेदन करुंगा सचिव महोदय से की सिर्फ मतदान के अलावा कुछ नाहो ।

नगरसचिव :-

कोणालाही वैयक्तिक मत द्यायचे असेल तर कृपया सांगावे.

निलम ढवण :-

मी प्रश्न विचारल्यावर प्रशासनाने उत्तर दिले नाही महापौर मॅडम.

नगरसचिव :-

कृपया मतदानाच्या प्रक्रियेमध्ये आता फक्त ज्यांना वैयक्तिक मत द्यायचे असेल तर त्यांनी कृपया द्यायचे आहे. जैन मॅडम मी आपणाला पुन्हा एकदा विचारतो आपण आपले मत कुठे आहे ते कृपया सांगावे.

गिता जैन :-

मला अजुन ते क्लेअरंन्स झाले नाही की प्रशासनाने अनुदान दिल तरच सत्ताधारी पक्ष करमाफी देणार अशी अट आहे का ? ते क्लियर करावे मग मी माझे मत देते.

निलम ढवण :-

आणि प्रशासन तो ठराव पाठवणार का, पाठवू शकतात का ?

गिता जैन :-

मॅडम तो प्रशासनाचा प्रश्न आहे.

मा. महापौर :-

महासभेचा ठराव आहे प्रशासन पाठवणारच, का नाही पाठवणार.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम तो प्रशासनाचा भाग आहे प्रशासनाने तो ठरावाचे काय करायचे आहे हे आता सांगणे उचित नाही. पहिला आपण ठराव करुन द्या.

निलम ढवण :-

हे तुम्ही कस सांगणार ते आयुक्त साहेब आम्हाला सांगुदेत.

प्रशांत दळवी :-

सचिव साहेब मतदान चालु आहे.

गिता जैन :-

निलमजी ते आपण प्रशासनाला नंतर विचारु मला फक्त हे सांगायचे आहे की त्यामध्ये अशी अट आहे की प्रशासनाने मंजुर केला तरच करनमाफी देणार का?

मा. महापौर :-

तुमचे मत श्री. जुबेर इनामदारजी यांनी ठराव मांडला आहे त्याच्या बाजुने आहे की श्री. प्रशांत दळवी ह्यांनी ठराव मांडला त्याचा बाजुने आहे ? मतदानाची प्रक्रिया चालु आहे................

नगरसचिव :-

कृपया फक्त मतदाना बद्दल बोलावे ऑलरेडी दोन्ही ठराव मांडलेले आहेत त्या दोन्ही ठरावा पैकी आपल्याला जे मतदान द्यायचे असेल तर ते कृपया द्याव.

जुबेर इनामदार :-

सचिव साहेबांनी ठराव परत वाचावा आणि त्याला कायम करावा.

गिता जैन :-

सचिव साहेब मी जे विचारते माझा शंकाचे निर्मूलन झाले तरच मी मत देवू शकते जर प्रशासनाने अनुदान दिले नाही तर करमाफी देणार का ?

नगरसचिव :-

मॅडम, मी आपल्याला विनंती पुर्वक सांगतो ...............

गिता जैन :-

सचिव साहेब मी विनंती करते मला हे पॉईंट क्लियर झाले की मी मतदार करेल.

नगरसचिव :-

कोणी करावे अशी अपेक्षा आहे ? कोणी क्लियर करावे अशी आपली अपेक्षा आहे ?

गिता जैन :-

ज्यांनी ठराव मांडला आहे त्यांनी क्लियर करावे की प्रशासनाने जर अनुदान दिले नाही तर कर माफी देणार का ?

मा. महापौर :-

मॅडत तुम्हीच अनुदान आणणार आहेत ना. करमाफी द्यायची असती तर हा सभागृहात विषय कशाला आणला असता अशीच करमाफी दिली असती. पण तुम्हीच अनुदान आणणार आहेत म्हणून तर आम्ही ठराव केला आहे.

गिता जैन :-

मॅडम माझा पत्रात मी कुठे असे नमुद केले नाही.

मा. महापौर :-

तुम्हीच सांगत आहेत की शासनाकडून मी मंजुर करुन आणणार मी ग्वाही देते.

गिता जैन :-

ठाराव मी मंजुरच करुन आणणार आहे पण मला ठरावामध्ये जी माझी शंका आहे मी कोणाला मतदान करायचे आहे.............

मा. महापौर :-

जेव्हा महानगरपालिका झाली तेव्हा तशी का दिली तेव्हा तशी का माफी दिली कोण असा आहे नगरसेवक ज्याला मिरा भाईंदर शहराच्या नागरीकांना टॅक्स माफ नाही करायचा आहे कोण नगरसेवक असा आहे मला सांगा.

निलम ढवण :-

महापौर मॅडम हायपर होऊ नका हो शांतपणे बोलाना तुमची आम्हाला काळजी आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, ठराव परत एकदा सचिवांना वाचायला सांगा.

गिता जैन :-

महापौर मॅडम, मी परत विचारते.............

मा. महापौर :-

नका विचारु सचिव साहेब तुम्ही मतदानाची प्रक्रिया करा.

नगरसचिव :-

प्लिज आपण ठरावावर मतदान द्याव. आपण शंका नंतर विचारा.

गिता जैन :-

सचिव साहेब मला ठराव इथे एकदा माहित पडत नाही त्यात ती अट आहे की नाही फक्त त्यांनी ते सांगाव लगेच मी माझे मतदान करते. एकच सांगायचे आहे की मी ही अट टाकली आहे की नाही.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, मी आपणाला विनंती करतो जर आपली अनुमती असेल तर मी ठराव पुन्हा वाचतो.

मा. महापौर :-

वाचा मॅडम आता निट ऐका.

प्रशांत दळवी :-

आता कोणी मधी बोलू नका आणि निट ऐका आणि ठराव झाल्या नंतर महापौर मॅडम आपल्याला विनंती असेल की फक्त मतदानच घ्याव.

मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील निवासी इमारतींमधील 500 चौरस फुटांपर्यंत चटई क्षेत्र असलेल्या घरांना मालमत्ता कर संपूर्णपणे माफ करण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री श्री. उध्दवजी ठाकरे यांनी केली आहे.

मिरा भाईंदर शहर हे मुंबई लगतच असल्याने सर्व लोकप्रतिनीधींनी मिरा भाईंदर शहरातील रहिवासीयांकरीता निवासी इमारतींमधील 500 चौरस फुटांपर्यंत चटई क्षेत्र असलेल्या घरांना मालमत्ता कर माफ करणेबाबत मागणी केलेली आहे.

मिरा भाईंदर शहरातील निवासी इमारतींमधील 500 चौ. फुटापर्यंत चटई क्षेत्र असलेल्या घरांना आकारण्यात येणारा मालमत्ता कर संपूर्णपणे माफ करावा व कर माफी केल्यानंतर महापालिकेस येणाऱ्या तुटीची रक्कम भरपाई म्हणून शासनाकडून दरवर्षी अनुदान घेण्यास तसेच याबाबत प्रशासनाने सन 2022-23 च्या अंदाजपत्रकात तरतुद करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

दि.01/04/2022 पासून शहरातील नागरीकांच्या निवासी इमारतींमधील 500 चौ. फुटापर्यंतच्या घरांचा मालमत्ता कर संपूर्णपणे माफ करण्याकरीता प्रशासनाने कर माफीचा प्रस्ताव मंजुरीस्तव राज्य शासनास त्वरीत पाठवावा व दि.20/02/2022 पर्यंत कर माफीची आवश्यक ती कार्यवाही करणेस ठराव मांडत आहे.

महापौर मॅडम, याच्यात आपण स्पष्ट याच्यात उल्लेक केलेला आहे त्यामुळे आपण आता कुठली दुसरी बाजु न ऐकता ह्या ठरावा परती जे मतदान सचिव साहेब घेत आहेत त्याची पुढील कार्यवाही सुरु करावी. धंन्यवाद.

नगरसचिव :-

मतदान ऑलरेडी घेतलेले आहे आता फक्त कोणाचे मत वैयक्तिक असेल तर सांगाव अन्यथा ती मतदानाची माहिती मी मा. महापौरांकडे देत आहे.

गिता जैन :-

महापौर मॅडम सत्ताधारी पक्षाची माणसिकता नाही आहे करमाफी द्यायची असे मला वाटते माझे मत जुबेरजी बरोबर आहे.

मा. महापौर :-

माणसिकता नाही असा शब्द तुमचा चुकीचा आहे. तुम्ही आता शासनाकडून मंजुर करुन आणा.

गिता जैन :-

मॅडम मी माझे मत दिले आहे.

( सभागृहात गोंधळ )

मा. महापौर :-

तुमचे मत कोणा बरोबर पण असो त्याची मला काही हरकत नाही. तुमचे मत कोणाबरोबर पण असू देत.

गिता जैन :-

मग घ्याना ते नमुद करु ? प्रोसेडिंगमध्ये ते नमुद करुन घ्या.

नगरसचिव :-

अन्य कोणाचे आहे का वैयक्तिक मत ? ठिक आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, नगरसेवक निधी प्रभाग निधी अर्थसंकल्पामधून कमी केलीना तर 35 कोटी रुपये कमी होतात. माणसिकता दाखवा काम होऊन जाईल आमची तयारी आहे नगर सेवक निधी, प्रभाग निधी सोडून द्यायची कर सवलत मिळत असेल...............

मा. उपमहापौर :-

2021 के अंदर मानसिकता हमने दिखाई थी 50 परसेंट ऑफ करने के लिये और पत्रव्यवहार भी किया था जुबेर भाई और मुख्यमंत्रीजी, उप-मुख्यमंत्रीजी, पालकमंत्रीजी के साथ सबके पास गये थे ऐलिगेशन के साथ मे गये थे जुबेर भाई और उन्होने बहूत सत्कार से और प्यार से हमे बुलाया बिठाया मानसन्मान दिया ।

जुबेर इनामदार :-

आप पहिले अर्थसंकल्प मे अपनी मानसिकता दिखाईये ।

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य प्रशांत दळवीजी यांनी मांडलेला ठराव बहूमताने मंजुर करण्यात येत आहे. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. 84 :-

मिरा भाईंदर शहरातील 500 चौ. फुटापर्यंतच्या घरांचा मालमत्ता कर माफ करणेबाबत.

ठराव क्र. 67 :-

मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील निवासी इमारतींमधील 500 चौरस फुटांपर्यंत चटई क्षेत्र असलेल्या घरांना मालमत्ता कर संपूर्णपणे माफ करण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री श्री. उध्दवजी ठाकरे यांनी केली आहे.

मिरा भाईंदर शहर हे मुंबई लगतच असल्याने सर्व लोकप्रतिनीधींनी मिरा भाईंदर शहरातील रहिवासीयांकरीता निवासी इमारतींमधील 500 चौरस फुटांपर्यंत चटई क्षेत्र असलेल्या घरांना मालमत्ता कर माफ करणेबाबत मागणी केलेली आहे.

मिरा भाईंदर शहरातील निवासी इमारतींमधील 500 चौ. फुटापर्यंत चटई क्षेत्र असलेल्या घरांना आकारण्यात येणारा मालमत्ता कर संपूर्णपणे माफ करावा व कर माफी केल्यानंतर महापालिकेस येणाऱ्या तुटीची रक्कम भरपाई म्हणून शासनाकडून दरवर्षी अनुदान घेण्यास तसेच याबाबत प्रशासनाने सन 2022-23 च्या अंदाजपत्रकात तरतुद करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

दि.01/04/2022 पासून शहरातील नागरीकांच्या निवासी इमारतींमधील 500 चौ. फुटापर्यंतच्या घरांचा मालमत्ता कर संपूर्णपणे माफ करण्याकरीता प्रशासनाने कर माफीचा प्रस्ताव मंजुरीस्तव राज्य शासनास त्वरीत पाठवावा व दि.20/02/2022 पर्यंत कर माफीची आवश्यक ती कार्यवाही करणेस ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी          अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

| **ठरावाच्या बाजूने** | **ठरावाच्या विरोधात** | तटस्थ |
|---|---|---|
| भारतीय जनता पार्टीचे 51 सदस्य व शिवसेना पक्षाच्या सदस्या श्रीम. दिप्ती भट्ट असे एकुण 52 सदस्य | शिवसेना व कॉंग्रेस लोकशाही आघाडीचे 24 सदस्य व भारतीय जनता पार्टीच्या सदस्या श्रीम. गिता जैन असे एकुण 25 सदस्य | 00 |

**ठराव बहूमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 85, भाईंदर (पूर्व) नवघर हनुमान मंदिर पाठीमागील गोदावरील इमारत ते समर्थ कृपा बंगल्यापर्यंत नाल्याची पुर्नबांधणी करणे.

गणेश भाईर :-

भाईंदर (पुर्व) नवघर हनुमान मंदिराच्या पाठीमागील गोदावरी इमारत ते समर्थ कृपा बंगल्यापर्यंत नाल्याची पुर्न:बांधणी करणे कामाच्या अंदाजित खर्च रु. 79,14,050/- इतक्या रक्कमेस ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

मनोज दुबे :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. 85 :-**

भाईंदर (पूर्व) नवघर हनुमान मंदिर पाठीमागील गोदावरील इमारत ते समर्थ कृपा बंगल्यापर्यंत नाल्याची पुर्नबांधणी करणे.

**ठराव क्र. 68 :-**

भाईंदर (पुर्व) नवघर हनुमान मंदिराच्या पाठीमागील गोदावरी इमारत ते समर्थ कृपा बंगल्यापर्यंत नाल्याची पुर्न:बांधणी करणे कामाच्या अंदाजित खर्च रु. 79,14,050/- इतक्या रक्कमेस ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. गणेश भोईर          अनुमोदक :- श्री. मनोज दुबे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 86, मिरारोड (पूर्व) नयानगरकडे जाणारा रेल्वे समांतर नाला आनंद छेडा इमारतीच्या विरुध्द बाजूस ते उड्डाणपुलापर्यंत नाल्याची पुर्नबांधणी करणे.

दिनेश जैन :-

मिरारोड (पुर्व) नयानगरकडे जाणारा रेल्वे समांतर नाला आनंद छेडा इमारतीच्या विरुध्द बाजुपासुन ते उड्डाण पुलापर्यंतच्या नाल्याची पुर्न:बांधणी करणे कामाकरीता “नविन गटारे / नाले

बांधकाम" या लेखाशिर्षकात तरतुद शिल्लक नसल्याने पुढील सन 2022-23 या आर्थिक वर्षात तरतुद उपलब्ध करुन प्रस्ताव सादर करणेस ही महासभा मंजुरी देत आहे.

सिमा शहा :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. 86 :-**

मिरारोड (पूर्व) नयानगरकडे जाणारा रेल्वे समांतर नाला आनंद छेडा इमारतीच्या विरुध्द बाजूस ते उड्डाणपुलापर्यंत नाल्याची पुर्नबांधणी करणे.

**ठराव क्र. 69 :-**

मिरारोड (पुर्व) नयानगरकडे जाणारा रेल्वे समांतर नाला आनंद छेडा इमारतीच्या विरुध्द बाजुपासुन ते उड्डाण पुलापर्यंतच्या नाल्याची पुर्नः बांधणी करणे कामाकरीता "नविन गटारे / नाले बांधकाम" या लेखाशिर्षकात तरतुद शिल्लक नसल्याने पुढील सन 2022-23 या आर्थिक वर्षात तरतुद उपलब्ध करुन प्रस्ताव सादर करणेस ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश जैन अनुमोदक :- श्रीम. सिमा शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 87, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर किल्ला परिसर सुशोभिकरण व जतन करणे कामाबाबत.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, जो विषय बांधकाम विभागाने आपल्याकडे सादर केला आहे आपणास ठावूक असेल की काही दिवसापुर्वीच आपण ह्या किल्याची आपले सर्व उपमहापौर असतील, पदाधिकारी असतील सगळे अधिकारीवर्ग आपण सगळे जावून त्या किल्याची पाहणी केली. आणि खरोखरच मला ह्याठिकाणी प्रशासनाचे अभिनंदन करावस वाटत ह्या ठिकाणी महापौर मॅडम प्रशासनाने म्हणजे आपल्या महापालिकेच्या माध्यमातुन 7 ते 8 करोड रुपये खर्च करुन कोटी खर्च करुन त्याठिकाणी किल्याची डागडूगी केली आहे. म्हणजे सुंदर असा किल्ला गेल्या वेळेला आमचे उपमहापौर चंद्रकांतजी वैती यांनी त्या किल्याची सुरुवात केली आणि त्या दिवसा पासून आजमितीस ह्या किल्याचे शुभोभिकरणाचे काम चालु आहे. महापौर मॅडम, हे सर्व करत असताना बांधकाम विभागाचे अधिकारी असतील, आयुक्त महोदय, आपणाला हे सांगु इच्छीतो की आपण स्टेपबाय स्टेप ह्या कामाला आपण ह्या महापालिकेमधून निधी देत आहोत परंतु हे करत असताना आपण त्यावेळेला आपला ठराव होता की शासनाकडूनही तो निधी यायला हवा परंतु आजमितीस महापौर मॅडम शासनाकडून अवघे 1 करोड रुपये आलेले आहेत. लोकप्रतिनिधी त्या किल्यांवरती जातात किल्यांवरचा दौरा करतात अधिकाऱ्यांसमवेत घोषनाही होते परंतु जो शुशोभीकरणाला जो खर्च आहे तो खर्च शासनाकडून येत नाही. महापौर मॅडम आपल्या माध्यमातुन सांगायचे आहे की शासनालाही आयुक्त महोदय आपण पाठपूरावा करायचा. आताच आदरणीय आमदार प्रतापजी सरनाईक यांनी या किल्यासाठी 75 लाख रुपये काहीतरी अनुदान ह्या 2022 मध्ये त्यांच्या निधीतुन दिलेले आहेत मी त्यांचेही अभिनंदन

करतो. महापौर मॅडम जेव्हा महानगरपालिका डबगाईला आलेली आहे किंबहूना कोरोना वरती करोडो रुपये आपण खर्च करतो हा सगळा कोरोनाचा प्रादुर्भाव सुरु असताना प्रशासन आपली बाजु भक्कमपणे त्याठिकाणी समर्थपणे त्याला सामोरे जाते आणि अशा परिस्थितीत महापौर मॅडम त्यादिवशी आपणही होतात आयुक्त साहेब स्व:त जातीने तिकडे हजर होते सगळे अधिकारीवर्ग होते सुंदर अस म्हणजे ठाणे वरुन किंवा मुंबई परिसरातुन जर कोणी लोक आली तर त्याठिकाणी लोकांना एक अभिमान वाटेल असं त्या किल्याचे आपण सुशोभीकरणाचे काम आपण हाती घेतले आहे. महापौर मॅडम पण एक खेद आहे की त्याठिकाणी मग आपले नगरसेवक असतील मग त्या ठिकाणचे लोकप्रतिनिधींनी फक्त त्या किल्यांवरती दौरे नकरता त्याठिकाणी आपआपला निधी मग महापौर मॅडम ह्यामध्ये मी महापौर म्हणून आपल्यालाही विनंती करीन, उपमहापौर म्हणून त्यांनाही विनंती करीन आम्ही स्व:त पदाधिकारी स्थायी समिती सभापती तेथील स्थानिक नगरसेवक यांनाही मी ह्या निवेदना द्वारे विंनती करीन की आपणही आपला त्याठिकाणी निधी देण्यात यावा आणि प्रशासनाला निधी दिलात तर लवकरात लवकर हा किल्ला ह्या मिरा भाईंदरच्या जनतेसाठी खुला होईल आणि एक मिरा भाईंदरची एक शान म्हणून ह्याठिकाणी ह्या किल्याला पाहिले जाईल तर माझी ह्या निवेदना द्वारे सर्वच लोकप्रतिनिधींना विनंती आहे फक्त आपले तिकडे पाट्याबीट्या लावणे ह्यापुर्ता मर्यादीत निधी नदेता त्याठिकाणी प्रशासनाने आखलेली काम त्याठिकाणी ती पुर्णत्वास नेण्यासाठी हा निधी आपण प्रशासनाला सुपुर्द करायचा जेणे करुन प्रशासनाने जो काही आराखडा त्याठिकाणी ह्या किल्यासाठी तयार केलेला आहे त्याचे एक जतन म्हणून त्याठिकाणी त्या निधीचा उपयोग करता येईल आणि म्हणून महापौर मॅडम पुनष्च एकता ह्या किल्यासाठी त्याच्या डागडूगीसाठी जे आपले लोकप्रतिनिधी आपली निधी देतील त्यांचेच आता मी अभिनंदन करतो

घोडबंदर किल्ल्याचे काम पुर्ण होत आलेले असून महापालिकेमार्फत सुमारे रु.8 कोटी रुपये खर्च केले आहेत व उर्वरीत कामात पूर्वेकडील कमानी भिंतीचे बांधकाम ईशान्य खोलीची जिर्णोद्वार/ दक्षिण बाजुचे भिंतीचे काम, स्टोरेज ग्रेनरीज अंतर्गत फुटपाथ, बुरजावर फरबंदसिंह, भिंतीचे युआरसीचे बांधकाम, सुरक्षा व्यवस्था, किल्ल्यावरील विद्युत कामे, स्वयंचलित स्प्रिंकल इ. कामे करण्याकरीता रु.6,50,46,340/- रकमेचा खर्च अपेक्षित आहे.

तरी सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतुद करणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच स्थानिक लोकप्रतिनीधी व महापौर, उपमहापौर व पदाधिकारी यांचा निधी उपलब्ध झाल्यास वरील कामात वापरण्यात यावा.

निलम ढवण :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

खुप बर वाटलं मला ह्या विषयावरती बोलायचे आहे प्रशासनाने आयुक्त, महापौर, उपमहापौर, सभागृहनेते किंवा गटनेते, विरोधी पक्षनेते यांनी ह्या शहरामध्ये जी जी काही आपण विकासकामे करतो त्या विकास कामांना भेट दिली किंवा त्या कामाची पाहणी केली ते काम किती पर्यंत झालेले आहे त्याची प्रगती काय आहे ते करणे म्हणजे त्या पदाधिकाऱ्यांनी त्या कामाचे क्रेडिट घेणे असा विषय होत नाही त्यासाठी मला ह्याठिकाणी असे म्हणायचे आहे की जर खर्च जिल्हा नियोजन समितीने एक करोड रुपये दिले आहेत आणि त्यावेळेला पहिल्या टप्यामध्ये 81 हजार हे कोणी दिलेले आहेत, प्रशासनाने दिलेले आहेत, दुसऱ्या टप्यामध्ये मनपा निधी 7 करोड 4 लाख 40 हजार 800 रुपये आहे. आणि तिसऱ्या टप्यामध्ये सन्मा. आमदार यांनी सन-2022 मध्ये 75 लाख रुपये निधी दिलेला आहे. आणि मनपा निधी हा 10 करोड 50 लाख म्हणजे टोटल प्रशासन किती खर्च करते 16 कोटी रुपये घोडबंदर किल्यासाठी प्रशासन हे खर्च करते. आणि जेव्हा मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासन त्याठिकाणी खर्च करते याचाच अर्थ ह्या ठिकाणी बसलेले सर्व लोकप्रतिनिधी सन्मा. सन्मा.

सर्व नगरसेवक ह्या सर्वांनी त्या कामाला मंजुरी दिलेली आहे. चांगले काम ह्या शहरामध्ये होत आहे आणि आम्हाला अभिमान आहे की घोडबंदर किल्ला ह्या ठिकाणी आमच्या शहरामध्ये आहे. विविध ठिकाणची लोक त्याठिकाणी यावीत त्यांनी ते पहाव अशी आमची सर्वांची मनपुर्वक इच्छा आहे. म्हणून केवळ मी निधी दिला म्हणून ते कामाचे क्रेडीट माझंच आहे अशातला काही भाग नाही आहे. म्हणून प्रशांत दळवीजीने जे म्हटलं की ज्या ज्या नगरसेवकाला आपआपला निधी द्यायचा आहे तो देवू शकतो ज्या पदाधिकाऱ्यांना आपला निधी त्याठिकाणी द्यायचा आहे तो देवू शकतो आणि प्रशासनाच्या कामकाजामध्ये आपण सुध्दा सहभागी होऊ शकतो. म्हणून मला असे वाटते की दळवी साहेब आपण तो ठराव केला आहे तो योग्य आहे. आणि इव्हन सेनेने तुम्हाला अनुमोदन दिलेले आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, मला आयुक्तांना ह्या विषयावर थोड बोलयाचे आहे, आयुक्त महोदय आपण हा चांगला किल्ला क्षत्रपतींचा किल्ला गोडबंदर किल्ला हे ऐतिहासिक धरोधर जो आहे त्याला आपण संरक्षण करण्याचा आपण प्रयत्न करत आहोत. भविष्यात तो पर्यटक स्थळ सुध्दा होईल. साहेब ऑल इंडीया आर्कोलॉजिकल डिपार्टमेंट ह्याला आपण हा पुर्ण किल्ला दिला का नाही ? जेणे करुन त्याला आपला जो पालिकेचा निधी लागतो तो पालिकेचा निधी नलागता आपल्याला टोटल असलेला खर्च त्यांनी उचलला असता. आणि याच्यातुन अजुन काही करता आलं किंवा कदांचित केले असेल तर चालेल. याची माहिती तुम्ही आम्हाला द्या खरी परिस्थिती काय आहे आपण का दिला नाही दिला असेल तर त्यांची काय डिमांड होती का त्या विषयावर कारण हा इथे संपणार नाही त्याला तुम्हाला मेंटेन करायला लागेल दरवर्षी समुद्र किणारी असल्यामुळे त्याचा तो मेंटेनन्स असणार आहे म्हणजे आपल्या पालिकेवर आर्थिक भार असणार आहे. कारण पर्यटकाकडून तेवढे आपल्याला काय उत्पन्न येणार नाही म्हणून ह्या विषयावर विचार करण्यात यावा प्रशासकिय पध्दतीने विचार करण्यात यावा.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो आपण जे म्हटलेले आहे पुरातत्व विभागाकडे आपण दिला असता त्यांनी केले असते हा किल्ला ऑरलेडी पुरातत्व विभागाकडे आहे परंतु ज्या महापालिका क्षेत्रात आहे त्यांनी तो त्याचं जतन आणि संवर्धन करण्यासाठी आपण मागणी केल्या नुसार त्यांनी परवानगी दिलेली आहे. किल्याचे संवर्धन जतन करण्यासाठी जी तरतुद पुरातत्व विभागाकडे नसल्यामुळे नव्याने त्याठिकाणी मेन्टेन करणे, बांधकाम करणे, किंवा पुढं अजुन त्याचे संवर्धन करणे हे काम ते डिपार्टमेंट विशेष करुन करत नाही थोड्या प्रमाणात त्यांचा जो काही खर्च असतो फार प्रमुख किल्ले जे राज्यातील मोठे आहेत त्यांची किरकोळ दुरुस्तीसाठी क्वचित वापरला जातो. म्हणून आपल्या महापालिका क्षेत्रातील जी जुनी वास्तु आहे ती ऐतिहासीक जतन करणारी आहे आणि पुढच्या पिढीला ती एक स्पृती देणारी आहे. म्हणून आपल्या महापालिकेने विनंती केल्यावर आर्चोलॉजी डिपार्टमेंटने त्याला दुरुस्तीची परवानगी दिलेली आहे वेळोवेळी. त्यांच्या गाईडलाईन नुसार आणि त्यांच्या सुचने नुसार त्यांच्या आर्किटेक्चरने केलेली पाहणी त्यांच्या देखरेखीखाली ही दुरुस्ती होत आहे. पुढे जावून आपल्या महापालिका क्षेत्रातील असल्याने मेंटेन करायची जबाबदारी आपल्याच महापालिकेची आहे. धंन्यवाद.

गिता जैन :-

मॅडम, आपल्यासाठी गौरवशाली दुसरी बाब अशी आहे की आपल्याकडे एक नाही दोन किल्ले आहेत. आणि धारावी जंज्जीरे किल्ले हेही खुप छान अस आहे. साहेब आता तिथे यंग मुलांनी लागुन खुप छान त्याचेही बुरुज वगैरे दिसायला लागले आहे. तिथला जो परिसर खुप सुंदर अशा प्रकारे दिसायला लागले आहे आणि तिथे खुप साफसफाई चांगल्या प्रकारे होत आहे. प्रशासनानेही त्याला मदत केलेली आहे. आणि काही दोन तीन बाहेरुन येणारी टीमने पण साफसफाई सुरु केली आहे. आणि खुप छान अस चिमाजी अप्पा साहेबांचा पुतळा आहे आणि तिथून खाली पुर्ण जंज्जीरे किल्ला हे दृष्य

खुप छान आहे. तर माझी विनंती अशी राहणार जस आपण घोडबंदर किल्यासाठी मोठ्या मानाने आपण हे केले आहे तर तसच धारावी जंज्जीरे किल्लासाठी ही निधी उपलबध करुन द्या. त्यासाठीही थोडस सुशोभिकरण आणि ते जतन करायचे काम नक्कीच करावं. कारण तेही आपली धरोहर आहे. आपल्या मिरा भाईंदर शहराचे गौरव आणि ते दोन किल्ले आपल्याकडे आहे.

मा. महापौर :-

नक्कीच.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम, जो धारावी किल्ला के बारे मे जो जैन मॅडमने अभी कहा और वो रियल मे हमारी शहर के लिये एक धरोहर है, उसी विषय को लेके मेने आपको आयुक्त महोदय को आनेवाले बजेट के तौर पे सिर्फ कहने से नही होगा इसके लिये टेक्निकल तौर पे जो बाब बार हमारे पास सवाल उठाये जाते है । मेने रिक्वेस्ट की है आयुक्त महोदय और आपको की आनेवाले बजेट के अंदर उसके अंदर तरतुद की जाये प्रोव्हिजन रखा जाये ताकी ओ किल्ले को हम पुरी तऱ्हासे निखार सके और हमारे शहर के लिये वह धरोहर बनी रहे आज और भविष्य के अंदर और साथ मे पर्यटक भी उसके अंदर आयेगे । और यह पत्रव्यवहार पिछले 10 दिन पहले हमने किया हूवा है आपके साथ और आपसे महासभा के तहेत सभी सदस्यो के मार्फत आपसे और आयुक्त महोदय से निवेदन है की आनेवाले बजेट के अंदर उसकी प्रोव्हिजन की जाये ताकी उसके अंदर रुकावट किसी काम के अंदर ना आये ।

मा. महापौर :-

बरोबर, सन्मा. सदस्या जैन मॅडम आणि उपमहापौर साहेब ह्या दोघांनी ह्या ठिकाणी सुचना केलेली आहे की आपण येणाऱ्या बजेटमध्ये दोन्ही किल्यासाठी तरतुद ठेवावी जेणे करुन दोन्ही किल्याचे जतन होईल आणि ज्या संस्था त्या ठिकाणी प्रामाणिकपणे काम करत आहेत अतिशय मेहनत घेवून ते इकडे साफसफाई करत आहेत त्यांचे सुध्दा मी अभिनंदन करते. आम्ही जो पाहणी दौरा केला होता आरक्षण क्र.242, 235, 273, 305, 261 आणि 299 ह्या ठिकाणी आम्ही सर्व उद्यानांची पाहणी केली. त्या वेळेला आम्हाला समाधान कारक तिथे काम पहायला मिळाले आणि अतिशय सुंदर अस मिरा भाईंदर शहरामध्ये उद्याने मोठ्या प्रमाणात आहेत मोठमोठी उद्याने आपल्या शहरामध्ये आहेत आणि त्या उद्यानाचे पण आता जतन चांगल्या पध्दतीने प्रशासनाच्या मार्फत होत आहे. टोटल आपल्याकडे 70 उद्याने आहेत जी आपण नागरीकांसाठी खुली केलेली आहेत. पण कोरोनामुळे आज आपण ती सध्या बंद ठेवली असली तरी ते आजना उद्या आपल्याला पुन्हा ती खुली करायची आहेत. तर मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये अजुन काही आपली जी उद्याने आहेत ती सुध्दा विकसीत झाली पाहिजेत आणि आपले मिरा भाईंदर शहर हे उद्यानाचे शहर म्हणून संपुर्ण ह्या महाराष्ट्रामध्ये ओळखले गेले पाहिजे ह्यासाठी प्रशासनाने त्याबाबत कार्यवाही सुरु करावी आणि जे सौंदर्य आपल्या शहरामध्ये आहे त्याचे जतन आपण केले पाहिजे अशी सुध्दा सुचना मी आपणाला ह्या महासभेच्या माध्यमातुन करत आहे की जी जी उद्याने आपल्याला जी विकसीत करायची आहेत त्यासाठी सुध्दा आपण आर्थिक तरतुद ह्याच्यामध्ये बजेटमध्ये करावी. जेणेकरुन आपले शहर हे उद्यानाचे शहर म्हणून ह्यापुढे ओळखले जाईल.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, हे करत असताना मी खरोखरच आपलेही अभिनंदन करीन उपमहापौर हस्मुखजी गहलोत यांचेही अभिनंदन करीन जो जंज्जीरे किल्ला उत्तन येथे आहे त्याचा विषय जो आता चालु आहे त्यामध्ये महापौर मॅडम मी येणाऱ्या बजेटमध्ये आपल्याला भरघोस अशी त्यामध्ये तरतुद करायची आहे. जेणे करुन प्रशासन तो किल्याचे सुशोभीकरण करेल. मला ह्या ठिकाणी नमुद करायचे आहे महापौर मॅडम आपले लोकसत्तेचे मिरा भाईंदरचे वार्ताहार आहेत श्री. मयुर ठाकूर

प्रामुख्याने मला त्यांचे नाव घ्यायचे आहे की ते किल्यासाठी खुप धडपड करत आहेत. म्हणजे इनिसेटीव्ह घेत आहेत त्या किल्याच्या सुशोभीकरणासाठी मी खरच पुन्हा ह्या सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो. आणि जस आपण म्हणालात उपमहापौरजी जसे म्हणाले आमदार मॅडम ज्या बोलल्या की जंज्जीरे किल्ला तर खरच भरघोस अशी आपण ह्या येणाऱ्या बजेटमध्ये ती तरतुद करावी. जेणेकरुन जसा जो घोडबंदरचा किल्ला आहे तसाच उत्तनचा एक जंज्जीरे किला ह्या मिरा भाईंदरकरांसाठी एक चांगले स्थळ निर्माण होईल.

मा. महापौर :-

प्रशासनाच्या मार्फत तिथे दुरुस्ती आणि साफसफाई साठी कर्मचारी पण ठेवलेले आहेत.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, आता जे सभागृह नेते यांनी नाव घेतले श्री. मयुर ठाकूर हे जे आपल्याकडचे लाकसत्ताचे वार्ताहार आहेत त्यांनी यात चांगले इनिसेटीव्ह घेतले आहे. गेले साडे तीन महिन्यापासून म्हणजे चार महिन्यापूर्वी मी आणि उपायुक्त श्री. संजय शिंदे साहेब यांनी त्या पावसाळाच्या अंतिम टप्प्यात असतांनाच त्या किल्ल्याच्या वेगवेगळ्या झाडा-झुडपात आणि गवतात सुध्दा तशा अवस्थेत आम्ही पाहणी केली बऱ्याच ठिकाणी स्ट्रक्चर आढळल्यानंतर प्रशासन गेल्या तिन साडे तीन महिन्यापासून रोज १५ मजुर त्यावर काम करत आहेत त्यामुळे तिथे असणाऱ्या झाडाची मुळं, गवत काढून किल्ल्याचे जूने स्ट्रक्चर काय म्हणजे पाली किल्ला चिमाजी आप्पा जे वर गार्डन आहे त्याठिकाणी मा. महापौर, उपमहापौर वेळोवेळी सगळे पदाधिकारी मा. आमदार यांनी यापूर्वी मा. खासदार यांनी यापूर्वी दौरा केलेला आहे. चिमाजी आप्पाचा पुतळा जो आहे त्याठिकाणी आणि परिसरातलं जसे आपण ब्युटीफीकेशन केलेले आहे. त्याच धरतीवर इतर किल्ल्याचे जे भाग आहेत. टप्प्या टप्प्याने आपल्या आर्थिक तरतुद होईल तसे प्रशासन ह्यावर जरूर काम करेल ह्यासाठी मा. आमदार यांनी सुचना केलेली आहे, मा. महापौर, मा. उपमहापौर सर्वच सन्मा. सदस्यांनी सुचना केलेली आहेत त्यानुसार प्रशासन यावर्षी आपल्या सुचनाचे दखल घेवून आर्थिक तरतूद आणि ऑलरेडी साफसफाईसाठी आपण दररोज १५ मजुर तिथे ठेवलेले आहेत त्यानुसार किल्ल्याची साफसफाई चालू आहे. आठवड्याच्या अखेर जे किल्ला प्रेमी आहेत ते ही लोक आपला हातभार लावता आहेत त्यामुळे ते स्ट्रक्चर आपला दिवसेंदिवस अजून चांगला होईल आणि किल्ल्यांचं आणखी संवर्धन चांगला होईल ह्यासाठी प्रशासन नक्कीच प्रयत्न करेल धन्यवाद.

मा. महापौर :-

घोडबंदर किल्ल्याचे विषय चालला आहे आणि सन्मा. सदस्य नगरसेवक चंद्रकांत वैतीजी बोलणार नाही असे होणार नाही त्यांनी हात वर केलेला आहे. सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीजी आपण बोला.

चंद्रकांत वैती :-

ह्या किल्ल्याच्या जी एक कमानीचा विषय होता आपण त्यासाठी ५० लाखाची आर्थिक प्रशासकीय मंजुरी घेतलेली आहे तर ती कमान देखील व्हावी आणि दुसरा एक विषय असा होता की, किल्ल्याकडे जाहायला मार्ग एकच आहे आणि आपण दुसरी मंजुरी घेतली आहे १८ मीटरची परंतु त्याला अवकाश लागेल तर असलेला जो मार्ग आहे त्या मार्गामध्ये पूर्वी किल्ल्याकडे जातांना संरक्षण भिंत होती ह्या संरक्षक भिंतीवरती काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहेत तर त्या रस्त्याची पुन्हा एकदा मोजणी व्हावी आणि अतिक्रमीत केलेल्या ज्या किल्ल्याच्या संरक्षण भिंती आहेत त्या जर आपण ओपन केला तर किल्ल्यावरती जे पर्यटक सातत्त्यांने येत असतात त्यांना जो संकटाचा सामना करावा लागतो. काही लोकांनी काय केले आहे की त्या संरक्षण भिंतीवरती भिंती बांधल्या आणि आमच्या घराला गाडी लागली असती असे करून भांडतात तर तो रस्ता ओपन व्हावा आणि किल्ल्याच्या समोर आता अनेक पर्यटक येत असतात, किल्ला प्रेमी येत असतात तर त्यांच्यासाठी एक

पार्किंगची व्यवस्था करावी असे एक नियोजन मी आयुक्त साहेबांशी शेअर केलं होतं तर ते देखील व्हावं आणि हा किल्ला घोडबंदरकरांचा मानबिंदू आहे आणि महानगरपालिकेत असलेल्या सर्व नगरसेवकांनी त्यावेळेला एकमुखांनी ठराव केला होता आणि त्याच्यामुळे तो किल्ला आता त्याच्या पूर्व वैभवात उभा राहिलेला आहे तर सगळ्यांचे मन:पूर्वक आभार मानतो आणि उर्वरीत जी कामे आहेत ती लवकरात लवकर व्हावीत अशी सर्वांना पुन्हा एकदा नम्र विनंती करतो आता सगळ्यांचे सहकार्य होत आहे ही नक्कीच स्वागतार्ह गोष्ट आहे. शिवजयंतीसाठी महापालिकेकडून आपण किल्ल्याला रोषणाई वगैरे करत असतो तर ह्यावर्षी ही रोषणाई किल्ल्याची व्हावी असे आयुक्त साहेबांना आणि महापौर मॅडम यांना माझा निवेदन आहे. धन्यवाद मॅडम.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य वैती साहेबांनी जी सुचना केलेली आहे ती प्रशासनानी त्याची सुचना नमूद करावी आणि येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या वेळेला घोडबंदर किल्ल्याची रोषणाई करावी आणि सुशोभित करावा. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. 87 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर किल्ला परिसर सुशोभिकरण व जतन करणे कामाबाबत.

**ठराव क्र. 70 :-**

घोडबंदर किल्ल्याचे काम पुर्ण होत आलेले असून महापालिकेमार्फत सुमारे रु.8 कोटी रुपये खर्च केले आहेत व उर्वरीत कामात पूर्वेकडील कमानी भिंतीचे बांधकाम ईशान्य खोलीची जिर्णोद्वार/ दक्षिण बाजुचे भिंतीचे काम, स्टोरेज ग्रेनरीज अंतर्गत फुटपाथ, बुरजावर फरबंदसिंह, भिंतीचे युआरसीचे बांधकाम, सुरक्षा व्यवस्था, किल्ल्यावरील विद्युत कामे, स्वयंचलित स्प्रिंकल इ. कामे करण्याकरीता रु.6,50,46,340/- रकमेचा खर्च अपेक्षित आहे.

तरी सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतुद करणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच स्थानिक लोकप्रतिनीधी व महापौर, उपमहापौर व पदाधिकारी यांचा निधी उपलब्ध झाल्यास वरील कामात वापरण्यात यावा.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्रीम. निलम ढवण**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८८, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्रायोगिक तत्वावर स्वखर्चाने कचरा प्रकल्प तयार करणेसाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, ह्या विषयी सर्व सन्मा. सदस्य ह्यावर चर्चा करतीलच परंतु तत्पूर्वी ठराव वाचण्यापूर्वी मा. आयुक्त महोदय आपल्याला विनंती आहे की, आरोग्य विभागाने ह्या प्रकल्पाबाबत सविस्तर चर्चा आपण ह्याठिकाणी माहिती ह्या सभागृहाला द्यावी.

हसमुख गेहलोत, (उपमहापौर) :-

प्रशांतजी, अगर हो सके तो यह माहिती आपको दे सकता हूँ, यह प्रकल्प के पिछे कनव्हर्झेशन करने वो संस्था के साथ माध्यम से जुडना, अधिकारी माध्यम से जुडना और यह प्रकल्प के बारे में भागदोड करना इसके पिछे पुरी तरह से मैं साथ मे रहा हूँ। और अधिकारी वर्ग इसमे दो-तीन बार

अदला बदली हो गई मतलब किसका ट्रान्सफर हो गया, कोई नया अधिकारी है, तो हर एक अधिकारी के पास जानकारी थोडी कम रहेगी ओर सुबह से इसमे जुडा रहा तो मुझे बताने मे थोडीसी आसानी होगी और उसमे कुछ बाकी रह जायेगा तो अधिकारी वर्ग इसको खुलासा कर देंगे।

प्रशांत दळवी :-

उपमहापौर साहेब आता तुम्ही महापौर म्हणून बसलात तर मी ह्या प्रकरणाचा ठराव करतो त्यानंतर आपण माहिती द्या.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) येथे प्रभाग क्र.04 मधील आरक्षण क्र.219 मध्ये लहान स्वरूपात कचरा प्रकल्प तयार करणेकरीता जागा उपलब्ध करुन देण्याची प्रशासनाने प्रस्ताव सादर केलेला आहे.

मेकिंग द डिफरन्स चॅरीटेबल ट्रस्ट या संस्थेने स्वखर्चाने लहान स्वरूपात कचरा प्रकल्प तयार करणेसाठी महानगरपालिकेकडे 10,000 चौरस फुट क्षेत्राची जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. सदर प्रकल्पासाठी आवश्यक सर्व साधन सामुग्री, वीज, पाणी, मनुष्यबळ, कार्यालय इ. सदर संस्था स्वत:च्या खर्चाने करणार आहे व सदर प्रकल्पामुळे उत्तन येथे कचरा वाहतूकीसाठी लागणाऱ्या गाड्या व त्यावरील खर्चाची बचत होणार असल्याने महापालिकेचा खर्च कमी होईल.

सुका कचरा उचलणे व विल्हेवाट लावण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची असेल, या कचरा प्रकल्पामुळे तेथील नागरीकांना त्रास व गैरसोय होणार नाही याची काळजी प्रशासनाने घ्यावी तसेच तेथील स्थानिक लोकप्रतिनीधींना विश्वासात घेवून प्रकल्प राबविण्यात यावा. या प्रकल्पाकरीता लागणारी वीज, पाणी व इतर बाबींकरीता नाहरकत दाखला प्रशासनाने द्यावा. या प्रकल्पाशिवाय इतर कोणताही उपक्रम सदर जागेत संस्थेने करु नये.

सबब, प्रभाग समिती क्र.4 क्षेत्रात आरक्षण क्र.219 मधील 10,000 चौरस फुट क्षेत्राची जागा किंवा मा. आयुक्त यांनी सुचविलेली जागा मेकिंग द डिफरन्स चॅरीटेबल ट्रस्ट, या संस्थेस 5 वर्षाकरीता विनामूल्य उपलब्ध करून देवून स्वखर्चाने लहान स्वरूपात सुका कचरा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर उभारणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

डिंमल मेहता :-

माझे अनुमोदन आहेत.

स्नेहा पांडे :-

महापौर मॅडम, ०४ नोव्हेंबर २०१८ मे एक महासभा में ठराव हूँवा था ठराव क्र. ७० उसमे एक कमिटी बनाकर जिसमे हमारी महापौर डिंमप मेहता मॅडम थी उस वक्त चंद्रकांती वैतीजी उपमहापौर थे और बालाजी खतगांवकर सहाब कमिशनर थे उस वक्त कमिटी बना के पुरे मिरा भाईंदर शहर मे ०९ जगह पे विल्हेवाट करने के लिए छोटे छोटे प्रकल्प बनाने का ठराव किया गया था, उसमे मुर्धागाव आरक्षण क्र. २१ भाईंदर (प.), आरक्षण क्र. १३५ भाईंदर (पूर्व), आरक्षण क्र. २१९ मिरा रोड २४८ काशीमिरा, १४४२ महाजनवाडी ३६८, पेनकरपाडा ३५३ A और आरक्षण क्र. २६९, ०९ जगह पर ऐसे छोटे छोटे प्रकल्प महानगरपालिका के द्वारा उभार के विल्हेवाट किया जायेगा ऐसा ठराव हूँवा था। उस समिती का अहवाल आया, उस पर कहा तक प्रोसिजर पोहोचा है, वो अपना ठराव ऐसा ही पडा है, अभी यह आरक्षण क्र. २१९ एक संस्था को दे रहे है, और अपने जो गोषवारा दिया है, उसमे दिया है की, वाहतुकीसाठी लागणाऱ्या गाड्या व त्यावरील खार्चाची बचत होणार. यह संस्था किस तरह का विल्हेवाट करनेवाला है, वो गिले कचरा का विल्हेवाट करेंगी या कमिशनर साहबने कोई उनसे अहवाल लिया है? देखीए यह संस्था यहा पर जो काम करेंगी, उनको जो सधान समुग्री सब लगेगा वो संस्था स्वखर्च मे कर रही है तो इसमे उनका क्या फायदा है। और दुसरी बात यह है की, यह जो जगह है आरक्षण क्र. २१९ एकदम शहर के बिच मे है, एक तरफ शंकर भगवान का मंदिर है, दुसरी तरफ आपना स्वर्गीय प्रमोद महाजन सभागृह है। बाळासाहब ठाकरे ग्राऊंड है, और चारो तरफ रहिवाशी

है। आयडल पार्क कॉम्प्लेक्स है इंद्रलोक फेस ०३ सब बिच की यह जगह है। यहा पर कचरे के विल्हेवाट के लिए जगह देने से पहिले पालिकेने कोई भी सर्वेक्षण नही किया है, कोई भी उनसे अहवाल नही लिया है, कोई भी संस्था आके ऐसे मागणी करेगी तो नगरपालिका अपनी जगह बिना मुल्य देने के लिए तयार है। वो संस्था क्या क्या करेंगी और उनका क्या फायदा है? यह पहिले अहवाल ले बाद मे इसको सविस्तर अगली महासभा मे लाये । और संस्था इस काम करने का कितने वर्षो का अनुभव है। यह सब जानकारी के साथ अगली महासभा मे यह विषय लाया जाएँ ऐसा मेरा निवेदन है।

निलम ढवण :-

महापौर सर, आयुक्त साहेबांशी अजून आपली ह्या विषयावर चर्चा झालेली नाही. की आताच स्वच्छ सर्वेक्षण आणि त्यावरील प्रक्रिया ह्या संदर्भात जे महापौर मॅडम आणि इतर कमिटी अधिकरी, अति-आयुक्त सर्व जनं जे बघून आलेत आणि त्याचा इम्प्लीमेंटेशन आपल्या शहरात करणे फार गरजेचे आहे जे आता एका ठिकाणी तुम्ही करता आहेत तर ते पूर्ण शहरासाठी त्याचा नियोजन करावं आणि त्यानंतरच जे मागच्या ठरावात तुम्ही घेतलात त्याची अंमलबजावणी आता पर्यंत काहीच झालेली नाही. आणि फक्त आता एका तेवढ्याच भागापुरता हा विषय घेणे हे बरोबर नाही. आपण पूर्ण मिरा भाईंदर शहरासाठी पूर्ण शहराचा अभ्सास करून शहराची पाहणी करून कोणत्या भागात प्रोजेक्ट करता येईल आणि त्यानुसार तो प्रोजेक्ट जे बघून आलेत त्यांनी त्या प्रोजेक्टची माहिती आयुक्त साहेबांना पूर्ण पणे द्यावी आणि त्यानंतर आयुक्त साहेब, महापौर मॅडम आणि सर्व जे गटनेते आणि मेंन पदाधिकारी आहेत त्यांनी त्यावर निर्णय घेतला तरी चालेल त्यामुळे हा विषय तूर्त इथे घेवू नये पूर्ण शहराचा विचार करून त्यानुसार आपण नियोजन करावा असे माझे मत आहे.

प्रशांत दळवी :-

आयुक्त महोदय, आपण हा प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावरती चालवत आहे.

जुबेर इनामदार :-

प्रशासनाने ह्यावर निवेदन करावं की ऍक्झॅटली काय विषय आहे, महानगरपालिकेला फायदा होणार की नाही.

हसमुख गेहलोत :-

जुबेरभाई इसकी मैं जानकारी दे देता हूँ, मैंने जैसे कहा...

जुबेर इनामदार :-

आपने यह प्रस्ताव लाया, आपने संस्था को लाया बहूत अच्छी बात है। जवाब प्रशासन के मुख से आने दो वो कहते है ना फॉर्म द हार्सेस माऊथ जिससे यह होगा की, उनका निवेदन होगा क्योंकि चलाना उनको है और आयुक्तने खुदने इसका गोषवारा दिया है इसका मतलब ।

हसमुख गेहलोत :-

मै मुरी तरह से थोडासा खुलासा करुंगा जो अपने बात कही है और बाकी सदस्यो का कहना है तो प्रशासन भी अपनी तरफ से बात खुलासा कर लेंगा। और स्पष्टीकरण होना चाहिए, सभी को पता होना चाहिए, और मैं जब भी कुछ चिजे लेके आता हूँ तो हन्डरेड परसेंट वो उसके खरे तौर पे उसको पुरी तरह से परख के शहर के हित के लिए और किसा का नुकसान न होते हूँऐ और खास तौर पे नागरीक और महानगरपालिका का आर्थिक नुकसान ना हो उसपे मेरा हमेशा ध्यान रहता है और किसीका प्रश्न है।

जयंतीलाल पाटील :-

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, हे प्रकल्प चालू करायच्या आधी तुम्ही स्थानिक लोकांना विश्वासात घेतले आहे का? स्थानिक लोकं आहेत, बाजुला करोना सेंटर आहे, आयडल पार्क आहे, इंद्रलोक आहे हा परिसर पूर्ण भरलेला आहे त्या परिसरामध्ये तुम्ही कचराचा प्रकल्प आणता आणि तो

प्रकल्प पण तुम्ही ट्रस्टला देता आणि ट्रस्टला देऊन सुध्दा त्याच्यामध्ये जागा आपली महानगरपालिकेची असणार आणि भरलेल्या एरियामध्ये तुम्ही कचरा प्रकल्प चालू करता, जर तुम्हाला कचरा प्रकल्प चालू करायचा असेल तर आपले ०९ ठिकाणी कचरा आपण पास केलेले आहेत दोन वर्षापूर्वी तो सर्व ठिकाणी एकचा वेळी करावा. तुम्ही आतापर्यंत ते कचरा प्रकल्प का चालू केला नाही? तुम्हाला अडचणी काय आल्यात?

हसमुख गेहलोत :-

जयंतीभाऊ आणि स्नेहा पांडेचा प्रश्न सेमच आहे, जयंतीभाई तुम्हाला प्रश्नाचे उत्तरं भेटतील.

जयंतीलाल पाटील :-

स्थानिक नगरसेवकांना का विचारले नाही? आमच्या प्रभागामध्ये जर कचरा प्रकल्प तुम्ही चालू करत असाल तर स्थानिक नगरसेवकांना तुम्ही विश्वासात घ्यायला पाहिजे. जर तुम्हाला खरोखर प्रकल्प करायची इच्छा असेल तर तुम्ही ०९ ठिकाणी आहे एका ठिकाणी चालू करा. आणि महानगरपालिकेने करावं ट्रस्टला कशाला देता आणि ती पण मिरा भाईंदरची महानगरपालिकेची जागा ट्रस्टला देता. द्यायची असेल तर प्रायव्हेट जागा द्यावी आणि प्रकल्प चालू करावा.

निला सोंस :-

महापौर महोदया, कमिशनर सर सबसे पहिले रिझर्व्हेशन २१९ यह स्कूल रिझर्व्हेशन है। और हम अगर यह ठराव रख रहे है की हमे देना है। देना है तो इसकी क्या अटी / शर्ती है। हमे शिक्षण के लिए संस्था भी बनाये की जो जगा ताबे में है, वहाँ पर हम स्कूल शुरू कर रहे है। तो उसके लिए हमारे पास क्या प्लॅनींग है, अगर हम यहाँ पर दे देंगे और लंबे समय के लिये देंगे तो फिर अगेंन टेक्नीकली प्रॉब्लेम आयेंगी, दुसरी बात इसी महासभा में ठराव पास किया गया था .... रिसायक्लींग ऑफ दी तो उस प्रोजेक्ट का क्या हूँवा, उस प्रोपोझल का क्या हूँवा जो हम प्रायव्हेटली संस्था को दे रहे है। और एन्ड ऑफ द डे बहुत इम्पार्टंट है की, संस्था को किस अटी / शर्ती पे दे रहे है। सिर्फ अमाऊंट इम्पॉर्टंट नही होता है, टाईम ड्युरेशन उसके अगेन्स मे प्रशासन को क्या ऑब्जेक्टीव्ह मिल रहा है मतलब रिटर्न मे जो हमारा आधार है, हम किस आधार पर दे रहे है। और अगर रिझल्ट नही मिलेंगा तो हमारी क्या उसमे क्लॉझ होंगे वो भी इम्पॉर्टंट है। और इस बात को भी इग्नॉर नही कर सकते है। और यह पुरा रेसीडंशीयल एरिया है, बाजू मे गार्डन है तो उसका हेल्थ के उपर भी क्या प्रभाग हो सकता है, रहिवासीओ को तकलीफ ना हो और काम हो और महानगरपालिका उसका कई ना कई उपयोग कर रहे है। महापौर महोदय, जब तक कोई ठराव पास नही हो जाता तो यह सेम डे प्रमाणितता देते है क्योंकि आपने लाईन शुरू किया की आप जो भी विषय लाते है वो पुरू स्टडी के साथ लाते है तो मैं सिर्फ याद दिलाना चाहूँगी की वरिष्ठो के लिए अपने धर्माधिकारी आप्पा पे जो प्रोव्हीजन ठराव पास किया है, जो की संभावीत FSI वहाँ नही है और वो प्रोजेक्ट टॅक्नीकली हो नही सकता है तो प्लीझ प्रमाणितता के साथ जब ठराव पास हो जाएँ तब उस चिज के लिए तब दा चिज के लिए सेम अपने आपको प्रमाणितता दिजीयेगा। अपने सुना नही है लेकीन बाद में मैं यह विषय जरूर बोलना चाहती हूँ क्योकि यहाँ पर प्रमाणितता का काम देता है हम खूद आपने आप को प्रमाणितता नही दे सकते है।

गीता जैन :-

विनंती है, एक बहुत सारा डिसस्टबन्स है, हम किसी की भी कहे हुऐ सवाल ये सुनाई नही देते। दुसरा आधे घण्टे से हाथ उच्चा रखो फिर दो-तीन बार फोन करो तब हमे बोलने मिलता है। तो या सामने पर्दा ऐसे रखे के जिसके हात उच्चे हो वो तुरंत दिखे ताकी आप बोल सखे की हमने आपको देख लिया है, आपको मौका दिया जायेंगा अब मैं विषय पे आती हूँ मैं आयुक्त साहब को पूहचना चाहूंगी निलाजी ने भी यही सवाल किया था, वह स्कूल आरक्षण है, क्या हमने ३७ करके इसको मंजुरी दिलवाई है? आयुक्त साहब मैंने आपको लेटर में यह बोला है की, आपने आभी तक वो

प्रोजेक्ट चालू नही किया हालाकी लास्ट आपने डेट थी फर्स्ट जानेवारी वो आज भी चालू नही हुऐ है। क्यू नही उस कॉन्ट्रॅक्टर से वो कॉन्ट्रॅक्ट लेके ऐसी संस्थाओ को दिया जाएँ जो मुक्त मे कर रहे है, हम उसे पैसे भी दे रहे और वो प्रोजेक्ट चालू नही कर रहे है, तो उसे जल्दी से जल्दी उसे दंड करके उसे पैसे जो दिये गये है वो वापस लिजीए और जैसे अभी विषय है की चालू होने से पहिले काफी सारा पेमेंट भी हो चुका है विच इज राँग अगेंन तो देखीय तिसरा दो ऐसी संस्थाये मैंने भी भिजी थी तो यह संस्था मे ऐसा क्या स्पेशल था की इसी संस्था को जगा दि जाएँ, दिजीए आच्छा काम कर रही है मेरा उससे कोई विरोध नाही है। मैं फिर कहती हूँ लेकीन और संस्थाओ भी आती है तो उन्हे भी उतनी ही तव्हजूद दिई जाएँ ताकी हमारे यहा कचरे की विल्हेवाट जो भी लगनी है ज्यादा से ज्यादा बिना मुल्य हो ताकी लागो को अॅटलिस्ट वो टॅक्स माफ कर सके कचरे का जिस दिन बिना मुल्य काम हो जायेंगा उस दिन हम लोग कचरे का टॅक्स जरुर माफ कर देंगे। मैं प्रशासन को यह जबाब चाहुँगी की क्यो नही अभी तक वो सब प्रोजेक्ट चालू नही हूँऐ दुसरा अगर नही चालू हूँऐ अभी तक तो उसका दंड किससे वसुलेंगे तिसरा स्कूल रिझर्व्हेशन मे अगर यह चालू करते है, तो क्या हम चालू कर सकते है क्या? और चौथा ऐसी दुसरी संस्थाये आती है तो हम क्या पॅरामीटर रखते है की, कौनसी कंपनी को कौनसी संस्था को यह काम दिया जाएँ । क्योकि दुसरी भी आती तो उनसे अन्याय होगा तो हमे पहिले पॅरामिटर फिक्स कर देने चाहिए क्योंकि यह जो संस्थाये आती है, यह सब प्रायोगिक होती है। हम अपनी जगह देते है यह बात बिलकूल सही है, हमारा दुसरा कुछ नही जाता है, लेकीन दुसरी संस्थाये भी जब अगर चाहती है और हो सकता है की उनसे बेटर संस्थाये हो तो उनके साथ अन्याय होगा यह पाचवी बात है, मुझे सभी बातो का प्रशासन से जवाब चाहिए उपमहापौरजी मुझे आयुक्तजी की मुह से सुनना है इसका जवाब इसलिए प्लीझ मेरे क्वेशन है।

अनिल सावंत :-

सन्मा. पिठासीन अधिकारी संधी दिल्या बद्दल धन्यवाद, हा जो प्रकल्प आणला आहे याच्यामध्ये कुठे मेंशन नाही की किती कचऱ्यावर ती संस्था प्रक्रिया करणार आहे आणि कुठच्या प्रकारची करणार आहे हा एक मुद्दा झाला. दुसरा मुद्दा जे ०९ प्रकल्प आपण तयार करणार होतो ते अजून डिसेंट्रलाईज झालेले नाही ते कधी होणार आणि एवढी वर्षे आपण उत्तनला ज्यावेळी प्रकल्प सुरू केला त्यावेळी सुध्दा तिथल्या स्थानिकांना असेच सांगण्यात आलं होतं की दुर्गंधी येणार नाही, कुठचा त्रास होणार नाही पण एवढे वर्षे उत्तनचे रहिवासी नरक यातना तिथे भागता आहेत. मुंबई महानगरपालिका किंवा नव्वी मुंबई महानगरपलिकामध्ये त्यामध्ये त्यांनी एक चांगला प्रोजेक्ट केला आहे ते स्वत:च्या कॉम्प्लेक्समध्ये अडीचशे किलो-पाचशे किलो किंवा एक टनापर्यंत कॉम्पॅक्ट मशीन लावून त्या कचऱ्याची तिथे त्याच्यावर विल्हेवाट लावतात आणि ती मशीन काय एवढी महाग नाही तसे जर आपण मोठमोठया संकुलना पालिकेमार्फत प्रमोट केलं आपण फक्त काय केलं की त्यांना फक्त ०५ टक्के डेबीट दिलेले आहे इतर कारवाई काहीच केली नाही. प्रमोट त्यांना केलेलेच नाही. नवीन जेवढे प्रोजेक्ट येता आहेत त्यांना कम्प्लसरी करा आणि जे जुने कॉम्प्लेक्स नाहीत आता माझा सृष्टी सारखा कॉम्प्लेक्स आहे जिथे हजार प्लॅट आहेत तिथे पालिकेने जर प्रमोट केले, मदत केली तर हा प्रोजेक्ट चांगल्या प्रकारे कार्यरीत होऊ शकतो. जर ते कॉम्प्लेक्स त्याठिकाणी स्वत:चा निधी मशनरीसाठी जर करत नसतील तर महानगरपालिकेच्या माध्यमातून नगरसेवक निधी, प्रभाग निधी त्यासाठी खर्च करण्याचची सवलत नगरसेवकांना देण्यात यावी कारण पुढे पुढे ही कचऱ्याची समस्या फार भयंकर आणि बिकट होणार आहे. इंदौरचे आपण किती जरी दौरे केले वर्षाला दोन जरी दौरे केले त्याचा इम्प्लीमेंटेशन मिरा भाईंदर शहरामध्ये होणार नाही तर मागच्या वेळी सुध्दा जेव्हा डिंमप मॅडम महापौर होत्या त्यावेळेस सुध्दा दौरे झाले होते, आता सुध्दा दौरे झाले फक्त दौर होत राहतील इम्प्लीमेंटेशन होणार नाही. तर आपल्या आजूबाजूच्या महानगरपालिका आणि मुंबई महानगरपालिकेमध्ये कांजूर मार्गला हिरा आनंदानी तो प्रोजेक्ट केलेले आहे, कांदिवलीला केलेला आहे

अशा प्रकारे जर आपण स्थानिक कॉम्प्लेक्सला प्रोत्साहन दिलं तर बऱ्याच प्रमाणात ही कचऱ्याची समस्या सुटू शकेल धन्यवाद.

हसमुख गेहलोत :-

महापौर मॅडम, सभी के सवाल आ गये, और जवाब देना चाहूँगा ओर साथ ही साथ मे प्रशासन भी उसके साथ मे खुलासा करेगी सबसे पहिले सभी सदस्य गन को बताना चाहूँगा मैं लेके आया बतलब प्रकल्प मेरा नही है, मैंने कहा इस प्रकल्प के पिछे मेरा इतना ही योगदान है की, इसके शुरूवात से लेके अब तक क्योंकि कचरे का विषय हमारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी का पॅरा विषय है स्वच्छ भारत उसके अंतर्गत मुझे भी ऐसा लगा की हमारे शहर में पहेल होनी चाहिए इसके लिए मैंने यह संस्था को साथ दिया और तक्रीबन ६-८ महिने पे सेम इसपे फॉलोफ कर रहे है, प्रशासन के अधिकारी भी इसपे फॉलोफ कर रहे है। और एक बात पै इन्होने ध्यान दिया और स्नेहाजी नी जो बात कही मुझे वों बहूत अजीब लगी की इसका संस्था को क्या फायदा है। स्नेहाजी आप या मै या कोई भी सदस्य गन किसी मंदिर मे जाके अगर दान करते है और हमे पुछे की इसमे हमारा क्या फायदा है, तो वो उचित नही होगा, संस्था अपनी तरफ से शहर के लिए अगर अपने मेकींन द डफरन्स के बारा मे अगर सुना होगा मैं जहाँ तक जानता हूँ । जितने भी सदसय् गन वो मेकींग द डिफरन्स के बारे मे अच्छी तरह से जानते है। वो सालाना तक्रीबन तक्रीबन १५ से १८ करोड रुपये मानवतो के लिए, समाज के लिए खर्चा करती आई है और करती रहेगी प्लस मिरा भाईंदर शहर के अंदर उन्होने पिछले दो साल के अंदर करोना काल के अंदर कमसे कम तक्रीबन देड से दो करोड रुपये उन्होने शहर के लिए खर्चा किया तो हम जाके यह सवाल पुछे की उसमे आपका फायदा क्या है, तो यह उचित नही रहेगा। और अपने कुछ सवाल ऐसे किये थे, कि पिछले ०९ जगह नक्की किये थे उसके बारे मे खुलासा नही हूँवा उसके बारे में अभी तक हूँवा नही हूँवा। तो उसकी बारे में प्रशासन जवाब देंगी मैं फिर से एक बात बताना चाहूँगा सभी सदस्यो को यह सवाल थे दो-तीन सबसे अच्छी बात यह प्रशांतजी ने खुलासा किया ठराव के अंदर मै पडना चाहूँगा। ह्या कचरा प्रकल्पामुळे तेथील नागरिकांना त्रास व गैरसोय होणार नाही याची काळजी प्रशासनाने घ्यावी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेवून प्रकल्प राबविण्यात यावा हे ऑलरेडी प्रशांतजी क्लिअर कर दिया है। अब यह शुरूवात किई हुई जिस तरह से सावंत साहबने कहाँ कौनसा एरिया होगा अब मैं थोडीसी जानकारी देना चाहूँगा सबसे पहिले इसे प्रायोगिक तौर पर यानी ट्रायल बेसेस पे यह प्रभाग क्र. ०४ के लिए कर रहे है। आजूबाजू के लोगो को रहिवाशीओ को तकलीफ ना हो इसके लिए शुरूवात शिर्फ वेस्टचे करनेवाले है, ड्रायसे नही करनेवाले है। फिर से मैं कह रहा हूँ यह संस्था और महानगरपालिका के अधिकारीने कडे नियमो के साथ आजूबाजू के रहिवाशीओ को तकलीफ ना हो इसलिए शुरूवाती तौर पे वो वेस्ट यानी जो ड्राय है, ड्राय के अंदर करनेवाले है व्हेट के अंदर नही करनेवाले है, मतलब गिला जो कचरा होता है हमेशा बास आती है यहा बधबू फैलती है, आपकी भाषा मे बिमारीयाँ फैलती है तो गिला कचरा वहाँ पर उपयोगी में शुरूवात में नही लागेंगी ओर यह अधिकारी वर्गने पुरी तरह से ध्यान दिया है। दुसरा इसमे संस्था किस तरीके से काम करेंगी, संस्था खुद आपनी गाडी, संस्था खुद आपनी मॅनपावर घर घर जायेगी उस प्रभाग के अंदर, उस वॉर्ड के अंदर ओर लोगों को जागृकता करेगी तक्रीबन देडशो से दोशो लोग है, उनें मॅन पावर में जो हर कॉम्प्लेक्स में जाकर जागृत करेंगे की आपने देखा होगा मिरा भाईंदर के अंदर आज भी हमने पॅनल्टीस रखी हूई है की सुका और गिला कचरा अलग होना चाहिए है लेकीन आज भी जहाँ से कचरा आता है आज भी मिक्स आता है। और उसकी वजह से आप जाकर देखो वहाँ पर जो हमारे डम्पींग ग्राऊंड है वहाँ पे कितनी तकलीफे होती है। इसलिए यह जो मॅनपावर है वो घर-घर जा के आव्हरनेस का प्रोग्राम करेंगी ताकी घरसे ही कचरा और जहाँ जे मूल कचरा निकलता है वहाँ से कचरा अलग होके निकले और यह जो मॅनपावर लगायेगी वो साथ में कॉम्प्लेक्स में जाके घर पे जाके वो कचरा खुद उठायेंगी और उसका फायदा क्या

होनेवाला है, महानगरपालिका को क्या पोहोचनेवाला है उसका एक सिंगल पेनी महानगरपालिका को खर्चा नही करना है, उनको देना है तो क्या देना है महानगरपालिका को एन.ओ.सी. इस लिए एन.ओ.सी. देना है की, वहाँ पर लाईट लगे, वहाँ पर समजो इन्फ्रा लगे, वहाँ पर समजो पानी खर्च होये और पानी बिल, लाईट बिल उन लोग बिल का भुगतान करेंगी फुकट में कुछ नही करेंगी और सिर्फ ओर सिर्फ जो महानगरपालिका की अटी / शर्ती है कि इसके अलावा और कुछ वहाँ पर उपयोग नही होगा अगर इस तरीके से महानगरपालिका को फायदा पोहचता है। आज हम कचरा प्रकल्प के अंदर करोडो रुपये हर साल डाल रहे है, करोडो रुपया खर्च कर रहें है और उसके बाउजूद पुरी तरह से शहर स्वच्छ नही रह पाता है। प्रभाग क्र. ०४ के अंदर एक ऐसा प्रभाग है की, इसके अंदर गाडीके दो दो-तीन तीन फेरा मारने के बाऊजूद कचरा वहाँ से नही उठता है, कभी कभी बाकी रह जाता है। क्योकि की यहाँ पे जीऑग्राफीकली एरिया काफी बढा है इसलिए मैंने सोचा की अपने वॉर्ड में ना करते हूऐ प्रभाग के अंदर किया जाएँ ताकी पुरा एक बार के प्रोयोगिक तौर पर चालू रहे। अब बात रही यहाँ पर इतनी जगा क्यू दे रहे है सिर्फ मात्र और मात्र १० हजार फुट ले रहे है, उनकी मागणी थी तक्रीबन १ लाख फुट के लिए लेकीन आयुक्त महोदयजी ने इसको परवानगी न देते हुऐ हमको टेम्परारी बेसीस पे करना है, अधिकारी वर्ग ने इसको टेम्पररी बेसीस पे इतनी जगा न देते हूऐ कहाँ पर दिई जाएँ, जहाँ पर पुरा रिझर्व्हेशन हमारे हस्तक्षेप में, यहाँ हमारे महानगरपालिका के दायरे के अंदर पुरी तरह से अंमल मे नही आया है, यानी हमारे पुरे कब्जे में नही आया हुँआ है तो वो एरिया उन्होने कहाँ और उन्होंने कहाँ एक लाख फुट नही मिनीमम जो बात हुई १० हजार फुट के उपर तक्रीबन ०६ से प्रक्रिया चालू है। तो १० हजार फुट देने के लिए उनको नक्की किया गया है, अब जो १० हजार फुट दे रहे है, सभी सदस्यओ को मैं कहना चाहूँगा और साथ मे उस वॉर्ड से संबंधित जो नगरसेवक है उनको भी कहना चाहूँगा हाथ जोडके बिनंती है के यह सिर्फ १० हजार फुट दे रहे जो रिझर्व्हेशन है जो स्कूल का बार बार कह रहे हो स्कूल है, स्कूल है उस स्कूल का रिझर्व्हेशन है ११२०० और अभी तक महानगरपालिका के हक के अंदर ७२ टक्का ही रिझर्व्हेशन आया हूँवा है बाकी का आया हूँवा नाही है तो उसमे से ११२०० में से सिर्फ १० हजार ११२०० स्केअर मीटर है और हम अगर स्केअर मीटर की बात करे तो हम वापीस सिर्फ हजार मीटर ही ले रहे है। और यह ११२०० है उसमे से हम हजार मीटर ही ले रहे है। यानी दस वा हिस्सा ले रहे है और वो भी टेम्पररी बेसीस पे जिसमे महानगरपालिका को एक पैसे का भी भुकतान करना नही है, ना किसी लाईट का भुकतान करना है, ना किसी पानी का भुगतान करना है सिर्फ ओर सिर्फ शहर के हित के लिए आजूबाजू के लोगो की लोगो की हित के लिए और क्लिअर शब्दों में प्रशांतजीने कहाँ है की, लोकल स्थानिक लोकप्रतिनिधी उनको भी विश्वास में लिया जाएँ, लोकल जो रहिवाशी है उनको तकलीफ ना होते हूँऐ और खास तौर पे जो अधिकारी वर्ग ने अटी / शर्ती बनाई हुऐ है, जो नियम बनाये हूऐ है, जो लोगो को तकलीफ ना होते हुई, महानगरपालिका के नुकसान ना होते हुऐ इसके उपर अंमल मे लाया गया है और यह आपके सामने पेछ किया गया है। इसमे व्यक्ती विशेष किसी के लिए भी नही है। मैं खुश इस बात से हूँ इस प्रकल्प में दौड-धूप शुरूवात से कर रहा हूँ, मैं खुश इस बात से हूँ की अगर सक्सेस होता है तो हमारे शहर के लिए बहुत ही बढी उपलब्धी होगी, मैं खुश इस बात से हूँ की अगर यह प्रोजेक्ट सक्सेस होता है तो इसे हम अमदनी जिस तरह से स्नेहाजीने कहाँ की क्या फायदा हो सकता है, क्या अमदनी हो सकती है, भविष्य मे इसके उपर भी चर्चा करेंगे, मै खुश इस बात से हूँ की एक पैसा नुकसान ना करते हूऐ इसका हम फायदा शहर को पोहचाने जा रहे है, मैं उस लिए खुश इस बात से हूँ की कहॉ ना कहाँ मेरा शहर है, हम इस शहर के रहिवाशी है। इसके आलावा कुछ खुलासा बाकी रह गया हो तो मैं आयुक्त महोदय से कहूँगा प्रशासन आपनी तरह से खुलासा करे धन्यवाद।

मा. महापौर :-

उपमहापौर साहेबांनी अतिशय चांगल्या पध्दतीने ह्याठिकाणी खुलासा केलेला आहे तरी कोणासा समाधान झाले नाही समाधान झाले की सर्वांची अनुमती आहे नही तर सभागृह नेत्यांनी ठराव वाचावा.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, ठराव वाचलेला आहे.

बगाजी शर्मिला :-

महापौर मॅडम, विरोधी पक्ष नेत्याच्या माईकवरून बोलते आहे कारण माझा माईक अनम्युट होत नाही म्हणून महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते, कचऱ्याचा विषय आला आणि धावगी डोंगरचा विषय निघाला नाही असा होत नाही आणि आम्ही बोलणार नाही हा पण असा विषय होणार नाही. आयुक्त साहेबांना मी विनंती करते की आपण बऱ्याच वेळेला आपण तिथे पाहणी केली, महापौरान बरोबर पाहणी केलेली आहे, आमदार मॅडम बरोबर पाहणी केलेली आहे, आमच्या बरोबर पाहणी केलेली आहे, आपण आम्हाला शाश्वती दिली होती की जे १० प्रोजेक्ट होते त्याच्यातले ०२ जे रेडी आहेत नवघरमधले ते दोन ०१ ताखेला चालू होणार होते आजची २५ तारीख आली आहे ते अजून ही चालू झाले नाहीत. साहेब आम्ही किती विश्वास ठेवायचा तुमच्या आश्वासनावर कारण १० प्रोजेक्टमधले फक्त दोनच प्रोजेक्ट चालू होणार ही शाश्वती दिली ती ही झाली नाही आता समजा एखाद्या प्रायोगिक तत्त्वावर हा जो विषय आलेला आहे आपण हा प्रायोगिक तत्त्वावर आणि गहलोत साहेबांनी बराचसा भाषण केले आहे निवेदन दिले आहे की, त्यांना १० लाख क्वेअर फुट जागा होती त्यांना आपण फक्त १० हजार स्केअर फुट दिली तर असं का होऊ शकत नाही की पूर्ण शहरासाठी हा प्रोजेक्ट डी.पी.आर. तयार करा आणि त्यांना छोटे छोटे प्रोजेक्टसाठी जर एन.जी.ओ. आहेत, ते बिना मुल्य करत आहेत तर ते एका ठिकाणी करण्यापेक्षा सगळ्याच ठिकाणी केले तर जो घनकचरावरचा भार आहे तो निघून जाईल आपले १० प्रोजेक्ट आहेत त्याचे सुरूवात केली तर तो कचऱ्याचा प्रमाण आहे तो अॅटोमॅटीक कमी होईल तर ह्या विषयी पहिले हे छोटे-छोटे विषय आणून काही ही त्याच्यामध्ये होत नाही प्रायोगिक आणि ट्रायल बेसवर होतं कारण घन कचरा जेव्हा प्रोजेक्ट आला तेव्हा पण हा ट्रायल बसवरच होता. आज किती वर्षे झाले आज १८-१९ वर्षे झाले हा ट्रायल बेसस आपला चालू आहे. म्हणजे आपण जेव्हा एखाद्या ठिकाणी आपण बोलतो की महानगरपालिकेचा स्वच्छेतेमध्ये आपला नंबर ०१ आला पाहिजे त्याच्यासाठी आपण खूप खटाठोख करत आहोत प्रशासन त्यासाठी खूप प्रयत्नशील आहे परंतु काय होते की, आपण प्रयत्नशिल असतो परंतु आपले प्रयत्न कमी पडतात ह्याला ते ठेकेदार पण कारणीभूत आहेत. मॅडम थोडक्यात मांडायला आपली परिस्थिती काय आहे हे पण समजणे गरजेचे आहे आम्ही डम्पींग विषयी बोलणार आणि डम्पींग विषयी आम्ही आंदोलनाचे इशारे दिल्यानंतर आम्हाला सगळे प्रतिनिधी मदत करतात. तुम्ही तो विषय बोलता आहेत पण आम्ही जेव्हा हा विषय येतो तेव्हा आम्ही बोलतो. साहेब, मला उत्तर द्या की ०८ प्रोजेक्ट चालू करणार होते ते का चालू झाले नाही आणि हा परत प्रायोगित तत्त्वावर तुम्ही काही तरी नवीन काही तरी करता आहेत. मॅडम, प्रशासनाकडून उत्तर मिळावं ही मला अपेक्षा आहे.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, मॅडमने उल्लेख केला की ०१ तारखेला सुरू होणार होते आणि सुरू झाले नाही परंतु नवघर येथील एक २० मेट्रीक टन आणि दुसरा १० मेट्रीक टन येथील जो प्रकल्प आहे तो ०८ जानेवारीला सुरू झालेला आहे त्याठिकाणी सुरूवातीला १५ ते २० दिवस त्याच्यात गोबर शेन टाकले जाते आणि त्याच्यावर कल्चर डेव्हलप झाल्या नंतर प्रत्यक्षात तो कचरा टाकला जातो. ओला कचरा प्रोसेस होण्यासाठी त्याच्यावर बायोकल्चरची प्रोसेस होण्यासाठी त्याच्यात कल्चर तयार होण्यासाठी गोबर शेन टाकले जाते आणि ते ऑलरेडी आपण ०८ जानेवारीला टाकलेले ते

प्रकल्प नवघर येथील दोन्ही प्रकल्प सुरू झालेले आहेत, जातीने मी स्वत: तिथे अनेकदा गेलेलो आहे माझ्याच बरोबर मागील ८-१० दिवसापूर्वी मा. महापौर मॅडम, उपमहापौर साहेब आणि त्याच बरोबर सभागृह नेते पण आले होते आणि मा. प्रविण पाटील साहेबांचा एरिया आहे त्यांना ही ते माहीत आहे तो प्रकल्प पूर्ण झालेला आहे. त्यानंतर कनाकिया आणि भाईंदर (प.) येथील प्रकल्प आहेत ३१ मार्च २०२२ रोजी सुरू होणार आहेत दिलेल्या दिनांकाप्रमाणे त्याच्या आधीच २-४ सुरू होतील पण उशीर होणार नाही याच्यासाठी प्रशासन दक्ष आहे आणि वेळोवेळी उरलेले प्रकल्प सुरू होण्यासाठी सुध्दा प्रयत्नशील आहे. त्यामुळे आपण म्हणतात ते तसे नाही प्रत्यक्षात नवघर येथील ३० मेट्रीक टनचा ०८ जानेवारी पासून सुरू झालेला आहे. धन्यवाद.

मा. महापौर :-

जुबरे इनामदारजी तुमचा ठराव आहे का?

जुबेर इनामदार :-

मी फक्त आयुक्तांनी निवेदन करणे ह्या विषयाबद्दल कारण त्यांचा गोषवारा आहे. साहेबांनी फक्त शर्मिला बगाजीचा जो विषय होता त्याचा उत्तर दिलेला आहे. ह्या विषयाबाबत आयुक्तांचा गोषवारा आहे आयुक्तांनी निवेदन करावे हा त्यांना विषय योग्य वाटलेला आहे म्हणून त्यांनी गोषवारा दिला तरी ह्याविषयी तांत्रिक बाबी असलेल्या अडी-अडचणी आयुक्तांनी सांगावं विषय संपून जाते. मला वाटते बऱ्याच लोकांचा समाधान होऊन जाईल.

रवि पवार (उपायुक्त) :-

स्वच्छ भारत अभियानमध्ये मा. उपमहापौरांनी जो काही प्रस्ताव आहे त्याच्या बाबतीमध्ये त्याच्यांशी चर्चा केली असता कारण लेखी स्वरुपामध्ये माझ्याकडे तसे काही निवेदन वगैरे आलेले नाही पण त्यांच्याशी मी काल चर्चा केली तर त्यांनी असे सांगितले की, ड्राय वेस्टवरती आपण हा प्रायोगिक तत्त्वावरती प्रोजेक्ट राबवत आहोत आता स्वच्छ भारत अभियानमध्ये आपल्याला जे काही स्वच्छ सर्वेक्षणमध्ये जे काही बाबी कम्प्लसरी केलेल्या आहेत त्याच्यामध्ये ह्यावर्षी एक तरी वॉर्ड किमान आत्मनिर्भर करून दाखवायचा आहे. आत्मनिर्भर वॉर्डची कनसेप्ट अशी आहे की त्या वॉर्डमध्ये जो कचरा आहे तो कचरा त्याच वॉर्डमध्ये शंभर टक्के आपल्याला सेग्रीगेशन करून आणि प्रोसेसींग करायची आहे त्यामुळे ही एक चांगली इनीश्युटीव्ह उपमहापौरांनी घेतलेली आहे. फक्त तांत्रिक बाबी ज्या आहेत त्या तांत्रिक बाबीच्या बाबतीमध्ये ज्यावेळेस आपण ठराव मान्य केल्यानंतर आपण करून घेणार आहेत.

मा. महापौर :-

ठीक आहे.

जुबेर इनामदार :-

थोडक्यात विषय चांगला आहे, संस्था नि:शुल्क पध्दतीने हे कार्य करणार आहेत, प्रशासनाने एक दक्षात घ्यावी की ह्याच्यामुळे उत्तनला जशा प्रकारे आंदोलने झाली कचऱ्याचा वास अथवा बाकीच्या काही अडचणी असतील परत अशा जागेवर होता कामा नये कारण आपली पहिली सुरूवात आहे.

हसमुख गहलोत :-

जुबेर भाई व्यक्तीगत तौर पर मैं आप इसकी ग्वाही देता हूँ। और जो आप सुचना देते हो वो मैं प्रशांत दळवीजी को कहूँगा की वों सुचना ॲड किया जाएँ।

जुबेर इनामदार :-

बाकीच्या सदस्यांची ज्या सुचना आहेत त्या ही घ्या.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, सन्मा. गटनेते जुबेर साहेब आणि सन्मा. सदस्यांनी ज्या ज्या सुचना केलेल्या आहेत त्या ठरावामध्ये नमूद करण्यात याव्यात.

महापौर मॅडम :-

ठीक आहे.

स्नेहा पांडे :-

महापौर मॅडम, आपकी परमीशन से बोल रही हूँ, उपमहापौर साहबने बहूत ही अच्छा खुलासा दिया बहुत बहुत धन्यवाद, उन्होने कहा की, करोडो रुपया लगाया है अभी तक नुकसान हो रहा है फिर भी उत्तन मैं क्या हालत है?

मा. महापौर मॅडम :-

ठराव झालेला आहे, तुम्हाला विरोधामध्ये ठराव करायचे आहे की, सर्वानुमते करायचा आहे.

स्नेहा पांडे :-

मॅडम ठराव नाही पण खुलासा बद्दल मला बोलायचे आहे. मॅडम हमारे वॉर्ड का विषय है तो हम बोलेंगे नही? ऑनलाईन सभा का मतलब हम लोग रेस हॅन्ड करके घण्टो-घण्टो रखते है फिर भी आप बोलने का मौका नही देंगे तो हम आपने पदाधिकारी से आयडी से बोल रहे उससे भी नही बोलने देंगे तो कैसे बोलेंगे तो फीर महासभा अटेंड करे की नही करे यह बताई।

महापौर मॅडम :-

महासभा अटेंड करना है। ऑफ लाईन सभा लेने के लिए शासन को पत्र भी दिया मगर वहाँ से आया नही।

स्नेहा पांडे :-

करोना का नियम तो हमको पालना ही है, हमको शासन के खिलाफ जाकर कोई काम नही करना है। हम ऑफ लाईन सभा लेने नही बोल रहे हम बोल रहे की जब हमने घण्टो घण्टो हात उपर करते है।

महापौर मॅडम :-

हे सगळे अर्जेस्ट करावे लागेल आणि वेळेचा भान सुध्दा ठेवावा लागेल, तुमचा ठराव असेल तर सांगा.

स्नेहा पांडे :-

मॅडम मेरे वॉर्ड का विषय है, मैंने पहिले ही क्वेशन किया था उपमहापौर साहब थे आप नही थे, उपमहापौर साहबने खुलासा किया उस खुलासा से मैं सॅटीसफाय नही हूँ इस लिए मुझे वापस बोलना है तो आपको सुनना पडेगा ।

महापौर मॅडम :-

मॅडम तुमची सुचना मांडा.

स्नेहा पांडे :-

उपमहापौरने कहा की, करोडो रुपया लगा के प्रशासनने घन कचरा प्रकल्प लगाया है, फिर भी उत्तन की यह स्थिती है उसी विषय पे मैं भी बोल रही हूँ। की जब पुरा प्रशासन जगा हूँवा है हम लोगोने इतने बढे प्रकल्प लगाये है, करोडो करोडो हमारे खर्चे हो रहे है फिर भी उत्तन की यह अवस्था है की वहाँ आप रह नही सकते तो यह जो संस्था है इसको कितने दिन का एक्सपिरियन्स है जो यह पुरे एक प्रभाग नं. ०४ का कचरा लेके यहा पे विल्हेवाट करेगी और स्थानिक लोगो को तकलीफ नही होगी जब उत्तन मे शुरू किया गया था तो वहा भी यही बोला गया था। की नागरिको को कोई तकलीफ नही होगा, कोई बदबू नही आयेगी लेकीन आज वही के लोग आंदोलन करने के लिए तयार है। और मेरा कहना है की अगर यह संस्था इतनी अच्छी तरह से आ रही है पुरे शहर का

कचरा वो विल्हेवाट करेंगी वो भी विदाऊट शुल्क तो हम पुरे शहर के लिए इस संस्था को दे दिया जाएँ, बहूत सारी जगह को शुरू किया जाएँ ताकी आपनी पालिका का खर्चा बच जाए। हम करोडो खर्चा कर रहे फिर भी नागरिक परिशान है।

महापौर मॅडम :-

मॅडम तुमची सुचना त्याच्यामध्ये ॲड करूया, त्या संस्थाला तुम्ही एकदा त्यांना मौकाच देणार नाही तर ते काय चांगले करता की वाईट करता ते तुम्हाला कसे निदर्शनास येईल त्यांना संधी तर द्या.

स्नेहा पांडे :-

त्यांना अशा प्रकारे काम करण्याचा अनुभव आहे का, की तो दुसऱ्या कुठल्या महानगरपालिकेमध्ये काम करतो का?

महापौर मॅडम :-

प्रशासन जे उत्तनला घन कचरा प्रकल्प रावबत आहे ते काय वाईट नाही.

स्नेहा पांडे :-

आम्हाला जागा द्या आम्ही हे करणार ते करणार आणि पालिका त्यांना जागा देणार?

महापौर मॅडम :-

प्रशासन जे घन कचरा प्रकल्प उत्तनला करतोय तो काय वाईट नाही मी स्वत: जाऊन बघितला आहे. आपला पण प्रकल्प खूप चांगला आहे आपण संस्थाना अशा संध्या जर दिल्या आणि विना मुल्य जर आपल्याला करून मिळत असेल तर त्यामध्ये काय वाईट नाही. जर तुमची सुचना असेल तर घ्यावी ती आम्ही नमूद करू. तुम्हाला ठराव करायचा आहे का?

स्नेहा पांडे :-

असेच शहरच्या मध्योमधी त्यांना जागा देणार आणि त्याचे कुठे प्रकल्प सुरू आहे का? त्यांना एक्सपिरियन्स आहे का?

महापौर मॅडम :-

ठराव असेल तर ठराव घ्या नाही तर मतदानाची प्रक्रिया करा, नाही तर सर्वानुमते मंजूर.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८८ करिता ठराव आलेला आहे सुचक प्रशांत दळवी अनुमोदक डिम्पल मेहता अन्य कोणाचा अजून ठराव आहे का ह्या विषयावरती? नाही

महापौर मॅडम :-

ठराव सर्वानुमते मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. 88 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्रायोगिक तत्वावर स्वखर्चाने कचरा प्रकल्प तयार करणेसाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत.

**ठराव क्र. 71 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) येथे प्रभाग क्र.04 मधील आरक्षण क्र.219 मध्ये लहान स्वरूपात कचरा प्रकल्प तयार करणेकरीता जागा उपलब्ध करुन देण्याची प्रशासनाने प्रस्ताव सादर केलेला आहे.

मेकिंग द डिफरन्स चॅरीटेबल ट्रस्ट या संस्थेने स्वखर्चाने लहान स्वरूपात कचरा प्रकल्प तयार करणेसाठी महानगरपालिकेकडे 10,000 चौरस फुट क्षेत्राची जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. सदर प्रकल्पासाठी आवश्यक सर्व साधन सामुग्री, वीज, पाणी, मनुष्यबळ, कार्यालय इ. सदर संस्था स्वत:च्या खर्चाने करणार आहे व सदर प्रकल्पामुळे उत्तन येथे कचरा वाहतूकीसाठी लागणाऱ्या गाड्या व त्यावरील खर्चाची बचत होणार असल्याने महापालिकेचा खर्च कमी होईल.

सुका कचरा उचलणे व विल्हेवाट लावण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची असेल, या कचरा प्रकल्पामुळे तेथील नागरीकांना त्रास व गैरसोय होणार नाही याची काळजी प्रशासनाने घ्यावी तसेच तेथील स्थानिक लोकप्रतिनीधींना विश्वासात घेवून प्रकल्प राबविण्यात यावा. या प्रकल्पाकरीता लागणारी वीज, पाणी व इतर बाबींकरीता नाहरकत दाखला प्रशासनाने द्यावा. या प्रकल्पाशिवाय इतर कोणताही उपक्रम सदर जागेत संस्थेने करु नये.

सबब, प्रभाग समिती क्र.4 क्षेत्रात आरक्षण क्र.219 मधील 10,000 चौरस फुट क्षेत्राची जागा किंवा मा. आयुक्त यांनी सुचविलेली जागा मेकिंग द डिफरन्स चॅरीटेबल ट्रस्ट, या संस्थेस 5 वर्षाकरीता विनामूल्य उपलब्ध करून देवून स्वखर्चाने लहान स्वरूपात सुका कचरा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर उभारणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्रीम. डिम्पल मेहता**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८९, ॲटोमॅटीक फायर बॉल (अग्निरोधके) यंत्रणा खरेदी करणेबाबत.

धृवकिशोर पाटील :-

पालिका प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यात नमुद केल्याप्रमाणे ऑटोमॅटिक फायर बॉल या स्वयंचलित अग्निरोधकाची ठळक वैशिष्टये लक्षात घेता मिरा भाईंदर महानगरपालिका शाळा, शैक्षणिक इमारत व इतर कार्यालयात सदर अग्निरोधके बसविणे हितावह ठरेल.

सदर उपकरण हे स्वयंचलित असल्याने आगीवर वापरणे करीता तंत्र-कुशल मनुष्यबळाची आवश्यकता नसुन सर्व प्रकारच्या लहान आगींवर उपयुक्त असल्याने सदरचे अग्निरोधक खरेदी केल्यास सर्व प्रकारच्या आगींवर वापरता येईल. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने ऑटोमॅटीक फायर बॉल उपयुक्त आहे असे अग्निशमन विभागाचे मत आहे.

तरी त्यामुळे पालिकेच्या अग्निशमन विभागाकरीता 1 कि. ग्रॅ. क्षमतेचे 1417 नग **AUTOMATIC FIRE BALL** खरेदी करणेकामी **GeM PORTAL** वर निविदा मागविणेस व रु. 1,04,85,800/- इतक्या अंदाजित खर्चास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

अनिल विराणी :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, ह्या विषयावर मला बोलायचे आहे ठरावाच्या बाजुने बोलू की विरोधात बोलू हा विषय नंतरचा आहे. आयुक्त महोदय, खरं तर हा प्रकार जो आहे तो मला वाटतो ह्या शहरासाठी ॲब्सूलूटली नवीन आहे, मुंबई महानगरपालिकेना ह्याला कोणत्या धरतीवर ॲक्सेप्ट केलेले आहे कारण आपण नेहमी मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका आजूबाजुच्या महानगरपालिकेचा उदाहरण नेहमी आपल्यासाठी घेतो. आपली एक छोटीसी महानगरपालिका आहे खरोखर आपल्याला ह्याची गरज आहे, इथून सुरूवात केली पाहिजे, आपल्याकडे त्याची मालमत्ता नाही, आज आपल्याकडे तरतूद उपलब्ध आहे म्हणून आपण त्याच्यावरती खर्च करायचा ही काही यंत्रना नवीन असेल नाही तर काय आहे? त्याची माहिती त्याची जाणीव, खरं तर तुम्ही साहेब सभागृहाला दिली पाहिजे हा फायर बॉल प्रकार तरी काय आहे. मंजुऱ्या घ्यायच्या हा नंतरचा आहे, जो मुंबई महानगरपालिका आहे, आपल्याकडे याची गरज आहे का?

मारूती गायकवाड :-

सन्मा. महापौर महोदय, सन्मा. सभागृह, आयुक्त महोदय, अॅक्चुव्हली हा जो फायर बॉल आहे जसे आपण फायर बुजविण्यासाठी एक सिलेंडर लावतो आपण प्रत्येक ऑफिसमध्ये किंवा ह्याठिकाणी अशा स्वरुपात तो फायर बॉल आहे तो सेंसरवरती चालणार आहे थोडी जरी आग लागली आणि धूर थोडा जरी सेंसेशन झाला तरी तो अॅटोमॅटीक त्या आगेवरती कन्ट्रोल येणार आहे. त्याठिकाणी असे कुठल्या मनुष्यबळाची किंवा कुठल्या अशा प्रशिक्षण मनुष्यबळाची आपणाला तशी फारसी त्याठिकाणी गरज भासणार नाही. आपले कोविड हॉस्पीटल आहेत, आपले महानगरपालिकेचे शाळा आहेत, आपल्या महानगरपालिकचे प्रभाग समित्या आहेत. ह्याठिकाणी ते लावण्यासाठी उपयुक्त आहेत म्हणून हा प्रस्ताव प्रशासनाकडून मांडण्यात आलेला आहे.

जुबेर इनामदार :-

आपण प्रत्येक इमारतीला स्प्रींकलर सिस्टम लावलेला आहे, जिथे जिथे कोविड सेंटर, शाळा वा महानगरपालिकेची मालमत्ता आहे ते स्प्रींकलर सिस्टम काम करत नाही का? आणि आजपर्यंत किती वेळेला...

मारूती गायकवाड :-

सरसकट मालमत्तेमध्ये आपली स्प्रींकलर सिस्टीम लावलेली नाही. ज्या नवीन नवीन मालमत्ता आपण ज्या आता आपण बनवत आहोत त्याठिकाणी स्प्रिंकलर सिस्टीम आहे. ज्या जुन्या इमारती आहेत, जुन्या शाळा आहेत, जुने आपले हॉस्पीटल आहेत आणि ज्याठिकाणी स्प्रिंकलर आहेत त्याठिकाणी लावले जाणार नाहीत.

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय, स्प्रिंकलर वैद लावल्यानंतर तुम्हाला १०-१५-२०-२५ वर्षे त्याला बघायची गरज लागणार नाही आणि हे तुम्ही लावल्यानंतर तुम्हाला फक्त ५ वर्षाचा त्याच्यामध्ये कार्यकाल आहे. म्हणजे ५ वर्षामध्ये फेकून द्या आणि नवीन लावा, ०५ वर्षानंतर ते चालणार नाही गायकवाड सर असेच आहे ना?

मारूती गायकवाड :-

साहेब, त्याची ०५ वर्षाची गॅरंटी आहे.

जुबेर इनामदार :-

०५ वर्षाची गरंटी म्हणजे ०५ वर्षेच टिकणार स्प्रिंकलर म्हणजे पाणी, पाणी म्हणजे तुम्हाला त्याची लाईफ पाहिजे तितकी वर्षे वापरू शकता. तर ह्याच्यावरती खर्च करण्यापेक्षा तुमच्या स्प्रिंकलर सिस्टमवर खर्च करा. शेवटी अग्निशमन म्हणजे हा आग आणि पाणी आगीवन नियंत्रण आणायचा असेल तर पाण्याची गरज आहे.

महापौर मॅडम :-

८८ नंबरचा ठराव घ्या. तुम्हाला जेंव्हा सन्मा. गटनेते निलम ताई जेव्हा सचिव महोदय तुम्हाला जेव्हा सांगतात की तुमचा ठराव आहे का, जेव्हा मी सांगते तुमचा ठराव आहे का, तुम्ही ठराव वाचत नाही. तुमच्या माईकवरती दुसरे कोणी तरी बोलायला बसवता असे नाही चासणार ना.

निलम ढवण :-

मॅडम, त्यांची इलेक्ट्रीसिटी मोबाईल बंद झाला होता, चॉर्जिंग संपली होती आणि त्यांना बोलायचं होतं स्थानिक नगरसेवक होते म्हणून मी त्यांना बोलायला दिलं.

महापौर मॅडम :-

ठिक आहे, हरकत नाही पण त्याच्यानंतर सचिवांनी सांगितलं की तुमचा ठराव आहे का, तुम्ही काय तुमचा ठराव बोलतच नाही. सचिव साहेब दोनदा बोलले.

निलम ढवण :-

मी बाहेर गेली होती तेवढ्यात. पण सांगितले होते का, नाही सांगितले, ठिक आहे सचिव साहेबांनी सांगितले असेल.

नगरसचिव :-

मी दोनदा पुकारलेलं होतं, दोनदा मी विचारना केली अन्य कोणाचा ठराव आहे का म्हणून दोनदा विचारले मॅडम.

महापौर मॅडम :-

ठिक आहे आता पहिल्यांदा सभागृहामध्ये येवून बोलले, पण असा सभागृहामध्ये डायरेक्ट वरती येवू नका तुम्ही तिथून सुचना करा की आम्हाला ठराव मांडायचा आहे, तर मी तुम्हाला संधी देईल. मी ठराव मांडायला संधी दिलेली आहे तुम्ही ह्याविषयावरती ठराव मांडा.

निलम ढवण :-

थँक्यू मॅडम, माझा माईक म्यूट होता त्यामुळे मला बोलता येत नव्हतं.

महापौर मॅडम :-

ठरावामध्ये असे म्हटले आहे की, स्थानिक नगरसेवकांना विश्वासात घेवून कारवाई करावी. पण तरी तुम्हाला ठराव मांडायचा असेल तर मांडू शकता.

निलम ढवण :-

मॅडम, मी अजून एक वाक्य सांगू का त्यांचा म्हणणं असे आहे की, सगळे जे करायचे आहे तसे मागे ठराव केला आणि काही अंमलबजावणी झाली नाही तर तसे व्हायला नको आणि एकाच ठिकाणी करण्यापेक्षा मिरा भाईंदर शहरामध्ये पूर्ण नियोजन करा आणि मिरा भाईंदर शहरामध्ये सर्व एकाच वेळी चालू करा असे त्यांचं म्हणणं आहे.

महापौर मॅडम :-

मान्य आहे तुमचं म्हणणं पण आपण समजा एका संस्थेला पहिल्यांदा संधी दिली आणि ती संस्था चांगले काम करते, नाही करते याचे आपल्याला बघायला तर लागेल. आपण त्याला पहिले फक्त संधी देतोय, त्यांनी जर चांगले काम केले तर आपण त्याला पुढे कन्टीन्यू करू किंवा दुसऱ्या संस्था त्यांचे बघून दुसऱ्या संस्था आपल्याकडे येवू शकतात मग आपण त्यांनाही दुसऱ्या ठिकाणी संधी देवू शकतो. आता आपण सगळे पाहिलेले आहे तुम्ही पण माझ्या बरोबर होत्या. त्याठिकाणी एन.जी.ओ. ने आपलं जास्तीत जास्त प्राधान्य दिलं म्हणून त्या शहरामध्ये पाचवा क्रमांक आला तुम्हाला ही माहिती आहे, गटनेते यांना पण माहीत आहे.

धनेश पाटील :-

मॅडम, पण त्यांना कामाचा अनुभव आहे का?

महापौर मॅडम :-

त्याला कामाचा अनुभव नसता तर कशाला आला असता.

धनेश पाटील :-

महापौर मॅडम, त्यांनी कुठल्या महानगरपालिकेत काम केलेले आहे का?

निलम ढवण :-

महापौर मॅडम, तुम्ही नव्हता मी बोलले तेव्हा, मी असे बोलले की जे आपण बघितलं ती अंमलबजावणी शंभर टक्के आपल्याला आपल्या शहरात करायची आहे परंतु त्या संदर्भात आयुक्त साहेबांना काही माहिती नाही आपण सर्व गटनेते आणि मेन पदाधिकारी मिळून आयुक्त साहेबांना घेवून आपण त्यासंदर्भात पूर्ण चर्चा करूया आणि त्यानुसार पूर्ण शहरामध्ये अंमलबजावणी करूया असे सुरूवातीला सांगितले तेव्हा तुम्ही नव्हते.

महापौर मॅडम :-

ठीक आहे, अजून काय वेळ गेलेली नाही, आता ठराव केला आणि उद्याच जावून तो प्रकल्प चालू होईल अशातली काही गोष्ट नाही. तुमचा म्हणणं असेल तर आपण स्थानिक नगरसेवकांना पुन्हा आपल्या दालनामध्ये बोलवू गटनेते या आपले आयुक्त महोदय असतील, संबंधित विभागाचे अधिकारी असतील, त्या एन.जी.ओ. यांना पण बोलवू आणि सर्व पदाधिकारी मिळून पुन्हा एकदा चर्चा करून जसे तुम्ही पण बोलाल तशा पध्दतीने करू. शहरामधून कचराच गायब करायचा हाच विषय आहे.

निलम ढवण :-

ठीक आहे, महापौर मॅडम.

महापौर मॅडम :-

तुमच्या सन्मा. नगरसेवकांना सांगा आपण त्यांना विश्वासात घेवूनच करूया. सन्मा. नगरसेवक स्नेहाताई पांडे आणि जयंतीलाल पाटील सर, तारा घरत मॅडम यांची जर मान्यता असेल तर ठीक आहे नाही तर जर तुम्हाला ठराव करायचा असेल तर मी तुम्हाला संधी दिली तुम्ही ठराव करू शकता.

महापौर मॅडम :-

अग्निशमन विषयाबद्दल प्रशासनाने माहिती दिलेली आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, माझी चर्चा संपलेली नाही. माझा विषय चालू असतांना दुसरा विषय मध्ये गुसवला परत महापौर मॅडम, आयुक्त महोदय, आपल्याकडे याची डिमांड केलेली आहे १४१७ आपल्याकडे ३६ शाळा रुग्णालय, मनपा इमारत सदर यंत्रणा बसविण्या करिता म्हणजे आपल्या ह्या १४१७ मध्ये सगह्या इमारती आपल्या मालमत्ता याच्यामध्ये कव्हर होतात का? हे तुमही प्रायोगिक तत्त्वावर करता आहेत का? करत असाल तर आधी कुठल्या तरी एका इमारतीवर फक्त करून बघा. साहेब स्प्रिंकलर आगीवर फक्त पाणीच चालतो कितीही आपण त्याच्यावर सिलेंडरचा वापर केला, करत असू तरी ही आगीवर पाण्याचाच मार असतो त्याच्यांनेच मोठ्यात मोठी आग आजपर्यंत विझविण्यात आलेली आहे त्याच्यामुळे स्प्रिंकलर सिस्टम हा आपल्याला कमी खर्चामध्ये पालिकेला फायदेशीर नाही ठरणार का?

महापौर मॅडम :-

हा विषय मी पेंडींग ठेवते. गीता जैन मॅडम तुम्हाला कचऱ्या विषयी काय बोलायचे होत, विषय चालू असतांनाच चर्चा करा म्हणजे विषयपटलावरती विषय दुसरा चालू आहे आणि आपण चर्चा मागच्या विषयावरती करतोय आता ढवण मॅडमशी मी बोलत होती तेव्हा पण कन्टीन्यू नाही केला.

गीता जैन :-

मॅडम जर कन्टीन्यू करायचं असेल तर मला अनम्यूटच ठेवा मी कन्टीन्यू करत राहणार मला हात वर करून करून माझे हात दुखायला आले आणि तुम्ही सांगातात की तुम्ही तेव्हाच सांगायचे.

महापौर मॅडम :-

मी तर म्हणते शासनाकडून मंजुरी आणा आपण ऑफ लाईन मिटींग घेवूया.

गीता जैन :-

मॅडम, आता सगळ्यात पहिले जेव्हा मी ह्या विषयावर बोलली तेव्हा स्पेसीफीक सांगितलं होतं, मला ह्या प्रश्नाचे उत्तर प्रशासन म्हणजे आयुक्त साहेबांकडून पाहिजे. परत परत जर मला सांगावे लागत असेल, आयुक्त साहेब आपल्याला विनंती करते की जेव्हा एखादे सदस्य आपल्याकडून काही जवाबाची मागणी करते तेव्हा प्लीझ नोट-डाऊन करून तेव्हाच जवाब द्या, जेव्हा तुम्ही तुमचे निवेदन करता. तर माझा विषय असा आहे आपण एवढी सगळी चर्चा केली. १. तिथे शाळेचा रिझर्व्हेशन आहे, तर तिथे आपण प्रकल्प चालू करू शेकाल का? २. ही संस्था किती कचरा घेणार

याची माहिती कोणालाच नाही पण दुसरी अशी संस्था आली तर त्यांना कोणत्या बेसीसवर आपण त्यांनाही परवानगी देवू शेकाल कारण माझ्याकडे ही दोन संस्था आहेत, दुसऱ्या सदस्याकडे ही दोन-चार संस्था असतील मग सगळ्यांनी आप-आपली संस्था सांगणार तर त्याला एक पॅरा मीटर नक्की करावा लागेल.

महापौर मॅडम :-

मॅडम, तुमची पण संस्था आणा ना आपण दुसरीकडे प्रयोग करूया आपल्याला कचरा डिव्हाईड झाला तर चांगलीच गोष्ट आहे. तुम्ही सांगा दुसऱ्या ठिकाणी आपण तिकडे पण हा प्रयोग करुया कारण शहरातून आपल्याला कचरा जास्तीत जास्त घालवायचा आहे. तुम्ही संस्था आणा आणि आयुक्त महोदयांना भेटा परत आपल्याला असा विषय आणायचा असेल तर आपण तसा महासभेला विषय आणू आणि तो ही मंजूर करू.

गीता जैन :-

महापौर मॅडम, माझा सांगणं असं आहे की त्या संस्थाचे पॅरा मीटर काय असावे जेणे करून कारण कोणी ही आला आणि आम्ही चालू करू तर तसे चालत नाही ना. पॅरा मीटर आपण काही ठरवले आहेत का?

आयुक्त :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, एकूण ११ हजार क्वेअर मीटर पैकी आपण फक्त १०० क्वेअर मीटरची जागा देत आहोत म्हणजे एकूण ग्राउंडच्या साईजच्या ०.१ परसेंट तर अतिशय छोटी जागा आपण त्याठिकाणी देत आहोत आणि ह्याच्यात आपण अजून एक विचारु ३७१ केलेला आहे का, हे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात देत असल्यामुळे आपण ३७१ केलेले नाही कारण हे त्यांना परमानन्ट चेंज करून देत नाही आपण ह्या शहरातील नागरिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जनजागृती व्हावी प्रत्येक हाऊसींग सोसायटीमध्ये ह्या संस्थेने जावून कचऱ्याच्या बाबतीत जनजागृत्ती करून ओला आणि सुका कचऱ्याचे वर्गीकरण अधिक त्याचे प्रोसेसींग हे व्हावा आणि त्याठिकाणी जो डेमो तो जास्तीत जास्त नागरिकांनी येवून त्याठिकाणचा डेमो पहावा ह्या उद्देशाने ती संस्था तिथे केलेली आहे. आपला जो मुद्दा आहे ३७१ केलेले आहे का परंतु ही तात्पुरती स्वरुपाची आहे त्यामुळे केलेले नाही आणि एकूण ११ हजार क्वेअर मीटर पैकी फक्त १०० क्वेअर मीटर म्हणजे ०.१ परसेंट आपण तिथे देत आहोत असे दोन विषय आहेत. आणि संस्थाचे जेसे आहे की, हे संस्था लावतांना आपण कुठलेही तुलनात्मक कुठलेही संस्थेचे अभ्यास न करता दिलेले आहे आणि अशा संस्था जर शहरात अनेक ठिकाणी आल्या तर आपण मा. महापौर मॅडमने सुचना दिल्या प्रमाणे शहरात वेगवेगळ्या ठिकाणी त्यांचा अभ्यास करून त्यांना ही संधी देण्यात येईल.

गीता जैन :-

ॲग्री आहे, साहेब मला काही विरोध नाही.

मा. महापौर :-

जेवणाची सुट्टी करण्यात येत आहे.

नगरसचिव :-

३:०० वाजले आहेत जेवणानंतर ३:४५ मिनीटाने सभेला सुरूवात करण्यात येईल.

**प्रकरण क्र. 89 :-**

ॲटोमॅटीक फायर बॉल (अग्निरोधके) यंत्रणा खरेदी करणेबाबत.

**ठराव क्र. 72 :-**

पालिका प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यात नमुद केल्याप्रमाणे ऑटोमॅटिक फायर बॉल या स्वयंचलित अग्निरोधकाची ठळक वैशिष्टये लक्षात घेता मिरा भाईंदर महानगरपालिका शाळा, शैक्षणिक इमारत व इतर कार्यालयात सदर अग्निरोधके बसविणे हितावह ठरेल.

सदर उपकरण हे स्वयंचलित असल्याने आगीवर वापरणे करीता तंत्र-कुशल मनुष्यबळाची आवश्यकता नसुन सर्व प्रकारच्या लहान आगींवर उपयुक्त असल्याने सदरचे अग्निरोधक खरेदी केल्यास सर्व प्रकारच्या आगींवर वापरता येईल. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने ऑटोमॅटीक फायर बॉल उपयुक्त आहे असे अग्निशमन विभागाचे मत आहे.

तरी त्यामुळे पालिकेच्या अग्निशमन विभागाकरीता 1 कि. ग्रॅ. क्षमतेचे 1417 नग **AUTOMATIC FIRE BALL** खरेदी करणेकामी **GeM PORTAL** वर निविदा मागविणेस व रु. 1,04,85,800/- इतक्या अंदाजित खर्चास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ९०, ॲटोमॅटीक फायर बॉल (अग्निरोधके) यंत्रणा खरेदी करणेबाबत.

जुबेर इनामदार :-

प्रशांतजी ९० नंबरचा ठरावावर गेलात की ८९ ठरावावर आहेत. ८९ नंबरचा ठरावाचा निकाल झालेला नाही.

नगरसचिव :-

८९ ठराव झाला.

जुबेर इनामदार :-

८९ नंबरच्या ठरावावर चर्चा चालू होती.

नगरसचिव :-

दोन्ही ठराव सेमच आहेत.

जुबेर इनामदार :-

तुम्ही ८९ चा ठराव घेत आहेत की ९० चा ठराव घेत आहेत.

मा. महापौर :-

८९ वर ठराव झालेला आहे, प्रशासनाने खुलासा पण केलेला आहे आता त्या विषयावर तुम्हाला काही बोलायचे आहे का?

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम त्या विषयावर खुलासा झाला नाही कारण तो ठराव झाला........

मा. महापौर :-

तुम्हाला परत प्रशासनाचे खुलासा पाहिजे का?

जुबेर इनामदार :-

खुलासा पाहिजे होता, मी आयुक्तांसोबत बोलत होतो, माझा निवेदन सुरू होता, मला आयुक्तांकडून उत्तराची अपेक्षा होती की आम्हाला आयुक्त उत्तर देतील.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, हा विषय ही सेम आहे त्यामुळे हा ठराव होऊ द्या आणि त्यानंतर मग चर्चा करा.

जुबेर इनामदार :-

दोन्ही विषय एकच असतील तर एकाच ठिकाणी कल्ब करा. दोन्ही विषय एकत्र करता ८९ करता ९० करता.

प्रशांत दळवी :-

पालिका प्रशासनाने दिलेल्या गोषवा–यात नमुद केल्याप्रमाणे ऑटोमॅटिक फायर बॉल या स्वयंचलित अग्निरोधकाची ठळक वैशिष्टये लक्षात घेता मिरा भाईंदर महानगरपालिका शाळा, शैक्षणिक इमारत व इतर कार्यालयात सदर अग्निरोधके बसविणे हितावह ठरेल.

सदर उपकरण हे स्वयंचलित असल्याने आगीवर वापरणे करीता तंत्र-कुशल मनुष्यबळाची आवश्यकता नसुन सर्व प्रकारच्या लहान आगींवर उपयुक्त असल्याने सदरचे अग्निरोधक खरेदी केल्यास सर्व प्रकारच्या आगींवर वापरता येईल. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने ऑटोमॅटीक फायर बॉल उपयुक्त आहे असे अग्निशमन विभागाचे मत आहे.

तरी त्यामुळे पालिकेच्या अग्निशमन विभागाकरीता 1.8 कि. ग्रॅ. क्षमतेचे 1289 नग **AUTOMATIC FIRE BALL** खरेदी करणेकामी **GeM PORTAL** वर निविदा मागविणेस व रु. 1,14,83,701/- इतक्या अंदाजित खर्चास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे

दिनेश जैन :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, ह्या विषयावर मला बोलायचे आहे, आयुक्त महोदय, हा विषय आपल्याकडे जो आलेला आहे, हा प्रायोगिक तत्त्वावर मिरा भाईंदरसाठी घेता आहेत कारण याच्या आधी मला तरी वाटत नाही की अशा प्रकारे कुठे यंत्रणा बसविलेली आहेत. हे जे आगीचे गोले आहेत म्हणजे ॲटोमेटीक फायर बॉल आगीचे गाले ॲटोमॅटीक फायर थांबविण्यासाठी असणार अंदाजी आपण सतावीसशे बॉल विकत घेणार अशा तुमच्या गोषवाऱ्यामध्ये असे नमूद स्पष्ट दिसून येते त्याच्यामध्ये दोन्ही गोषवाऱ्यामध्ये ३६ शाळा, रूग्णालय, कदाचीत महानगरपालिकेची मालमत्ता जिथे जिथे आहेत तिथे तिथे याचा आपण वापर करू. आयुक्त महोदाय, आपल्याकडे तरतूद उपलब्ध आहे ०२ कोटी २५ लाख रुपये आता तरतूद उपलब्ध आहे म्हणून पैशाची घसांडी करायची असे आहे तर अशा प्रकारे काही तरी प्रायोगिक तत्त्वावर केले पाहिजे अन्यथा फायरवर पाणी हा एकमेव उपाय असतो, आपण हेलीयमचा वापर करतो, गॅसचा वापर केला जातो त्यात मात्र तरी ही मोठ्या आगीवर एकच विषय चालतो तो आहे पाणी, फायर शेफ्टी, फायर टॅंक्स, फायर प्रिकॉशन्स हा आपला एक विकास नियमावलीचा भाग आहे, त्याच बरोबर आपण कोट्यवधी रुपये नवीन फायर टेंडर, फायर गाड्या ह्या विकत घेण्यासाठी आपण खर्च करतो. तुम्हाला खरोखर निधीचा वापर करायचा असेल, अग्निशमनसाठीच वापर करायचा असेल तर ज्या मालमत्ता जिथे फायर प्रिक्लर नाहीत तिथे फायर स्प्रींकलर लावा २५-३० वर्षे त्याला काहीच होणार नाही. हा ०५ वर्षे चालेल तर ०५ वर्षासाठी वाया घालवायचे म्हणजे पैशाची पालिकेच्या निधीची अनाकांडी याच्या पलीकडे महापौर मॅडम दुसरे काही याच्या मधून दिसत नाही. हा कदाचीत तुम्ही ठराव केला

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य जुबेर इनामदारजी जे म्हणता आहेत याच्यावर प्रशासनाचे काय मत आहे. आपण काही व्यर्थ करतोय आहे का? त्याचा खुलासा करून त्यांना सांगा.

मारूती गायकवाड :-

सन्मा. महापौर महोदया, सन्मा. आयुक्त महोदय, सन्मा. सभागृह ॲकच्युव्ही मी मगाशीच निवेदन केलं होतं त्यामध्ये याची उपयुक्तता, याचे स्पेशीफिकेशन हे कुठे कुठे लावणार आहेत काय करणार आहेत ह्याविषयी मी मगाशी बोललेलो आहे. हे छोटे इन्स्ट्रूमेंट आहे, हे सेंसर द्वारे चालणार

आहे आग लागली तर त्याठिकाणी आगीचे जरी सेंस झाला तरी ते ॲटोमॅटीक स्फोट होऊन ती आग विझणार आहे. आणि ही छोटी जागा ज्याठिकाणी गाडी जात नाही किंवा ज्याठिकाणी आपण फाईल्स ठेवलेल्या आहेत किंवा ज्याठिकाणी आपले रेकॉर्ड्स ठेवलेले आहेत अशा ठिकाणी ते ठेवायचे आहे. आणि ज्याठिकाणी स्प्रीकलर लावले आहेत त्याठिकाणी आपण ठेवणार नाहीत, ज्याठिकाणी स्प्रींकलरची व्यवस्था नाही ज्या ठिकाणी आपण करू शकत नाही अशा ठिकाणीच आपण सर्व्हे केलेला आहे की कुठल्या-कुठल्या ठिकाणी ठेवता येतील आणि तो सर्व्हे करूनच ही संख्या निश्चित केलेली आहे आणि त्याप्रमाणे आपण प्रशासनाने तसा गोषवारा सन्मा. सभागृहासमोर मांडलेला आहे.

जुबेर इनामदार :-

मा. अधिकारी गायकवाड साहेब, मला एक सांगा तुम्ही त्या विभागाचे प्रमुख आहात स्प्रींकलर बेटर की तुमचे आगीचे गोले जर स्प्रींकलर बसवले तर २५ वर्षे त्याला काहीच होत नाही आणि पाणी हे एकमेव उपाय अगीवर फक्त पाण्याचाच नियंत्रण असू शकतो मान्य करूया हे नैसर्गीक आहे तुम्ही ह्या सव्वा दोनशे कोटी रुपये खर्च करणार ०५ वर्षासाठी त्या ०५ वर्षामध्ये त्याचा उपयोग नाही झाला परमेश्वर करो कधीच उपयोग नाही झाला पाहिजे तर सव्वा दोन कोटी रुपयेची नसांडी झाली त्याच्या ऐवजी तुम्ही पाण्याचे स्प्रींकलर लावले तर त्याला २५ वर्षे काहीच होणार नाही. आणि त्याचा वापर सुध्दा परमिश्वर करो त्याचा गरज झाली नाही पाहिजे. तुमची छोटी जागा असो किंवा मोठी जागा असो स्प्रींकलर तुम्हाला लावावे लागतील, आग लागलेली असली छोटी जागेमधले फायली असतील तर त्याचा ही नाश होईल आणि मोठ्या इमारतीचा सुध्दा नाश होत असतो तर जीवीत हानी तेव्हा ही होऊ शकते आणि आज ही होऊ शकते तर त्याचा उपयोग काय?

मारूती गायकवाड :-

सन्मा. सदस्य आपल्याला सांगू इच्छितो की आपण आता जे गॅस सिलेंडर वापरतो म्हणजे गॅस, फायर इस्टीग्युशर म्हणून एक छोटा सिलेंडर वापरतो बऱ्याच इमारतीच्या कोपऱ्यामध्ये ठेवतो, बऱ्याच आपल्या किचरमध्ये असतात, किंवा हॉटेलच्या किचनमध्ये असतात, बऱ्याच आस्थापनामध्ये असतात तशा पध्दतीने हे काम करायचे आहे फक्त तो इन्स्ट्रूमेंट वापर करण्यासाठी आपल्याला ॲक्चूव्हली मनुष्यबळाची गरज असते ह्या ॲटोमॅटीक वापर होणार आहे सेंसर द्वारे स्फोट होणार आहे.

जुबेर इनामदार :-

स्प्रींकलर सुध्दा ॲटोमॅटीकच चालतो. ॲस्टीक कीचन हा घरगुती असतो ऑफिसमध्ये असलेल्या जागेमध्ये तुम्ही ठेवता. दॅट इज ओन्ली म्हजणे फक्त एमर्जन्सी सिच्युव्हेशन मध्ये.

मा. आयुक्त :-

सन्मा. सदस्य, आपण जो प्रश्न विचारला आहे तो समजला आहे आणि आमचे उप-आयुक्त गायकवाड साहेबांनी खुलासा केलेला आहे परंत काळाच्या ओघात जे नवीन नवीन तंत्रज्ञान येत असतात आणि त्या तंत्रज्ञानाचा वापर केला तर जीवीत हानी वित्त हानी होत नाही, होऊ नये म्हणून जे काळाच्या ओघात तंत्रज्ञान बदलतं म्हणून आपण हे तंत्रज्ञान वापरत असतो आणि आणखी उप-आयुक्तांनी उल्लेख केला ज्याठिकाणी गाडी जात नाही, ज्याठिकाणी अगदी गोळीतला रस्ता असतो, काही ठिकाणी शाळा असतात, काही ठिकाणी हॉस्पीटल असतात आणि ज्याठिकाणी अत्यावश्यकता आहे आपण स्प्रींकलरचा उपयोग करत आहात नक्की ते स्प्रींकलर पेक्षा वाजवी असून चांगला आहे आणि जीवीत हानी आणि वित्त हानी टाळण्यासाठी त्याचा जास्तीत जास्त उपयोग होतो याची प्रशासनाने खातर जमा करून कारवाई केलेली आहे. धन्यवाद.

जुबेर इनामदार :-

असे नवीन काही प्रयोग करता तेव्हा कमीत कमी पालिकेच्या सदस्यांना पदधिकाऱ्यांना तरी त्याची मला असे वाटते तरी त्याचा एक डेमो दिला पाहिजे होता.

मा. महापौर :-

ठीक आहे, तुम्हाला डेमो बघायला बोलवून घेईल. गटनेते तसेच सर्व पदधिकारी यांना प्रशासनाने संबंधित विभागाने डेमो दाखवावा आणि मग पुढची कारवाई करावी.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, तुम्ही दोन्ही विषय एकत्र करत करावा, महापौर मॅडम ह्या विषयाला विरोध आहे.

मा. महापौर :-

विरोध आहे तर ठराव करा.

जुबेर इनामदार :-

दोन्ही ठरावावर आमची विरोधाची नोंद करण्यात यावी.

मा. महापौर :-

विरोधकांच्या दोन्ही ठरावावर नोंद घेण्यात यावी. पुढील विषय घ्या.

**प्रकरण क्र. 90 :-**

ॲटोमॅटीक फायर बॉल (अग्निरोधके) यंत्रणा खरेदी करणेबाबत.

**ठराव क्र. 73 :-**

पालिका प्रशासनाने दिलेल्या गोषवा–यात नमुद केल्याप्रमाणे ऑटोमॅटिक फायर बॉल या स्वयंचलित अग्निरोधकाची ठळक वैशिष्टये लक्षात घेता मिरा भाईंदर महानगरपालिका शाळा, शैक्षणिक इमारत व इतर कार्यालयात सदर अग्निरोधके बसविणे हितावह ठरेल.

सदर उपकरण हे स्वयंचलित असल्याने आगीवर वापरणे करीता तंत्र-कुशल मनुष्यबळाची आवश्यकता नसुन सर्व प्रकारच्या लहान आगींवर उपयुक्त असल्याने सदरचे अग्निरोधक खरेदी केल्यास सर्व प्रकारच्या आगींवर वापरता येईल. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने ऑटोमॅटीक फायर बॉल उपयुक्त आहे असे अग्निशमन विभागाचे मत आहे.

तरी त्यामुळे पालिकेच्या अग्निशमन विभागाकरीता 1.8 कि. ग्रॅ. क्षमतेचे 1289 नग **AUTOMATIC FIRE BALL** खरेदी करणेकामी **GeM PORTAL** वर निविदा मागविणेस व रु. 1,14,83,701/- इतक्या अंदाजित खर्चास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्री. दिनेश जैन**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ९१, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इमारत बांधकाम प्रस्तावामध्ये आकारण्यात येणाऱ्या मालमत्ता कर अनामत शुल्काबाबत.

प्रशांत दळवी :-

प्रकरण ९१ आणि ९९ सेम आहेत आपण ९१ वरतीच ठराव करतोय. महापौर मॅडम, प्रकरण ९१ घेण्यापूर्वी ह्याठिकाणी आपल्याला ९३ आणि ९४ विषयाचे गोषवारे प्राप्त झालेले आहेत त्यामुळे ९१ आणि ९२ हा विषय नंतर घेऊन आपण ९३ आणि ९४ हे विषय पहिल्यांदा घ्यावे.

नगरसचिव :-

९१-९२ नंबरचा पण गोषवारा दिलेला आहे.

प्रशांत दळवी :-

त्याच्यावर टिप्पणी दिलेली आहे.

जुबेर इनामदार :-

मागे पुढे करायचे कारण काय आहे?

प्रशांत दळवी :-

ठीक आहे महापौर मॅडम, माझ्या माहिती प्रमाणे हा इमारत बांधकाम प्रस्तावमध्ये आकारण्यात येणाऱ्या मालमत्ता अनामत रक्कम शुल्काबाबत प्रशासनाने पुन्हा एकदा सविस्तर ह्या संदर्भात माहिती देण्यात यावी.

मा. महापौर :-

आयुक्त महोदय, तुम्ही तुमचा मत सांगा. सर्वांनी कृपया शांत रहा, कारण मग त्याच त्याच विषयावर चर्चा होते, ९१ आणि ९९ ह्या दोन्ही विषयाच्या संदर्भामध्ये आयुक्त महादय प्रशासनाचे मत सांगता आहेत, विषय एकच आहे.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इमारत बांधकाम प्रस्तावामध्ये आकारण्यात येणाऱ्या मालमत्ता कर अनामत बाबत. ह्या ठिकाणी असा विषय आणला आहे आणि त्यानुसार भोगवटा दाखला आपण तीन वर्षाने परत करतो त्याचे टप्पे आपले ए.डी.टी.पी. ठाकूर साहेब सांगतील आणि त्याच्यानंतर जो उर्वरीत पार्ट आहे तो मी तुम्हाला त्याचा खुलास करेल त्याच्यात एक महत्त्वाचा मुद्दा असा आलेला आहे की युनीफाय डिसीआर मध्ये अशी तरतूद नसतांना सुध्दा तर एकदा त्याची अंमलबजावणी करावी. त्याबाबत मी एवढंच नमूद करील बाकी तांत्रिक बाबी वर ए.डी.टी.पी. बोलतील परंतु ह्यासाठी पाठीमागे माहिती घेतल्यानंतर ठाणे, नवी मुंबई, कल्याण इतर महापालिका ह्यासाठी अनामत रक्कम घेत असतात, ज्यांचा काम व्यवस्थित पूर्ण होतं त्यांनी ती अनामत रक्कम तीन वर्षात परत दिली जाते परंतु जे नियमाचा भंग करतात, समजा टेरीस वाढवलं त्याचा एरिया वाढवला तर अशा वेळी त्याची रक्कम ही जप्त केली जाते. फोरपीट केली जाते, सीज केली जाते आणि त्याचा डिपोझीट आपल्याकडे जमा आहे ह्या भितीने त्याच्याकडून काम निट केलं जातं त्यामुळे नियमाचा उल्लंघन केले जात नाही आणि चुकून त्यांनी नियमाचे उल्लंघन कलं, तर महापालिका त्याची रक्कम जप्त करते आणि जे उल्लंघन केले आहे ते परत बांधकाम तोडून नियमीत करण्यासाठी सांगत असते. आणि इतर सर्व महापालिका ह्याबाबत असा मालमत्तेचा जो विषय आहे, अनामत तर ह्या सगळ्याच महापालिका घेत असतात तरी सुध्दा सन्मा सदस्य आणि महासभेची भावना असेल तर पुन्हा एकदा महापौर मॅडमच्या अध्यक्षतेखाली बैठक लावावी आणि आपले जे बैठकीत म्हणणे असेल ते आम्ही पुन्हा एकदा शासनाकडे रेफर करू आणि शासनाचे आदेश आणि मार्गदर्शन घेवून पुढील कारवाई करू. थॅन्क्यू.

मा. महापौर :-

दळवी साहेब, मा. आयुक्तांनी पदाधिकाऱ्याची बैठक घेवून हा निर्णय घ्यावा असे त्यांच्या निवेदनात म्हटलेले आहे तर आपल्या ठरावामध्ये तसे बघा काय नमूद केले.

धृवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम, इमारत बांधकाम प्रस्तावामध्ये आकारण्यात येणाऱ्या मालमत्ता कर अनामत रक्कम, महापौर मॅडम, ज्यावेळी आपली महानगरपालिका झाली त्याच्या अगोदर नगरपालिका होती, ह्या नगरपरिषदेच्या काळामध्ये इथे भरपूर इमारती इल्लिगल बनत होत्या, ते प्लान पास करायचे, प्लास पास नुसार इमारत बांधायचे नाही त्याचे उल्लंघन करायचे आणि त्याच्यावरती कन्ट्रोल यावा म्हणून तत्कालीन आयुक्त शिवमूर्ती नाईक साहेब त्या तरतुदीच्या अनुषंगाने सिक्युरिटी डिपॉझीट घेण्याचं सुरू केलं आणि सिक्युरिटी डिपॉझीट घेण्याची पण एक रक्कम होती त्याच्यात वीस रुपये

मॅक्झीमम लिमीट होती परंतु तत्कालीन कमिशनर त्यांनी २१० रुपये पती चौ.मी. ह्याप्रमाणे शुल्क आकारणे आपला आदेश पारीत केला आणि ते शुल्क घेतल्यानंतर ज्या इमारतीने ओ.सी. घेतलेली आहे त्यांना ते शुल्क परत देण्याचं नमूद आहे परंतु बहुतेक इमारतीच्या विकासकांनी शुल्क परत घेतले नाही कारण शुल्क परत घेण्याची जी प्रक्रिया आहे, जी काय आहे ती तुम्हाला ही माहिती आहे, सगळ्यांना माहिती आहे, एकदा शासनाकडे पैसे गेले मग ते पुन्हा परत येवू शकत नाही आणि म्हणून ते पैसे महापालिकेला मिळत त्याच्यानंतर नवीन युनीफाय डी.सी. रुल आला आणि युनीफाय डी.सी. रुलमध्ये अशा कोणत्याही प्रकारची नाही. जेणेकरून विकासकाकडून आपण डिपॉझीट घेवू शकतो, महापालिकेची हे काय इनकम होत नाही, महानगरपालिकेकडे त्यांचे पैसे जमा असतात आणि महानगरालिकेला हे पैसे परत करणे अनिवार्य आहे, त्याच्यामुळे हे महानगरपालिकेची इनकमचे स्त्रोतमध्ये काहीही याचा उपयोग होत नाही. त्याच्यानंतर मॅडम तुम्हाला माहिती असेल की शासनाने एक जी.आर. काढला ज्या इमारतीच्या विकासकांनी जर इमारती इल्लिगल बांधल्या, नियमाच्या व्यतिरिक्त बांधल्या तर त्याच्यावरती कारवाई आपण करू शकतो. एम.आर.टी.पी ॲक्ट प्रमाणे किंवा त्याच्यावरती आपण खातीनामा लिहून आपण तोडू शकतो किंवा त्याच्यानंतर आपण शास्ती लावून त्या संपूर्ण मालमत्तेवरती आपण थ्री टाईमस टॅक्स वसूल करू शकतो अशी पण तरतूद त्याच्यामध्ये आहे. म्हणजे विकासक जर चुकीचं काम करत असेल तर त्याच्यावरती आपली महानगरपालिकेचा अंकुश आहे. म्हणजेच आपण जी अनामत शुल्क घेतो तर हे अनामत शुल्काचं आणि त्या याचा तसा काहीही संबंध नाही. प्रशासनाला जर त्याच्यावरती अंकुश ठेवायचा असेल तर आपल्याकडे विविध प्रकार आहेत त्याच्यामुळे अनामत शुल्क घेवून त्याच्यावरती आपण अंकुश ठेवू शकतो असे काहीही नाही. आणि दुसरी गोष्ट जो नवीन युनीफाय डी.सी.रुल आलेला आहे त्या युनीफाय डी.सी. रुलमध्ये अशी कोणत्याही प्रकारची अनामत शुल्क घेण्याची अशी काही ही तरतूद नाही. म्हणून माझी आपणांस विनंती आहे की आता महानगरपालिकेने अनामत शुल्क घेणे बंद करावं आणि ज्या लोकांकडून घेतलेले आहे त्यांनी जर ओ.सी. घेतलेली आहे त्यांना परत करावं जर आपल्याकडे पैसे नसतील तर त्यांच्या ज्या शुल्कामध्ये त्यांचा समायोजन करावं अशी माझी विनंती आहे आणि म्हणून मी ठराव ठेवतो आहे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, आता जे आमचे सन्मा. सहकारी धृवजी पाटील यांनी जी भूमिका मांडली की अनामत रक्कम न घेता, शास्ती लावणे आणि वेगवेगळे प्रकार शास्ती लागते ही कोणला एकदा बिल्डींग बाधून झाली की, बिल्डर बाजूला होतात परत शास्ती तुम्ही लावणार ती लोकांच्या प्रत्येक जो फ्लॅट धारक असतो शेवटी त्यांना ती शास्तीची अमाऊंट भरावी लागते, मग तुम्ही लोकांना त्रास देणार आहात की बिल्डरच्या पाठीशी ऊभे राहणार आहात? अनामत रक्कम जर राहिली तर बिल्डर त्या निमित्ताने का असे ना ते वसूल कसे ही करतील. त्या संदर्भात बोलता की विषय घेतलेला आहे अनामत रक्कमची वाढीव केलेली आहे. त्या वाढीवप्रमाणेच त्याच्याकडून घेण्यात यावी. जेणेकरून ती भिती त्यांना राहणार आहे. बरेच असे बिल्डर आहेत आणि आपल्या मिरा भाईदरमध्ये तो जास्तच प्रकार आहे. बिल्डींग बांधून सरळ निघून जातात कायद्याप्रमाणे कोणतेच इम्पलीमेटेंशन होत नाही. मग आपण बोंबलत बसतो. त्यानंतर सर्व गोष्टी मनपावर येतात आणि त्याचा भुर्दंड लोकांवरच पडतो असे का ? बिल्डरच्या पाठीशी उभे रहाण्यापेक्षा जनतेच्या पाठीशी उभे रहा. त्यामूळे तसा ठराव करावा अशी मी अपेक्षा करते.

धृवकिशोर पाटील:-

१०० फूटांच्या घरांना पूर्ण कर माफी करायचा ठराव आम्ही केला.

निलम ढवण:-

तुम्ही काय केले ते सांगू नका. अंमलबजावणी काय झाली ते सांगा.

मा. महापौर:-

हा विषय मी पेंडीग ठेवते ह्या विषयावर आपण बैठक बोलवून त्यावर प्रशासनाचे काय मत आहे त्याची संपूर्ण माहिती घेवून रितसर हा विषय विषय पटलावर घेवू या. गटनेता आणि पदाधिका-याची बैठक लावू.

जुबेर इनामदार:-

प्रशासनाच्या गोषवा-याच्या बाजूने बोलतो अनामत रक्कम २१० आहे ती २५० रू. करा.

मा. महापौर:-

तुम्ही माझ्या मताशी सहमत असाल तर हा विषय आपण नंतर घेवू या.

नगरसचिव:-

प्रकरण क्र. ९२, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने, दुभाजके इत्यादी ठिकाणची निगा व देखभाल करणेच्या कामाची माहिती सादर करणेकरीता मा. महापौर यांनी दि. 27/12/2021 रोजीचे पत्र संदर्भात वस्तुस्थिती अहवाल.

प्रशांत दळवी:५

मा. महापौर मॅडम ह्या संदर्भामध्ये सन्मा. सदस्य अनिल सावंत ह्यांनी "ज" चा प्रस्ताव मांडलेला आहे तो विषय ह्यामध्ये क्लब करावा आणि अनिल सावंत ह्यांना ह्या विषयावर बोलण्याची संधी द्यावी.

मा. महापौर:-

ह्या विषयावर अजित पाटील साहेबांनी प्रश्न विचारलेला आहे तर सन्मा.अजित पाटील साहेब आणि सन्मा. अनिल सावंत ह्यांना संधी देते.

अनिल सावंत:-

"ज" चा प्रस्ताव दिलेला आहे. प्रशासनाने १८.११.२०२१ मध्ये एच ओ डी मिटींग घेतली होती त्या मिटींगमध्ये जो नविन युनिफाय डी सी रूल आला आहे त्याचा हवाला देवून शहरातील २५ आर जी टाकत आहेत प्रामुख्याने शांती नगर आणि शांती पार्कमध्ये आहेत इतर ठिकाणी आहेत पण १-२ आहेत त्याच्यावर मनपानी करोडो रू. खर्च केला होता प्राथमिक सोयी सुविधा मनपा बघत होती त्या मिटींगनंतर त्या सोयी सुविधा ताबडतोब बंद करण्यात आल्या.

मा. उपमहापैार:-

माझ्या हिशोबाने प्रशासनाने गोषवारा पाठवलेला आहे.

अनिल सावंत:-

तो विषय वेगळा आहे.

मा. उपमहापौर:-

जर ठराव मांडला तर दोन्ही विषय वेगवेगळे आहेत. ठरावामध्ये फरेबदल होणार तुमच्याकडून किंवा अजून कोणी ठराव मांडला त्याच्याकडून ते वेगवेगळे प्रकरण होणार आहे. ह्यावेळी ह्याला आणि त्याला वेगळे घेवून ह्याच्यावर चर्चा करू शकता.

अनिल सावंत:-

माझा तर "ज" चा प्रस्ताव आहे.

नगरसचिव:-

तुम्ही "ज" च्या प्रस्तावावरच बोला कारण तो विषय वेगळा आहे हा विषय वेगळा आहे. आपण प्रकरण क्र.९२ वर चर्चा करू या.

मा. उपमहापौर:-

महापौर मॅडम हा विषय गंभीर आहे तर मी सर्वांना विनंती करेन की थोडक्यात मांडून घ्या.

अजित पाटील:-

मी ह्या संदर्भामध्ये एक टिप्पनी दिली होती त्याअनुशंगाने बोलत आहे मनपाचे कामकाज आर्थिक व्यव्हार मुंबई प्रांतिक महानगरपालिका १०४९ व म्युन्सिपल अकाउंट कोड १७१ त्या तरतूदी मनपाला लागून आहेत. मनपाला कोणतेही काम करताना विकास कामे करतांना त्या कामासाठी खालीलप्रमाणे पूरक मंजूरी देण आवश्यक आहे महाराष्ट्र अकांउट कोड नियम १७१ नुसार नियम १०७ नुसार कामाचे महासभेची आर्थिक मंजूरी लागून प्रशासकीय आर्थिक मंजूरी आवश्यक आहे नियम १६१ नुसार स्थापत्य अभियंता, शहर अभियंता...

मा. महापौर:-

पाटील साहेब तुम्ही काय बोलता ते कळत नाही.

अजित पाटील:-

निविदा मंजूरी आणि देयक मंजूरी हयामध्ये मोठया प्रमाणात अनियमीतता म्युन्सिपल कोड १५८ चे उल्लघन झालेले आहे

मा. महापौर:-

तुम्ही काय बोलले ते आम्हाला समजले आहे.

प्रशांत दळवी:-

मा. महापौर मॅडम अनिल सावंतचा जो विषय आहे त्या विषयाशी निगडीत दिप्ती भट ह्यांना बोलायचे आहे.

मा. उपमहापौर:-

सभागृहनेताजी दोनो विषय अलगअलग है जो गोषवारा दिया है उसको लेके बात करते है

धृवकिशोर पाटील:-

म.न.पा. चे कामकाज व आर्थिक व्यवहार मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम 1949 व महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 (MAC 1971) नियमानुसार होत आहे. त्यांतील सर्व तरतुदी महापालिकेला लागू आहेत.

महापालिकेला कोणतेही काम/विकास कामे करावयाची असल्यास त्या कामासाठी खालीलप्रमाणे पूर्व मान्यता मंजूरी घेणे आवश्यक आहे.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 (MAC 1971) नियम 160 नुसार सदर कामाच्या काढावयाच्या निविदा रक्कम एस्टीमेट रकमेला महासभेची प्रशासकीय व आर्थिक मंजुरी घेणे.
2. MAC 1971 नियम 161 नुसार स्थापत्य अभियंता/शहर अभियंता ह्याची एस्टीमेटला तांत्रिक मंजुरी आवश्यक आहे.
3. सदर कामाचा अर्थसंकल्पामध्ये समावेश असणे व त्यासाठी अदांजपत्रकीय तरतूद असणे आवश्यक आहे.
4. एस्टीमेट तयार करणे, निविदा मंजुरी व कामाची देयक अदा करणे कामी MAC 1971 मधील नियमानुसार कार्यपध्दती अवलंबणे आवश्यक आहे. प्रशासनाने सदर कामाच्या निविदा मे. निसर्ग लँडस्केप सर्व्हिसेस, पुणे ह्याच्या नावाने मंजूर करुन तसा कार्यादेश दि. 12.04.2021 रोजी दिला आहे. परंतु सदर निविदा मंजूरी व कामाची देयके अदा करणे ह्यामध्ये अनयिमितता व नियमांचे खालीलप्रमाणे उल्लंघन झाले आहे.
    1. MAC 1971 नियम 158 नुसार सदर कामाचे एस्टीमेट सक्षम अभियंत्याने केले नाही.
    2. MAC 1971 नियम 160 नुसार कामाच्या एस्टीमेट रु. 26,58,96,403/- ह्या रकमेस आवश्यक ती महापालिकेच्या महासभेची प्रशासकीय आर्थिक मंजुरी प्राप्त नाही.

3. MAC 1971 नियम 161 नुसार एस्टीमेटला स्थापत्य अभियंता/शहर अभियंता ह्यांची तांत्रिक मंजुरी प्राप्त नाही.
4. MAC 1971 नियम 166 नुसार एस्टीमेट तयार केले नाही.
1. पार्क/गार्डन विभाग सार्व. बांधकाम विभाग, मुंबई ह्यांची 2015-16 ची दरसूचीनुसार एस्टीमेट तयार केल्याची नोंद आहे.
2. दरसूचीप्रमाणे एस्टीमेट केले नाही.
3. जादा दराने एस्टीमेट केले आहे.
4. दरसूचीमध्ये प्रती महाचे एस्टीमेट करण्याची तरतूद नाही.
5. दरसूचीमध्ये ॲटमचे दर असल्यास Rate Analysis करता येत नाही.
6. एस्टीमेट Rate Analysis नुसार केले आहे असे नमुद आहे. एस्टीमेट सोबत Rate Analysis चा तपशिल नाही. Rate Analysis ला सक्षम अभियंत्याची मंजुरी नाही.
7. दरसूचीपेक्षा जादा दराने एस्टीमेट करता येत नाही (तशी नियम 166 मध्ये तरतूद)
8. एस्टीमेटमधील दर दरसूचीपेक्षा ¾ पट आहेत. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे.
5. MAC 1971 नियम 180 नुसार कोणत्याही झालेल्या कामाची एस्टीमेटमधील ॲटमनिहाय मोजमापाची नोंद मोजणी पुस्तक नमुना नं. 136 मध्ये ठेवण्याची तरतुद आहे. पुस्तकांतील कामाच्या नोंदी वरिष्ठ अभियंता मुख्य लेखापरिक्षक ह्यांनी तपासणी करुनच देयके मंजुरीस शिफारस करण्याची तरतुद आहे. परंतु प्रत्यक्ष झालेल्या कामाची नोंदी मोजणी पुस्तकामध्ये घेतल्या नाहीत त्या नोंदी न तपासता देयक अदा केली आहेत. मोजणी पुस्तके(नमुना नं. 136) प्रत्यक्षात ठेवले नाही. कामाच्या नोंदी नियमानुसार न ठेवल्याने प्रत्यक्ष काम झाले किंवा नाही ह्याचा संभ्रम आहे.

6. महापालिका अंदाजपत्रक 2021-22 मध्ये निविदा कामाचा (शहरातील उद्याने, मैदाने, स्मशाने, दुभाजके निगा व देखभाल काम) समावेश नाही व तशी स्पष्ट तरतूद देखील नाही. ज्या कामाचा अर्थसंकल्पामध्ये समावेश नाही व त्यासाठी तरतूद नसेल अशा कामावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 86 नुसार खर्च करणेस प्रतिबंध आहे असे असता उद्यान विभागाने Manuplate करुन चलाखीने अर्थसंकल्प लेखाशिर्ष “मजूर पुरवठा लेखा संकेतांक 2120” मधून देयके अदा केली आहेत. ती पूर्णतया नियमबाह्य आहेत. मजूर पुरवठा लेखा संकेतांक 2120 आहे ह्यामध्ये फक्त “मजूरी-मजुर पुरवठा” बील देणे ह्यांचा समावेश होत आहे. मजुर पुरवठा करणे ह्या कामाचा कार्यादेश नसताना ह्या शिर्षाखाली बीले अदा करणे बेकायदा आहे. वर नमुद केल्याप्रमाणे मोठ्या प्रमाणावर अनियमितता व नियमांचे उल्लंघन झालेले आहे. ज्या एस्टीमेटला नियमानुसार आवश्यक ती तांत्रिक मंजुरी प्राप्त नाही त्यामुळे ते एस्टीमेट अवैध ठरत आहे. एस्टीमेट अवैध असल्याने त्यानुसार अदा केलेली रक्कम नियमबाह्य ठरत आहे. जादा दराने एस्टीमेट (नियमबाह्यरित्या) केल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

मैदाने, आरक्षणे, बगीचा यांचे क्षेत्रफळ सक्षम अधिकारी, पालिकेचे सर्व्हेअर यांचकडून प्रमाणित करुन घेतले नाही. त्यामुळे क्षेत्रफळात विसंगती निर्माण झालेली आहे. कमी क्षेत्रफळ असलेल्या जागेचे जास्त क्षेत्रफळ कार्यादेशात नमुद असल्यामुळे ठेकेदारास लाखो रुपयांची जास्त देयके अदा केलेली आहेत.

प्रशासनाने निविदा संबधीचा अहवाल सादर कामाला MAC 1971 नियम 160 नियम 161 नियम 166 व म.न.पा. अधिनियम 1949 चे कलम 73 ब नुसार आवश्यक मंजुऱ्या नाहीत व

नियमांचे उल्लंघन झालेले आहे. ह्या तांत्रिक व कायदेशीर बाबी शासनाच्या निदर्शनास आणणे आवश्यक होते परंतु तसे शासनाच्या निदर्शनास आणले नाही.

तसेच म.न.पा. अधिनियम 1949 चे कलम 73 (क) नुसार निविदेस मा. स्थायी समितीची मंजुरी घेतली नाही.

निविदा कामाच्या एस्टीमेटला आवश्यक ती तांत्रिक मंजुरी नाही. एस्टीमेट सक्षम अभियंत्याने केले नाही त्यामुळे सदर एस्टीमेटची तांत्रिक मंजुरी देण्यास सक्षम असलेल्या स्थापत्य अभियंता/शहर अभियंता ह्यांचेकडून फेरतपासणी करावी.

वृक्ष प्राधिकरण व अन्य विभागाने कोणतीही कामे करताना कामाच्या एस्टीमेटला शहर अभियंता/कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग ह्यांचेकडून आवश्यक ती तांत्रिक मंजुरी घेवूनच पुढील कार्यवाही करणेचे निर्देश मा. आयुक्त सो. ह्यांनी दि. 30.08.2021 रोजी काढलेल्या आदेशामध्ये देण्यात आले आहेत.

अंदाजपत्रकामध्ये “मजुर पुरवठा लेखा संकेतांक 2120” ह्या शिर्षाची तरतूद फक्त “मजुराचा पुरवठा करणेकामी नेमलेल्या ठेकेदराचे बील अदा करण्यासाठीच आहे. त्यामुळे ह्या लेखाशिर्षातून अन्य कोणतीही देयक अदा करु नयेत.

सदर कामाच्या निविदा मंजूरी देयक अदा करणे ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता / नियमांचे उल्लंघन झाले आहे. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले.

ह्याप्रकरणी एस्टीमेट तयार करणारे महापालिकेचे अधिकारी यांनी त्याच्या कर्तव्यामध्ये कलम 106 मध्ये नमुद केल्याप्रमाणे हयगय केली आहे तसेच जे अधिकारी जबाबदार आहेत. त्यांची चौकशी करुन कारवाई करण्यात यावी.

सदर कामाचे एस्टीमेट Analysis करुन केल्याचे म्हटले आहे परंतु एस्टीमेटला तांत्रिक मंजुरी नाही त्यामुळे एस्टीमेटमध्ये नमुद केलेले दर अवैध/नियमबाह्य आहेत. (MAC 1971 नियम 166 नुसार) त्यामुळे त्या दरानुसार देयके अदा करणे नियमबाह्य ठरणार आहेत. त्याप्रमाणे देयके अदा करु नयेत.

एस्टीमेटप्रमाणे ऑटमवार झालेल्या कामाची नोंद मोजणीपुस्तकामध्ये (नमुना नं. 136) घेण्याची तरतुद आहे. मोजणी पुस्तकांतील नोंदी शहर अभियंता/वा कार्यकारी अभियंता (सा.बांधकाम विभाग) ह्यांचे कडून तपासणी करुनच देयके (एस्टीमेटला तांत्रिक मंजूरी प्राप्त झाल्यानंतरच) तयार करावीत.

दिनेश जैन:-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर:-

ह्या ठरावाशी तुम्ही सहमत आहेत.

जुबेर इनामदार:-

तो ठराव सचिवांनी पून्हा वाचून दाखववा.

धृवकिशोर पाटील:-

महापौर मॅडमनी ठराव मांडायला सागितला तर मी ठराव मांडला.

मा. महापौर:-

मी सन्मा. धृवकिशोर पाटील ह्यांना ठराव मांडायला सागितला त्यांनी ठराव मांडला तुम्हाला ठराव मांडायचा आहे की तुम्ही ह्या ठरावाशी सहमत आहात.

जुबेर इनामदार:-

ठरावावर चर्चा नको का फक्त ठरावच पाहिजे.

मा. महापौर:-

५.०० वाजायला आले तरी चर्चाच करता. नळ कनेक्शनचा महत्वाचा विषय आहे. त्यावर तुम्हाला चर्चा नाही करायची का ?

जुबेर इनामदर:-

आयुक्तांनी गोषवारा दिलेला आहे आयुक्तांच्या म्हणण्याप्रमाणे सदर बाबीची वस्तूस्थिती दर्शवत आहोत सदर अहवाल महासभेसमोर सादर करण्यात येता आहे या सर्व बाबी विचारात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३ (क) तसेच कलम ४५१ मधील तरतुदी विचारात घेवून शासन निर्णय व मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार महानगरपालिकेने निविदा संविदा प्रक्रिया पूर्ण करून कामाचे कार्यादेश दिलेले आहेत व ते नियमानुसार योग्य आहे. असे गोषवा-यामध्ये नमुद आहे म्हणून आम्ही ठरावाचा विरोध करतो.

मा. महापौर:-

ठरावाचा विरोध नोंदवून घ्या. प्रशासनानी आपले मत मांडावे.

संदिप शिंदे :-

मा.महापौर मॅडम,मा. उपमहापौर ह्या संदर्भामध्ये मा. महापौरानी विषय पटलावर विषय घेतला आहे. गोषवा-याद्वारे सन्मा. सभागृहाला वस्तूस्थिती अहवाल सादर करण्यात आलेला आहे. पाटील साहेबांनी जो ठराव मांडला आहे त्या ठराव मांडला आहे त्याला प्रशासनाचा विरोध आहे. कायदयानुसार तो ठराव विसंगत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाची पूर्णपणे अंमलबजावणी करून त्यानूसार कार्यवाही सूरू आहे. ह्याबाबत जी वस्तूस्थिती आहे ती गोषवा-याच्या माध्यमातून आपल्यापूढे सादर केलेली आहे. त्यामूळे आम्ही जो गोषवारा सादर केलेला आहे ती वस्तूस्थिती आहे. त्यामूळे प्रशासनाचे स्पष्ट मत आहे की महापालिका अधिनियम आणि अकाउंट कोड जो आहे वारंवार १९७० चा उल्लेख केला जात आहे सदर अकाऊट कोड १९७१ चा नगरपालिकेला लागू होता २०१३ ला नविन अकाउंट कोड आलेला आहे. तो अकाउंट कोड महानगरपालिकेला लागू आहे. इस्टीमेटचा जो मुद्दा होता २०१५-१६ चे जे ऑर्टीकल्चरचे डी एस आर आहे त्याचा वापर करून उदयान अधिक्षक हे तांत्रिक पद  आहे त्यामुळे उदयान अधिक्षक आणि तत्कालीन उपायुक्त ह्यांनी इस्टीमेट बनवून प्रॉपर मंजूरी दिलेली आहे. ते कायद्याने बरोबर आहे. त्यानुसारच प्रक्रिया केली आहे. निकषजे आहेत त्यासंबधात महासभेने ठराव करून दिले होते त्या ठरावाच्या अनुशंगाने निविदा प्रक्रिया केली होती. निविदा प्रक्रिया झाल्यानंतर आला होता तो मा. स्थायी समिती समोर सादर केला होता. परंतू स्थायी समितीने त्याला नाकारले त्यानंतर तो शासनाकडे विखंडनाला गेला होता शासनाने आदेश आपल्याकडे सादर केलेला आहे. २.३.२०२१ चा शासन आदेश होता त्या आदेशानूसार ४५१ खाली मा. स्थायी समितीने जो ठराव केला होता तो विखंडीत करण्यात आला. त्यानंतर शासन आदेश दिले की निविदा प्रक्रिया जी प्रशासनानी केली आहे ती योग्य आहे. त्याप्रमाणे ऑर्डर देवून कामाला सूरूवात करावी. असे स्पष्ट आदेश प्राप्त झाले दर्म्यानच्या काळामध्ये  उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली होती ती याचिका सन्मा. उच्च न्यायालयाने निकाली काढली  गोषवारा विचारात घेवून प्रशासनानी एडवण` ठेकेदाराला वर्क ऑर्डर दिलेली आहे. त्याचे नियमानूसार काम चालू आहे ते काम झालेले आहे त्याचेच बिल अदा केले जातात ह्या संदर्भमध्ये मुद्दा निघाला होता की आपली जी मैदान किंवा गार्डन आहेत त्याचे क्षेत्र कमी जास्त पकडलेले आहे तर आम्ही इस्टेट डिपार्टमेंदचे कार्यकारी अभियंता आहेत त्यांना तत्कालीन अतिरिक्त आयुक्तांनी गार्डन आणि मैदानाच्या मेझरमेंट संदर्भात लेखी पत्र दिले आहे त्याच्याकडून मेझरमेंट घेवूनच काम केले जाते तथापि आपले जे ठेकेदाराचे अॅग्रीमेंट झाले होते त्यामध्ये अशी तरतूद होती जर मेझरमेंटमध्ये काही चूकी असेल ता ठेकेदार आणि मनपा एकत्रित बसून पून्हा मेझरमेंट घेतले जाईल त्याप्रमाणे प्रत्यक्ष ग्राऊड किंवा  गार्डन असेल त्याप्रमोणेच बिल अदा केले जाईल अशाप्रकारची  अॅग्रीमेंटमध्ये तरतूद होती. सचिन तेंडूलकर मैदानासंबधी सन्मा.

अजित पाटील ह्यांनी जो काही मुद्दा मांडला होता त्याच्या अगोदरच प्रशासनानी कारवाई केली होती एप्रिलमध्ये आपण वर्कऑर्डर दिली मे पासून काम चालू झाले सचिन तेंडूलकर मैदानाचे मे जून महिन्याचे बिल एक्स्ट्रा गेले होते परंतू ही बाब प्रशासनाच्या लक्षात आल्यानंतर प्रशासनानी पून्हा फेरतपासणी केली आणि जे जादा बिल होते ते पूढच्या बिलामध्ये मायनस केले त्यामूळे कूठलीही अनियमीतता घडलेली नाही. किंवा एक्स्ट्रा पैसे आपण ठेकेदाराला दिलेले नाहीत तो जे काही कामकाज करतो आपण इस्टीमेट प्रमाणेच काम करतो. त्याचे बिल एम व्ही लो रेकोर्डिंग केले जाते त्यानंतर ऑडीट अकाऊट होवून प्रत्यक्ष मा. आयुक्तांची मान्यता झाल्यानंतर त्याचे बिल अदा केले जाते त्यामूळे माझी सन्मा. सभागृहाला विनंती आहे की प्रशासनानी गोषवा-यामार्फत जी वस्तूस्थिती सादर केली आहे. तीच योग्य आहे आणि त्याप्रमाणे गार्डनचे काम चालू आहे ह्या सर्व गार्डनची पाहणी करण्यासाठी सर्व सन्मा पदाधिकारी तसेच मा. आयुक्तांनी दौरा केला होता माझी सन्मा. सभागृहाला विनंती आहे की जर काही ठिकाणी ठेकेदार काम करत नसेल किंवा काही चूका असतील तर प्रशासनाला वेळीच निर्दशनास आणून दया आम्ही सुध्दा त्याच्यामध्ये फिरत असतो त्याच्याकडून आपले जे इस्टीमेट प्रमाणे काम ठरलेले आहे ते काम करून घेण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे काही त्रूटी असतील तर त्याची आम्ही नक्कीच पूर्तता करू.

मा. महापौर:-

ठीक आहे. विरोध नोंदवून घेतला आहे. पूढचा विषय घ्या.

जुबेर इनामदार:-

आमचा विरोध धृवकिशोर पाटील ह्यांनी केलेल्या ठरावावर आहे

मा. महापौर:-

धृवकिशोर पाटील ह्यांच्या ठरावावर तूमचा विरोध नोंदवून घेतलेला आहे.

**प्रकरण क्र. 92 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने, दुभाजके इत्यादी ठिकाणची निगा व देखभाल करणेच्या कामाची माहिती सादर करणेकरीता मा. महापौर यांनी दि. 27/12/2021 रोजीचे पत्र संदर्भात वस्तुस्थिती अहवाल.

**ठराव क्र. 74 :-**

म.न.पा. चे कामकाज व आर्थिक व्यवहार मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम 1949 व महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 (MAC 1971) नियमानुसार होत आहे. त्यांतील सर्व तरतुदी महापालिकेला लागू आहेत.

महापालिकेला कोणतेही काम/विकास कामे करावयाची असल्यास त्या कामासाठी खालीलप्रमाणे पूर्व मान्यता मंजूरी घेणे आवश्यक आहे.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 (MAC 1971) नियम 160 नुसार सदर कामाच्या काढावयाच्या निविदा रक्कम एस्टीमेट रकमेला महासभेची प्रशासकीय व आर्थिक मंजुरी घेणे.
2. MAC 1971 नियम 161 नुसार स्थापत्य अभियंता/शहर अभियंता ह्याची एस्टीमेटला तांत्रिक मंजुरी आवश्यक आहे.
3. सदर कामाचा अर्थसंकल्पामध्ये समावेश असणे व त्यासाठी अदांजपत्रकीय तरतूद असणे आवश्यक आहे.
4. एस्टीमेट तयार करणे, निविदा मंजुरी व कामाची देयक अदा करणे कामी MAC 1971 मधील नियमानुसार कार्यपध्दती अवलंबणे आवश्यक आहे. प्रशासनाने सदर कामाच्या निविदा मे. निसर्ग लँडस्केप सर्व्हिसेस, पुणे ह्याच्या नावाने मंजूर करुन तसा कार्यादेश

दि. 12.04.2021 रोजी दिला आहे. परंतु सदर निविदा मंजूरी व कामाची देयके अदा करणे ह्यामध्ये अनयिमितता व नियमांचे खालीलप्रमाणे उल्लंघन झाले आहे.

1. MAC 1971 नियम 158 नुसार सदर कामाचे एस्टीमेट सक्षम अभियंत्याने केले नाही.
2. MAC 1971 नियम 160 नुसार कामाच्या एस्टीमेट रु. 26,58,96,403/- ह्या रकमेस आवश्यक ती महापालिकेच्या महासभेची प्रशासकीय आर्थिक मंजुरी प्राप्त नाही.
3. MAC 1971 नियम 161 नुसार एस्टीमेटला स्थापत्य अभियंता/शहर अभियंता ह्यांची तांत्रिक मंजुरी प्राप्त नाही.
4. MAC 1971 नियम 166 नुसार एस्टीमेट तयार केले नाही.
   1. पार्क/गार्डन विभाग सार्व. बांधकाम विभाग, मुंबई ह्यांची 2015-16 ची दरसूचीनुसार एस्टीमेट तयार केल्याची नोंद आहे.
   2. दरसूचीप्रमाणे एस्टीमेट केले नाही.
   3. जादा दराने एस्टीमेट केले आहे.
   4. दरसूचीमध्ये प्रती महाचे एस्टीमेट करण्याची तरतूद नाही.
   5. दरसूचीमध्ये ॲटमचे दर असल्यास Rate Analysis करता येत नाही.
   6. एस्टीमेट Rate Analysis नुसार केले आहे असे नमुद आहे. एस्टीमेट सोबत Rate Analysis चा तपशिल नाही. Rate Analysis ला सक्षम अभियंत्याची मंजुरी नाही.
   7. दरसूचीपेक्षा जादा दराने एस्टीमेट करता येत नाही (तशी नियम 166 मध्ये तरतूद)
   8. एस्टीमेटमधील दर दरसूचीपेक्षा ¾ पट आहेत. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे.
5. MAC 1971 नियम 180 नुसार कोणत्याही झालेल्या कामाची एस्टीमेटमधील ॲटमनिहाय मोजमापाची नोंद मोजणी पुस्तक नमुना नं. 136 मध्ये ठेवण्याची तरतुद आहे. पुस्तकांतील कामाच्या नोंदी वरिष्ठ अभियंता मुख्य लेखापरिक्षक ह्यांनी तपासणी करुनच देयके मंजुरीस शिफारस करण्याची तरतुद आहे. परंतु प्रत्यक्ष झालेल्या कामाची नोंदी मोजणी पुस्तकामध्ये घेतल्या नाहीत त्या नोंदी न तपासता देयक अदा केली आहेत. मोजणी पुस्तके(नमुना नं. 136) प्रत्यक्षात ठेवले नाही. कामाच्या नोंदी नियमानुसार न ठेवल्याने प्रत्यक्ष काम झाले किंवा नाही ह्याचा संभ्रम आहे.

6. महापालिका अंदाजपत्रक 2021-22 मध्ये निविदा कामाचा (शहरातील उद्याने, मैदाने, स्मशाने, दुभाजके निगा व देखभाल काम) समावेश नाही व तशी स्पष्ट तरतूद देखील नाही. ज्या कामाचा अर्थसंकल्पामध्ये समावेश नाही व त्यासाठी तरतूद नसेल अशा कामावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 86 नुसार खर्च करणेस प्रतिबंध आहे असे असता उद्यान विभागाने Manuplate करुन चलाखीने अर्थसंकल्प लेखाशिर्ष “मजूर पुरवठा लेखा संकेतांक 2120” मधून देयके अदा केली आहेत. ती पूर्णतया नियमबाहय आहेत. मजूर पुरवठा लेखा संकेतांक 2120 आहे ह्यामध्ये फक्त “मजूरी-मजुर पुरवठा” बील देणे ह्यांचा समावेश होत आहे. मजुर पुरवठा करणे ह्या कामाचा कार्यादेश नसताना ह्या शिर्षाखाली बीले अदा करणे बेकायदा आहे. वर नमुद केल्याप्रमाणे मोठ्या प्रमाणावर अनियमितता व नियमांचे उल्लंघन झालेले आहे. ज्या एस्टीमेटला नियमानुसार आवश्यक ती तांत्रिक मंजुरी प्राप्त नाही त्यामुळे ते एस्टीमेट अवैध ठरत आहे. एस्टीमेट अवैध असल्याने त्यानुसार अदा केलेली रक्कम नियमबाहय ठरत आहे. जादा दराने एस्टीमेट (नियमबाहयरित्या) केल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

मैदाने, आरक्षणे, बगीचा यांचे क्षेत्रफळ सक्षम अधिकारी, पालिकेचे सर्व्हेअर यांचकडून प्रमाणित करुन घेतले नाही. त्यामुळे क्षेत्रफळात विसंगती निर्माण झालेली आहे. कमी क्षेत्रफळ असलेल्या जागेचे जास्त क्षेत्रफळ कार्यादेशात नमुद असल्यामुळे ठेकेदारास लाखो रुपयांची जास्त देयके अदा केलेली आहेत.

प्रशासनाने निविदा संबधीचा अहवाल सादर कामाला MAC 1971 नियम 160 नियम 161 नियम 166 व म.न.पा. अधिनियम 1949 चे कलम 73 ब नुसार आवश्यक मंजुऱ्या नाहीत व नियमांचे उल्लंघन झालेले आहे. ह्या तांत्रिक व कायदेशीर बाबी शासनाच्या निदर्शनास आणणे आवश्यक होते परंतु तसे शासनाच्या निदर्शनास आणले नाही.

तसेच म.न.पा. अधिनियम 1949 चे कलम 73 (क) नुसार निविदेस मा. स्थायी समितीची मंजुरी घेतली नाही.

निविदा कामाच्या एस्टीमेटला आवश्यक ती तांत्रिक मंजुरी नाही. एस्टीमेट सक्षम अभियंत्याने केले नाही त्यामुळे सदर एस्टीमेटची तांत्रिक मंजुरी देण्यास सक्षम असलेल्या स्थापत्य अभियंता/शहर अभियंता ह्यांचेकडून फेरतपासणी करावी.

वृक्ष प्राधिकरण व अन्य विभागाने कोणतीही कामे करताना कामाच्या एस्टीमेटला शहर अभियंता/कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग ह्यांचेकडून आवश्यक ती तांत्रिक मंजुरी घेवूनच पुढील कार्यवाही करणेचे निर्देश मा. आयुक्त सो. ह्यांनी दि. 30.08.2021 रोजी काढलेल्या आदेशामध्ये देण्यात आले आहेत.

अंदाजपत्रकामध्ये “मजुर पुरवठा लेखा संकेतांक 2120” ह्या शिर्षाची तरतूद फक्त “मजुराचा पुरवठा करणेकामी नेमलेल्या ठेकेदराचे बील अदा करण्यासाठीच आहे. त्यामुळे ह्या लेखाशिर्षातून अन्य कोणतीही देयक अदा करु नयेत.

सदर कामाच्या निविदा मंजूरी देयक अदा करणे ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता / नियमांचे उल्लंघन झाले आहे. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले.

ह्याप्रकरणी एस्टीमेट तयार करणारे महापालिकेचे अधिकारी यांनी त्याच्या कर्तव्यामध्ये कलम 106 मध्ये नमुद केल्याप्रमाणे हयगय केली आहे तसेच जे अधिकारी जबाबदार आहेत. त्यांची चौकशी करुन कारवाई करण्यात यावी.

सदर कामाचे एस्टीमेट Analysis करुन केल्याचे म्हटले आहे परंतु एस्टीमेटला तांत्रिक मंजुरी नाही त्यामुळे एस्टीमेटमध्ये नमुद केलेले दर अवैध/नियमबाह्य आहेत. (MAC 1971 नियम 166 नुसार) त्यामुळे त्या दरानुसार देयके अदा करणे नियमबाह्य ठरणार आहेत. त्याप्रमाणे देयके अदा करु नयेत.

एस्टीमेटप्रमाणे ॲटमवार झालेल्या कामाची नोंद मोजणीपुस्तकामध्ये (नमुना नं. 136) घेण्याची तरतुद आहे. मोजणी पुस्तकांतील नोंदी शहर अभियंता/वा कार्यकारी अभियंता (सा.बांधकाम विभाग) ह्यांचे कडून तपासणी करुनच देयके (एस्टीमेटला तांत्रिक मंजूरी प्राप्त झाल्यानंतरच) तयार करावीत.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील        अनुमोदक :- श्री. दिनेश जैन**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव:-

प्रकरण क्र. ९३, सन 2022-23 या आर्थिक वर्षात कच्चे/पक्के नाले सफाई/खोदाई व सक्शन पंप भाड्याने घेणे कामाची निवीदा मागविणेबाबत.

धनेश पाटील:५

मॅडम ह्या विषयावर चर्चा होणार नाही का ?

मा. महापौर:-

चर्चा होणार नाही कारण आपण त्यांना फक्त मंजूरी देतो.

धनेश पाटील:-

मॅडम तो ठेकेदार फॉल्टी असला तर काय करायचे?7

मा. महापौर:-

तो फॉल्ट करतो की नाही ते बघायला आपल्याला वेळ मिळेल ना.

धनेश पाटील:-

गेल्यावर्षी मी पत्र दिले होते.

मा. महापौर:-

आपण अर्जट देतो त्यावेळी पाऊस आलेला असतो.

मनोज दुबे:-

पावसाळ्यापूर्वी कच्चे/पक्के नाले सफाई/खोदाई आदि आवश्यक कामे करणेकरीता लागणारी विविध यंत्र सामुग्री व मनुष्य बळ भाड्याने उपलब्ध करुन शहरातील कच्चे / पक्के नालेसफाईची कामे पावसाळ्यापूर्वी मुदतीत पूर्ण करणेकरीता निविदा मागविण्यास व येणाऱ्या साडेतीन कोटी खर्चास मंजुरी देत आहे.

तसेच पावसाळ्या दरम्यान शहरात पाणी साचून राहते त्यामुळे नागरीकांची गैरसोय होते याकरीता साचलेल्या पाण्याचा तातडीने उपसा करणेकरीता विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने घेवून पाण्याचा उपसा करणेकरीता विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने घेण्याची निविदा मागविणेस व सदर कामी येणाऱ्या पंचाहत्तर लक्ष रुपयांस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

प्रशासनाने सन 2022-23 या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात उपरोक्त तरतुद करावी.

दिनेश जैन :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार:-

विरोधी पक्षनेत्यांनी जे आक्षेप घेतले आहेत त्याची प्रशासनानी चौकशी करावी.

मा. महापौर:-

ठीक आहे.

जुबेर इनामदार:-

काम करत नसेल तर त्याला काळया यादीत टाका.

धनेश पाटील:५

काळया यादीत टाकावे अशी आमची तुम्हाला विनंती आहे.

मा. महापौर:-

ठीक आहे तुमच्या मताशी मी सहमत आहे.

**प्रकरण क्र. 93 :-**

सन 2022-23 या आर्थिक वर्षात कच्चे/पक्के नाले सफाई/खोदाई व सक्शन पंप भाड्याने घेणे कामाची निवीदा मागविणेबाबत.

**ठराव क्र. 75 :-**

पावसाळ्यापूर्वी कच्चे/पक्के नाले सफाई/खोदाई आदि आवश्यक कामे करणेकरीता लागणारी विविध यंत्र सामुग्री व मनुष्य बळ भाड्याने उपलब्ध करुन शहरातील कच्चे / पक्के नालेसफाईची कामे

पावसाळ्यापूर्वी मुदतीत पूर्ण करणेकरीता निविदा मागविण्यास व येणाऱ्या साडेतीन कोटी खर्चास मंजुरी देत आहे.

तसेच पावसाळ्या दरम्यान शहरात पाणी साचून राहते त्यामुळे नागरीकांची गैरसोय होते याकरीता साचलेल्या पाण्याचा तातडीने उपसा करणेकरीता विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने घेवून पाण्याचा उपसा करणेकरीता विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने घेण्याची निविदा मागविणेस व सदर कामी येणाऱ्या पंचाहत्तर लक्ष रुपयांस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

प्रशासनाने सन 2022-23 या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात उपरोक्त तरतुद करावी.

**सुचक :- श्री. मनोज दुबे अनुमोदक :- श्री. दिनेश जैन**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव:-

प्रकरण क्र. ९४, शहरातील इमारतींना नळ जोडण्या बंद करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.

प्रशांत दळवी:-

मा. महापौर मॅडम, मिरा भाईदरला भेडसावणारा प्रश्न ह्यावर ब-याच लोकप्रतिनिधीनी आवाज उठवला होता. ह्या विषयावर आंदोलन ही झाली. शासनानी पाणी पुरवठा बंद केल्यानंतर मिरा भाईदरला पाण्यापासून वंचित राहावे लागले. काही लोक प्रतिनिधीना अनधिकृत नळ कनेक्शन झाले असे आरोप केल्यानंतर मा. आयुक्तांनी आपण जी पाण्याची कनेक्यान देत होतो ते पूर्ण अधिकार आपल्याकडे घेतले आणि जे अनधिकृत जे नळ कनेक्शन दिले गेले होते त्यावर पाण्याचा पूरवठा बघून ४० तासानंतर जे आपल्याला पाणी येत होते त्यामूळे आयुक्त महोदयांनी ह्या शहराला पाणी पूरवठा नळ कनेक्शन देणे बंद करण्याचा आदेश पारीत केला परंतू सध्या आपल्याला एम आय डी सी कडून १२५ एम एल डी पाणी पूरवठा होतो आणि स्टेम प्राधिकरणकडून ८६ एम एल डी त्यामध्ये गेल्या दोन महिन्याच्या तुलनेत मा. आयुक्तांनी एम आय डी सी ला पत्रव्यव्हार केला आपण शहरात आंदोलन केली सर्वच पक्षानी ह्या विरोधात आवाज उठवला. सांगायचे एवढेच की मा. आयुक्तांनी पाठपूरावा केल्यानंतर आजही आपण बघाल ११०-१११,८८-८४ हया क्रमाने आपल्याला पाणी येत आहे. आपण जेव्हा हे कनेक्शन चालू केले त्याही वेळेला हाच रेषीयो होता आणि आपण मिरा भाईदरच्या नागरिकांना पाणी द्यायला सक्षंम होतो. मा.महापौर मॅडम आणि मा. आयुक्त महोदय आपल्याला ह्या निवेदनाद्वारे आपल्याला पून्हा एकदा विनंती करायची होती की पाणी प्रश्न हा ज्वलंत आहे आणि पाणी हे सगळयांना मिळायला पाहिजे आपल्याही त्याच भावना असतील परंतू ज्या ज्या वेळेला अनधिकृत कनेक्शन वरती प्रशासनातर्फे कनेक्शन दिले जाते त्याची पत्रकारामध्ये किंवा बाहेर जी चर्चा होते म्हणून आपण हा निर्णय घेतला असावा आणि त्या ठिकाणी ते पाणी उपलब्ध होत नव्हता त्यामूळे हा निर्णय घेतला असावा आणि आता जे पाणी आपल्याला मिळते त्या अनुशंगाने ज्या इमारतीनी भोगवटा दाखला घेतला आहे आणि जे लिगल आहेत त्यांना पुनश्च एकदा कनेक्शन सूरू करावे शहरवासियांच्या वतीने, पक्षाच्या वतीने सभागृहाच्या वतीने मी मा. आयुक्तांना निवेदन करतो. आपण आपल्या अध्यक्षतेखाली आपली निवड समिती घ्यावी जेणेकरून कूठलेही अनधिकृत कनेक्शन हया शहरामध्ये जाणार नाही आणि जे योग्य असेल तेच नळ कनेक्शन त्या रहिवांशाना प्राप्त होईल. हयावर माझा ठराव आहे.

मा. महापौर:-

गेल्या महासभेमध्ये व्यासपिठावरून मी पाण्याचे अधिकारी वाकोडे साहेब त्यांना विचारले होते की मिरा भाईदर शहरामध्ये अनधिकृत नळ कनेक्शन किती आहेत. आणि त्यांनी आपल्याला ह्या महासभेत उत्तर दिले होते की ७५ पेक्षा ही अनधिकृत कमी नळ कनेक्शन आहेत माझ्यावरही आरोप लावला की अनधिकृत नळ कनेक्शन असतील तर महापौरानी महापौराच्या वॉर्डपासून बंद करावे. मी तर आजही महासभेमध्ये बोलते की अनधिकृत नळ कनेक्शन मिरा भाईदरमध्ये असतील तर बंद करा. सूरूवात माझ्या वॉर्डपासून करा. प्रभाग क्र. १४ मध्ये अनधिकृत नळ कनेक्शन असतील ते तत्काळ बंद करा. आणि नंतर इतर जे असतील ते बंद करा. अनधिकृत वरून नळ कनेक्शन बंद केले गेले ते योग्य वाटत नाही. आणि मी आरोप केल्यावर त्याला सत्यता असली पाहिजे विनाकारण प्रशासनावर आरोप करू नये आणि केले असले तर त्याच्यामध्ये तथ्य असले पाहिजे. आणि दूसरा आरोप असेल अनधिकृत नळ कनेक्शन बंद करावे तर मी ह्या सभेमध्ये पाणी पूरवठा आदेश देते अनधिकृत नळ कनेक्शन असतील तर पहिली माझ्या प्रभागापासून सूरूवात करा. अनधिकृत नळ कनेक्शन बंद करून टाका.

प्रशांत दळवी:-

महापौर मॅडम आमचीही ती भुमिका असणार आहे आमच्या सर्व सदस्यांची ती भुमिका असणार आहे की कूठल्याही वॉर्डमध्ये अनधिकृत नळ कनेक्शन खपवून घेतले जाणार नाही. आणि प्रशासनावर उगाचच केलेले आरोप हे देखील खपवून घेतले जाणार नाही. कारण कनेक्शनच १०,००० होतात तर १५,००० अनधिकृत नळ कनेक्शन येतात कूठून. प्रकरण क्र. ९४ च्या ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर शहरास स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ऍण्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. यांच्याकडून 86 एम.एल.डी व एम.आय.डी.सी कडून 125 MLD असा एकूण 211 MLD पाणीपुरवठा मंजुर आहे. परंतु मिरा भाईंदर शहरास प्रत्यक्ष सरासरी 190 ते 195 द.ल.ली पाणी पुरवठा होत आहे. सध्याच्या लोकसंख्येनुसार सरासरी 215 द.ल.ली पाण्याची आवश्यकता आहे असे प्रशासनाचे मत आहे. त्यानुसार फक्त 20 ते 25 द.ल.ली पाणीपुरवठा शहरास कमी होत आहे.

सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात शहराला मंजुर कोट्यापेक्षा खुपच अपुरा पाणीपुरवठा झाल्याने तसेच शटडाऊन, पाईपलाईन फुटणे, लाईट जाणे यामुळे पाणी पुरवठा वारंवार खंडीत होत होता. त्यामुळे शहराला कृत्रिम पाणीटंचाईला सामोरे जावे लागले होते व पाणी पुरवठा सुमारे 48 ते 60 तासांवर पोहचला होता. परिणामी प्रशासन आणि लोकप्रतिनीधी यांना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागले व त्यामुळे लोकप्रतिनिधींना जल आंदोलन करावे लागले.

या जल आंदोलनानंतर स्टेम व एम.आय.डी.सी प्राधिकरणाव्दारे पाणीपुरवठा सुरळीत झाला व आता शहराला 24 ते 30 तासानंतर पाणीपुरवठा होत आहे.

महापालिका क्षेत्रात दि.31-08-2011 अखेर 33,603 इतक्या नळजोडण्या होत्या. तद्नंतर सन 2017 मध्ये नवीन नळजोडण्या सुरु करण्यात आल्या व दि.20-10-2021 अखेर एकुण 43,617 इतक्या नळजोडण्या असून 05 वर्षात फक्त 10,000 नळजोडण्या वाढलेल्या आहेत यावरुन मनपा क्षेत्रात पाणीपुरवठा व जलजोडण्या याचा समतोल आपोआप राखला गेला आहे. त्यामुळे नवीन जलजोडणी मंजुर करण्याचे बंद करणे संयुक्तिक होणार नसल्याने शहरातील नागरीकांना नवीन नळ जोडण्या मंजुर करण्याचे बंद करु नये.

याकरीता मा. आयुक्त यांनी नवीन नळजोडणी मंजुरी बंद करणेकामी दिलेला आदेश त्वरीत रद्द करावा व शहरातील नागरिकांना पाणीपुरवठा होणेकरीता जलजोडण्या मंजुर करण्याचे सुरु करावे. तसेच यापूर्वी मोठ्या संकुलात स्वखर्चाने 4 इंचाची पाईप लाईन टाकण्याची परवानगी महापालिकेतर्फे देण्यात येत होती परंतु कोणतेही कारण न देता सदर परवानगी देण्याचे बंद करण्यात आले होते. तरी

मोठ्या संकुलांना पुरेसा पाणीपुरवठा होणेकरीता त्यांच्या आवारात त्यांना स्वखर्चाने 4 इंची पाईपलाईन टाकण्याची परवानगी देणे सुरु करावे असा मी ठराव मांडत आहे.

तसेच प्रशासनाने स्टेम व एम.आय.डी.सी प्राधिकरणाच्या मंजुर कोट्यानुसार शहरास पाणीपुरवठा उपलब्ध करुन घेणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

राकेश शहा:-

माझे अनुमोदन आहे.

निलम ढवण:-

मा. महापौर मॅडम मागच्या महासभेत ह्या विषयावर चर्चा झाली होती त्यानुसार मी सांगू इच्छिते की इतर ज्या नळ जोडण्या बंद केल्या होत्या आणि पूर्वी जो एम आय डी सी चा पाणी पूरवठा बंद झाल्यानंतर नागरिकांना जो त्रास होत होता तो त्रास आता बंद करता त्यावेळी अजिबात कोणाला कळत देखील नाही पाणी बंद होता तेव्हा लाईन कूठली मा. आयुक्तसाहेब आपले मनपुर्वक आभार मानते की खरोखर त्यावेळी जेव्हा असे मेसेज येतो पण त्या मेसेजची आम्हाला झळ पोहोचत नाही त्याच्यामूळे पाणी हा विषय विसरलेले आहेत मला वाटते आमचे भाईदर पूर्व एरिया ग्रामपंचायत काळातला असल्यामूळे पूर्ण दाटीवाटी आहे. आणि जी पूर्वी झळ पोहोचत होती ती आता पोहोचत नाही. म्हणजे त्यांना पाणी मिळते ह्याच्याबद्दल आभार. आणि खरोखर नळजोडणी आवश्यक असेल तर आयुक्त साहेब त्या संदर्भात विचार करत असतील त्यांच्याकडे तो अधिकार दिलेला आहे. त्यानुसार अतिआवश्यक जिथे असेल तिथे त्यांनी दयावे परंतू सरसकट लाईन त्यांनी चालू केली तर पून्हा मागच्या सारखा विषय होईल. आणि जोपर्यंत पूर्ण कोटा आपल्याला मिळत नाही तोपर्यंत ह्या नविन लाईन चालू केल्या तर पून्हा तोच प्रॉब्लेम चालू होईल आणि शहरामध्ये पाण्यासाठी पून्हा एकदा वादळ निर्माण होईल त्यामूळे आयुक्त साहेब आपल्या अधिकारामध्ये बसेल तो योग्य निर्णय आपण घ्यावा. महापौर मॅडम आणि आयुक्त साहेब संक्षम आहेत त्याप्रमाणे योग्य निर्णय घ्यावा अशी मी आपणास विनंती करते.

प्रशांत दळवी:-

मा. महापौर मॅडम मी माझ्या निवेदनाद्वारे पहिलेच स्पष्ट केले आहे.की आपल्याला मिळत असलेले पाणी आणि त्यातून काटकसर करून मा. आयुक्तांनी प्रत्येक वेळेला एम आय डीसी आणि स्टेम कडून आपल्याला मिळणारे पाणी ह्यासाठी त्यांच्याशी वेळोवेळी संपर्क साधलेला आहे. त्यातून मिळणारे पाणी ११० किंवा १८६ एम एल डी मिळाले तर ते आपल्याला पूरेसे होणार आहे. म्हणून आपण वारंवार आयुक्त महोदयांना विनंती करतो की जिथे गरज आहे आणि जे लिगल आहेत त्यांनाच द्यायचे आम्ही अनधिकृत नळ कनेक्शन संदर्भात बोलत नाही. महापौर मॅडम असे असतांना ढवण मॅडम म्हणतात पाणी कनेक्शन मग ह्यांचा विरोध आहे का ? की देवू नये म्हणून मला स्पष्ट कळलेले नाही.

मा. महापौर:-

त्यांचा विरोध नाही ते सांगतात की जिथे अति आवश्यक आहे ते द्यावे.

प्रशांत दळवी:-

अति आवश्यक म्हणजे काय?

मा. महापौर:-

ते आयुक्त साहेब ठरवतील.

प्रशांत दळवी:-

आपण अधिकार आयुक्तांनाच दिलेले आहेत.

मा. महापौर:-

प्रशासनाने तपासून कारवाई करावी. ठराव सर्वानुमते मंजूर.

निलम ढवण:-

ठराव कसा सर्वानुमते मंजूर आपण आयुक्तांना देतो. ठरावात आपण म्हटले आहे की चार फूटांच्या मोठ मोठया कॉम्पलेक्सला लाईन देण्यात याव्या.

प्रशांत दळवी:-

ज्या ठिकाणी प्रेशरनी पाणी जात नसेल त्या ठिकाणी पहिल्यापासूनच चालू आहे.

निलम ढवण:-

ठरावात मेन्शन करण्यापेक्षा आयुक्ताना तो अधिकार आहे ना.

मा. महापौर:-

आयुक्त जेव्हा आपली आर्थिक परिस्थिती साहेबांनी त्या सुनावणीवर ऑब्जेक्शन घेतले अनधिकृत कनेक्शनच्या बद्दल त्यांनी ऑब्जेक्शन घेतले त्यावेळी आयुक्तांनी शहरामध्ये तडकाफडकी नळ कनेक्शन बंद केले. आणि त्यावेळी शहरामध्ये पाण्याचा प्रॉब्लेम होता. तुम्ही आंदोलन केले सर्व पक्षाच्या लोकांनी आंदोलन केले महापौर म्हणून मला सोसायटीच्या कंम्पलेन्ट आल्या होत्या. माझ्याकडे तक्रारीची एवढी मोठी थप्पी लागली होती मग मी महापौर म्हणून काय करायला पाहिजे. प्रशासनाला आपण वारंवार सांगितले की प्रशासन उत्तर देतो की एम आय डी सी पाणी देत नाही. तर एम आय डी सी आमच्या हातात आहे का ? एम आय डी सी कोणाच्या हातात आहे. मग एम आय डी सी १२५ एम एल डी मोठया प्रमाणात पाणी आम्हाला दिले असते तर आपल्याला आंदोलन करायची गरज लागली नसती आणि नळ कनेक्शन पण बंद करायची गरज लागली नसती आणि एकमेकावर आरोप करायची पण गरज लागली नसती पण एम आय डी सी ने आपल्याला पाणी कमी दिले आताच ढवण ताईनी सांगितले की आता पाणी येते किंवा जाते आम्हाला कळत सुध्दा नाही आणि त्याची झळ सुध्दा पोहोचत नाही. मग आता आपण नविन पाईपलाईन टाकल्या का पाणी पण तेच आहे पण एवढेच की आताचा पाणी पुरवठा सूरळीत आहे. आणि जेव्हा हे कामकाज करतात ते पण जलद गतीने करतात आणि पूर्व सुचना अधिका-यांना दिली जाते आणि त्या पध्दतीने प्रशासन सुध्दा नागरिकाना सुचना देते. त्यामूळे ती झळ आपल्याला बसत नाही. हे महासभेमध्ये तुम्ही कबूल केले आता राहिला प्रश्न नळ कनेक्शनचा तर आमच्या ठरावामध्ये असे म्हटलेले आहे की आपण ज्यावेळेला इमारतीला ओ सी देतो म्हणजे नागरिकांना राहायची परवानगी देतो जेव्हा नागरिक त्याठिकाणी राहायला येतात त्यावेळी नागरिकांना पाणी नको का ? बिना पाण्याचे नागरिक राहतील का ? त्यामूळे शहराचे नाव खराब होईल विकास कर देखील आपण् घेतो तर त्यांना नळ कनेक्शन द्यायला कूठे बिघडले आणि प्रशासनाची जर तयारी असेल त्यांना कनेक्शन द्यायचे ओ सी घेतलेल अनलिगलच होते ना इनलिगल असू शकत नाही इनलिगल कनेक्शन कापून तूम्ही पहिलाच सभागृहाला आदेश दिला आहे माझ्या वॉर्डापासून सूरू करा. मी प्रशासनाचे अभिनंदन पण करते की ऑनलाईन केले असल्यामूळे ते फाईल तपासणे फाईल फिरवणे त्यामध्ये जो व्यव्हार होत होता तो सर्व बंद झाला आहे ऑनलाईन पध्दतीने चांगले कामकाज तुम्ही करता त्यामूळे इलिगल होण्याचा प्रश्नच राहत नाही. आणि इलिगल असतील ते पणकाढून टाका.

निलम ढवण:-

मॅडम टँकरने पाणी पूरवठा कूठे होतो.

मा. महापौर:-

त्याची पाणी पुरवठा विभागाने माहिती घ्यावी.

निलम ढवण :-

मॅडम विचाराना काय होते आपण नळ जोडणी करतो तिथे पाणी पुरवठा होत नाही असे नाही फक्त नळाच्या एक्स्ट्रा लाईन दिल्या जात नाही. बाकी त्यांना पाणी पुरवठा होतो.

मा. महापौर:-

पाणी पुरवठा कूठे होतो.

सुरेश वाकोडे:-

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, टँकरचा पाणी पुरवठा आपल्याकडे काही आदिवासी पाडे आहेत ज्याठिकाणी कनेक्शन नाहीत ज्याठिकाणी पाईपलाईन टाकू शकत नाही.

मा. महापौर:-

पाईपलाईन का टाकू शकत नाही ते सांगा .

सुरेश वाकोडे:-

त्याठिकाणी फॉरेस्ट आहे. काही ठिकाणी खाजगी जमिनी आहेत त्या परवानग्या नसल्यामूळे तिथपर्यत पोहोचू शकत नाही. त्यामूळे त्याठिकाणी सिन्टेक्स टाकीमध्ये पाणी भरतो. काही ठिकाणी मस्जीद, मंदिराला पाण्याची मागणी असते. त्याठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करतो ज्याठिकाणी दूषीत पाणी येते त्याना पर्याय नसतो त्यांना टँकरने पाणी द्यावे लागते. तसेच काही कनेक्शन येताता त्याना आपण नळ कनेक्शन दिले नाहीत आणि त्याना ओ सी मिळाली असेल त्याना आपल्याला टँकरने पाणी पुरवठा करायला लागतो. साधारण ७०-८० टँकरपर्यत पाणी पुरवठा होतो म्हणजे टोटल येणा-या पाण्याच्या १% च्या पेक्षा कमी पाणी पुरवठा टँकरद्वारे होते.

निलम ढवण:-

मॅडम ओसी चा विषय काढला होता ओ सी दिलेल्या बिल्डींगला पाणी पुरवठा होत नाही तो टँकरने केला का ?

प्रशांत दळवी:-

मा. महापौर मॅडम एकाच विषयावर आमचेही नगरसेवक आहेत प्रत्येकांना बोलायची संधी द्यायची का ? विषय होणार आहेत का सांगा. महापौर मॅडम तुम्ही सांगितले ना की तुमच्या प्रभागापासून सूरूवात करायची आणि अनधिकृत कनेक्शन असतील तर मी सांगतो आता अनधिकृत कनेक्शन शोधून दाखवा. प्रशासनाला बदनाम करू नका. आणि जनतेची दिशाभूल करू नका. जर अनधिकृत कनेक्शन आढळत असतील तर जे कनेक्शन पकडतील त्यांना अर्धी रक्कम देवू.

सभागृहात गोंधळ

मा. महापौर:-

तुमचा ठरावाला विरोध आहे का ?

जुबेर इनामदार:-

आमचा विरोध नाही आयुक्तांना निवेदन करायचे आहे.

मा. महापौर:-

आयुक्तांनी सांगितले आहे.

मा. आयुक्त:-

महापौराच्या परवानगीने बोलतो कार्यकारी अभियंता वाकोडे साहेबांनी पाण्याची स्थिती काय आहे त्याबद्दल सांगितले त्याचप्रमाणे मा. ढवण ताई, दळवी साहेब, जुबेर साहेब ह्यांनी सांगितले आणि आपल्या बोलण्याच्या उल्लेखात होते की ज्याठिकाणी अत्यावश्यक आहे त्याठिकाणी आवश्यकता बघून द्यावी परत मुद्दा हाच सांगितला की आवश्यकता म्हणजे काय? उदा. काही लिगल कनेक्शनचा आरोप होतो काही चाळी झोपडपट्टीत दिले जाते असा आरोप होतो काही ठिकाणी पाण्याच्या लाईन असतांना जास्त लाईनची मागणी केली जाते. उदा. ७ लाईन आहेत तरी ९ द्या अशी मागणी होते तर त्यातली आवश्यकता तपासून ज्याठिकाणी अत्यावश्यक आहे त्याठिकाणी आवश्यकता पाहून जसे आता मा. महासभेने आदेश दिले त्यानुसार त्याची आवश्यकता तपासून मी स्वत- लक्ष घालेन आणि ज्या ठिकाणी आवश्यकता आहे त्याठिकाणी पाण्याची कनेक्शन देता येतील ज्याठिकाणी सद्य स्थितीत

आवश्यकता नसेल किंवा आहे त्या लाईनवर त्यांचे भागत असेल तर ज्याठिकाणी टंचाई असेल अशा ठिकाणची टंचाईची तपासणी करून आवश्यकता तपासून स्थळ पाहणी करून आमचे वरिष्ठ अधिकारी त्याठिकाणी स्थळ पाहणी करतील आणि गरज तपासून पूढील कारवाई करतील. धन्यवाद

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम आयुक्तांना एक विनंती होती शहरामध्ये पाणी टंचाई आहे कूठे ? त्याचबरासेबर काही लोकांना गरजेपेक्षा जास्त पाणी पुरवठा होतो त्याचे कारण म्हणजे बूस्टर पंप ह्या विषयावर एक मोहिम लावावी लागेल जे लावण्यात आलेले बूस्टर पंप काढण्याची मोठी परिक्रमा

मा. आयुक्त :-

जुबेर साहेब अतिशय चांगली सूचना आहे. बूस्टर पंप जेथे आवश्यकतेपेक्षा जास्त लावले आहेत किंवा इनलिगल लावले आहेत ते तपासून कारवाई करण्यात येईल.

**प्रकरण क्र. 94 :-**

शहरातील इमारतींना नळ जोडण्या बंद करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.

**ठराव क्र. 76 :-**

मिरा भाईंदर शहरास स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. यांच्याकडून 86 एम.एल.डी व एम.आय.डी.सी कडून 125 MLD असा एकूण 211 MLD पाणीपुरवठा मंजुर आहे. परंतु मिरा भाईंदर शहरास प्रत्यक्ष सरासरी 190 ते 195 द.ल.ली पाणी पुरवठा होत आहे. सध्याच्या लोकसंख्येनुसार सरासरी 215 द.ल.ली पाण्याची आवश्यकता आहे असे प्रशासनाचे मत आहे. त्यानुसार फक्त 20 ते 25 द.ल.ली पाणीपुरवठा शहरास कमी होत आहे.

सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात शहराला मंजुर कोट्यापेक्षा खुपच अपुरा पाणीपुरवठा झाल्याने तसेच शटडाऊन, पाईपलाईन फुटणे, लाईट जाणे यामुळे पाणी पुरवठा वारंवार खंडीत होत होता. त्यामुळे शहराला कृत्रिम पाणीटंचाईला सामोरे जावे लागले होते व पाणी पुरवठा सुमारे 48 ते 60 तासांवर पोहचला होता. परिणामी प्रशासन आणि लोकप्रतिनीधी यांना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागले व त्यामुळे लोकप्रतिनिधींना जल आंदोलन करावे लागले.

या जल आंदोलनानंतर स्टेम व एम.आय.डी.सी प्राधिकरणाव्दारे पाणीपुरवठा सुरळीत झाला व आता शहराला 24 ते 30 तासानंतर पाणीपुरवठा होत आहे.

महापालिका क्षेत्रात दि.31-08-2011 अखेर 33,603 इतक्या नळजोडण्या होत्या. तद्नंतर सन 2017 मध्ये नवीन नळजोडण्या सुरु करण्यात आल्या व दि.20-10-2021 अखेर एकुण 43,617 इतक्या नळजोडण्या असून 05 वर्षात फक्त 10,000 नळजोडण्या वाढलेल्या आहेत यावरुन मनपा क्षेत्रात पाणीपुरवठा व जलजोडण्या याचा समतोल आपोआप राखला गेला आहे. त्यामुळे नवीन जलजोडणी मंजुर करण्याचे बंद करणे संयुक्तिक होणार नसल्याने शहरातील नागरीकांना नवीन नळ जोडण्या मंजुर करण्याचे बंद करु नये.

याकरीता मा. आयुक्त यांनी नवीन नळजोडणी मंजुरी बंद करणेकामी दिलेला आदेश त्वरीत रद्द करावा व शहरातील नागरिकांना पाणीपुरवठा होणेकरीता जलजोडण्या मंजुर करण्याचे सुरु करावे. तसेच यापूर्वी मोठ्या संकुलात स्वखर्चाने 4 इंचाची पाईप लाईन टाकण्याची परवानगी महापालिकेतर्फे देण्यात येत होती परंतु कोणतेही कारण न देता सदर परवानगी देण्याचे बंद करण्यात आले होते. तरी मोठ्या संकुलांना पुरेसा पाणीपुरवठा होणेकरीता त्यांच्या आवारात त्यांना स्वखर्चाने 4 इंची पाईपलाईन टाकण्याची परवानगी देणे सुरु करावे असा मी ठराव मांडत आहे.

तसेच प्रशासनाने स्टेम व एम.आय.डी.सी प्राधिकरणाच्या मंजुर कोट्यानुसार शहरास पाणीपुरवठा उपलब्ध करुन घेणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 95, शहरातील इमारतींमध्ये उभ्या राहणाऱ्या वाहनांच्या पार्कींग जागेवर कर आकारणी करणेच्या प्रशासनाच्या आदेशाबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.

अनिल विराणी:-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 99 अन्वये मालमत्ता कर लावणे व दर ठरविण्याचा अधिकार मा. महासभेला आहे. प्रशासनामार्फत शहरातील मालमत्तांना कर लावणे व दर ठरविणे, मोकळ्या जागेवर कराची आकारणी करणे, मालमत्ता करामध्ये सुट व सवलत देणे इ. बाबतचे प्रस्ताव प्रशासनाने वेळोवेळी मा. महासभेत मंजुरीकरीता मागील काही वर्षांत सादर केले होते, त्याप्रमाणे मा. महासभेत चर्चा होवून याबाबत ठराव पारित झालेले आहेत.

प्रशासनातर्फे मिरा भाईंदर शहरातील इमारतींमध्ये पार्किंगवर कर आकारणी करणेबाबत प्रभाग अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले होते. पार्किंग कर आकारणीचा निर्णय मा. महासभेची परवानगी न घेता तसेच पालिकेच्या कोणत्याही पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता निर्णय घेतलेला आहे या निर्णयामुळे शहरातील नागरीकांमध्ये असंतोष पसरला आहे.

सबब, प्रशासनाने पार्किंगवर कर आकारणीचा घेतलेला बेकायदेशीर निर्णय रद्द करावा व कोणत्याही नागरीकांवर / मालमत्ता धारकांवर पार्किंग कराची आकारणी करु नये असा मी ठराव मांडत आहे.

राकेश शहा:-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर:-

ठीक आहे. पूढचा विषय घ्या.

स्नेहा पांडे:-

प्रकरण क्र.८८ पे विषय खतम होने के बाद बोलने दिजीए

मा. महापौर:-

ठीक है

**प्रकरणे क्र. 95 :-**

शहरातील इमारतींमध्ये उभ्या राहणाऱ्या वाहनांच्या पार्कींग जागेवर कर आकारणी करणेच्या प्रशासनाच्या आदेशाबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.

**ठराव क्र. 77 :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 99 अन्वये मालमत्ता कर लावणे व दर ठरविण्याचा अधिकार मा. महासभेला आहे. प्रशासनामार्फत शहरातील मालमत्तांना कर लावणे व दर ठरविणे, मोकळ्या जागेवर कराची आकारणी करणे, मालमत्ता करामध्ये सुट व सवलत देणे इ. बाबतचे प्रस्ताव प्रशासनाने वेळोवेळी मा. महासभेत मंजुरीकरीता मागील काही वर्षांत सादर केले होते, त्याप्रमाणे मा. महासभेत चर्चा होवून याबाबत ठराव पारित झालेले आहेत.

प्रशासनातर्फे मिरा भाईंदर शहरातील इमारतींमध्ये पार्किंगवर कर आकारणी करणेबाबत प्रभाग अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले होते. पार्किंग कर आकारणीचा निर्णय मा. महासभेची परवानगी न

घेता तसेच पालिकेच्या कोणत्याही पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता निर्णय घेतलेला आहे या निर्णयामुळे शहरातील नागरीकांमध्ये असंतोष पसरला आहे.

सबब, प्रशासनाने पार्किंगवर कर आकारणीचा घेतलेला बेकायदेशीर निर्णय रद्द करावा व कोणत्याही नागरीकांवर / मालमत्ता धारकांवर पार्किंग कराची आकारणी करु नये असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल विराणी अनुमोदक :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव:-

प्रकरण क्र. 96, आकृतीबंधामध्ये मंजुर पदापेक्षा जास्त पदांवरील उपायुक्तांना शासनाच्या सेवेत वर्ग करुन महापालिकेतून कार्यमुक्त करणेबाबत निर्णय घेणे.

आनंद मांजरेकर :-

महाराष्ट्र शासनाने मंजुर केलेल्या आकृतीबंधात एकूण ०४ उपायुक्तांपैकी ०२ उपायुक्त शासन नियुक्त व महानगरपालिकेत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांपैकी पदोन्नतीने ०२ उपायुक्त घेण्यात यावे असे नमुद आहे.

महानगरपालिकेत एकूण ०४ उपायुक्तांपैकी एका उपायुक्तास अतिरिक्त आयुक्त या पदावर पदोन्नती देण्यात आली. रिक्त झालेल्या उपायुक्त पदावर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचाऱ्यांपैकी एका अधिकाऱ्यास प्रभारी उपायुक्त म्हणून कार्यभार देण्यात आला. त्यानंतर शासनाकडूनही एका अधिका-यास उपायुक्त पदावर हजर करुन त्यालाही कार्यभार देण्यात आलेला आहे.

महानगरपालिकेत एकूण ०४ उपायुक्त शासनाचे व ०१ प्रभारी उपायुक्त महानगरपालिकेचे असे एकुण ०५ उपायुक्त या महानगरपालिकेत सद्यस्थितीत कार्यरत आहेत. तसेच शासनाकडून प्रतिनियुक्तीवरील दोनच उपायुक्त महापालिकेच्या आस्थापनेवर नियमाप्रमाणे हजर करुन घेणे आवश्यक होते. परंतु मंजुर उपायुक्तांपेक्षा जास्तीचे उपायुक्त महापालिकेने नियुक्त केलेले आहे जे नियमबाह्य आहे,

तरतुद नसतानाही महापालिकेच्या सेवेत घेतलेल्या उपायुक्तांना कार्यमुक्त करणेबाबतचा दि.२६/१०/२०२१ रोजीच्या मा. महासभेत ठराव पारित करण्यात आलेला असतानाही महापालिकेमार्फत अजुनपर्यंत कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

सदरची वस्तुस्थिती पाहता, मंजुर आकृतीबंधाप्रमाणे शासनाकडून प्रतिनीयुक्तीवर आलेल्या दोनच उपायुक्तांना महापालिकेच्या सेवेत ठेवावे व दोन उपायुक्तांना महापालिकेच्या सेवेतून कार्यमुक्त करावे तसेच महानगरपालिकेच्या आस्थापनेमधून जे अधिकारी सेवाज्येष्ठ आहेत, महापालिकेच्या कामकाजाचा अनुभव असणाऱ्या अधिकाऱ्यांमधुन ०१ उपायुक्त किंवा प्रभारी उपायुक्ताची नेमणूक करुन त्यास त्वरीत कार्यभार देण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

हेतल परमार :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर:-

ह्या विषयावर गटनेते आणि पदाधिका-याची एक बैठक घेवून ह्या विषयावर प्रशासनाचे काय मत आहे ते विचारात घेवून नंतर निर्णय घेवू.

निलम ढवण:-

मॅडम चालेल.

प्रशांत दळवी:-

ह्या मध्ये प्रशासनाचे जे मत दिले गेले आहे जे ह्या पदावर बसू शकतात त्यांची एन्टीकरप्शन मार्फत चौकशी सूरू असल्यामूळे त्यांना हे पद देता येत नाही असे प्रशासनाचे म्हणणे आहे. त्यामूळे सविस्तर माहिती घ्यावी.

निलम ढवण:-

ह्या संदर्भात बैठक म्हणून आपण आयुक्त बैठक घेवून त्यानंतर आपण हा विचार करावा.

जुबेर इनामदार:-

समितीची बैठक बोलवा.

मा. महापौर:-

ठीक आहे पूढचा विषय घ्या.

नगरसचिव:-

प्रकरण क्र. ९७, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात निविदांची मुदत संपलेली असुनही नियमबाह्य मुदतवाढ देणे व मुदतवाढ नसतानाही देयक अदा केलेल्या संबंधीतांवर कारवाई करणेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

निलम ढवण:-

मा. महापौर मॅडम मुदतवाढ का द्यावी लागते हा पहिला प्रश्न प्रत्येकाला प्रत्येक वेळी मुदतवाढ द्यावी लागते मुदतवाढ का दिली जाते. टेंडर कधी संपणार हे त्या विभागाला माहित असते मग मुदतवाढ हा प्रकार काढून टाका.

मा. महापौर:-

त्यासाठीच हा विषय आलेला आहे. की चिचिध विभागातील निविदांची मुदत संपलेली आहे. तरी प्रशासनाने त्यांना मुदत वाढ देवून कामकाज सूरू ठेवले आहे तर ती मुदतवाढ न देता त्याचे रितसर टेंडर काढावे आणि त्या कामाची रितसर प्रक्रिया करावी. असे कूठले कूठले निविदा आहेत त्याची आपल्याला कल्पना नाही. ह्या संदर्भात प्रशासनाने मत द्यावे.

मा. आयुक्त:-

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो ह्या ठिकाणी म्हटले आहे की नियमबाह्य मुदत वाढ देणे आणि मुदत नसताना अदा केलेले बिलामूळे प्रशासनाच्या अधिका-यावर कारवाई करणे. हा विषय ५-६ महिन्यापासून आहे तर ऑलमोस्ट आम्ही जी सगळी टेंडरची प्रक्रिया आहे ती युध्दपातळीवर हातात घेतली बरीच मार्गी लागली आणि २-३ साफ सफाईसारखी आहेत त्याच्यात काय म्हटले आहे प्रढील टेंडर प्रक्रिया होईपर्यत मूदतवाढ देणे जे जे असे आहे ते सैनिक सिक्यूरिटी आणि इतर जे आहेत ज्यांच्या टेंडरची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे असे फार अपवाद आहेत बाकी ८०-९०% प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. ज्या २-४ टेंडर राहिलेल्या आहेत त्याच्या मागे गोषवारा आहेत त्याच्यात नमूद आहे पूढील टेंडर पक्रिया पूर्ण होईपर्यत मूदतवाढ देण्यात आलेली आहे ह्या शिवाय कूठले असतील आपल्याकडे यादी आहे आणि प्रशासनाकडून कारवाई करायची राहिली असे जर कोणत्या सन्मा. सदस्यांचे असतील की प्रशासनाच्या नजरेतून सूटले आहे आणि आपल्याकडे माहिती आहे ते ही द्यावे तो मुद्दा तपासून बघतो कुठले नजरचूकीने राहीले आहे आणि आणखी काय कमतरता असेल हे तपासून कारवाई करण्यात येईल.

मा. महापौर:-

मला असे वाटते प्रशासनाने असे ठरवले आहे की मुदतवाढ न देता पूढील कारवाई ते करणार आहेत तर ह्या विषयावर आणखी चर्चा न करता पूढील विषय घ्यावा.

(सदरचा विषय तहकुब करण्यात आला.)

नगरसचिव:-

प्रकरण क्र. ९८, आरक्षण क्र. 364 बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

अनिल भोसले:-

मा. महापौर मॅडम आरक्षण क्र. ३६४ मध्ये जी घर तोडली गेली आहेत त्यामध्ये दि. २०.८.२०२१ रोजी खांबित साहेबांनी एक पत्र दिले आहे त्या पत्राचा खुलासा पाहिजे.

दिपक खांबित:-

मा. महापौराच्या परवानगीने आरक्षण  नगररचना ताब्यात घेते आरक्षणाच्या मोकळया जागा ताब्यात घेते ह्याच्यामध्ये ७/१२ उताना महानरगपालिकेच्या नावावर केला त्यावेळी माझ्याकडे जेव्हा विषय आला त्यावेळी त्याच्यावर झोपडया झाल्या होत्या. त्यामूळे मी पत्र दिले की ह्या झोपडया काढून घ्या आणि मग आपण ताबा घेवू.

अनिल भोसले:-

विकासकांनी २०१७ ला टॅक्स लाईट पाणी असताना प्रशासनानी कोणतीही कारवाई केली नाही. विकासकांना मोबदला देण्यासाठी कारवाई झाली असेल असे त्या परिसरातील लोकाचे मत आहे. ह्या बद्दल आपले काय मत आहे.

मारूती गायकवाड:-

मा. महापौर, मा. आयुक्तांच्या परवानगीने २०२० मध्ये जी कारवाई झाली आहे ती दैनदिन कारवाई संबधीत होती सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे सन्मा. सभागृहाने २०११ रोजी ठराव केला आहे त्या ठरावाच्या अनुशंगाने आरक्षणाच्या जागेवर अनधिकृत बांधकाम हटवण्याबाबत धोरण पारित झालेले आहे. सदर धोरणानुसार आरक्षण क्र. ३६४ येथील अतिक्रमण निश्काषित करण्याची कारवाई प्रशासनामार्फत करण्यात आलेली आहे मुद्दा क्र. २ त्या जागेवर कधी अतिक्रमण झाले त्याचे गुगल मॅप माझ्याजवळ आहेत अतिक्रमण डिसें. २०१९ पासून अतिक्रमण झालेली आहेत त्याचे गुगल मॅप माझ्या जवळ आहेत ते मी संबधीत सदस्यांना हयाठिकाणी दाखवतो.

अनिल भोसले:-

मा. महापौर मॅडम २०१९ मध्ये गुगल मॅपमध्ये दिसत आहेत तर २०१७ मध्ये ७० लोकांचे टॅक्स कसे लागले ?

मा. महापौर:-

साहेब सभागृहाला चूकीची माहिती देवू नका. त्याचे म्हणणे आहे २०१७ ला टॅक्स लागले म्हणजे प्रशासनाने तिकडे काही नसताना आधीच टॅक्स लावले का ? चूकीची माहिती सभागृहात दिली जाते.

मारुती गायकवाड:-

२०१९ चे गुगल मॅप आहेत.

मा. महापौर:-

२०१७ ला टॅक्स लागले ते खोटे आहे का

मारूती गायकवाड:-

ही जागा २०१९ मध्ये मनपाच्या ताब्यात आली आहे. २०२० मध्ये त्या जागेवर अतिक्रमण झाले आहेत

मा. महापौर:-

त्यांचे म्हणणे आहे तिथे झोपडपट्टीला टॅक्स लागलेला आहे.

मा. आयुक्त:-

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो पहिल्यांदा किती घराना टॅक्स लागला ती घर कोणत्या तारखेची होती हा एरिया बराच मोठा आहे. पैकी आपण ६४ फूट मनपाचा निष्काशित केलेला हा एरिया

सोडून इतर ठिकाणी अजून आजूबाजूला चाळ आणि झोपडया आहेत तर सन्मा. सदस्य जो उल्लेख करत आहेत २०१७ ला टॅक्स लागला पहिल्यांदा टॅक्स आणि अतिक्रमण विभाग त्यांच्याकडे जे पूरावे आहेत २०१७ ला कोणती घर होती आणि आपण निष्काशित केलेली त्या घराच्या बाबतीतच बोलत आहोत की आजूबाजूला जी घर आहेत त्याबाबत बोलत आहोत ह्याची खातरजमा करावी म्हणजे दोन्ही बाबी जम्बलींग होणार नाही.

अनिल भोसले:-

अतिक्रमण विभाग तसेच नगररचना विभागाला पूर्ण बंच दिलेला आहे त्यामध्ये टॅक्स लाईट पावती जी तोडलेली घर आहेत त्याठिकाणचे डॉक्यूमेंट आपल्याकडे सादर केलेले आहे. त्यामूध्ये दूसरे पत्र आहे त्याठिकाणचे कागदपत्र शहानिशा करण्यासाठी पालिकेनी २०२१ मध्ये पत्र दिले होते. दिनेश शहा म्हणून आहेत त्यांनी १० वर्षापूर्वी.............

मा. महापौर:-

आता नक्की तिथे काय करायचे त्या ठिकाणी काय करायला पाहिजे.मनपानी आरक्षण आपल्या ताब्यामध्ये घेतलेले आहे ७/१२ मनपाच्या नावाने होता तो त्यांनी ती जागा आपल्या ताब्यात घेतलेली आहे. बाकीचे जे नागरिक आहेत त्याच्या संदर्भात तुम्हाला चर्चा करायची आहे त्या नागरिकांना काय मोबदला दिला पाहिजे त्या संदर्भात चर्चा करायची आहे.

अनिल भोसले:-

मा. महापौर मॅडम २/१/२०१२ रोजीचा जो जी आर आहे त्या अनुशंगाने मनपानी आपल्याला पत्र दिले आहे शासनाचा जो जी आर आहे त्याप्रमाणे ज्या लोकांची घर तूटलेली आहेत आणि जे कायद्यामध्ये बसतात आणि त्यांना घर मिळत नाही तोपर्यंत विकासकाला टी डी आर देवू नये अशी माझी मागणी आहे.

मा. महापौर:-

सन्मा. नगरसेवक आपण जे म्हटले त्याच पध्दतीने ७/१२ उता-यावर जो मूळ मालक आहे त्या मूळ मालकांनी सुध्दा मनपाला किंवा त्या विकासकाला संबधीत पत्र दिलेले नसेल तर मनपा किंवा नगररचना विभाग त्या विकासकाला टी डी आर कसा देणार देवू शकत नाही.

अनिल भोसले:-

धन्यवाद

मा. महापौर:-

सभागृहाकडे आरक्षण क्र. ३६४ चा ठराव आहे.

निलम ढवण:-

हा विषय इथल्या आरक्षणावर अनधिकृत बांधलेली घर तोडल्यानंतर हा विषय इथे आला आहे. खरतर हा विषय तिथल्या स्थानिक लोकांनी तिथे अनधिकृत झोपडया बांधत असताना तो विषय घेतला पाहिजे होता आणि त्याच वेळी आणि त्या झोपडया तिथेच तोडल्या पाहिजे होते अशा प्रकारे झोपडया बांधून त्याच्यावर गुन्हा नोंदवायचा त्यांना पून्हा संरक्षण द्या, त्यांना घर द्या सगळया गोष्टी त्यांना द्यायच्या लाईटचे कनेक्शन मिळते, पाण्याचे कनेक्शन मिळते ह्या सर्वामध्ये मनपाचे किती नूकसान आहे ह्याचा कोणी विचार केला का?

मा. महापौर:-

ज्यावेळेला तिकडे बांधकाम होतात त्यावेळी ह्या प्रभाग अधिका-यांनी तिथे जावून काम करायला पाहिजे त्यांचे कर्तव्य नाही का ?

निलम ढवण:-

झोपडी अनधिकृत आहे तर एखाद्या नगरसेवकांनी अनधिकृत बांधकाम पाठीशी घालायचे म्हटले तर त्यांचे दूसरे काही निघू शकते.

मा. महापौर:-

एवढे ठामपणे बोलता नगरसेवकांचे नाव तर सांगा.

निलम ढवण:-

होतात ना असे.

मा. महापौर:-

माझे काय म्हणणे आहे आयुक्त साहेबांचे पत्र आहे अनधिकृत बांधकाम नाही व्हायला पाहिजे.

निलम ढवण:-

लोकांनी दिलेल्या लोकांच्या पैशातून प्रत्येक वेळेला बांधकाम तयार होतात झोपडपट्टीतल्या लोकांना आपण पर्यायी जागेची व्यवस्था करतो प्रत्येक जण आपआपल्या वॉर्डात हेच करत राहतो.

मा. महापौर:-

प्रभात ताई मॅडमनी ज्या सुचना केल्या आहेत तसेच आमच्या स्थानिक नगरसेवकांनी प्रशासनाला सुचना आहेत ज्या ज्या ठिकाणी तुम्हाला अशा प्रकारचे अनधिकृत बांधकाम दिसेल ते तातडीने तोडावे तुम्हाला आताचे बांधकाम जास्त सोप पडेल परंतू तुम्ही पूर्वीची बांधकाम तोडायला जाता असे न करता आताची सर्व बांधकात थांबवा.

निलम ढवण:-

महापौर मॅडम आणि आयुक्तसाहेब तुम्हाला अजून एक विनंती आहे की असा ठराव करा की ह्याच्यानंतर अशी कूठेही अनधिकृत घर झाली किंवा झोपडपट्टी झाली तर त्यांना पर्यायी व्यवस्था आम्ही करून देणार नाही. असा ठराव करा.

मा. महापौर:-

बरोबर आहे. आरक्षणाच्या जागेवर झोपडया बांधलेल्या आहेत.

निलम ढवण:-

विकास होतो आणि सर्व गोष्टी वाढत चालल्या आहेत शहर दिवसे दिवस विद्रूप होत चाललेले आहे. आणि शहराचे नूकसान देखील होत आहे.

गिता जैन:-

एखाद्या आरक्षणाबद्दल तुम्ही बोलतच नाही जे झाले त्याला आपण काही करू शकत नाही कोणाचीही मिस्टेक सांगा मग आपल्या नगररचना विभाग कमिशनर साहेब आपल्याला आठवण असेल आरक्षण क्र. १२२ मध्ये जेव्हा सन्मा. बाळासाहेब ठाकरे कलादालनासाठी जेव्हा खाली करून घ्यायची होती तेव्हा आपल्या लक्षात आले की जेव्हा टी डी आर दिला गेला तेव्हा ही घर तिथेच होती म्हणजे आपण टी डी आर ही देतो आणि त्यांना दूसरे घर ही देतो हे मनपाचे डबल नुकसान होते किंवा आपण बोलतो की मनपाकडे पैसे नाही आणि मग हे सगळे चालले आहे हा आरक्षण क्र. १२२ चा विषय नाही तुमच्या लक्षात आले आहे जेव्हा जेव्हा नगररचना विभागाने टी डी आर दिला आहे तेव्हा त्याची शहानिशा केली नाही की तो प्लॉट खाली आहे किंवा नाही झोपडे झाले झोपडे नाही होवून द्यायचे होते ही नंतरची गोष्ट आहे पण मनपाचा डबल खर्च होवू नये ह्याची खबरदारी अधिका-यांनी घ्यावी असे मला वाटते १-२ प्रकरण माझ्या लक्षात आले की टी डी आर आपण दिला आहे आणि ती जागा मोकळी नसते. म्हणजे कोणाच्या दबावाखाली किंवा कोणत्या परिस्थितीत आपण देतो त्याबद्दल मी काही सांगू इच्छित नाही. पण आता जे काही शहरात झाले आहे जे झोपड वाढते ते बांधलेले दूसरा असतो आणि तो तिस-याला विकून जातो आणि तिस-याला माहित नसते की ही जागा आरक्षित आहे किंवा नाही ही जबाबदारी आपल्यावर असते की त्या झोपडयाचा पहिला बांबू लागला की बांधून द्यायचे नाही की आपल्या आरक्षणाचा तिथे प्लॉट आहे ती जबाबदारी आपली असते. ह्याच्यात सांगितले आहे की मोकळा करून द्या. मग आता तुम्ही सांगता आता लेटर दिले पहिले लेटर दिले ही सर्व लपवा लपवीची गोष्ट जावू द्या आपल्याकडून ही दक्षता घेतली गेली नाही की टी डी आर देताना तो प्लॉट

मोकळा करावा. १२२ चे पण एक्झाम्पल म्हणून दिले आणि ते आपण  लोकांनी एकत्र मिळून घर ही त्यांना दिले आणि त्याच्या टी डी आरचे प्रोसेस आता करायला लागले पण तेव्हाच्या नगररचनाचा डी पी आहे. आता ही कितीतरी आरक्षण आहेत तिथेही झोपडपट्टी झालेली आहे. ते आपण बघत नाही. मग आपण एखादा प्रोजेक्ट आपण करायला जातो तेव्हा प्रश्न हा असतो की त्यांना घर कूठे द्यायची हा भार आपल्या मनपावर पडतो. जेव्हा जेव्हा झोपडपट्टी वाढते तेव्हा अनधिकृत घराचा मनपावर भार येत असतो. इनलिगल लाईट घ्यायचा त्याचा पण भार आपल्यावर येतो आणि आपल्याला तिकडे काय प्रोजेक्ट करायचे आहे तर त्यांना रिकमंडेशन कूठे करायचे रि लोकेट कूठे करायचे आहे हा पण भार आपल्यावर येतो. महापौर मॅडम आपल्यालाही माहित आहे असा ठराव नक्कीच करा की ज्या ज्या प्रभागात असे काही घडले असेल त्या त्या प्रभाग ऑफिसर पालन करत नाही त्याच्यावर ॲक्शन घ्या. असा निर्णय घ्यायला पाहिजे तसेच नगररचना विभागाला तेव्हाच जबाबदार ठरवा जेव्हा टी डी आर देताना बाऊड्री नाही आणि कमी जागा दिलेली आहे ते सत्य दिले नसेल तर त्या अधिका-यावर कारवाई करा.

मिरादेवी यादवः-

मिरा भाईंदर महानगरपालिका मंजूर विकास योजनेत मौजे काशी येथील आरक्षण क्र. 364 उद्यानासाठी राखीव आहे. सदर आरक्षण 4 हजार 500 चौ.मी. आहे. सदर आरक्षणाची मोठ्या क्षेत्राची जागा महापालिकेच्या नावे झालेली असून उर्वरीत जागेतील बांधकामाची खात्री करुन त्यांना योग्य मोबदला देवून त्यानंतर सदर जागा रिकामी करुन घ्यावी. सदर आरक्षणात सध्या बांधण्यात आली असून उद्यानासाठी पंम्पींग, स्टेम, सुरक्षा रक्षक केबीन इ. साठी 46 लाख रु. खर्च अपेक्षीत आहे. तरी सदर खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

जुबेर इनामदारः-

आर्थिक प्रशासकीय मान्यता कशाला देता. आमचा ह्या ठरावाला विरोध आहे.

गिता जैनः-

आर्थिक प्रशासकीय मान्यता कशासाठी घेता.

मा. महापौरः-

सन्मा. मिरादेवी यादव मॅडमनी काय म्हटलेले आहे की मनपानी आरक्षणाची जागा मोकळी केली तिथे ज्या झोपडया होत्या त्या काढल्या त्या लोकांना बेघर केले आता ती जागा मोकळी आहे. प्रशासनानी तिथे कुंपन भिंत नाही घातली तर तिथे झोपडया होणार नाहीत ह्याची गॅरेन्टी कोण देईल. तिकडे काय नगरसेवकांनी जावून बसायचे. मग प्रशासनानी कुंपन भिंत घालायलाच पाहिजे. कुंपन भिंत घातल्यानंतर तिथे उद्यानसुध्दा करायला लागेल तुम्ही उदयानासाठी झोपडया तोडल्या आहेत ना की विकासकाला टी डी आर देण्यासाठी झोपडया तोडल्या जागा आरक्षणाची होती मनपाला ते आरक्षणाचा प्रश्न होता. कुंपन भिंत कोणी घातली.

दिपक खांबितः-

मा. महापौराच्या परवानगीने बोलातो त्या जागेत ऑलरेडी कुंपन भिंत घातलेली आहे. ३६०० स्केवअर फिट जागा ताब्यात आली आहे त्याच्यात पाथवे करायचा आहे. पाण्याची टाकी आण वॉचमन एवढ काम करायचे आहे. पून्हा तिथे अतिक्रमण होणार नाही आणि ते गार्डन सूरू होवून जाईल.

जुबेर इनामदारः-

प्रशासनाने त्याचा गोषवारा द्या. ह्याला आमचा विरोध आहे. अशाप्रकारे घेता येतात का

मा. आयुक्तः-

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो आपण ह्या ठिकाणी ३६०० स्केवअर मिटरची जी जागा रिकामी केली त्याठिकाणी संबधीत विकासकानी कम्पाऊड वॉल घालून ग्रिल मारलेली आहे. परंतू आणखी ह्यात लेट होत गेले तर पून्हा झोपडया होतील पून्हा प्रशासनावर आरोप प्रत्यारोप होतील

आणि संबधीत स्थानिक लोकप्रतिनिधीवर आरोप होतात. ह्यात सर्वात महत्वाचे म्हणजे तुम्ही जागा खाली केली त्याठिकाणी जे रिझर्व्हेशन आहे ते गार्डन डेव्हलपमेंट आहे, सिक्यूरिटी केबीन आहे हे जरी केली तरी आपण आगामी २-३ महिन्यात आपण गार्डन आपल्या उपयोगात योवू शकते आणि एकदा गार्डनचा वापर सूरू झाल्यानंतर त्याठिकाणी झोपडपट्टी होणार नाही. आणि मनपाच्या नावावर ७/१२ उतारा असलेली जमिन आणि ताब्यात आलेल्या जमिनीवर पुन्हा अतिक्रमण होवू नये म्हणून काळजी घेण्यासाठी म्हणून हा ठराव आणलेला आहे. एवढया जागा खाली झालेल्या आहेत त्या जागेचा परत गैर वापर करून झोपडपट्टी होवू नये ह्या उद्देशाने त्याठिकाणी गार्डन डेव्हलपमेंट आणि सिक्यूरिटीची केबीन ह्यासाठी हा गोषवारा दिलेला आहे. आज ना उदया त्याला प्रशासकीय मान्यता देणे आहेच. जर आपण जेवढे लेट करतो पून्हा एकदा चाळ झाली तर जबाबदारी प्रशासनाची येते आणि स्थानिक नगरसेवकांची पण येते नविन कायदयात जी अमेंटमेट आली आहे सर्व नगरसेवकांना विनती आहे की स्थानिक तिथला जो वॉर्ड ऑफिसर आहे त्याच्याबरोबर नगरसेक पण इक्वल रिस्पॉन्सिबल आहे ह्याची नोंद घ्यवी जी कायदयात तरतूद आहे.

मा. महापौर:-

आम्ही जबाबदारी घेणनगरसेवकांना तिथे पगार देवून बसवा.

मा. आयुक्त:५

माझी नम्र विनंती आहे ह्याचबरोबर फुटबॉलचे मैदान लोकनेते गूपीनाथ मुंडे कॉम्पलेक्सच्या बॅकसाईडला सुध्दा खाली केलेले आहे त्याठिकाणी डेव्हलपमेंट सूरू केली कंम्पाऊड वॉल बांधली ते काम ३-४ महिन्यात केले तर आपल्या शहराला अदयावत फुटबॉलचे मैदान होईल त्याठिकाणी जवळपास २०-२५ गाळे झोपडया असे मिळून ३५-३६ स्ट्रक्चर होते हे प्रशासनाने तोडलेले आहेत. आणि त्या ठिकाणचे जे फूटबॉल ग्राऊड आहे ते लवकरच मिरा भाईदर नागरिकांना उपलब्ध होईल म्हणून आपल्याला विनंती आहे जो आता ठराव आणला आहे तो आणण्याचा उद्देशच तो आहे अन्यथा अजून २-४ महिने निघून गेल्यानंतर बजेट आहे आचार संहिता लागेल इतर कूठल्या अडचणी आल्या तर पून्हा तिथे चाळी आणि झोपडी होतील तयामूळे विनंती अशी आहे.

मा. महापौर:-

आम्ही जबाबदार राहणार नाही आताच सांगतो. ह्या महासभेमध्ये ठणकावून सांगते तुम्ही ते ताब्यात घ्या. आरक्षणाच्या जागा तुमच्या ताब्यात आल्या नाहीत त्याठिकाणी आता लोक राहतात त्यांना नाहक त्रास द्यायला जावू नका. एकतर आरक्षणची जागा तुमच्या नावावर चढवा आणि मग त्या विषयावर कारवाई करा. आता जी जागा तुमच्या ताब्यात आलेली आहे तिला कम्पाऊड वैगेरे घालून रितसर उद्यान करायचे ते करा. तिकडे काय झाले तर मी नगरसेवक म्हणून दोषी राहणार नाही असे मी ह्या महासभेत सांगते सर्व चॅनलवाले पत्रकार ह्यांना मी उत्तर द्यायचे का ? मिरादेवी यादव वॉड क्र. १४ काही झाले की वॉर्ड क्र.१४ तसे नाही करायचे ना अधिका-यांना काही बोलले की चालले असे नाही चालणार. प्रभाग क्र. १४ मध्ये किती त्रास आहे. गायकवाड साहेब तुमच्या प्रभाग अधिका-यांना सांगा की ज्या झोपडया होतात त्या जावून थांबवा. आम्ही दोषी नाही तरी आमची नाहक बदनामी होते. तुमचे इंजिनियर आहेत ते दूसरीकडे उड्या मारून जातात मोजमाप घ्यायला मग त्याला ते दिसत नाही का ? ह्या महासभेमध्ये बोलते ना की अनधिकृत बांधकाम थांबवा गेल्या वेळेला सुध्दा बोलली होती तरी सुध्दा झाले. मला तरी बोला तुम्हीच काम करा. आम्ही रात्रपाळी करतो. तुमच्या अधिकारात तुम्ही करा आम्ही काय करणार ? नगरसेवक दोषी आहे पण नगरसेवकांच्या हातात काय आहे. जे सी पी हातोडा घेवून आम्ही तोडायला जायचे का ? तुम्ही बघा आणि तुम्ही तुमच्य अधिका-यांना करायला सांगा.

जुबेर इनामदार:-

आयुक्तांनी चांगले निवेदन केले आहे. की अशाप्रकारे अतिक्रमण वाचवण्यासाठी बाकीची सोयीसुविधा केली पाहिजे. आयुक्त महोदय तुमचा उद्देश चांगला आहे. पण ह्या विषयावर तुमचा गोषवारा नाही तुमची टिप्पनी आलेली आहे. अशाप्रकारे टिप्पनी खराब केलेले आहे ठरावाला आम्ही मान्यता दिली तर परत पायंडा पडेल.

मा. महापौर:-

सन्मा. सदस्य जुबेर इनामदारजी हा विषय पुढच्या महासभेत विषय पटलावर आणू. तोपर्यत तिथे कूठल्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही ह्याची दक्षता अधिका-यांनी घ्यावी पण आरक्षणाच्या व्यतिरिक्त जी जागा आहे त्याला तुम्ही हातही लावणार नाही कारण ती जागा तुमच्या ताब्यात आलेली नाही नागरिकांना नाहक त्रास देवू नका.

(सदरचा विषय पुढच्या मिटींगमध्ये घेण्याचे ठरले.)

नगरसचिव:-

प्रकरण क्र.१००, महापालिकेच्या काही विभागात निविदा न काढता ठेका पध्दतीने मजुर व कर्मचारी घेणेकरीता ठराविक ठेकेदारांना प्रशासनाने चुकीच्या पध्दतीने मजुर व कर्मचारी पुरवठा करण्याचे कार्यादेश दिलेले आहेत, सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत निर्णय घेणे.

सुजाता पारधी :-

मिरा भाईंदर महापालिकेच्या विविध विभागात निविदा प्रक्रिया करुन कर्मचारी / मजुर पुरवठा केला जातो. परंतु पालिकेच्या वृक्षप्राधिकरण विभागात व अतिक्रमण विभागात मजुर घेणेकरीता निविदा न मागविता इतर विभागातील मंजुर दरात ठराविक ठेकेदाराकडून मजुर पुरवठा करणेस कार्यादेश देण्यात आलेले आहेत. पालिकेच्या इतर विभागात कमी दरात मजुर पुरवठा करण्याचे दर मंजुर असुनही त्या ठेकेदाराकडून मजुर न घेता जास्त दर असलेल्या ठेकेदाराकडून मजुर पुरवठा केल्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच सदर कामाला सक्षम प्राधिकरणाची मंजुरी नसतानाही देयक अदा केलेले आहे.

महापालिकेत कर्मचारी पुरवठा करण्याची प्रत्येक निविदा किमान वेतन कायद्याप्रमाणे किमान वेतनात देय असलेली रक्कम मंजुर केली जाते व त्याप्रमाणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. निविदा धारकास कर्मचाऱ्यांना देय असलेले PF, ESIC, किमान वेतन इ. लाभ देणे बंधनकारक आहे. नियमाप्रमाणे शासकीय भरणा केल्यानंतर त्याच्या पावत्या प्रशासनाकडे जमा केल्यानंतर निविदा धारकास देयक अदा करणे आवश्यक असताना प्रशासनामार्फत या सर्व बाबींचा तपास न करता निविदा धारकास देयके अदा केली जातात.

सबब, मा. आयुक्त यांनी महापालिकेच्या सर्व कर्मचारी पुरवठा करणाऱ्या निविदांची चौकशी करुन दोषी निविदा धारकांना व देयक अदा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व आजपासुन सर्व ठेक्यावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा पगार त्यांच्या स्वत:च्या बँक खात्यात जमा करण्यात यावा व फक्त सर्विस चार्ज निविदा धारकास देण्यात यावा.

तसेच महापालिकेचे आर्थिक नुकसान व नियमबाह्य केलेले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करुन त्यांना निलंबित करावे व महापालिकेचे आर्थिक नुकसान केल्याने त्यांचेवर गुन्हा दाखल करणेस ही सभा मान्यता देत आहे.

निलम ढवण:-

प्रकरण क्र. ९९ चा विषय राहिला.

मा. महापौर:-

प्रकरण ९९ ही टिप्पनी आहे.

जुबेर इनामदार:-

त्याच्यावर ठराव केला आहे. लेखापरिक्षकावर गुन्हा दाखल करा.

मा. महापौर:-

त्याच्यावर कसा गुन्हा दाखल होईल. ही टिप्पणी आहे.

जुबेर इनामदार:-

टिप्पनीवर ठराव केला आहे ना.

मा. महापौर:-

तुम्हा ठराव मांडा ना ऑडिटर वर कशाला गुन्हा दाखल होईल. ह्याच्यावर तुमचे मत काय आहे.

निलम ढवण:-

ठराव का केला.

मा. महापौर:-

तुमचे मत काय आहे.

प्रशांत दळवी:-

मा. महापौर मॅडम ६.०० वाजायला आले आहेत पूढचे विषय आहेत

मा. महापौर:-

१०० नंबर विषयावर काय करणार.

जुबेर इनामदार:-

तुम्ही टिप्पनीवर ठराव केला आहे.

मा. महापौर:-

ठीक आहे.

निलम ढवण :-

मागच्या वेळी ठेका पध्दतीने घ्या किंवा डायरेक्ट घ्या कर्मचारी घेताना स्थ्रानिक लोकांना प्राधान्य दया. वेळोवेळी सांगितले आहे.

**प्रकरण क्र. 100 :-**

महापालिकेच्या काही विभागात निविदा न काढता ठेका पध्दतीने मजुर व कर्मचारी घेणेकरीता ठराविक ठेकेदारांना प्रशासनाने चुकीच्या पध्दतीने मजुर व कर्मचारी पुरवठा करण्याचे कार्यादेश दिलेले आहेत, सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत निर्णय घेणे.

**ठराव क्र. 79 :-**

मिरा भाईंदर महापालिकेच्या विविध विभागात निविदा प्रक्रिया करुन कर्मचारी / मजुर पुरवठा केला जातो. परंतु पालिकेच्या वृक्षप्राधिकरण विभागात व अतिक्रमण विभागात मजुर घेणेकरीता निविदा न मागविता इतर विभागातील मंजुर दरात ठराविक ठेकेदाराकडून मजुर पुरवठा करणेस कार्यादेश देण्यात आलेले आहेत. पालिकेच्या इतर विभागात कमी दरात मजुर पुरवठा करण्याचे दर मंजुर असुनही त्या ठेकेदाराकडून मजुर न घेता जास्त दर असलेल्या ठेकेदाराकडून मजुर पुरवठा केल्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच सदर कामाला सक्षम प्राधिकरणाची मंजुरी नसतानाही देयक अदा केलेले आहे.

महापालिकेत कर्मचारी पुरवठा करण्याची प्रत्येक निविदा किमान वेतन कायद्याप्रमाणे किमान वेतनात देय असलेली रक्कम मंजुर केली जाते व त्याप्रमाणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. निविदा धारकास कर्मचाऱ्यांना देय असलेले PF, ESIC, किमान वेतन इ. लाभ देणे बंधनकारक आहे. नियमाप्रमाणे शासकीय भरणा केल्यानंतर त्याच्या पावत्या प्रशासनाकडे जमा केल्यानंतर निविदा

धारकास देयक अदा करणे आवश्यक असताना प्रशासनामार्फत या सर्व बाबींचा तपास न करता निविदा धारकास देयके अदा केली जातात.

सबब, मा. आयुक्त यांनी महापालिकेच्या सर्व कर्मचारी पुरवठा करणाऱ्या निविदांची चौकशी करुन दोषी निविदा धारकांना व देयक अदा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व आजपासुन सर्व ठेक्यावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा पगार त्यांच्या स्वत:च्या बँक खात्यात जमा करण्यात यावा व फक्त सर्विस चार्ज निविदा धारकास देण्यात यावा.

तसेच महापालिकेचे आर्थिक नुकसान व नियमबाह्य केलेले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करुन त्यांना निलंबित करावे व महापालिकेचे आर्थिक नुकसान केल्याने त्यांचेवर गुन्हा दाखल करणेस ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्रीम. सुजाता पारधी अनुमोदक :- श्रीम. विविता नाईक**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र.१०१, परिवहन उपक्रमात कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणेकामी अवलंबिलेली पध्दत इतर विभागात नियुक्त करताना अवलंबिली जात नाही याबाबत विचार विनीमय करणे.

मा. महापौर:-

प्रशासनाने परिवहन उपक्रमामध्ये कर्मचा-याची नियुक्तिच अशी केलेली आहे ती पध्दत राहू दे तशी इतर विभागात नियुक्ती करतांना ही पध्दत अवलंबवावी इतर विभागात सुध्दा अंमलबजावणी करावी.

(सदरचा विषय तहकुब करण्यात आला.)

नगरसचिव:-

पकरण क्र. १०२, कोविड कालावधीमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेतील काम केलेल्या कर्मचाऱ्यांना कोविड भत्ता देणेबाबत.

प्रशांत दळवी :-

मिरा भाईंदर महापालिकेच्या काही कर्मचाऱ्यांनी कोविड कालावधीमध्ये आपला जीव धोक्यात घालून कोविड रुग्णांच्या उपचाराकरीता, लसीकरण, कोविड तपासणी आदी कामे केलेली आहेत. या सर्व कर्मचाऱ्यांना कोविड कालावधीत केलेल्या कामाचा मोबदला म्हणून कोविड भत्ता देणे आवश्यक आहे.

मिरा भाईंदर महापालिका प्रशासनाने महाराष्ट्रातील इतर महापालिकांमधील कर्मचाऱ्यांना कोविड भत्ता दिलेला असल्यास त्याची माहिती घेवून आपल्या महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना कोविड भत्ता देणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करावा.

गणेश भोईर:-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार:-

खरोखर ह्या लोकांना कोव्हिड भत्ता दिला पाहिजे.

प्रशांत दळवी:-

तुमच्या मताशी सहमत आहे.

निलम ढवण:-

वेळोवेळी भत्ता देण्यासंदर्भात महासभेमध्ये चर्चा झाली तसेच विनंती केलेली आहे त्यात प्रॉब्लेम काय आहे.

प्रशांत दळवी:-

इतर मनपामध्ये कोव्हिड भत्ता देण्यात आला त्यासंदर्भात माहिती घेवून प्रस्ताव पूढील मलासभेत सादर करा.

मा. महापौर:-

कोव्हिड संदर्भामध्ये सर्व नगरसेवकांचे म्हणणे होते की आपल्या सर्व कर्मचा-यांने काम केलेले आहे, जीव धोक्यात घालून काम केलेले आहे तर त्यांना त्यांचा मोबदला भेटला पाहिजे. आज आपल्याकडे परिस्थिती नियंत्रणात आहे म्हणून काही वाटत नाही परंतू अशीच परिस्थित असती तर आपल्याला त्याच कर्मचा-याची गरज लागली असती त्याच्याकडूनच काम करून घेतले असते. अशा परिस्थितीत इतर मनपानी भत्ता दिलेला असेल ह्या बाबतीमध्ये आपल्याला काही माहिती असेल तर प्रशासनाने मागवावी. कोव्हिड भत्त्यासाठी  बजेटमध्ये आर्थिक तरतूद करायची आहे. माहिती आल्यावर तरतूद करा.

गिता जैन:-

महापौर मॅडम मला कोव्हिड भत्त्याविषयी बोलायचे आहे. भत्त्यासाठी प्रशासनानी ठरवायचे आहे की आपल्याकडे हेल्थ वर्कर होते आणि त्यांना एवढा भत्ता द्यायचा आहे दरवेळी आपण हे सांगतो की दूस-या मनपानी काय दिले आपला निर्णय आपण घ्या की आपल्याला द्यायचे आहे आपण बोलतांना सगळेच बोलतो हो त्यांना द्यायला पाहिजे समजा मुंबई मनपानी नाही दिले ठाणे मनपानी नाही दिले तर आपण देणार नाही का ? ही भुमिका पहिली स्पष्ट करा. आपण दूस-या मनपाचे बघतो पण दूस-या मनपानी करमाफीसाठी अनुदान मागितले नाही ते ही फॉलो करा.

मा. महापौर:-

काय मॅडम तुम्ही आजच्या आज थकले तुम्ही ग्वाही दिली आहे. तुम्ही माघार घेतली. मा. मुख्यमंत्री साहेब इतके चांगले आहेत ते देतील तुम्ही मागून तर बघा.

निलम ढवण :-

तुम्ही गेले तर अजून देतील.

मा. महापौर:-

मी माझी आमदार मॅडम आणि सरनाईक साहेब ह्याच्या सोबत गटनेते, विरोधी पक्षनेते, उपमहापौर, सभागृह नेते, मा. आयुक्त, संबधीत विभागाचे अधिकारी सगळयांना घेवून मा. पालकमंत्री साहेब आणि मा. मुख्यमंत्री साहेबाकडे जाणार आणि सांगणार की आमच्या मिरा भाईदर मनपाला सुध्दा टॅक्स माफी करा. मॅडम मी तुमच्या सोबत आहे तुम्ही टेंशन घेवू नका.

**प्रकरण क्र. 102 :-**

कोविड कालावधीमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेतील काम केलेल्या कर्मचाऱ्यांना कोविड भत्ता देणेबाबत.

**ठराव क्र. 80 :-**

मिरा भाईंदर महापालिकेच्या काही कर्मचाऱ्यांनी कोविड कालावधीमध्ये आपला जीव धोक्यात घालून कोविड रुग्णांच्या उपचाराकरीता, लसीकरण, कोविड तपासणी आदी कामे केलेली आहेत. या सर्व कर्मचाऱ्यांना कोविड कालावधीत केलेल्या कामाचा मोबदला म्हणून कोविड भत्ता देणे आवश्यक आहे.

मिरा भाईंदर महापालिका प्रशासनाने महाराष्ट्रातील इतर महापालिकांमधील कर्मचाऱ्यांना कोविड भत्ता दिलेला असल्यास त्याची माहिती घेवून आपल्या महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना कोविड भत्ता देणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करावा.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी		अनुमोदक :- श्री. गणेश भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव:-

प्रकरण क्र. 103, सन्मा. सदस्य श्री. अनिल दिवाकर सावंत यांचा दिनांक 19/01/2022 रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरारोड शांती नगर व शांती पार्क गृहसंकुलाच्या रेखांकनातील मोकळ्या जागा (R.G.) जागा देखभाल दुरुस्ती करणेकरीता विकासका बरोबर झालेला करारनामा मनपाने रद्द करुन जागा पुन्हा विकासकाच्या ताब्यात दिलेबाबत आक्षेप.

दिप्ती भट:-

मॅडम आपल्या अध्यक्षतेखाली आम्ही १५ तारखेला मिटींग घेतलेली.

जुबेर इनामदार:-

ज चा प्रस्ताच अनिल सावंतचा आहे त्यांना बोलू द्या.

दिप्ती भट:-

में कहॉ मना कर रही हूॅ महापौर मॅडम दोन मिनिट बोलू दे आयुक्त साहेबांना पण माहित आहे की १५ तारखेच्या मिटींगमध्ये ठरले आणि आम्ही तुम्ही गेल्या मिटींगमध्ये रितसर गोषवारा घेवून हा विषय पटलावर आणण्यासाठी भेटायला आलो होतो आम्हाला असे वाटते आम्हाला टाकून दिले आहे. आमचा विषय गोषवा-यामध्ये घेण्यासाठी पत्र दिले होते ७ नगरसेवकांनी पत्र दिले आहे पण तो विषय आला नाही त्या विषयासाठी आम्हाला पाच मिनिट बोलायला द्या आम्ही सकाळपासून हात वर करतो.

मा. महापौर:-

तुम्ही शांतपणे बोला. तुम्ही बोललात काय किंवा अनिल सावंत बोलले काय दोन्ही विषय एकच आहे. तुम्ही वेगवेगळया पक्षाच्या माध्यमातून बोलत आहात का? तुम्ही एकाच विषयावर बोलता तर कशाला वाद घालता.

दिप्ती भट:-

महापौर मॅडम आरक्षीत जागेबाबत आपण जे अॅग्रीमेंट रद्द केले आपण १५ तारखेला मिटींग घेतलेली आयुक्तांनी सांगितले की आम्ही रितसर गोषवारा आणू आणि रितसर शासनाकडे पाठवू. चार दिवसाचे टाईम दिलेले चार दिवसात काय झाले त्याचा आम्हाला रिपोर्ट आला नाही म्हणून आम्ही रितसर शांतीनगरचा गोषवारा आणू तो विषय आम्ही तुम्हाला सांगितला आहे ह्या विषयामूळे बाहेर लोकामध्ये खूप खराब वातावरण झाले आहे त्यामूळे काय झाले आहे ते क्लियर करावे आणि तो बिल्डर सांभाळू शकत नाही. म्हणून आम्ही सकाळी सांगत होतो की हा विषय सभेच्या अगोदर घेण्यात यावा.

मा. महापौर:-

मॅडम मी तुम्हाला थांबवते सन्मा. नगरसेवक अनिल सावंतजी तुम्हाला विनंती करते पूढच्या महासभेमध्ये प्रशासनाने हा विषय विषय पटलावर आणा. गोषवारा द्या जेणेकरून महासभेला निर्णय घेणे सोयीस्कर होईल. महासभा लवकरच लागेल. अनिल सावंतजी मी तुम्हाला विनंती करते उदया २६ जानेवारी आहे. कोणाची काहीच तयारी नाही. हा विषय पहिल्या क्रमांकावर घेवू.

जुबेर इनामदार:-

मा. महापौर मॅडम सन्मा. सदस्य अनिल सावंत ह्यांनी “ज” च्या माध्यमातून दिला.

मा. महापौर:-

त्यांनी मला विचारले तर मी सांगितले घ्या.

जुबेर इनामदार:-

सदरचा प्रस्ताव हा आलेला आहे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तसेच सभाशास्त्रा नुसार गोषवारा नसेल तर तुम्ही चर्चा करू शकता. त्याचा ठरावही होवू शकतो. कारण त्याला ज च्या माध्यमातून अधिकार प्राप्त आहेत.

मा. महापौर:-

मी विनंती करते की पूढच्या महासभेमध्ये हा विषय विषय पटलावर पहिल्या क्रमांकावर घेवू आणि गोषवा-यासहीत घेवू.

प्रशांत दळवी:-

मा. महापौर मॅडम ह्यामध्ये त्याठिकाणच्या ज्या आर जी आहेत त्याबद्दल सर्व सन्मा. सदस्यांना बोलायचे आहे आणि वेळ संपत आली आहे.

जुबेर इनामदार:-

सचिव महोदय "ज" चा प्रस्ताव अनिल सावंतचा आहे. सन्मा. सदस्यांना अनम्यूट करा त्यांना ह्या विषयावर बोलायचे आहे.

मा. महापौर:-

उदया २६ जानेवारी आहे  त्याची तयारी करायची आहे. त्यामूळे मी उपमहापौर साहेबांना खुर्ची देवून जाते.

जुबेर इनामदार:-

महापौर मॅडम तसे होत नाही.

सभागृहात गोधळ

अनिल सावंत:-

सचिव साहेब आम्ही तुमच्या विरोधात तक्रार करणार

मा. महापौर:-

मी तुम्हाला विनंती केलेली आहे.

प्रशांत दळवी:-

मा. महापौर मॅडम सदरचे ज चे प्रस्ताव रितसर पूढील महासभेत घेण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

धृवकिशोरर पाटील:-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार:-

असे करता येते का सचिवांनी सांगावे.

मा. महापौर:-

"ज" च्या प्रस्तावासाठी अनिल सांवत ह्यांना पाच मिनिटाचा वेळ दिला जाईल.

अनिल सावंत:-

मिरारोड पूर्व शांती नगर संकुलाचा रेखांकनातील मोकळ्या जागा आर.जी विकासकाने विकसित करणे अपेक्षीत होते. परंतु विकासकाने तसे न केल्यामुळे ह्या जागांचा गैरवापर व अनधिकृत बांधकाम कारणांसाठी वापर झाल्याचे राज्य शासनाच्या निदर्शनास आले म्हणून राज्य शासनाने दि. 10/06/1996 रोजी परिपत्रक TBP4396/114/प्र.क्र.8996 नवि.11 व परिपत्रक दि. 30/06/2010 रोजी शासन परिपत्रक संकिर्ण क्र. 2009/955/प्र.क्र.146/नवि-20 परिपत्रक काढून सदर मोकळया जागा ताब्यात घेवून त्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याचे निर्देश स्थानिक स्वराज्य संस्थांना दिलेले आहेत.

त्यानुसार मनपाने सदर जागा ताब्यात घेऊन विकसित केल्या व त्यांची देखभाल दुरुस्ती केली आहे. मिरारोड शांतीनगर गृहसंकुलाच्या रेखांकनातील मोकळ्या आर.जी. जागेवर मनपातर्फे समाजमंदिर, उद्याने विकसित करणे, झाडे लावणे, सुलभा शौचालय बांधणे, प्रवेशद्वार बांधणे, क्रिकेट, व्हॉलीबॉल, फुटबॉल व इतर खेळांकरीता सोयीसुविधा उपलब्ध करणे, जॉगींग ट्रॅक बनविणे, पंप हाऊस बांधणे, हायमास व इतर दिव्यांची सोय करणे, कुंपणभिंत बांधणे, स्टेज बांधणे इत्यादीसाठी करोडो रुपयांचा खर्च सन 2007 पासून मनपाने केलेला आहे. सदर कामासाठी नगरसेवक निधी, खासदार निधी, पदाधिकारी निधी तसेच शासनाचा निधी खर्च झालेला आहे. ह्या संकुलातील नागरीकांना तेवढी वर्ष मोठा उपयोग होत होता. साधारण 50 कोटी पेक्षा जास्त रक्कमचा खर्च झालेला आहे व ह्या सर्व मोकळ्या जागा गेली 15 वर्षे मनपाच्या ताब्यात आहेत. दि. 18/11/2021 रोजी मनपा प्रशासनाने अधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीमध्ये निर्णय घेवून शहरातील 29 आर.जी. उद्यानातील मुलभूत सोयीसुविधा पुरविणेचे बंद केले व या उद्यानाचा ताबा विकासकाला देवून टाकला यामध्ये प्रामुख्याने शांतीनगर गृहसंकुलाच्या रेखांकनातील मोकळ्या जागांचा समावेश आहे. यासाठी राज्य शासनाचा नगरविकास विभागाकडील दि. 02/12/2020 UDCPR/3422 निर्णयातील तरतुदींचा हवाला देण्यात आला. सदर मोकळ्या जागा विकासक व मनपा यांच्यात झालेला करारनामा दि. 25/01/2014 नुसार पालिकेच्या ताब्यात होत्या. पालिकेच्या ताब्यात असलेले शांतीनगर गृहसंकुलाच्या रेखांकनातील मोकळ्या जागा करारनामा रद्द करुन विकासकाला देऊन टाकल्या आणि ताबा सोडला. करारनामा रद्द करतेवेळी त्या रेखांकनातील भोगवटा प्राप्त गृहसंकुल निर्माण संस्थांना विचारात घेतलेले नाही. राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडून दि. 02/12/2020 UDCPR नियमातील तरतुदीनुसार ह्या जागेवर गृहसंकुलातील रहिवासियांचा आहे. राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडील दि. 02/12/2020 UDCPR 342 तो निर्णयातील तरतुदीनुसार शांतीनगर रेखांकनातील इमारतींचा पुर्नविकास करताना शांतीनगर रेखांकनातील एकूण जागेच्या क्षेत्रफळानुसार चटई क्षेत्राचा लाभ मिळणार नाही. शांतीनगर वसाहत 35 ते 40 वर्ष जुनी असून पूर्ण विकासाच्या प्रतिक्षेत आहे. अशाच प्रकारे शांतीनगर गृहसंकुलात असलेल्या 90 हजार चौ.मी. मोकळ्या जागेचा मोबदला शांतीस्टार विकासकाला मिळावा ह्या उद्देशाने सदर मोकळ्या आर.जी. जागांचा ताबा घाईघाईने विकासकाला दिल्याचे दिसून येत आहे. शांतीनगर गृहसंकुलाच्या रेखांकनातील मोकळ्या जागेवर विकास योजना रस्ते यांचा मोबदला गृहसंकुलातील रहिवाशांना देणे अपेक्षित आहे व त्यांचा तो हक्क आहे. मिरारोड शांतीनगर व शांतीपार्क गृहसंकुलाचा रेखांकना.......

जुबेर इनामदार:-

अनिल सावंतनी जो ठराव केला होता त्याला माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर:-

अनिल सावंतचे जे बोलणे होत ते झाले आहे “ज” चा प्रस्ताव संपलेला आहे. सन्मा. नगरसेवक नगरसेविका ह्यांनी ह्या विषयावर मा. आयुक्त महोदयांना पत्र दिलेले आहे त्यांच्याही काही भावना आहेत त्याची काही मत आहेत त्यांचे काही विचार आहेत ते शहराच्या हिताकरिता आहेत तेव्हा हा विषय पून्हा विषय पटलावर रितसर प्रशासनानी पूढच्या महासभेमध्ये आणावा प्रकरण क्र. १ मध्ये ठेवावा असा मी ह्या ठिकाणी निर्णय घेत आहे. सन्मा. नगरसेविका स्नेहा पांडे नी जो विषय दिलेला आहे तो सुध्दा रितसर विषय पटलावर गोषवा-यासहीत आणावा.

सभागृहात गोधंळ

मा. महापौर:-

पूढच्या वेळेला महासभेसाठी शासनाची मान्यता घेवून या त्या सभागृहामध्ये काय गोंधळ घालायचा तो घाला. मी संक्षम आहे सत्ताधा-यांना पण आणि विरोधकांना पण. ह्याच्यापूढे असेच

ठराव होतील सत्ताधारी आणि विरोधक दोन्ही बाजू घेवून चाललेली आहे पण अशाप्रकारी वातावरण निर्मीती केली तर मी महापौर म्हणून सहन करणार नाही.

प्रशांत दळवी:-

महापौर मॅडम अभय योजनेचे वाचन करा.

संदिप शिंदे:-

सन्मा. महापौर महोदया मिरा भाईदर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर वसूली बाबत नागरिकांना मालमत्ता करात सवलत देणेकरिता अभय योजना लागू करणे बाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे ह्यापूर्वी सुध्दा फेब्रुवारी २०२१ मध्ये अभय योजना आपण दिलेली होती. सर्व सन्मा. विविध लोकप्रतिनिधी ह्यांची मागणी होती की सध्या कोव्हिडची परिस्थिती विचारात घेता नागरिकांना व्याजात मोठया प्रमाणात लागलेले आहे साधारणत: ५० कोटी रू. आपल्या शहरातल्या नागरिकांवर व्याजाची रक्कम वाढलेली आहे कायदयामध्ये तरतूद आहे की प्रकरण ८ कराधर नियम ५१ नूसार नियम ५० खाली आपण जे व्याज लावतो त्या व्याजामध्ये पूर्णत: अथवा अंशता माफ करण्याचा अधिकार मनपाला आहे त्यामूळे प्रशासनाच्या वतीने हा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की दि. १/२/२०२२ ते १५/३/२०२२ पर्यत ह्या कालावधीमध्ये नागरिकांनी थकबाकी व चालू रक्कम भरली तर थकबाकीच्या ७५% माफी देण्यात यावी म्हणजे २५% व्याज प्लस चालू वर्षाची रक्कम जर त्यांनी भरली तर त्यांना ७५% माफ करण्याबाबतचा प्रस्ताव आम्ही सादर केलेला आहे साधारणत: २०२१-२२ मधल्या २८४ कोटीची मागणी आहे त्यामध्ये ११४ कोटी एवढी रक्कम वसूल झालेली असून १७० कोटी वसूल करणे बाकी आहे त्यामध्ये ५० कोटी ही व्याजाची रक्कम आहे त्यामूळे आपण जर नागरिकांना अभय योजना देवून जर सवलत दिली तर १/२/२०२२ ते १५/३/२०२२ पर्यत जास्तीत जास्त नागरिकांनी ह्याचा फायदा घेतला तर त्याच्यामध्ये ७५% माफी देण्याचा प्रस्ताव मी ह्याठिकाणी सादर करत आहे सभागृहाला विनंती आहे की कोव्हिड परिस्थितीची विचार घेता व आपली वसूली वाढविण्याच्या दृष्टीकोनातून सदर मान्यता व्हावी.

प्रशांत दळवी:-

महापौर मॅडम प्रशासनानी जो अभय योजनाचा प्रस्ताव सादर केला गेल्यावर्षाप्रमाणे ह्या वर्षी लागू करावा ह्या प्रस्तावास आमच्य सर्वाचा होकार आहे हा प्रस्ताव आपण मान्य करून घ्यावा जेणेकरून जो व्याजाचा भुर्दड आहे ह्या शहरातील नागरिकांना लागलेला आहे तो गेल्या वर्षीप्रमाणे हया ही वर्षी १/२/२०२२ ते मार्च पर्यत चालू ठेवावे.

मा. महापौर:-

ठीक आहे आपण ही अभय योजना ह्या वर्षी नागरिकांच्या हिताकरिता चालू करीत आहोत त्यामूळे प्रशासनाचे देखील जे काही उत्पन्न राहीले असेल ते मिळेल ह्यासाठी ह्या ठरावाला आपण मंजूरी देत आहोत.

प्रशांत दळवी:-

महापौर मॅडम आपले व मा. आयुक्तांचे खूप खूप आभार.

निला सोंस:-

महापौर मॅडम करोन काल के बिकट परिस्थिती को देखते हूए आज सभी चहॉ है की प्रॉपर्टी टॅक्समें रिहायत मिले यह बिकट परिस्थितीमें विरोधाभास हो रहा है यहॉ माफी की बात कर रहे है छ महिने पहले भी माफ हो चूका है और यहॉ बाकी प्रॉपर्टी टॅक्समें आऊटस्टॅडीग होने में प्रशासन की तरफसे पूरे दल बलके साथ पाणी की लाईन काटी जा रही है जैसा की हम सभी नागरिक प्रॉपर्टी टॅक्स लाता है वो इन्डीव्हयूजवल नाम से आता है सोसयटी की लाईन अगर उनके पास १५ कनेक्शन है तो आज की तारीख में पाच कनेक्शन चालू है जो की पूरी अवैद प्रक्रिया है प्रशासन को जितना जानकारी है जो मैने बिल देखा है उसके हिसाब से यह कहीपर भी नही है इन्डीव्हयूजचल बिल के कारण पूरी

सोसायटी की तो यह अवैद प्रक्रिया पर हम अंकूश नही लगा पा रहे है मिरा भाईदर मनपा एक सूर मे प्रशासन को बोल सकती है की यह कौनसी दादागीरी है आम नागरिको के उपर यह दादागीरी क्यू है आज मनपासे यह रेकॉर्ड लिया है जिन लोगो के प्रॉपर्टी टॅक्स बाकी है जिनमा मालमत्ता कर जादा होता है उनको बकायदा सिल किया जाता है ऐसे व्हॅल्यूऐशनवाले २५ करोड की प्रॉपर्टीज है जिसके उपर आज तक मनपाने कोई कारवाई नही की मतलब इसकी वसूली नही करनी है हौर्डिंग के लिए वसूली नही करनी है बिल्डरोसे ओपन लॅन्ड टॅक्स वसूली नही करनी है मतलब बिल्डरो संरक्षण दिया जा रहा है डिफॉल्टर को संरक्षण दिया जा रहा है और आम नागरिका को परेशान किया जा रहा है जनता जब यह सुनेगी की हम सब माफी की मांग कर रहे है लेकीन अवैद प्रक्रिया पे रोक नही लगा पा रहे है आपकी और हमारी भुमिका क्या रहेगी जब वो मिटर कनेक्शन के लिए जाते है तो चेक एक्सेप्ट नही करते है कॅश लिया जाता है क्योकी अवैद प्रक्रिया में यह चेक कौनसे बँक में डाले यह उनको पता नही है क्योकी अगर चेक लेंगे तो प्रोपर्टी टॅक्स मे जायेगा वॉटर टॅकस में जायेगा यह पता नही है कॅश लेते है और रिकनेक्शन की रसीद देते है रिकनेक्शनकी रसीद देने के बाद भी ग्रूप कनेक्ट नही करते है मतलब पूरी चिटींग जनता के उपर हो रही है यह अन्याय है

संदिप शिंदे:-

सन्मा महापौर महोदया सन्मा सभागृहात जो विषय मांडलेला आहे तो प्रॉपर्टी टॅक्स वसूली करत असतांना जे आपण नागरिकांच्या थकबाकी असतात त्याचे ही आपण नळकनेक्शन करतो त्या संदर्भातला हा विषय आहे मी इथे सन्मा सभागृहाला सांगू इच्छितोा की मालमत्ता कर वसूली करत असताना आपले काही नियम आहेत ह्या प्रध्दतीने २८४ कोटी हयावर्षी करवसूली करायची आहे. आतापर्यत ११७ कोटी झालेली आहे. अजून १६५ कोटी वसूली करायची आहे. माझी सभागृहाला विनंती आहे माझी पूर्ण सभागृहाला विनंती आहे की प्रत्येक नागरिकांना अरेसमेंट करत नाही जो थकबाकीदार मोठा आहे त्याची प्रवृत्तीच आहे की तो पैसे भरत नाहीत अशा सोसायटीना सुचना देतो नोटीस देतो त्यांना सर्व सधी देतो असे सर्व देवून जर तो पैसे भरत नसेल तर आपण त्यांचे नळ कनेक्शन कट करतो ज्याची चालू रक्कम भरायची असेल त्याचे आपण कट करत नाही थकबाकी आहे आणि वारंवार सुचना देवून भरत नाही असेच नळ कनेक्शन करतो आतापर्यत ३ लाख २४ हजार प्रॉपर्टी पैकी फक्त १७२ नळ कनेक्शन कट केलेले होते सन्मा. सदस्योनी जो मुद्दा मांडलेला आहे त्याचे प्रशासन गांर्भियपूर्वक विचार करू कूठल्या नागरिकांना हरेसमेंट होणार नाही ह्याची खबरदारी घेवू परंतू वसूली करत असताोना वसूली मात्र झालीच पाहिजे आपण नळ कनेक्शन कट केले नाही आणि वसुली साठी नागरिकाकडे गेलो नाही तर आपली वसूली होणारच नाही त्यामूळे माझी सर्व सदस्यांना विनंती राहील आपण अभय योजनेला मंजूरी दिलेलीच आहे त्यामूळे १ फेब्रुवारीपासून आपण साधारणता: त्याच्या व्याजावर ७५% माफ करत आहोत ५२ कोटी पैकी ३७ कोटी माफ करणार आहोत १२ कोटी नागरिकांनी भरली तर त्याची पूर्ण थकबाकी माफ होणार आहे चालू वसूली राहणार आहे त्यामूळे माझी सर्व सभागृहाला विनंती राहील आपण पूर्ण प्रसिध्दी करणार आहोत नागरिकांनी अभय योजनेचा फयदा घेवून व्याज माफ करण्यासाठी मूळ रक्कम भरली तर त्यांना सवलत मिळेल आणि नळ कनेक्शन तोडोयचा प्रश्न येणार नाही. मी सभागृहाला ग्वाही देतो की कूठल्याही नागरिकांची हरेसमेंट करणार नाही. परंतू वर्षानुवर्षे पैसेच भरत नसतील तर त्यावेळेला नळ तोडायला लागेल त्यावेळी सर्व सदस्यांनी आम्हाला आणि प्रशासनाला सहकार्य करावी ही विनंती.

मा. महापौर:-

सन्मा. नगरसेविकांनी ज्या काही सुचना केल्या आहेत त्यावर प्रशासनानी लक्ष द्यावे आणि योग्य ती कारवाई करावी. तसेच शहरात लवकरात लवकर अभय योजना कशी लागू होईल त्यासाठी लोकापर्यत पोहोचले पाहिजेत ते आपण करावे.

**प्रकरण क्र. 106 :-**

के अन्वये प्रस्ताव - मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर वसुलीबाबत नागरीकांना मालमत्ता करात सवलत देण्याकरीता अभय योजना लागु करणेबाबत.

**ठराव क्र. 81 :-**

प्रशासनाने अभय योजना लागू करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. मागील वर्षीदेखील महानगरपालिकेने मालमत्ता कर वसुली होण्याच्या दृष्टीने अभय योजना लागू केली होती. सदर योजना लागू करणेचा मुळ उद्दीद्ष्ट म्हणजे महानगरपालिकेची मालमत्ता कराची जी थकबाकी आहे ती वसुल होऊन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढावे. तसेच शहरातील नागरीकांना मालमत्ता करात व्याजाचा भुर्दंड लागलेला आहे तो गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी माफ व्हावा. करिता नागरीकांच्या हिताचे व महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर वसुलीबाबत नागरीकांना मालमत्ता करात सवलत देण्याकरीता अभय योजना लागु करणेस ही महासभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रशांत दळवी:-

परिवहन सदस्या वनिता बने ह्यांचे पती कैलासवासी शंकर बने ह्यांचे अकस्मित निधन झाले आहे त्यांना भारतीय जनता पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पित करतो. तसेच सिंधूताई सपकाळे ह्यांचे देखील अकस्मित निधन झालेले आहे.

**दु:खवठा ठराव क्र. 82 :-**

परिवहन सदस्या वनिता बने ह्यांचे पती कैलासवासी शंकर बने ह्यांचे अकस्मित निधन झाले आहे तसेच सिंधूताई सपकाळे ह्यांचे देखील अकस्मित निधन झालेले आहे. त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. महापौर :-

आजची सभा संपली असे मी जाहिर करते.

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका